
जनमाध्यम

✦ अमरावती, रविवार ८ नोव्हेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ ४२ एक प्रतिष्ठित सवय









या वेळची दिवाळीही देशाच्या वीर जवानांसोबत

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- पंतप्रधाननरेंद्र मोदी यांनी दिवाळी निमित्त व्हिडिओ संदेशाद्वारे देसातील जनतेला दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. दरम्यान, आपण परंपरा कायम ठेवत या वेळची दिवाळीही देशाच्या वीर जवानांसोबतच साजरी करणार आहोत, असेही त्यांनी सांगितले. असल्याचे स्पष्ट केले आहे. दिवाळी निमित्त दिलेल्या आपल्या व्हिडिओ संदेशात पंतप्रधान मोदी म्हणाले, दिवाळीच्या शुभप्रसंगी संपूर्ण देश दिव्यांच्या रोषणाईने उजळून निघतो. प्रकाशाचा हा उत्सव अंधकाराविरुद्धच्या आपल्या संकल्पाचे प्रतीक आहे. आपल्या सर्वांना दिवाळीच्या खूप-खूप शुभेच्छा. आपल्यासाठी हा उत्सव आणि आगामी काळ सुख, शांती आणि समृद्धीने भरलेला असो. मी देखील आपल्याप्रमाणेच मोठ्या उत्साहाने दिवाळी साजरी करतो. आपल्याला माहीतच आहे की, दरवर्षी देशाच्या जवानांसोबत राहणे हा माझा नित्यक्रम आहे. यावर्षीही तो तसाच सुरू राहील. आपल्या सर्वांना दिवाळीच्या खूप-खूप शुभेच्छा.'



पंतप्रधान मोदींचा व्हिडिओ संदेश, देशवासियांना दिल्या शुभेच्छा

उपराष्ट्रपतींची घेतली भेट

आणि धनत्रयोदशीच्या शुभेच्छा -

या विशेष प्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांची शिष्टाचार भेट घेत त्यांना दीवाळीच्या शुभेच्छा दिल्या. तत्पूर्वी, धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर आयुर्वेद आणि आरोग्याची देवता भगवान धन्वंतरी यांना नमन करत पंतप्रधानांनी देशवासीयांच्या निरोगी आणि सुखमय आयुष्यासाठी प्रार्थना केली. प्रत्येक घर आनंदाच्या दिव्याने उजळून निघो, अशा भावनाही त्यांनी सोशल मीडियावरून व्यक्त केल्या.

दहावी, बारावीच्या परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत (राज्य मंडळ) फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये घेण्यात येणा-या दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार बारावीची लेखी परीक्षा ६ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत, तर दहावीची लेखी परीक्षा १५ फेब्रुवारी ते १५ मार्च या दरम्यान होणार आहे. विषयनिहाय सविस्तर वेळापत्रक ६ डिसेंबरपासून राज्य मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी याबाबतची माहिती प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली.

सुटीची सूचना

आज, रविवार दिनांक ८ नोव्हेंबर रोजी लक्ष्मीपूजनानिमित्त दैनिक जनमाध्यम कार्यालयाला सुट्टी राहणार आहे. त्यामुळे उद्या, सोमवार दिनांक ९ नोव्हेंबर रोजी अंक प्रकाशित होणार नाही, याची वाचक, जाहिरातदार व हितचिंतकांनी नोंद घ्यावी.

■ व्यवस्थापक





जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

महायुतीच्या विजयात लप्पीभैय्या आणि त्यांच्या टीमचे विशेष योगदान

आमदार किरण सरनाईक यांनी घरी जाऊन मानले आभार



अमरावती/प्रतिनिधीः-

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार ॲड. किरण रामराव सरनाईक यांनी काल अमरावती येथील प्रसिद्ध समाजसेवक चंद्रकुमार जाजोदिया उर्फ लप्पीभैय्या यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी लप्पीभैय्या तसेच त्यांच्या संपूर्ण टीमची भेट घेऊन महायुतीच्या विजयात त्यांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल विशेष आभार व्यक्त केले.

यावेळी आमदार किरण सरनाईक म्हणाले की, निवडणुकीच्या काळात लप्पीभैय्या आणि त्यांच्या टीमने ज्या समर्पित भावनेने, मेहनतीने आणि निष्ठेने महायुतीच्या समर्थनार्थ कार्य केले, ते निश्चितच उल्लेखनीय आहे. त्यांच्या टीमने दिलेले सहकार्य आणि सक्रिय सहभाग हा विजयाच्या प्रवासातील महत्त्वाचा भाग ठरला.विशेष म्हणजे, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली असतानाही आमदार सरनाईक यांनी लप्पीभैय्या आणि त्यांच्या टीमच्या योगदानाचा आवर्जून उल्लेख केला. महायुतीच्या या विजयामध्ये लप्पीभैय्या आणि त्यांच्या टीमची भूमिका महत्त्वपूर्ण राहिल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

आमदार किरण सरनाईक यांनी स्वतः लप्पीभैय्या यांच्या निवासस्थानी येऊन आभार व्यक्त केल्याने त्यांच्या सामाजिक व संघटनात्मक कार्याची दखल घेतल्याचे मानले जात आहे.

या सदिच्छा भेटीमुळे लप्पीभैय्या आणि त्यांच्या टीममधील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, आगामी काळातही सामाजिक व संघटनात्मक कार्यासाठी नव्या ऊर्जेने कार्य करण्याची प्रेरणा मिळाली आहे.

चांदूर बाजार येथे आर्थिक समावेशन शिबिर उत्साहात

सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ, रि-केवायसी पूर्ण करण्याचे आवाहन



अमरावती/प्रतिनिधीः-

जिल्हा अग्रणी बँकेतर्फे चांदूरबाजार येथे आर्थिक समावेशन शिबीर घेण्यात आले. या शिबिरात बँकेतर्फे सामाजिक सुरक्षांचा लाभ नागरिकांना देण्यात आला. तसेच यावेळी खातेधारकांनी रि-केवायसी पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले. वित्त मंत्रालयाच्या निर्देशानुसार, दि. २१ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत आर्थिक समावेशन अभियान राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात दि. २ नोव्हेंबरपासून या अभियानाची सुरुवात करण्यात आली.

या अभियानाचा एक भाग म्हणून जिल्ह्याची अग्रणी बँक असलेल्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया आणि अग्रणी जिल्हा व्यवस्थापक नरेश हेडाऊ यांच्या पुढाकाराने चांदूर बाजार येथे दि. ५ नोव्हेंबर रोजी आर्थिक समावेशन शिबिराचे आयोजन करण्यात आले.

नागपूर येथील रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या उपमहाप्रबंधक अंजना श्यामनाय अध्यक्षस्थानी होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून नाबार्डच्या जिल्हा विकास व्यवस्थापक रश्मिता पंचाले, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे उपक्षेत्रीय प्रबंधक निखिल रंजन, बँक ऑफ महाराष्ट्रचे आंचलिक व्यवस्थापक महेश डांगे, बँक ऑफ बडोदाचे क्षेत्रिय व्यवस्थापक राजेश कुमार, तसेच सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे सतर्कता अधिकारी राहुलकुमार उपस्थित होते.

श्यामनाय यांनी उपस्थितांना प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, अटल पेन्शन योजना यांसारख्या सामाजिक सुरक्षा योजनांचे महत्त्व सांगितले. तसेच या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. नागरिकांनी बँक खात्यांचे री-केवायसी पूर्ण करण्याचे आवाहन केले.

शिबिरामध्ये सेंट्रल बँक ऑफ इंडिया, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि बँक ऑफ इंडिया यांच्या वतीने सामाजिक सुरक्षा योजनांच्या पात्र लाभार्थ्यांना धनादेशांचे वितरण करण्यात आले. नागरिकांना विविध शासकीय योजनांची माहिती देऊन बँकिंग सेवांचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. निलेश वाघमारे यांनी सूत्रसंचालन केले. अग्रणी जिल्हा व्यवस्थापक नरेश हेडाऊ यांनी आभार मानले.

ग्रामीण पोलिसांकडून १०३ नागरिकांना आनंदाची भेट!

१९.१८ लाखांचे गहाळ मोबाइल मूळ मालकांना परत

-सीईआयआर प्रणालीची मदत

अमरावती/प्रतिनिधीः-

हरवलेला मोबाइल पुन्हा मिळेल की नाही, याची शाश्वती नसते. अनेकदा मोबाइल गहाळ झाल्यानंतर नागरिक त्याची आशाच सोडून देतात. मात्र, अमरावती ग्रामीण पोलिसांच्या विशेष मोहिमेमुळे अशा १०३ नागरिकांच्या हातात त्यांचे मोबाइल पुन्हा आले आहेत. सीईआयआर

पोर्टलच्या मदतीने शोधण्यात आलेल्या या मोबाइलची एकूण किंमत सुमारे १९ लाख १८ हजार रुपये आहे. दिवाळीच्या तोंडावर मिळालेल्या या अनपेक्षित भेटीमुळे संबंधित नागरिकांच्या आनंदात भर पडली आहे. मोबाइल हरवल्यानंतर त्याचा गैरवापर होण्याची भीतीही असते. त्यामुळे गहाळ मोबाइल शोधण्यासाठी तांत्रिक यंत्रणेचा वापर करण्यावर ग्रामीण पोलिसांनी भर दिला. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली ऑक्टोबर महिन्यात जिल्हाभर विशेष मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेसाठी सायबर पोलीस ठाण्यासह जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांच्या स्तरावर विशेष पथके तयार करण्यात आली होती. नागरिकांनी दाखल केलेल्या तक्रारींच्या आधारे सीईआयआर अर्थात सेंट्रल इक्विपमेंट आयडेंटिटी रजिस्टर पोर्टलचा वापर करण्यात आला. मोबाइलचा विशिष्ट आयएमईआय क्रमांक हा शोधमोहिमेतील महत्त्वाचा दुवा ठरला. या क्रमांकाच्या आधारे तांत्रिक विश्लेषण करून विविध ठिकाणी वापरात असलेल्या गहाळ मोबाइलचा माग काढण्यात आला. त्यातून एकूण १०३ मोबाइल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले.

हस्तगत केलेले सर्व मोबाइल पडताळणी केल्यानंतर त्यांच्या मूळ मालकांच्या स्वाधीन करण्यात आले. अनेक दिवसांपासून हरवलेल्या मोबाइलचा पुन्हा ताबा मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम आणि अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाण्याचे निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात ही मोहीम राबविण्यात आली.

जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे अधिकारी आणि अंमलदार सहभागी झाले होते.मोबाइल गहाळ झाल्यास नागरिकांनी तातडीने जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी किंवा CEIR पोर्टलवर माहिती भरावी, असे आवाहन ग्रामीण पोलिसांनी केले आहे

वलगाव रोडवरील अवैध दारूच्या भट्टीवर पोलिसांची धाड



-१.४८ लाखांचा मुद्देमाल जप्त

अमरावती/प्रतिनिधीः-

शहरात अवैध दारू निर्मिती व विक्रीविरुद्ध कारवाई करत गाडगेनगर पोलिसांनी वलगाव रोडवरील ऑर्चिड शाळेच्या मागे नाल्याच्या काठावर सुरू असलेल्या अवैध हातभट्टीवर धाड मारली. या कारवाईत पोलिसांनी एका आरोपीला अटक करून त्याच्याकडून दारू बनवण्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य, कच्चा माल, चार लोखंडी ड्रम, तीन जर्मन मेटलच्या पातेल्या व एक ॲक्सेस मोटारसायकलसह एकूण १ लाख ४८ हजार ९२० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. येथून सापडलेले आठ ड्रम सडलेले मिश्रण पंचांच्या उपस्थितीत नष्ट करण्यात आले.

माहिती नुसार, ६ नोव्हेंबर रोजी दुपारी सुमारे १२.४० वाजता गाडगे नगर पोलीस स्टेशनच्या डीबी पथकाला गुप्त माहिती मिळाली की, वलगाव रोडवरील ऑर्चिड शाळेच्या मागे नाल्याच्या तटबंदीच्या जवळ अवैधरीत्या हातभट्टी लावून दारू बनवण्याची तयारी सुरू आहे.माहिती मिळताच डीबी पथकाने तात्काळ जाऊन छापा मारला. यावेळी नवसारी येथील सिद्धार्थ नगर निवासी रामनाथ कन्हैयालाल वाघमारे (वय ४१) याला दारू बनवण्याची तयारी करताना पकडण्यात आले. आरोपीच्या ताब्यातून मोहा, गूळ आणि फिटकरी मिसळून तयार केलेले आठ ड्रम सडलेले मिश्रण जप्त केले. त्या शिवाय दारू बनवण्यासाठी वापरण्यात येणारे चार लोखंडी ड्रम, तीन जर्मन मेटलच्या पातेल्या, इतर उपकरणे, कच्चा माल आणि आरोपीची ॲक्सेस मोटार सायकल जप्त करण्यात आली. जप्त केलेल्या एकूण मुद्देमालाची किंमत १ लाख ४८ हजार ९२० रुपये आहे. आठही ड्रममधील सडलेले मिश्रण पंचांच्या समक्ष घटनास्थळीच नष्ट करण्यात आले.या प्रकरणात आरोपी रामनाथ वाघमारे याच्याविरुद्ध गाडगेनगर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी हा मागील अनेक दिवसांपासून नाल्याच्या काठावर लपून छपून हातभट्टीची दारू बनवत असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.दिवाळीच्या सणाच्या काळात अवैध दारू विक्री वाढण्याची शक्यता असल्याने पोलिसांनी शहरात विशेष मोहीम राबवली आहे. गाडगेनगर पोलिसांच्या या कारवाईमुळे अवैध दारू विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.पुढील तपास गाडगेनगर पोलीस करत आहेत.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त यशवंत सोळंके ,सहाय्यक आयुक्त निलेश ब्राह्मणे यांच्या मार्गदर्शनात गाडगे नगरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या नेतृत्वात सहाय्यक निरीक्षक संदीप हिवाळे, भारत वानखडे, राजेश गुरले, मतीन शेख, सुशांत प्रधान, धनराज कुमरे, महेश शर्मा, अजय निस्ताने यांनी केली.

सिलेंडर स्फोट झाल्याने घर जळून खाक

-ईश्वर नगरातील घटना



यवतमाळ/प्रतिनिधीः-

शहरातील वडगाव रोड परिसरातील श्रद्धानगर जवळ असलेल्या ईश्वर नगर येथे गॅस सिलिंडरचा भीषण स्फोट होऊन संचाली ढेंगे यांच्या घराला आग लागली. या आगीत संपूर्ण घर जळून खाक झाले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. आज शनिवार ७ नोव्हेंबर रोजी सकाळी ही घटना झाली.

घरातील गॅस सिलिंडर मधून गॅस लीक होत असल्याने सतत गॅसचा वास येत होता. याबाबत त्यांनी घटनेच्या आदल्या दिवशीच संबंधित दत्त गॅस एजन्सीकडे सिलिंडर दाखवून तक्रार नोंदविली होती. मात्र, एजन्सी कडून केवळ वायसर बदलून सिलिंडर जशाच्या तसा परत देण्यात आला होता. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी सिलिंडरचा भीषण स्फोट झाल्याने संपूर्ण घर आगीच्या भक्ष्यस्थानी पडले.स्फोटाची तीव्रता एवढी प्रचंड होती की घरातील दरवाजे व काचा तुटून दूरवर फेकल्या गेल्या. शेजारी असलेल्या शाळेच्या काचांचेही नुकसान झाले. घरातील किचन, बेडरूम आणि हॉल मधील धान्य, कपडे, गाद्या तसेच इतर सर्व जीवनावश्यक साहित्य जळून खाक झाले.

स्फोटाचा आवाज एवढा मोठा होता की परिसरातील शंभर ते दोनशे मीटर अंतरावरील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान, प्रशांत शिरभाते यांनी जळत असलेले सिलिंडर घराबाहेर काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, सिलिंडरने अधिकच पेट घेतल्याने त्यांनी प्रसंगावधान राखत स्वतःचा जीव वाचविण्यासाठी घराबाहेर धाव घेतली. घटनेची माहिती मिळताच नगरपालिकेच्या अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणली. दरम्यान, सिलिंडर मधून गॅस गळती होत असल्याची तक्रार करूनही योग्य तपासणी व दुरुस्ती झाली होती का, याबाबत प्रश्न उपस्थित होत असून गॅस एजन्सीच्या निष्काळजीपणामुळे ही घटना घडली का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

ई-बाइकला वाचविण्याच्या प्रयत्नात ऑटो उलटला

इर्विन चौकातील घटना, चिमुकलीसह महिला प्रवासी ऑटोखाली

-नागरिक आणि वाहतूक पोलिसांच्या तत्परतेने मोठा अनर्थ टळला



अमरावती/प्रतिनिधीः-

गजबजलेल्या इर्विन चौकात शनिवारी दुपारी काही क्षणांसाठी भीतीचे वातावरण निर्माण झाले. ई-बाइकला वाचविण्याच्या प्रयत्नात एका ऑटो रिक्षाचे नियंत्रण सुटले आणि रिक्षा रस्त्यावरच उलटली. या ऑटोमध्ये काही महिन्यांची चिमुकली आणि चार ते पाच महिला प्रवासी होत्या. रिक्षा उलटल्याने त्या खाली दबल्या, तर ई-बाइकवरील दोन महिला रस्त्यावर फेकल्या गेल्या. मात्र, घटनास्थळी धाव घेतलेल्या नागरिकांनी आणि वाहतूक पोलिसांनी तत्परतेने मदत केल्याने सर्वजण सुदैवाने बचावले.

राजकमल चौकातील रेल्वे उड्डाणपूल बंद असल्याने सध्या शहरातील वाहतुकीचा मोठा भार इर्विन चौकातून वळविण्यात आला आहे. परिणामी या परिसरात दिवसभर वाहनांची वर्दळ असते. शनिवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास चौकातील सिग्नल लाल झाल्याने विविध दिशांनी येणारी वाहने थांबली होती. याच वेळी सांस्कृतिक भवनाकडून खापर्डे बगीच्याकडे जाणारी एमएच २७ बीडब्ल्यू ८४३५ क्रमांकाची ऑटो रिक्षा चौकातून जात होती. त्याचदरम्यान निळ्या रंगाची ई-बाइक अचानक समोर आल्याने ऑटोचालकाने तिला वाचविण्यासाठी प्रयत्न केला. मात्र, या प्रयत्नात रिक्षावरील नियंत्रण सुटले आणि ऑटो ई-बाइकच्या दिशेने उलटला.

ऑटो उलटताच त्यातील महिला प्रवासी आणि चिमुकली खाली दबल्या गेल्या. ई-बाइकवरील दोन्ही महिलाही रस्त्यावर पडल्या. अचानक घडलेल्या या घटनेमुळे चौकातील वाहनचालक आणि पादचाऱ्यांमध्ये एकच गोंधळ उडाला. सिग्नलवर थांबलेल्या नागरिकांनी प्रसंगावधान राखत तातडीने मदतीसाठी धाव घेतली. कर्तव्यावर असलेल्या वाहतूक पोलिसांनीही बचावकार्यात सहभाग घेतला. नागरिक आणि पोलिसांनी एकत्रित प्रयत्न करून उलटलेली रिक्षा सरळ केली. त्यानंतर त्याखाली अडकलेल्या महिला आणि चिमुकलीला सुरक्षित बाहेर काढण्यात आले. या अपघातात कोणालाही गंभीर दुखापत झाली नसल्याची माहिती आहे. गर्दीच्या चौकात घडलेल्या या दुर्घटनेत मोठी जीवितहानी टळल्याने उपस्थितांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

शेजा-याने सेवानिवृत्त कर्मचाऱ्याला लावला ४५.९० लाखांचा चूना

आधार-पॅनची माहिती घेऊन टप्प्याटप्प्याने उडवले ४५ लाख ९० हजार

अमरावती/प्रतिनिधीः-

शेजाऱ्यावर वर्षानुवर्षे दाखवलेला विश्वास एका सेवानिवृत्त बँक कर्मचाऱ्याला चांगलाच महागात पडला. ऑनलाईन ऑडिट आणि इन्कम टॅक्सच्या कामात मदत करण्याच्या बहाण्याने आरोपीने आधी सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचा विश्वास संपादन केला आणि नंतर त्यांच्या बँक खात्यातून वेगवेगळ्या वेळी एकूण ४५ लाख ९० हजार ७७ रुपये काढून मोठी फसवणूक केली. बँक खात्यातील रक्कम सातत्याने कमी होत असल्याचे लक्षात आल्यानंतर संबंधितांनी आरोपीकडे विचारणा केली असता, त्याने संपूर्ण रक्कम परत करण्याचे लेखी आश्वासन दिले. मात्र, वेगवेगळ्या तारखा देऊनही त्याने पैसे परत केले नाहीत. अखेर पीडिताच्या तक्रारी वरून पोलिसांनी आरोपी विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

ही घटना राजापेठ पोलीस ठाणे हद्दीतील एकनाथ विहार, शंकर नगर येथे समोर आली आहे.माहितीनुसार तक्रारदार राम प्रल्हादराव वाजपे (वय ७४) हे सेवानिवृत्त बँक कर्मचारी असून त्यांच्या पत्नीही पेन्शनधारक आहेत. तक्रारदारांचे पेन्शन बँक ऑफ महाराष्ट्र, जवाहर रोड शाखा, अमरावती येथे जमा होते.

या चलाखीच्या प्रकरणातील आरोपी रविंद्र पळसोदकर (वय २४, उमरसरा जि.यवतमाळ) हा त्यांचा शेजारी आईसोबत भाड्याने राहतो. सन २०१८ पासून दोघांची ओळख होती. याच ओळखीचा फायदा घेऊन आरोपीने हळूहळू तक्रारदारांचा विश्वास संपादन केला.आरोपीने तक्रारदारांना सांगितले होते की, तो ऑनलाईन ऑडिट व इन्कम टॅक्सचे काम करतो. या बहाण्याने तो वेळोवेळी राम वाजपे यांच्या ऑनलाईन कामांमध्ये मदत करत असे. दीर्घकाळ मदत केल्यामुळे राम वाजपे यांचा त्याच्यावर पूर्ण विश्वास बसला होता.

याच दरम्यान ऑनलाईन प्रक्रियेत मदत करण्याच्या बहाण्याने आरोपीने तक्रारदारांचे



आधार कार्ड व पॅन कार्डची माहिती मिळवली. त्यानंतर तक्रारदारांना विश्वासात ठेवून त्याने त्यांच्या बँक खात्यातून वेगवेगळ्या वेळी मोठी रक्कम इतर खात्यांमध्ये वळती केली. बँक खात्याच्या व्यवहाराची माहिती नसल्यामुळे सुरुवातीला तक्रारदारांना या गडबडीचा अंदाज आला नाही.काही काळानंतर राम वाजपे यांनी आपल्या बँक खात्यातील जमा रक्कम सातत्याने कमी होत असल्याचे पाहिले. त्यांना संशय आल्यावर त्यांनी आरोपीकडे विचारणा केली असता, त्याने सुरुवातीला टाळाटाळ केली. मात्र, चौकशीअंती आरोपीने बँक खात्यातून मोठी रक्कम काढल्याची माहिती समोर आली.तपासादरम्यान असे समोर आले की, आरोपी रविंद्र पळसोदकर याने कथितरीत्या त्यांच्या खात्यातून एकूण ४५ लाख ९० हजार ७७ रुपये वेगवेगळ्या वेळी ट्रान्सफर केले आहेत.राम वाजपे यांनी आरोपीकडे या रकमेबाबत जाब विचारला असता, आरोपीने पैसे घेतल्याची कबुली देत संपूर्ण रक्कम परत करण्याचे लेखी आश्वासन दिले. त्याने वेगवेगळ्या तारखांना रक्कम परत करण्याचा विश्वास दिला, मात्र ठरलेली मुदत उलटूनही त्याने एकही रुपया परत केला नाही.अखेर पीडितांनी राजापेठ पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी आरोपी रविंद्र पळसोदकर याच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, आपले आधार, पॅन, बँक खाते, ओटीपी आणि पासवर्डची माहिती कितीही ओळखीची व्यक्ती असली तरी कोणालाही देऊ नका. बँक स्टेटमेंटची वेळोवेळी तपासणी करत राहा. पेन्शन खात्यातून असामान्य रक्कम निघाल्यास तात्काळ बँक व पोलिसांना कळवा.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
paper www.janmadhyam.com

अयोध्येत ३० लाख दिवे लावले, फटाक्यांची आतषबाजीही केली

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- आज अयोध्येत १० वा दीपोत्सव साजरा होत आहे. सरयू नदीच्या काठावरील ५६ घाटांवर जवळपास ३० लाख दिवे लावण्यात आले.राम की पैडी आणि सरयू घाटावर लेझर शोद्वारे रामायणाचे चित्रण करण्यात आले. २,१०० ड्रोनचा वापर करून एक विशेष शो आयोजित करण्यात आला होता. सरयू नदीच्या काठावर २,१४७ पुजाऱ्यांनी सरयूची महाआरती केली. यानंतर आतषबाजी करण्यात आली.यापूर्वी, अयोध्येत सुमारे तीन तास शोभायात्रा काढण्यात आली. यामध्ये रामायणाच्या सात अध्यायांचे चित्रण करणारे २१ चित्ररथ समाविष्ट होते.मुंबई, गुजरात आणि बिहारसह देशभरातून लोक दीपोत्सव पाहण्यासाठी आले होते. उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह अनेक मंत्रीही उपस्थित होते.मुख्यमंत्री योगी म्हणाले, '२०१७ मध्ये उत्तर प्रदेशची अर्थव्यवस्था कोलमडली होती. कर्मचाऱ्यांचे पगार देण्यासाठीही पुरेसा पैसा नव्हता. मागील सरकारांच्या एका सिंडिकेटने सरकारी तिजोरी लुटली होती आणि परदेशात मालमत्ता खरेदी केली होती.'पहिल्या दीपोत्सवात केवळ २५,००० दिवे लावण्यात आले होते. दिव्यांची संख्या वाढल्याने राज्याची समृद्धीही वाढली. यावेळी, राज्याच्या आर्थिक समृद्धीचे प्रतीक असलेल्या अयोध्येत ३६ लाख दिवे लावले जात आहेत.



अयोध्या फटाक्यांच्या आतषबाजीने उजळून निघाली- दीपोत्सवाच्या निमित्ताने, अयोध्येचे आकाश रंगीबेरंगी फटाक्यांच्या आतषबाजीने उजळून निघाले होते. रामनगरीतील आतषबाजीने उत्सवात आणखी भर घातली. आकाशातून येणाऱ्या रंगीबेरंगी दिव्यांच्या रोषणाईत सरयू नदीचा काठ आणि रामघाटाचे दृश्य डोळ्यांना सुखावणारे होते. मोठ्या संख्येने लोक फटाक्यांच्या आतषबाजीचा आनंद घेण्यासाठी उपस्थित होते.

अयोध्या येथील राम की पैडी आणि सरयू घाटावर लेझर शोने रोषणाई

राम की पैडी आणि सरयू घाटावर एका भव्य लेझर लाईट शोचे आयोजन करण्यात आले होते. हे घाट रंगीबेरंगी दिव्यांनी सजवण्यात आले होते. सरयू नदीकिनारी असलेले ५६ घाट ३० लाखांहून अधिक मातीच्या दिव्यांनी उजळले जातील. यासाठी, घाट दिव्यांनी सजवण्याची तयारी करण्यात आली आहे. दिवाळीच्या पूर्वसंध्येला, अयोध्येत दिव्यांचा दहावा सण साजरा होत आहे. राम की पैडी आणि सरयू नदीच्या काठावर भव्य सोहळा पार पडत आहे. सरयू नदीकिनारी असलेले ५६ घाट ३० लाखांहून अधिक मातीच्या दिव्यांनी उजळून निघतील.दीपोत्सवासाठी रामलल्लाच्या दरबाराच्या सजावटीची तयारी जोरात सुरू झाली आहे. मणिरामदास यांच्या गटाचे उत्तराधिकारी महंत कमलनयन दास शास्त्री, राम मंदिर धार्मिक समितीचे सदस्य आणि श्री राम वल्लभ कुंजचे प्रमुख स्वामी राजकुमार दास, आचार्य मिथिलासनंदानी शरण आणि महंत दिनेंद्र दास यांनी मंदिरात दीपोत्सवाच्या तयारीवर चर्चा केली.

सुरक्षेच्या दृष्टीने अयोध्येची २० झोनमध्ये विभागणी

दीपोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अयोध्येत सुरक्षेची कडक व्यवस्था करण्यात आली आहे. सुरक्षेच्या दृष्टीने संपूर्ण अयोध्येची २० झोन आणि ५३ सेक्टरमध्ये विभागणी करण्यात आली आहे. तसेच पोलिस, सीआरपीएफ, पीएसी, बॉम्ब शोधक पथक आणि अग्निशमन विभागाच्या पथकांनाही सतर्क ठेवण्यात आले आहे. त्यामुळे दीपोत्सवाचा सोहळा सुरक्षित वातावरणात पार पडण्यासाठी प्रशासनाकडून विशेष खबरदारी घेतली जात आहे.



परदेशी लोकांनीही दीपदान केले

शिकागोहून अयोध्येत आलेल्या पॉल आणि शेल्बी यांनीही सरयू नदीच्या काठावर दिवे लावले. त्यांनी सांगितले की, त्यांनी अयोध्येबद्दल अनेक गौरवगाथा ऐकल्या होत्या. आपल्या आई-वडिलांकडून रामनगरीबद्दल ऐकल्यानंतर त्यांनी अयोध्येला भेट देण्याचे ठरवले होते. आज त्यांची ही इच्छा पूर्ण झाली होती.लेझर शो नंतर मुख्यमंत्री योगी यांनी जनतेला संबोधित केले. ते म्हणाले की, जो भारत एकेकाळी अविश्वास, अराजकता, दहशतवाद, नक्षलवाद आणि भ्रष्टाचाराचे प्रतीक मानला जात होता, तो गेल्या १२ वर्षांत पूर्णपणे बदलला आहे.ते म्हणाले, 'नवा भारत विकासाच्या नव्या उंची गाठत आहे. सरकार देशातील प्रत्येक नागरिकाला कोणत्याही भेदभावाशिवाय योजनांचे लाभ देत आहे. आजचा भारत दहशतवादाचे निर्मूलन करत आहे आणि नक्षलवाद संपवत आहे.'

धनत्रयोदशीला १ लाख कोटींची उलाढाल; ७० हजार कोटींच्या सोने-चांदीच्या दागिन्यांचा वाटा

नवी दिल्ली /वृत्तसंस्था- धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर देशभरातील बाजारपेठांमध्ये मोठी उलाढाल होण्याची अपेक्षा असून, देशभरात १ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक व्यापार होण्याचा अंदाज आहे, त्यात ७० हजार कोटी रुपयांच्या सोन्या चांदीच्या दागिन्यांचा वाटा आहे.नवरात्रीपासून दिवाळीपर्यंतच्या संपूर्ण सणासुदीच्या हंगामातील एकूण उलाढाल ७ लाख कोटी रुपयांच्या पुढे जाण्याची शक्यता आहे. म्हणजेच मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे १५ ते १८ टक्के वाढ अपेक्षित आहे. या अंदाजात वस्तूंच्या विक्रीबरोबरच सेवाक्षेत्रातील उलाढालीचाही समावेश आहे, अखिल भारतीय व्यापारी महासंघाने (कॅट) हा अंदाज वर्तवला आहे.अखिल भारतीय ज्वेलर्स आणि सुवर्णकार महासंघाच्या (एआयजेएफ) म्हणण्यानुसार, किमती वाढूनही ग्राहक खरेदी करत आहेत. हलके दागिने, चांदीची नाणी आणि पारंपरिक भेटवस्तूंना मागणी वाढली आहे. सोन्याचे दर वाढले असले तरी ग्राहक आपल्या आवडीनुसार आणि बजेटनुसार खरेदी करत आहेत.



बाजारात १४ आणि १८ कॅरेट सोन्याच्या हलक्या दागिन्यांना पसंती मिळत आहे. चांदीची नाणी, सजावटीच्या वस्तू तसेच मत्स्य, कासव आणि हत्ती यांच्या शुभ प्रतिकृतींनाही मागणी आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत उलाढाल जवळपास १० टक्के अधिक असेल. याशिवाय भांडी, घर सजावटीच्या वस्तू आणि सणासुदीच्या साहित्याचीही खरेदी होत आहे.

राज्यातील ७२ बालगृहांना दणका : मान्यता रद्द!

नागपूर : राज्यातील बालसंगोपन संस्थांच्या मान्यतेबाबत राज्य सरकारने मोठी कारवाई केली असून स्वयंसेवी संस्थांद्वारे चालवल्या जाणाऱ्या ७२ बालगृहांची मान्यता रद्द करण्यात आली आहे. या यादीत मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, पुणे, नागपूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, अहिल्यानगर, जलगांव, नंदूरबार, बीड, लातूर जिल्ह्यातील बालगृहांचाही समावेश आहे. मान्यता रद्द करण्यात आलेल्या नागपुरातील तीन बालगृहांचाही समावेश आहे. विशेष म्हणजे, या तिन्ही संस्थांनी सुमारे दोन वर्षांपूर्वीच बालगृहांचे संचालन थांबविले होते. मान्यतेची मुदत संपल्यानंतर संबंधित संस्थांकडून नूतनीकरणासाठी अर्ज प्राप्त न झाल्याने शासनाने त्यांच्या मान्यता रद्द करण्याचा आदेश काढला.नागपूर शहरात सध्या सात बालगृहे आणि चार शिशुगृहे सुरू असून त्यांची संख्या एकूण ११ आहे. यातील चार बालगृहे सरकारी व्यवस्थापनाखाली, तर तीन खासगी संस्थांकडून चालविली जातात. दुसरीकडे, चारही शिशुगृहांची जबाबदारी खासगी संस्थांकडे आहे. याशिवाय गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या अल्पवयीन मुलांना ठेवण्यासाठी शहरात निरीक्षणगृहही कार्यरत आहे.कोणत्याही स्वयंसेवी संस्थेला बालगृह चालवण्यासाठी नियमांनुसार सरकारकडून च मान्यता घेणे बंधनकारक असते. ती साधारणपणे पाच वर्षांच्या कालावधीसाठी दिली जाते. हा कालावधी संपल्यानंतर, संबंधित संस्थेला विहित प्रक्रियेचे पालन करून मान्यता प्रमाणपत्र नूतनीकरणासाठी अर्ज करावा लागतो. नागपुरातील ज्या तीन बालगृहांची मान्यता रद्द करण्यात आली आहे, ती आधीच बंद झाली होती. संबंधित संस्थांकडून नूतनीकरणासाठी कोणताही अर्ज मिळाला नव्हता. परिणामी, राज्य सरकारने त्यांची मान्यता रद्द करण्याचा आदेश जारी केला.सहा ते १८ वयोगटातील ज्या मुलांना कुटुंबाचे संरक्षण आणि योग्य काळजी मिळत नाही, त्यांना बालगृहांमध्ये आश्रय दिला जातो. ही बालगृहे मुलांच्या राहण्याची सोय, अन्न, शिक्षण, आरोग्यसेवा आणि इतर आवश्यक गरजांची जबाबदारी घेतात. मुलांना केवळ निवारा देणे हा या बालगृहांचा उद्देश नसून शिक्षणाद्वारे आणि मूल्यांच्या संस्काराद्वारे मुलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे हा त्यामागील उद्देश आहे. औपचारिक शिक्षणासोबतच, मुलांच्या सर्वांगीण विकासावर आणि पुनर्वसनावरही भर दिला जातो.

ज्येष्ठ प्रकाशक अनिल मेहता यांचे हृदयविकाराने निधन

कोल्हापूर : मराठी साहित्यविश्वातील प्रकाशन व्यवसायात ठसा उमटवणारे ज्येष्ठ प्रकाशक आणि मेहता पब्लिशिंग हाऊसचे संस्थापक अनिल धोंडीलाल मेहता (वय ८६) यांचे शनिवारी सकाळी कोल्हापुरात हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगी शर्मिला, नातू अखिल, साहिल, कोमल असा परिवार आहे. सायंकाळी पंचगंगा स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.मूळचे कर्नाटकातील निपाणी येथील अनिल मेहता हे पुणे येथे बीकॉमचे शिक्षण घेतल्यानंतर कोल्हापुरात आले. त्यांनी १९६४ मध्ये पुस्तक विक्री व्यवसाय सुरू केला. बंधू उल्हास मेहता यांच्यासमवेत १९६५ मध्ये कोल्हापुरात अजब पुस्तकालय हे दुकान सुरू केले. पुढे १९७६ मध्ये पुणे येथे त्यांनी मेहता पब्लिशिंग हाऊस ही संस्था सुरू केली.डॉ. आनंद यादव यांच्या 'मळ्यावरची मैना' या कथासंग्रहापासून या संस्थेचा प्रवास सुरू झाला. वि. स. खांडेकर, रणजित देसाई, विश्वास पाटील, शिवाजी सावंत, व. पु. काळे, शंकर पाटील, द. मा. मिरासदार, व्यंकटेश माडगूळकर, शांता शेळके, मनोहर माळगावकर, जयसिंगराव पवार यांसारख्या मराठीतील प्रस्थापित लेखकांसोबतच नव्या लेखकांचे साहित्य त्यांनी प्रकाशित केले.रॉबिन कुक, मायकेल क्रायटन, मारिओ पुझो, जॉन ग्रिशम, डॅन ब्राऊन, जेफ्री आर्चर, फ्रेडरिक फोर्सिथ, ली चाईल्ड यांसारख्या जागतिक लेखकांबरोबरच सुधा मूर्ती, तस्लिमा नसरीन, ओशो, किरण बेदी, एस. एल. भैरप्पा, गुलजार, दलाई लामा, मलाला युसुफझाई यांच्यासह इंग्रजी आणि इतर भारतीय भाषांमधील तसेच फ्रेंच, डच यांसारख्या परदेशी भाषांमधील साहित्याचेही मराठी अनुवाद प्रकाशित केले.ए. पी. जे. अब्दुल कलाम आणि सचिन तेंडुलकर यांचे 'प्लेइंग इट माय वे' हे आत्मचरित्र मराठीत आणण्यातही त्यांची महत्त्वाची भूमिका होती. अलीकडेच त्यांनी सुरू केलेल्या नव्या प्रकाशन संस्थेतर्फे ले. ज. एस. पी. पी. थोरात यांच्या 'माझी शिपाईगिरी' यासह दोन ते तीन पुस्तके प्रकाशित केली होती. पहिल्या डीआरएम सक्षम अस्सल मराठी ई-बुक्सची निर्मिती करण्याचा मानही त्यांनी मिळवला. त्यांनी 'मराठी ग्रंथजगत' हे मासिकही सुरू केले.

सोने-चांदीच्या लक्ष्मी मातेच्या मूर्ती खरेदीसाठी ग्राहकांची झुंबड

जळगाव : दिवाळीच्या लक्ष्मीपूजनासाठी जळगावच्या सुवर्णनगरीत ग्राहकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी धन आणि समृद्धीचे प्रतीक म्हणून देवी लक्ष्मीची पूजा केली जाते. याच पार्श्वभूमीवर सोने आणि चांदीच्या लक्ष्मी मूर्ती खरेदी करण्याकडे ग्राहकांचा कल वाढला आहे. सराफा बाजारातील दुकानांमध्ये विविध आकारांच्या आणि आकर्षक नक्षीकाम केलेल्या लक्ष्मी मूर्ती उपलब्ध असून, ग्राहकांकडून आपल्या बजेटनुसार मूर्तींची खरेदी केली जात आहे. विशेष म्हणजे, पूजेसाठी खरेदी करण्यासोबतच या मूर्ती भविष्यातील गुंतवणूक म्हणूनही अनेक ग्राहक पसंती देत आहेत. त्यामुळे दिवाळीच्या पार्श्वभूमीवर जळगावच्या सुवर्णनगरीतील सराफा बाजारात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.



गरज नसेल तर सरकारचे ५ हजार रुपये परत करा

गिरीश महाजनांच्या विधानाची चर्चा

मुंबई/प्रतिनिधी- सध्या राज्यात दुष्काळ पडलाय. राज्यातील ३०४ तालुक्यांमध्ये हा दुष्काळ जाहीर करण्यात आलाय. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना सरकार वेगवेगळ्या माध्यमातून मदत करतंय. दिवाळी चांगली जावी यासाठी सरकारने शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ५००० रुपयांची अग्रीम रक्कम जमा केलेली आहे. आता याच रकमेवरून भाजपाचे नेते तथा मंत्री गिरीश महजान यांनी महत्त्वाचं आवाहन केलंय. ज्या शेतकऱ्यांना या पैशांची गरज नसेल, त्या शेतकऱ्यांनी हे पैसे सरकारला परत करावेत, असं महाजन म्हणालेत. त्यांच्या या विधानाने आता वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले आहे.गिरीश महाजन आज (७ नोव्हेंबर) जळगाव जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. यावेळी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना त्यांनी वरील विधान केले. 'पाच-पाच हजार रुपये सरकारने सर्वच शेतकऱ्यांना मदत केलेली आहे. पण अनेक शेतकरी असे आहेत, ज्यांची आर्थिक स्थिती चांगली आहे. माझ्याकडे सकाळपासून ५० शेतकरी आले. माझ्याही खात्यात सरकारने पाठवलेले पैसे आलेले आहेत, पण मला हे पैसे परत करायचे आहेत, असं या शेतकऱ्यांचं मत आहे. मला या पैशांची आवश्यकता नाही. माझा शेतीपुरक व्यवसाय आहे, असं या शेतकऱ्यांचं मत आहे,' असं महाजन म्हणाले. तसेच ज्या शेतकऱ्यांना ५००० रुपयांची गरज नसेल त्या शेतकऱ्यांनी हे पैसे परत करावेत, असं आवाहनही त्यांनी केलं.



पैशांची गरज नसलेल्या शेतकऱ्यांनी विशेष म्हणजे मी स्वत:देखील हे पैसे सरकारला परत करणार आहे, असं त्यांनी जाहीर केलंय. सध्या सेतकरी संकटात सापडलाय. आर्थिक पातळीवर त्याच्यावर अनेक गंभीर प्रश्न उभे राहिले आहेत. अग्रीम ५००० रुपयांची शेतकऱ्यांना थोडीफार मदत होत आहे. अजूनही दुष्काळाची मुख्य मदत मिळालेली नाही. असे असताना गिरीश महाजन यांनी पैशांची गरज नसलेल्या शेतकऱ्यांना ५००० रुपये परत करा, असे आवाहन केलेय. त्यामुळे या आवाहनाला किती प्रतिसाद मिळणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. महाजनांच्या या आवाहनानंतर विरोधक आक्रमक होण्याची शक्यताही व्यक्त केली जातेय.

एल निनोमुळे पाणीटंचाई अधिकच गंभीर

हैदराबाद /वृत्तसंस्था- एल निनोचा देशावर विनाशकारी परिणाम झाला आहे. सर्वांत आधी एल निनोमुळे पावसाळ्यात पावसाचे प्रमाण कमी झाले आणि नंतर भात व कडधान्यांसारख्या खरीप पिकांचे नुकसान झाले. आता, नजीकच्या भविष्यात, पाण्यावरही संकट येऊ शकते. कारण केंद्रीय जल आयोगाचा ताजा अहवाल हीच आकडेवारी दर्शवत आहे.पावसाळ्यातील दुष्काळाचे आता पाण्याच्या संकटात रूपांतर झाले आहे. कमी पावसाचा थेट परिणाम देशातील प्रमुख धरणे आणि जलाशयांवर झाला आहे, जे आता त्यांच्या क्षमतेच्या ३३ टक्के रिकामे झाले आहेत. दक्षिण भारताला याचा सर्वाधिक फटका बसला आहे, जिथे कर्नाटक आणि केरळमधील जलाशयांमधील पाण्याची पातळी नीचांकी पातळीवर पोहोचली आहे. उत्तर प्रदेश, बिहार आणि महाराष्ट्रातील प्रत्येकी एक धरण आणि जलाशय पूर्णपणे कोरडे पडण्याच्या मार्गावर आहे, म्हणजेच पाणीसाठा शून्य झाला आहे.भारताकडे सध्या जगातील सर्वांत मोठ्या धरण पोर्टफोलिओपैकी एक आहे. सरकारी आकडेवारीनुसार, ६,६२८ धरणांसह भारत जगात तिस-या क्रमांकावर आहे. यापैकी ६,५४५ धरणे कार्यरत आहेत आणि ८३ धरणांचे बांधकाम सुरू आहे. देशात १७८ प्रमुख जलाशय आहेत, ज्यांचे केंद्रीय जल आयोगाद्वारे नियमितपणे निरीक्षण केले जाते. केंद्रीय जल आयोगाच्या ३० एप्रिल २०२६ च्या अहवालानुसार, देशातील १६६ जलाशयांमध्ये एकूण ७१.०८२ बिलियन क्यूबिक मीटर पाणी उपलब्ध होते. हे त्यांच्या एकूण क्षमतेच्या ३८.७२टक्के होते. गेल्या वर्षीच्या तुलनेत आंध्र प्रदेश, तामिळनाडू आणि तेलंगणामध्ये पाण्याची लक्षणीय घट झाली.केंद्रीय जल आयोगाच्या साप्ताहिक बुलेटिननुसार, बिहारमधील चंदन धरण कोरडे पडल्याची बातमी समोर आली. यामध्ये महाराष्ट्रातील भीमा उजनी धरण आणि उत्तर प्रदेशातील मौदाहा जलाशयाचा समावेश आहे. तामिळनाडूमधील अलियार धरणही जवळपास रिकामे झाले आहे. देशातील जवळपास ६० टक्के जलाशयांमध्ये त्यांच्या एकूण क्षमतेच्या निम्म्याहून कमी पाणी आहे.



गोकुळवर ताबा मिळवायचा हेतू नाही

कोरमचा पेच सोडवण्यासाठीच निर्णय

नागपूर/प्रतिनिधी- गोकुळ डेअरीबाबत राहुल गांधींच्या पोस्टवर प्रतिक्रिया देताना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'दुर्दैवाने, काँग्रेस पक्ष अशा टप्प्यावर पोहोचला आहे की, ते सहकारी संस्थेच्या निवडणुकीलाही राष्ट्रीय मुद्दा बनवतात. अलीकडच्या काळात आपण हे पाहत आहोत. त्यांना याला राजकीय मुद्दा बनवायचा आहे, पण आम्हाला यात राजकारण करायचे नाही.''गोकुळ' सहकारी संस्थेच्या निवडणुकीतील वाद आणि त्याबाबत सरकारने घेतलेल्या निर्णयावर भाष्य करताना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'सर्वात आधी हे समजून घेणे आवश्यक आहे की, 'गोकुळ'च्या निवडणुकीनंतर कोणत्याही एका गटाकडे 'कोरम' (गणपूर्ती) पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेली मते नाहीत. जर कोरम पूर्ण झाला नाही, तर अध्यक्ष निवडला जाऊ शकत नाही. त्यामुळे, जर दोन्हीपैकी एकाही गटाने बैठकीवर बहिष्कार टाकला किंवा ते अनुपस्थित राहिले, तर अध्यक्षांची निवड होऊ शकत नाही. जेव्हा अध्यक्षांच्या निवडणुकीची तारीख निश्चित करण्यात आली होती, तेव्हा एक गट अनुपस्थित राहिला. परिणामी निवडणूक होऊ शकली नाही. त्यानंतर हे प्रकरण न्यायालयात गेले असता, न्यायालयाने १० तारखेला



निवडणूक घेण्याचे निर्देश दिले. मात्र, न्यायालयाने असे म्हटलेले नाही की, १० तारखेलाही कोरम पूर्ण झाला नाही, तरीही निवडणूक पार पाडावी. त्यामुळे, जर पुन्हा एकदा कोरम पूर्ण झाला नाही, तर निवडणूक होऊच शकत नाही. 'गोकुळ'चे नियम आणि उपविधी (बायलॉज) तपासल्यास असे दिसून येते की, जर तीन वेळा निवडणूक होऊ शकली नाही, तर सर्व अधिकार पुन्हा 'डीडीआर' (जिल्हा उपनिबंधक) यांच्याकडे जातात. अशा परिस्थितीत, निवडून आलेल्या प्रतिनिधींचे अधिकार संपुष्टात येतात. म्हणूनच, कोरम पूर्ण व्हावा या उद्देशाने, मतदानाचा अधिकार असलेल्या काही व्यक्तींना नामनिर्देशित करण्याची कायदेशीर तरतूद करण्यात आली आहे. कोरम पूर्ण करण्यासाठी आवश्यक संख्याबळ कोणत्याही गटाकडे नसल्यामुळे एक घटनात्मक किंवा कायदेशीर पेच निर्माण झाला होता. तो सोडवण्यासाठीच हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे, राज्य सरकारला 'गोकुळ'वर ताबा मिळवायचा आहे, असा समज पूर्णपणे चुकीचा आहे. 'गोकुळ'मध्ये सुमारे ५,००० मतदार आहेत. ही एका जिल्ह्यापुरती मर्यादित सहकारी संस्था असून, काही तालुक्यांमध्ये तिचा प्रभाव अधिक आहे. केवळ एका संस्थेवर ताबा मिळवण्यासाठी संपूर्ण राज्य सरकार उत्सुक असेल, असे मानण्याचे कोणतेही कारण नाही.'पुढे मुख्यमंत्री म्हणाले की, 'मी एक पाऊल पुढे जाऊन असे म्हणेन की, राज्य सरकारने यात हस्तक्षेप करण्याची अजिबात गरज नाही. आजही माझे असे मत आहे की, जर दोन्ही गट एकत्र बसून काही निर्णय घेऊ शकले, तर कोणालाही नामनिर्देशित करण्याची (नियुक्त करण्याची) गरज पडणार नाही. मग ते एका बाजूला हसन मुश्रीफ किंवा विनय कोरे असोत, किंवा दुसऱ्या बाजूला बंटी पाटील असोत; त्यांनी एकत्र बसून काहीतरी तोडगा काढायला हवा.

स्वातंत्र्याच्या तब्बल ७९ वर्षांनंतर गावात पहिल्यांदाच पोहोचली वीज

४०० कुटुंबांच्या घरात आनंदात साजरी होणार दिवाळी

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- दिवाळी आली की, सर्वत्र रोषणाई दिसते. लोक आनंदाने आपली घरे दिव्यांनी, लाइट्सने सजवतात. मात्र, आपल्याला ऐकूण धक्का बसले, की पश्चिम बंगालमधील एक गाव असेही होते, जेथे स्वातंत्र्यानंतर तब्बल ७९ वर्षांपर्यंत वीज पोहोचलेली नाव्हती! या गावात स्वातंत्र्यानंतर आत्ता कुठे पहिल्यांदा विजेचा दिवा पेटला आहे. यामुळे या ग्रामस्थांसाठी यंदाची दिवाळी विशेष ठरणार आहे. हुगळी जिल्ह्यातील तारकेश्वर विधानसभा मतदारसंघातील अष्टरादत्तपूर ग्रामपंचायतीअंतर्गत येणाऱ्या चकदह गावात स्वातंत्र्यानंतर एवढ्या वर्षांनी वीज पोहचल्याने येथील ४०० आदिवासी कुटुंबांच्या घरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सत्तापरिवर्तनामुळे या गावात वीज पोहचल्याचे बोलले जात आहे - महत्वाचे म्हणजे, पश्चिम बंगालमध्ये झालेल्या सत्तापरिवर्तनामुळे या गावात



वीज पोहचल्याचे बोलले जात आहे. माध्यमांतील वृत्तांनुसार, चकदह गावात विजेचे खांब अनेक वर्षांपूर्वी उभे होते. मात्र, प्रत्यक्ष वीजपुरवठा आता सुरू झाला. स्थानिक भाजप आमदार संतू पाल यांनी निवडणुकीदरम्यान दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करत या कामात पुढाकार घेतला आणि वीज जोडणीचे काम पूर्ण करून घेतले.

४०० आदिवासी कुटुंबांमध्ये उत्साहाचे वातावरण - स्वातंत्र्याच्या एवढ्या वर्षांनंतर का होईना, अंधारात आयुष्य कंठणाऱ्या, चाचपडणाऱ्या चकदह गावातील नागरिकांना अखेर वीज कनेक्शन मिळाले आहे. दिवाळी आणि कालीपूजेच्या आधीच गाव प्रकाशमय झाल्याने ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला आहे. महत्वाचे म्हणजे, एवढ्या प्रतिक्षेनंतर, येथील घराघरात वीज पोहचल्याने, या ४०० आदिवासी कुटुंबीयांसाठी, बंधूंसाठी या वर्षीची दिवाळी ऐतिहासिक असणार आहे. एका नव्या आशेने, उत्साहाने आणि नव्या उमेदीने हे बांधव ही दिवाळी साजरी करणार आहेत.

न्यू गोल्डन इंग्लिश हायस्कूलमध्ये दीपोत्सव साजरा

अमरावती/प्रतिनिधी- बालाजी नगर, मोती नगर वार्ड स्थित न्यू गोल्डन इंग्लिश हायस्कूल, एन. जी. पब्लीक स्कूल तसेच साहिल प्राथमिक व माध्यमिक शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने नव्या नवलाईने नटलेल्या अपूर्व दिवाळी सोहळ्याचे आगळे वेगळे आयोजन करण्यात आले. संस्थेच्या संचालिका जयश्री अनिल आसलकर तसेच मुख्याध्यापिका सारिका माथने यांचे हस्ते पूजन तसेच दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. दिवाळीला आपण सणांचा राजा असे संबोधतो. वसुबारस, धनत्रयोदशी, नरकचतुर्दशी, श्री लक्ष्मीपूजन, बलीप्रतिपदा, दिवाळी पाडवा आणि भाऊबीज अशा विविधतेने नटलेल्या या दीपावलीचे महत्त्व आणि तो दिवस साजरा करण्यामागे असलेली आख्यायिका विद्यार्थ्यांना कळावी या उद्देशाने सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. संस्थेचे असोसिएट डायरेक्टर उत्कर्ष अनिल आसलकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या कार्यक्रमाकरिता सर्व विद्यार्थी, शिक्षक तसेच सर्व कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.कार्यक्रमाच्या दिवशी विद्यार्थ्यांनी तोरण, हार, आकाशदिवे, दिव्यांची रोषणाई आणि रांगोळ्यांनी संपूर्ण शाळा सजविली. शिक्षकांनी आपल्या ओघवत्या वाणीने कथा रूपात विद्यार्थ्यांना दिवाळी सणाचे महत्व सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मदतीने दिवाळीच्या दिवसांचे महत्त्व विषद करणारे नाट्य सादरीकरण केले. दिवाळीचा पहिला दिवस म्हणजे वसुबारस. या दिवशी शेतकरी राजा गायीची तिच्या वासरासह पूजा करतो आणि तिला गोड पदार्थ नैवेद्य स्वरूपात अर्पण करून दूध दुभत्याच्या समृद्धी करीता प्रार्थना करतो. सदर दिवसाचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी नाटकेच्या स्वरूपात केले.

धनत्रयोदशीची संपूर्ण पूजा तसेच नरकचतुर्दशी च्या दिवसाचे महत्व विषद करणारी नृत्य नाटिका विद्यार्थ्यांनी या वेळी सादर केली. दिवाळीचा तिसरा दिवस म्हणजे श्री लक्ष्मीपूजन. या दिवसाचे महत्त्व विषद करताना विद्यार्थ्यांनी स्टेजवर सुंदर दिव्यांची



आरास करून श्री लक्ष्मी मातेची आराधना करीत संस्कृत श्लोक सादर केला. बलीप्रतिपदा हा दिवाळीचा चौथा दिवस. बळीराजा, श्री विष्णूजी यांचा वामन अवतार तसेच गोवर्धन पूजेचा देखावा नाट्यस्वरूपात विद्यार्थ्यांनी सादर केला. भाऊबीज हा दिवाळीचा पाचवा दिवस. या दिवशी यमाची बहीण यमी हिने आपल्या भावाला ओवाळले. ह्या दिवशी सर्व बहिणी आपल्या भावाला तसेच चंद्राला ओवाळतात. या दिवसाचा देखावा पूर्व प्राथमिक वर्गाच्या छोट्या विद्यार्थ्यांनी आपल्या नाट्य सादरीकरणातून अतिशय उत्कृष्ट रीतीने प्रस्तुत केला.

विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना वाव मिळावा याकरिता श्लोक, नृत्य, नाटिका अशा विविध कला प्रदर्शनाकरीता यावेळी विद्यार्थ्यांना मंच उपलब्ध करून दिला गेला. याप्रसंगी विद्यार्थ्यांना प्रदूषण मुक्त दिवाळी साजरी करण्याविषयी आवाहन केले गेले तसेच प्रदूषणाचे दुष्परिणाम सांगणारी नाटिका देखील सादर करण्यात आली. कार्यक्रमानंतर उपस्थित सर्वांना प्रसाद वितरीत करण्यात आला. शाळेच्या संचालिका जयश्री अनिल आसलकर यांनी उपस्थित सर्वांना दिवाळीच्या मंगल शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे शेवटी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ आणि मिठाई वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

दिवाळीचा प्रकाशोत्सव

दिवाळी हा प्रकाशाचा, आनंदाचा, उत्साहाचा आणि मांगल्याचा सण.अश्विन वद्य त्रयोदशीपासून कार्तिक शुद्ध द्वितीयेपर्यंत किंवा शरद ऋतूतील निरोपाची आणि हेमंत ऋतूच्या आगमनाच्या वेळी साजरा होणारा हा दिव्यांचा सण, केवळ एक धार्मिक विधी नसून, सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय दृष्टिकोनातून मानवी जीवन समृद्ध करणारा एक भव्य उत्सव आहे. दीपोत्सव हे भारतीय लोकसंस्कृतीतील सर्वांत मांगल्यदायी पर्व अंगणातील सडा-संमार्जन, नक्षीदार रांगोळी, दारात डोलणारे आकाशकंदील, मिणमिणती पणती, स्वादिष्ट फराळाचा घमघमाट आणि पहाटेचे अभ्यंगस्नान या सर्वांचा एक अकृत्रिम अनुबंध प्रत्येक भारतीयाच्या मनाशी जोडलेला असतो. वर्षभराच्या धकाधकीने, तणावाने आणि आर्थिक विवंचनांनी थकलेल्या मानवी मनाला नवी संजीवनी देणारी आश्वासक पहाट म्हणजे दिवाळी. अंधारावर प्रकाशाने मिळवलेला विजय हे या सणाचे मूळ रूपक असून त्यातील मतितार्थ गहन आहे. सृष्टीच्या नियमानुसार अंधार स्वतःहून अस्तित्वात नसतो. तो प्रकाशाचा अभाव असतो. मानवी जीवनात अज्ञान, भीती, नैराश्य आणि संभ्रमाचे सावट गडद होत गेले की पावले अडखळू लागतात. अशा वेळी आशेचा, ज्ञानाचा आणि विवेकाचा एक छोटासा किरणही त्या काळ्याकभिन्न अंधाराला छेद देऊन प्रकाशाची सोनेरी पहाट घेऊन येतो. उंबरठ्यावरील इवलीशी पणती सोसाट्याच्या वाऱ्यातही शांतपणे प्रकाश पसरवते. तिचा हा संयम आणि जिद्दीचा चिरंतन संदेश भारतीय संस्कृतीच्या शिकवणुकीशी सुसंगत आहे. आजच्या यांत्रिक आणि आभासी युगात हाच संयम आणि विवेक जगाला मार्ग दाखवू पाहात आहे. गेल्या काही वर्षांत जागतिक पटलावर युद्धांचे वणवे आणि पुरवठा साखळीत अडथळ्यांमुळे निर्माण झालेला आर्थिक ताण निवळण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. यंदाचे प्रकाशपर्व एका मोठ्या वैश्विक स्थित्यंतराची आणि आशेच्या किरणांची नांदी घेऊन अवतरले आहे. अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकांचे निकाल लोकशाहीतील सत्तासंतुलनाची ताकद अधोरेखित करणारे ठरले. युद्धखोर धोरणांना मिळालेला हा राजकीय लगाम जागतिक स्तरावर शांततेचे पर्व प्रस्थापित करणारा ठरू शकतो. होर्मुझ सामुद्रधुनीने जगाची झोप उडवली होती. बदललेल्या परिस्थितीत भारतासह चार देशांसाठी होर्मुझ खुली ठेवण्याचा इराणचा पवित्रा अर्थव्यवस्थेसाठी सर्वात मोठी दिवाळी भेट ठरणार आहे. भांडवली बाजारानेही या दोन्ही घडामोडींचे जोरदार स्वागत करत तेजीकडे आगेकूच केली. या जोडीला कच्च्या तेलाच्या भावांमध्ये झालेली घसरण हा दुग्धशर्करा योगच म्हणावा लागेल. तेल किमती नियंत्रणात आल्याचे दूरगामी सकारात्मक परिणाम अर्थव्यवस्थेसह सर्वसामान्यांच्या जीवनमानावर होतात. रुपयाला आंतरराष्ट्रीय बाजारात भक्कम आधार मिळतो.राष्ट्राच्या सामर्थ्याचे एकक असलेल्या परकीय गंगाजळीला सुरक्षितता लाभते. महागाई आटोक्यात येण्यास मदत होते. येणाऱ्या काळात टप्प्याटप्प्याने हे बदल दिसू लागतील, ही आशाच नवी उमेद देणारी आहे. जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये भारताचा विकास दर अग्रस्थानी टिकून आहे. देशातील डिजिटल तंत्रज्ञानाचा अभूतपूर्व विस्तार, कर संकलनातील उच्चांक, महामार्ग-रेल्वेचे जाळे आणि देशांतर्गत उत्पादनाला मिळालेली चालना यामुळे भारताचा आर्थिक पाया पूर्वीपेक्षा कितीतरी पटींनी भक्कम झाला आहे. उत्पादन क्षेत्रात परकीय गुंतवणुकीचा ओघ वाढत असून भारत जागतिक पुरवठा साखळीतील अत्यंत विश्वासार्ह केंद्र म्हणून उदयास आला आहे. अशा भक्कम देशांतर्गत पायाला अनुकूल जागतिक परिस्थितीची साथ मिळाल्यास समृद्धीचा प्रवाह समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पाझरू लागतो. उत्सवाचा खरा मतितार्थ हाच आहे. सणासुदीच्या निमित्ताने बाजारपेठा ग्राहकांच्या गर्दीने ओसंडून वाहत असताना शेतकरी कुटुंबांची दिवाळी कशी साजरी होते आहे, याचेही भान प्रत्येकाने ठेवायला हवे. यंदा दुष्काळामुळे बळीराजा संकटात आहे. त्याच्या व्यथेची दखल घेत आधी राज्य सरकारने आणि आता केंद्र शासनाने थेट खात्यात मदत निधी जमा करून संवेदनशीलतेचे दर्शन घडवले. वर्षातील सर्वांत मोठ्या सणाच्या पूर्वसंध्येला मिळालेला हा आर्थिक आधार त्याच्यासाठी मोठा दिलासा आहे.बळीराजाप्रमाणेच देशांच्या सीमांचे रक्षण करणारे सैनिकही जीवाची बाजी लावून अहोरात्र झटत असतात. या जवानांना दिवाळीच्या दिवशीही 'तैनात' राहावे लागते. या पार्श्वभूमीवर अत्यंत दिलासादायक बाब नुकतीच समोर आली. गेल्या वर्षभरात केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या (सीआरपीएफ) एकाही जवानाला कोणत्याही मोहिमेदरम्यान प्राण गमवावे लागलेले नाहीत. १९७९ नंतरच्या ४७ वर्षांत प्रथमच असे झाले. ही सुवार्ता जवानांच्या शौर्याची आणि शासनाच्या नियोजनबद्धतेची साक्ष देणारी आहे. दुसरीकडे, भारतातील अत्यंत गरिबीचे प्रमाण मागील दशकभरामध्ये २७.१ टक्क्यांवरून २.६ टक्क्यांवर आल्याची माहिती जागतिक बँकेच्या पॉव्हर्टी अँड इक्विटी ब्रीफ अहवालाने समोर आणली. या काळात अंदाजे ४९.६ कोटी लोक गरिबीतून बाहेर आल्याचे हा अहवाल सांगतो. या सर्वांची गुंफण केली असता सकारात्मक बदलांचा, परिवर्तनाचा, आशेचा एक मोठा कॅनव्हास दिसू लागतो. भारतीय संस्कृतीने दीपोत्सवाला व्यक्तिगत आनंदाची चौकट कधीच दिलेली नाही. या उत्सवातून कुटुंब, समाज आणि निसर्गाशी असलेले नाते अधिक दृढ व्हावे हा दिवाळीचा खरा संदेश आहे. आज भौतिक सुख-सोयींची रेलचेल वाढत असताना माणसा-माणसांतील संवाद, आपुलकी आणि विश्वास जपणे अधिक महत्त्वाचे आहे. वैचारिक मतभेदांचे रूपांतर वैमनस्यात होऊ न देणे, सामाजिक सलोखा टिकवणे आणि सार्वजनिक जीवनात विवेकाला प्रतिष्ठा मिळवून देणे ही काळाची गरज आहे.घराघरांत लावले जाणारे दिवे काही काळासाठी परिसर उजळून टाकतात; पण मनामनांत प्रज्वलित झालेली सद्भावनेची ज्योत अनेक पिढ्यांचे जीवन उजळवू शकते.म्हणूनच दिवाळीचा आनंद आपल्या घराच्या उंबरठ्यापलीकडे नेऊन इतरांच्या जीवनातही समाधानाचे क्षण निर्माण करणे गरजेचे आहे. प्रकाश आणि अंधार यांच्यातील संघर्ष हा मानवी जीवनाचा चिरंतन भाग आहे. प्रत्येक पिढीसमोर आव्हानांचे स्वरूप बदलते; परंतु त्यावर मात करण्यासाठी लागणारे धैर्य, आशावाद आणि सामूहिक प्रयत्नांचे महत्त्व कधीही कमी होत नाही. आज भारतासमोर प्रगतीच्या नव्या संधी उपलब्ध होत असताना त्या संधींचे रूपांतर सर्वसमावेशक समृद्धीत करण्याची ऐतिहासिक जबाबदारीही आहे. जागतिक शांततेची आशा, राष्ट्रीय सुरक्षेचा विश्वास आणि आर्थिक उन्नतीची उमेद यांना सामाजिक संवेदनशीलतेची जोड मिळाली, तर येणारा काळ अधिक उज्ज्वल ठरू शकतो. पर्यावरणस्नेही जीवनशैली अंगीकारून, स्थानिक कारागिरांनी बनवलेल्या मातीच्या पणत्यांना प्राधान्य देऊन स्थानिक अर्थकारणाला बळ देणे, हाच या उत्सवाचा खरा राष्ट्रधर्म ठरेल. प्रत्येकाच्या अंतर्मनात एकात्मतेची, विश्वासाची आणि प्रगतीकडे झेपावण्याची ज्योत प्रज्वलित व्हावी, हीच या प्रकाशपर्वाची खरी फलनिष्पत्ती ठरेल. तसेच आपल्या आनंदात दुसऱ्यांना सहभागी करून घेतले, त्यांच्या जीवनातील दुःखाचा अंधार दूर केला, तरच दिवाळीचा हा प्रकाशोत्सव खऱ्या अर्थाने सार्थकी लागेल.

भाजप-शिवसेनेमध्ये रस्सीखेच वाढत आहे!

विधान परिषद निवडणुकीनंतर महायुतीचे काचेचे भांडे तडकले आहे, यात शंका नाही. निवडणुकीनंतर हे तडकलेले भांडे पुन्हा जोडले जाते की पूर्णपणे फुटते, हे लवकरच स्पष्ट होईल.

सध्या महायुतीमध्ये बेबनाव सुरू झाला आहे आणि हा बेबनाव आता टोकाला पोहोचला आहे. अशा परिस्थितीत सरकार चालवणे कठीण होणार आहे, यात शंका नाही. आश्चर्याची बाब म्हणजे शिवसेनेकडून भाजपला आव्हान देण्यात आले आहे. उद्या शिवसेनेचे शिंदे समर्थक बाहेर पडले अथवा त्यांना बाहेर काढले, तरी राज्य सरकार कोसळू शकत नाही. सन २०१४ मध्ये केवळ १२६ जागा भाजपाकडे असतानाही देवेंद्र फडणवीस यांनी पाच वर्षे मुख्यमंत्री म्हणून कार्यभार सांभाळला होता. आता तर १३७ जागा भाजपकडे असताना शिवसेनेने कितीही आदळआपट केली, तरी २०२९ पर्यंत सरकार पडू शकत नाही.

भाजप आणि शिवसेना यांच्यामधील ठिणगीची आग दसरा मेळाव्यानंतर भडकली. दसरा मेळाव्यात रामदास कदम यांनी तर भाजपला आव्हान दिले. भाषणातील जहाल वक्तव्यांमुळे युती तुटते की काय, अशी शंका निर्माण झाली. शिवसेनेचे मंत्री गुलाबराव पाटील आणि उदय सामंत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्री झाले पाहिजेत, अशी भूमिका शिंदे यांच्या उपस्थितीत जाहीर केली. महाराष्ट्र विधानसभेमध्ये भाजप हा क्रमांक एकचा पक्ष असून, शिवसेना शिंदे गट हा क्रमांक दोनचा पक्ष आहे.

शिवसेना (शिंदे गट) यांचे ६३ आमदार आहेत. ज्या-ज्या वेळी संख्याबळाचा प्रश्न निर्माण होतो, त्या-त्या वेळी दोन्ही शिवसेना आक्रमक भूमिका घेत मुख्यमंत्रिपदाची खुर्ची बळकावण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते. २०१९ मध्ये भाजपने मुख्यमंत्रिपद दिले नाही, म्हणून शिवसेनेने काँग्रेसशी घरोबा केला आणि उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले. आता तीच परिस्थिती एकनाथ शिंदे यांच्याकडून निर्माण केली जात असल्याचे दिसते. त्याची पहिली झलक नुकत्याच झालेल्या विधान परिषद निवडणुकीमध्ये दिसून आली. विधान परिषदेच्या पाच जागांसाठी महायुतीमध्ये तडजोड झाली. जागावाटपामध्ये भाजपच्या वाट्याला तीन जागा आल्या, तर शिवसेना एक आणि राष्ट्रवादी काँग्रेस असे जागांचे वाटप झाले. परंतु उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वीच शिवसेनेने बंडाचा झेंडा उगारला. पुण्यामध्ये अपक्ष उमेदवार सानप यांना शिवसेनेने भाजपच्या उमेदवाराविरुद्ध उमेदवारी दिली. परंतु तेथे भाजप उमदेवारापुढे सानप यांची डाळ शिजली नाही. विशेष म्हणजे राष्ट्रवादीला दिलेल्या एका जागेवरही शिवसेनेने एक वेगळी भूमिका घेतली. शिवसेनेचे माजी मंत्री अब्दुल सत्तार यांनी उघडपणे काँग्रेसच्या उमेदवाराला पाठिंबा देऊन प्रचार केला. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला जागा गमवावी लागली. पुण्यामध्येही शिवसेनेच्या धंगेकर यांनी भाजपच्या उमेदवाराविरोधात पॅनल उभे केल्याने तेथेही भाजपच्या उमेदवार जाधव या पराभूत झाल्या. ही संपूर्ण परिस्थिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत घडली. मात्र, त्यांनी यावर कोणताही 'ब्र' काढला नाही. यावरून या निवडणुकीत शिंदे यांची भूमिका भाजपविरोधात होती, हे स्पष्ट झाले आहे.

शिंदे यांच्या दसरा मेळाव्यात त्यांच्या उपस्थितीतच रामदास कदम आणि गुलाबराव पाटील यांनी जाहीरपणे घेतलेल्या भूमिकेमागे शिंदे यांचा त्यांच्यावर वरदहस्त होता, असे दिसून आले. कारण, शिंदे यांनी आपल्या भाषणाच्या शेवटी मुख्यमंत्रिपदाबाबत कोणतीही भूमिका जाहीर केली नाही. याचा अर्थ, या संपूर्ण राजकारणामागील बोलविता धनी कोण आहे, हे त्या मेळाव्यातच स्पष्ट झाले. हे एवढ्यावरच थांबले नाही, तर याबाबतची भूमिका उघडपणे मांडण्यात आली. प्रताप सरनाईक यांनी शिवसेना (शिंदे गट) १४५ जागा जिंकेल, असा दावा केला. या विधानावरून राजकीय वर्तुळात विविध प्रतिक्रिया उमटल्या. आता राजकारण करताना दबावाचे तंत्र वापरले जात असल्याचे दिसते. ज्या उद्धव ठाकरे यांनी एकतर तू राहशील किंवा मी राहीन, अशी टोकाची भूमिका देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर जाहीरपणे घेतली होती, तेच उद्धव ठाकरे व राज ठाकरे आता राजकीय परिस्थितीनुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत एकाच व्यासपीठावर येत आहेत. दबावाचे हे राजकारण देवेंद्र फडणवीस कशा पद्धतीने हाताळतात आणि एकनाथ शिंदे यांच्या राजकीय भूमिकेला कसे उत्तर देतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

हे सर्व सुरू असतानाच मराठा नेते मनोज जरांगे यांनी ५०० कोटींचा बॉम्ब टाकला आहे. या आरोपांच्या भोवऱ्यात शिवसेना (शिंदे गट) सापडल्याचे दिसत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव खा. श्रीकांत शिंदे यांच्याबाबत ५०० कोटी रुपयांचा आरोप केला जात आहे. हे आरोप होत असताना भाजपला लक्ष्य केले जात असल्याचेही दिसून येत आहे. महाराष्ट्रात अशी परिस्थिती असताना एकनाथ शिंदे यांचे दिल्ली दौरे सुरू आहेत. शिवाय, दिल्ली दौऱ्यापूर्वी राज्यातील रुसवे-फुगवेही सुरू असल्याचे दिसून येते. शिंदे यांनी मंत्रिमंडळ बैठकीला उपस्थित न राहणे, संयुक्त उपक्रमांमध्ये गैरहजेरी लावणे, तसेच नाराजीच्या पार्श्वभूमीवर मुंबई सोडून गावी निघून जाणे, अशा घडामोडी घडत आहेत.

विधान परिषद निवडणुकीमध्ये नागपूर येथे भाजपचा झालेला पराभव हा चिंतेचा विषय ठरला आहे. नागपूर हा भाजपचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जात होता. त्यामुळे तेथील पराभव हा भाजपसाठी मोठा राजकीय धक्का असल्याचे प्रतिक्रियांवरून दिसून येते. पुण्यातील पराभवामागे अंतर्गत दुफळीबरोबरच शिक्षण क्षेत्रातील प्रश्नही प्रभावी ठरले आहेत. २०२९ मध्ये भाजपला एकनाथ शिंदे यांच्याकडून मोठे आव्हान निर्माण होऊ शकते. सध्या शिवसेना (शिंदे गट) अंतर्गतरीत्या भाजपच्या विरोधात असल्याचे दिसून येत आहे. मुंबई, ठाणे आणि इतर महानगरपालिकांमध्ये महायुतीचे वर्चस्व असले, तरी शिंदे यांच्या राजकीय खेळीमुळे हे वर्चस्व धोक्यात येऊ शकते.



आश्चर्याची बाब म्हणजे, एकनाथ शिंदे महाराष्ट्रात भाजपच्या विरोधात राजकीय खेळी करत असल्याचे चित्र दिसत असताना दुसरीकडे दिल्लीमध्ये मात्र ते भाजपच्या वरिष्ठ नेत्यांच्या नियमित भेटी घेत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या भेटी शिंदे सातत्याने घेत आहेत. दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांचा आपल्याला पाठिंबा आहे, असे शिंदे नेहमी आवर्जून सांगतात. मात्र, महाराष्ट्रात भाजपच्या सरकारला अडचणीत आणण्याचा प्रयत्न सुरू असेल, तर दिल्लीतील नेते या भूमिकेला किती महत्त्व देतील, हा प्रश्न आहे. सन २०१४ मध्ये प्रारंभी अखंड शिवसेना भाजपच्या विरोधात होती. राष्ट्रवादी काँग्रेसने बाहेरून पाठिंबा देण्याची भूमिका घेतल्याने अखंड शिवसेनेचे राजकीय गणित यशस्वी झाले नव्हते. अखेर काही महिन्यांनंतर शिवसेना भाजपबरोबर सत्तेत सहभागी झाली. त्यावेळी कमी दर्जाची मंत्रिपदे स्वीकारूनही शिवसेनेने भाजपबरोबर जाण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, अर्थसंकल्पाचा प्रश्न उपस्थित झाला, त्यावेळी सत्तेत सहभागी असलेल्या शिवसेनेने विरोधी भूमिका घेतली होती, हे नाकारता येणार नाही. शिंदे यांच्या शिवसेनेतील रामदास कदम, गुलाबराव पाटील आणि गजानन कीर्तिकर हे प्रामुख्याने भाजपविरोधी भूमिका घेत असल्याचे स्पष्ट झाले आहे. विधान परिषद निवडणुकीनंतर महायुतीचे काचेचे भांडे तडकले आहे, यात शंका नाही. निवडणुकीनंतर हे तडकलेले भांडे पुन्हा जोडले जाते की पूर्णपणे फुटते, हे लवकरच स्पष्ट होईल. मात्र, एक गोष्ट निश्चित आहे की, २०२९ पर्यंत भाजपचे महाराष्ट्रातील सरकार कोसळणे शक्य नाही.(साभार-नवशकती)

अरविंद भानुशाली

'ट्रम्प' यांना फाजील आत्मविश्वास नडला!

अमेरिकेत नुकत्याच पार पडलेल्या मध्यावधी निवडणुकीत राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांची धोरणे,राजकीय वर्तणूक आणि त्यांची दोन वर्षांतील कामगिरी यावर मतदारांनी आपली नाराजी व्यक्त केली आहे.रिपब्लिकन पक्षाचा निवडणुकीत झालेला मोठा पराभव त्याची साक्ष देत आहे.डेमॉक्रॅट्सनी प्रतिनिधी गृह आणि सिनेटमध्ये बहुमत मिळवून ट्रम्प यांना मोठाच धडा शिकवला आहे.इतकेच नव्हे तर आजवर रिपब्लिकन पक्षाची भक्कम साथ देणाऱ्या काही राज्यांनी याखेपेच्या निवडणुकीत पक्षाकडे मोठ्या प्रमाणात पाठ फिरवली आहे.

ट्रम्प यांनी आपल्या प्रचारात मतदारांना असे आवाहन केले होते की,निवडणुकीत मी उभा आहे असे समजून मतदान करा.मात्र निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचा पराभव झाल्यानंतर ट्रम्पनी अबाऊट टर्न घेऊन, निवडणुकीत मी उभा असतो तर आम्हाला मोठा विजय मिळाला असता असे हास्यास्पद विधान केले.ट्रम्प यांचे अनधिकृत स्थलांतरितांबाबतचे तसेच आयात शुल्क वाढवण्याचे धोरण, इस्त्रायलच्या नादी लागून इराण विरोधात युद्ध छेडण्याचा त्यांचा चुकीचा निर्णय व अमेरिकेच्या मित्र राष्ट्रांना विश्वासात न घेण्याचे त्यांचे धोरण याचा परिणाम प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेवर झाला.गॅसच्या वाढत्या किंमती, आरोग्य सेवेचा वाढलेला खर्च, गरिबीत झालेली वाढ,महागडे किराणा सामान आणि इराण विरुद्धच्या युद्धामुळे महागलेले डिझेल, यामुळे अमेरिकेतील सामान्य माणूस ट्रम्प



यांच्यावर नाराज होताच.ती नाराजी जनतेने मतपेटीच्या माध्यमातून व्यक्त केली इतकेच.त्यामध्ये समाधानाची बाब म्हणजे ट्रम्पनी मतचोरी झाल्याचा आपला जुना आरोप यावेळी केला नाही.त्यांनी आपला पराभव मान्य केला आणि डेमॉक्रॅट्सना मिळालेल्या विजयासाठी त्यांचे अभिनंदन केले.

'वॉशिंग्टन पोस्ट' या दैनिकाने आयोजित केलेल्या एका सर्वेक्षणात असे आढळून आले की, अमेरिकेतील ५५ टक्के महिला मतदार,४९ टक्के पुरुष मतदार,६७ टक्के तरुण मतदार (१८ ते २४ वयोगटातील) ८३ टक्के आफ्रिकन अमेरिकन्स आणि ६२ टक्के स्पॅनिश भाषिक व एशियन मतदारांनी डेमॉक्रॅटिक पक्षाला मतदान केले.मध्यावधी निवडणुकीपुर्वी प्रसिद्ध झालेल्या बऱ्याच ओपिनियन पोल्समध्ये डेमोक्रॅटिक पक्षाला प्रतिनिधी गृहात पुर्वी पेक्षा जास्त जागा मिळतील असा अंदाज व्यक्त करण्यात आला होता आणि सिनेट मध्ये डेमॉक्रॅट्सना काठावरच बहुमत मिळेल अशी शक्यता वर्तवण्यात आली होती.मात्र पक्षाला प्रतिनिधी गृह आणि सिनेटमध्ये इतका मोठा विजय मिळेल असे भाकीत कुणीच केले नव्हते.मात्र निकाल बाहेर आल्यानंतर अमेरिकेतील प्रमुख वृत्तपत्रांचे मथळे बरेच बोलके होते.'व्होटर्स पनिश ट्रंप बुईथ ड्रॅमॅटिक स्विंग्ज टू डेमॉक्रॅट्स'अशी हेडलाईन वॉशिंग्टन पोस्टने दिली होती.'डेमॉक्रॅट्स रुट जीओपी' (ग्रॅन्ड ओल्ड पार्टी) ही हेडलाईन न्युयॉर्क टाईम्सने दिली होती. आता इतका मोठा पराभव झाल्यानंतर ट्रम्प यांच्या वागण्यात काही बदल होतो का ते पहावे लागेल.

अमेरिकन घटनेनुसार ट्रम्प यांना तिसऱ्यांदा अध्यक्षपदाच्या निवडणुकी साठी उभे रहाता येणार नाही.त्यामुळे ट्रम्प यांच्यासाठी पुढील दोन वर्षे खूपच महत्वाची ठरणार आहेत.रिपब्लिकन पक्षाच्या पराभवाचे खापर ट्रम्प यांच्यावर फोडले जात आहे आणि ते सहाजिकच आहे.ट्रम्प यांच्या मनमानीची किंमत ते भविष्यात मोजणार आहेतच,पण त्यांनी दोन वर्षांत ज्या चुका केल्या त्याचा ताप त्यांच्या पक्षाला सहन करावा लागणार आहे.निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर लगेचच त्यांच्या बद्दल पक्षांतर्गत नाराजी व्यक्त होऊ लागली आहे.थोडक्यात ट्रम्प यांचा या पुढील राजकीय प्रवास सोपा असणार नाही.

अभय गोखले

भाजपचा रडीचा डाव!



भारतीय जनता पक्ष हा एक अजब पक्ष आहे. जो खालपासून वरपर्यंत सत्तेत आहे तरीही लोकशाही वाचवा म्हणून मोर्चे काढत आहे. हे जगातील एकमेव उदाहरण असेल जिथे सत्ताधारी पक्ष विरोधी पक्षाच्या विरोधात मोर्चा काढतो. बरे लोकशाहीची बूज राखायची खरोखर इतकी इच्छा असेल तर गोकुळ प्रकरणात तुमच्या भाजप पॅनलचे १२ विरोधात सतेज पाटील पॅनलचे १३ जण निवडून आल्यावर लगेच तुम्ही सरकारचे (म्हणजे तुमचेच) ५ संचालक का नेमले आणि त्यांना मतदानाचा अधिकार देऊन काय सिद्ध करताय तुम्ही? बरे ते बॅलेट मतदान पद्धतीने आणि लोकशाही मार्गाने निवडणूक लढवून निवडून आले. तुम्हाला खरंच लोकशाहीची पर्वा किंवा काळजी वाटत असती तर हा असला प्रकार तुम्ही केला नसता. गोकुळवर तुम्हाला सत्ता मिळवता नाही आली म्हणून तुम्ही लगेच तुमची सगळी तत्त्व बाजूला ठेवणार आणि म्हणे लोकशाही वाचवा म्हणून मोर्चे काढणार. सध्या महाराष्ट्रात पाण्याचा भीषण दुष्काळ आणि भारतीय जनता पक्षात समजूतदारपणाचा भीषण दुष्काळ एकाच वेळी कसा यावा, याचंच आश्चर्य वाटते!

सत्तेत असताना ते लोकशाही वाचवा म्हणून मोर्चे काढतील आणि स्वतःच लोकशाहीचा गळा आवळतील.यांच्या काळात अतिरेकी हल्ले झाले,कायदा सुव्यवस्था बिघडली म्हणून दहशतवादापासून देश वाचवा यासाठी मोर्चे काढतील. देशाची अर्थव्यवस्था गाळात गेली आहे म्हणून आता अर्थव्यवस्था वाचवा साठी पण मोर्चे काढतील.

भारतीय जनता पक्षाने रडीचा डाव खेळणे बंद करावे. कुठल्या का मार्गाने तुम्ही जे बहुमत मिळवले ते सर्व विरोधी पक्षांनी १२ वर्षे सहन केले मग आता विरोधी पक्षांकडे या देशातील जनता झुकायला लागली आहे तर त्यापुढे भाजपाने पण सहन करायला शिकले पाहिजे !

राज ठाकरे

संवाद

अलर्ट!डेटा सेंटर्स!

अमेरिकेतील डेमोक्रॅट्सच्या निर्णायक विजयामुळे भारतात, विशेषतः महाराष्ट्रात येऊ घातलेली डेटा सेंटर्स अधिक वेगाने बांधली जातील. अमेरिकेतातील विविध राज्यात डेटा सेंटर्सना नागरिकांचा असलेला विरोध मोठा आहे. अनेक ठिकाणी आंदोलने झाली. अजूनही होत आहेत. यात डेमोक्रॅटिक पक्षाचे कार्यकर्ते नेते आणि पाठीराखो आघाडीवर आहेत.

मध्यवर्ती निवडणुकांमध्ये डेमोक्रॅटिक पक्षाकडे काँग्रेस आणि सिनेट दोन्ही सदने आल्यानंतर निवडून दिलेल्या प्रतिनिधींवर डेटा सेंटर्स विरोधी कार्यकर्ते दडपण आणणार हे नक्की.प्रतिनिधींना त्याला प्रतिसाद द्यावाच लागेल. त्यासाठी नवीन आणि पाइपलाइन मध्ये असणाऱ्या डेटासेंटर्स वर पुढचा काही काळ मोराटोरियम म्हणजे तहकुबी.. घातली जाईल अशी बातमी फायनान्शीयल टाइम्सने दिली आहे.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स कंपन्यांचे वापरकर्ते आणि म्हणून रेवेन्यू वाढवण्यासाठी डेटा सेंटर लवकरात लवकर कार्यरत होणे गरजेचे आहे. त्यामुळे एआय कंपन्या इतर देशात लवकरात लवकर डेटा सेंटर बांधून कार्यरत करतील हे उघड आहे.

भारत त्यांच्यासाठी पहिला उमेदवार देश आहे. आणि भारतातील महाराष्ट्रातील राज्यकर्ते त्यांच्यासाठी आधीच पायघड्या घालून तयार आहेत. जगात घडणाऱ्या महत्वाच्या घटनांचा डायरेक्ट परिणाम आपल्या इथे होत असतो तो असा

संजीव चांदोरकर

रविवार , दि. ८ नोव्हेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

उमरसरा येथे नवीन पाइपलाईन जोडणीला अवघ्या दोन दिवसांत गळती..!

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



यवतमाळ, दि . ७ : एकीकडे यवतमाळ जिल्हा दुष्काळाच्या संकटाचा सामना करत असताना नागरिकांना पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरण्याचे आवाहन केले जात आहे. घरासमोर पाणी मारू नका, वाहन धुण्यासाठी पाण्याचा अपव्यय करू नका, अशा सूचना सामान्य नागरिकांना दिल्या जातात. मात्र, दुसरीकडे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या यंत्रणेच्या कामातूनच हजारो लिटर पाणी रस्त्यावर वाहून जात असेल, तर पाणी बचतीचे हे धडे नेमके कोणासाठी, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

शहरातील जुना उमरसरा मार्गावरील त्रिरत्न बुद्ध विहार परिसरात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून मोठ्या व्यासाच्या नवीन पाइपलाईनची जोडणी करण्यात आली आहे. मात्र, ही जोडणी पूर्ण झाल्यानंतर अवघ्या दोन ते चार दिवसांतच पाइपलाईनमधून पाण्याची गळती सुरू झाल्याचे चित्र समोर आले आहे. पाइपलाईनच्या जोडणीची पकड सुटल्याने मोठ्या प्रमाणात पिण्याचे पाणी रस्त्यावर वाहत असून, हे पाणी थेट नाल्यांमध्ये जात आहे. यामुळे पाइपलाईनच्या कामाचा दर्जा आणि जोडणीच्या तांत्रिक गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. विशेष म्हणजे, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आगामी उन्हाळ्यात शहराला पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो. अशा परिस्थितीत पाणीपुरवठ्याच्या यंत्रणेने अधिक दक्षता घेणे अपेक्षित असताना नवीन पाइपलाईनमधूनच पाण्याची नासाडी होत आहे. नवीन काम अवघ्या काही दिवसांतच गळू लागले, तर या कामासाठी वापरण्यात आलेले साहित्य, जोडणीची पद्धत आणि कामाच्या गुणवत्तेची तपासणी झाली होती का, असे प्रश्न उपस्थित होत आहेत. सामान्य नागरिकांच्या घरातील नळाला तोटी नसल्यास किंवा पाणीपट्टी थकीत असल्यास कारवाईची तत्परता दाखविणाऱ्या यंत्रणेकडून सार्वजनिक पाण्याच्या अशा नासाडीबाबत मात्र तितकीच तत्परता दिसणार का? पाणी वाचविण्याच्या सूचना देणाऱ्या प्रशासनाने स्वतःच्या विभागातील पाण्याची गळती रोखण्यासाठी काय उपाययोजना केल्या आहेत, याचे उत्तर देण्याची वेळ आली आहे. नागरिकांना पाणी बचतीचे धडे देण्यापूर्वी प्रशासनाने स्वतःच्या यंत्रणेतील गळती थांबवावी. अन्यथा, एकीकडे पाणीटंचाईची भीती आणि दुसरीकडे रस्त्यावर वाहणारे पाणी, हे विरोधाभासी चित्र यवतमाळकरांच्या संतापात भर घालणारे ठरणार आहे.

गळती रोखण्याबरोबरच कामाची चौकशीही करा!

उमरसरा परिसरातील पाइपलाईन गळती तातडीने दुरुस्त करून पाणीपुरवठा सुरळीत करावा. तसेच संबंधित कामाची गुणवत्ता तपासणी करून जोडणी अवघ्या काही दिवसांत निकामी होण्यामागील कारणांचा शोध घ्यावा. कामात निष्काळजीपणा किंवा निकृष्ट साहित्याचा वापर झाल्याचे आढळल्यास संबंधित कंत्राटदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. दुष्काळ हा केवळ पावसाच्या लहरीपणाचा प्रश्न नाही. उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन आणि जतन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

दिवाळीच्या गोडव्याला भेसळीचा विळखा, मिठाई खाताना सावधान!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ विवेक वानखेडे



यवतमाळ, दि . ७ : दिवाळीचा सण म्हटला की मिठाईची खरेदी आणि आप्तस्वकीयांना गोड पदार्थांची भेट देण्याची परंपरा आलीच. मात्र, यंदा बाजारपेठेतील मिठाईचा गोडवा नागरिकांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वाढती मागणी, व्यापाऱ्यांना मिळणारा अतिरिक्त नफा आणि दुधाच्या उत्पादनाच्या तुलनेत मिठाईच्या निर्मितीत झालेली वाढ पाहता बाजारात भेसळयुक्त खवा, पनीर आणि मिठाई विक्रीचा संशय व्यक्त होत आहे.

त्यामुळे दिवाळीच्या आनंदावर भेसळीचे सावट निर्माण झाले आहे. यवतमाळ शहरात अलीकडच्या काळात मिठाईच्या दुकानांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मोठमोठे मिठाई शोरूम, तसेच एमआयडीसी परिसरातील मिठाई निर्मितीचे कारखाने सुरू झाले आहेत. मात्र, या सर्व ठिकाणी मिठाई तयार करण्यासाठी लागणारा शुद्ध खवा आणि दुधाचा पुरवठा नेमका कुठून होतो, याची तपासणी आवश्यक आहे. जिल्ह्यातील दूध उत्पादन आणि बाजारात उपलब्ध होणाऱ्या मिठाईचे प्रमाण यांचा ताळमेळ तपासल्यास अनेक प्रश्न उपस्थित होतात. बाहेरच्या राज्यांतून भेसळयुक्त खवा आणला जात असल्याचीही माहिती समोर येत आहे. ही बाब गांभीर्याने घेऊन संबंधित खव्याची प्रयोगशाळेत तपासणी होणे गरजेचे आहे. मात्र, दिवाळीचा हंगाम जवळ आलेला असताना अन्न व औषध प्रशासनाकडून मिठाई विक्रेते, उत्पादक आणि खवा पुरवठादारांची व्यापक तपासणी होताना दिसत नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळण्याचा अधिकार कोणालाही नाही. मिठाईतील भेसळ रोखण्यासाठी प्रशासनाने केवळ कागदोपत्री सूचना न देता अचानक धाडी, नमुने संकलन आणि प्रयोगशाळा तपासणीची मोहीम राबवावी. दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. अन्यथा सणाच्या गोडव्याच्या नावाखाली नागरिकांच्या आरोग्याशी गंभीर तडजोड होण्याची भीती आहे.

घरीही घ्या खबरदारी!

भेसळयुक्त पनीर ओळखण्यासाठी आयोडीन टिंचर चाचणीची माहिती दिली जाते. उकळून थंड केलेल्या पनीरच्या तुकड्यावर आयोडीनचे काही थेंब टाकल्यास रंग निळसर होणे हे स्टार्चच्या उपस्थितीचे संकेत असू शकतात. मात्र, ही चाचणी सर्व प्रकारच्या भेसळीची खात्रीशीर तपासणी नाही. त्यामुळे संशयास्पद पदार्थांचे सेवन टाळावे आणि अधिकृत प्रयोगशाळेत तपासणी करून घ्यावी. दूध, खवा, पनीर, रबडी व इतर दुग्धजन्य पदार्थ खरेदी करताना विश्वासार्ह विक्रेत्याची निवड करावी. दिवाळीचा गोडवा आरोग्याला महागात पडू नये, एवढीच खबरदारी प्रत्येक ग्राहकाने घेणे आवश्यक आहे.

थोडक्यात



बालगृहातील मुलांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळणे गरजेचे!

'आनंद मेळ्या'तून चिमुकल्यांच्या सुप्तगुणाना संधी

यवतमाळ : बालगृहातील मुलांनाही समाजाच्या मुख्य प्रवाहात आत्मविश्वासाने वावरता यावे, त्यांच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांच्यातील कौशल्यांना योग्य व्यासपीठ मिळावे, यासाठी केवळ औपचारिक उपक्रम नव्हे, तर सातत्यपूर्ण संधी निर्माण होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ॲड. दामिनी संजय राठोड यांनी केले. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर यवतमाळ येथील शासकीय निरीक्षण गृह व बालगृह (मुलांचे) येथे आयोजित 'आनंद मेळ्या'त त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. महिला व बालविकास विभाग, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय आणि शासकीय बालगृह यांच्या संयुक्त विद्यमाने या मेळ्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळ्यात बालगृहातील मुलांनी स्वतःच्या हातांनी तयार केलेल्या कलाकुसरीच्या विविध वस्तूंचे प्रदर्शन व विक्री करण्यात आली. या वस्तूंमधून मुलांची कल्पकता, मेहनत आणि कलात्मक कौशल्य अधोरेखित झाले. ॲड. राठोड यांनी प्रदर्शनाची पाहणी करून मुलांशी संवाद साधला. मुलांना केवळ सहानुभूतीची नव्हे, तर त्यांच्या क्षमता ओळखून त्या विकसित करण्यासाठी प्रोत्साहन आणि संधी देण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. दिवाळीचा आनंद बालगृहातील मुलांनाही अनुभवता यावा, त्यांना आपुलकीचे वातावरण मिळावे आणि आत्मविश्वास वाढावा, या उद्देशाने सांस्कृतिक कार्यक्रमही घेण्यात आला. यावेळी ॲड. दामिनी राठोड यांच्या वतीने मुलांना दिवाळी फराळ व विविध खाऊचे वाटप करण्यात आले.

प्रसंगी समुपदेशक पूजा राठोड, बाल कल्याण समिती सदस्य ॲड. लीना आडे, सरकारी अभियोक्ता ॲड. चैताली खांद्रे, बालगृह अधीक्षक गजानन जुमळे आणि परिवीक्षा अधिकारी रवींद्र सुरडकर उपस्थित होते.



प्यारे खान यांच्या अबू सालेम भेटीची उच्चस्तरीय चौकशी करा!

अल्पसंख्याक आयोगाच्या अध्यक्षांना पदावरून हटविण्याची विश्व हिंदू परिषदेची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

यवतमाळ : महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी नाशिक कारागृहात १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोटातील दोषी अबू सालेम याची भेट घेतल्याच्या वृत्तावरून वाद निर्माण झाला आहे. या भेटीचे प्रयोजन आणि त्यामागील कारणांची सखोल चौकशी करण्याची मागणी विश्व हिंदू परिषद, यवतमाळ जिल्ह्याच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात ५ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. संवैधानिक पदावर कार्यरत असलेल्या व्यक्तीने गंभीर गुन्ह्यात दोषी ठरलेल्या व्यक्तीची कारागृहात भेट घेणे आणि त्याला मदतीचे आश्वासन दिल्याचा आरोप गंभीर असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. प्यारे खान यांना अध्यक्षपदावरून तात्काळ हटवावे, तसेच या भेटीमागील नेमके कारण, संभाव्य संबंध आणि राष्ट्रहिताशी निगडित बाबींची राष्ट्रीय तपास यंत्रणा (NIA) व केंद्रीय अन्वेषण ब्युरो (CBI) यांच्यामार्फत निष्पक्ष चौकशी करावी, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. यावेळी बजरंग दलाचे यवतमाळ विभाग संयोजक भूपेंद्रसिंह परिहार, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा सहमंत्री विनोद सानप, जिल्हा संयोजक योगिन तिवारी, सहसंयोजक ओम ठाकरे, विनय शर्मा, सुनील धुके, सूरज बिसेन, प्रमोद, राजू नाडे, पवन मोकासे, शुभम मोरे, तुषार गणोरकर, आकाश जयस्वाल, कार्तिक पवार, हरीश श्रीवास यांच्यासह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

आकाशकंदील स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद..! विक्रीतून मिळालेला निधी गरजूंना दान

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



पांढरकवडा, दि . ७ : युवा परिवर्तन क्लब, पांढरकवडा यांच्या वतीने आयोजित आकाशकंदील निर्मिती स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता, कलागुण आणि कल्पकतेला वाव देण्यासोबतच सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून राधिका कोंडापलकुलवार यांनी काम पाहिले. त्यांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या आकाशकंदिलांचे परीक्षण करून त्यांच्या कलाकौशल्याचे कौतुक केले. तसेच दिवाळी हा आनंदाचा आणि प्रकाशाचा सण असून, तो पर्यावरणाला हानी न पोहोचवता साजरा करावा, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. फटाक्यांमुळे होणारे वायुप्रदूषण व ध्वनिप्रदूषण टाळून पारंपरिक पद्धतीने, पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून प्रदूषणविरहित दिवाळी साजरी करण्याचा संदेश त्यांनी दिला. विद्यार्थ्यांनी विविध रंगसंगती, आकर्षक सजावट आणि नाविन्यपूर्ण कल्पनांचा वापर करून सुंदर आकाशकंदील तयार केले. स्पर्धेत विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग लाभला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विविध शाळांतील मुख्याध्यापक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत उत्स्फूर्त सहकार्य केले. स्पर्धेतील विजेत्यामध्ये प्रथम क्रमांकाचे १,००१ रुपयाचे पारितोषिक सुनील झाडे यांनी, द्वितीय क्रमांकाचे ७०१ रुपयाचे पारितोषिक गुंजन वंजारी यांनी, तर तृतीय क्रमांकाचे ३०१ रुपयाचे पारितोषिक आर्या पवार यांनी पटकावले. तसेच प्रोत्साहनपर प्रत्येकी २०० रुपयाचे पारितोषिक ओवी बोरकर, निधी मॅगीडवार आणि अनविका राऊत यांना प्रदान करण्यात आले. या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या आकाशकंदिलांची विक्री करण्यात आली. या विक्रीतून जमा झालेला निधी गोपाळकृष्ण मंदिर परिसरातील गरजू व्यक्तींना मदत म्हणून देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देतानाच सामाजिक संवेदनशीलता, पर्यावरण संरक्षण आणि दातृत्वाची भावना जोपासण्याचा हा उपक्रम ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आयोजक प्रा.डॉ. अमर वंजारी यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, शिक्षक व मुख्याध्यापकांचे सहकार्य आणि सामाजिक उपक्रमाला मिळालेला प्रतिसाद यामुळे स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडली.

राष्ट्र सेविका समितीचा विजयादशमी उत्सव उत्साहात साजरा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



पुसद, दि . ७ : राष्ट्रसेविका समिती, पुसद नगर यांच्या वतीने विजयादशमी उत्सव २०२६ चे आयोजन सोमवार, दिनांक २ नोव्हेंबर रोजी मोतीनगर येथील मारुती मंदिर परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले.

विजयादशमी हा सण हिंदू समाजातील स्वाभिमान, पराक्रम आणि शक्तीचे जागरण करणारा उत्सव आहे. राष्ट्र सेविका समितीचे कार्य विश्वशांती आणि मानवी कल्याणाच्या उद्देशाने प्रेरित असून, समाजात महिलांचे सामर्थ्य, संस्कार आणि राष्ट्रभक्ती जागृत करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य समितीच्या माध्यमातून केले जाते. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सौ. शामल गुध्दटवार हे उपस्थित होत्या, तर प्रमुख वक्त्या म्हणून सौ.लक्ष्मीताई प्रतापवार (पुसद नगर गीत प्रमुख) यांनी मार्गदर्शन केले. यावेळी हिंदू समाजातील प्राचीन काळापासूनच्या पराक्रमी महिलांचे ऐतिहासिक योगदान, त्यांचे शौर्य, त्याग आणि कर्तृत्व यांचे स्मरण करून देण्यात आले. महिलांनी आपल्या संस्कृतीचे जतन करत राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असा प्रेरणादायी संदेश प्रमुख व त्यांच्या भाषणातून यावेळी देण्यात आला. तर अध्यक्षांनी आपल्या उद्बोधनात या कार्यक्रमाच्या माध्यमातून उपस्थितांना राष्ट्रभक्ती, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक एकतेची प्रेरणादायक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन नगर कार्यवाहीका सौ.सोनाली प्रतापवार यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्र सेविका समिती, पुसद नगर यांच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी समितीच्या सेविकांनी परिश्रम घेतले.

'पाटण युवा बेंचमेट्स क्रिकेट टूर्नामेंट २०२६'चा उत्साहात शुभारंभ..!

गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



झरी, दि . ७ : क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासोबतच युवकांमध्ये एकता, संघभावना आणि खिलाडूवृत्ती निर्माण करण्याच्या उद्देशाने पाटण येथे आयोजित करण्यात आलेल्या 'पाटण युवा बेंचमेट्स क्रिकेट टूर्नामेंट २०२६' या भव्य क्रिकेट स्पर्धेचा उद्घाटन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या उद्घाटन सोहळ्याला माजी आमदार वामनराव कासावार ,वीरभद्र पाटील, राम आईटवार ,अरविंद भेदोडरकर, शेखर बोनगीरवार यांच्यासह गावातील अनेक प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित होते. यावेळी गावातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करून गावाचा नावलौकिक वाढविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा आयोजकांच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा आणि कर्तृत्वाचा सन्मान करणे ही निश्चितच कौतुकास्पद बाब असून, अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील तरुणांना आणि विद्यार्थ्यांना नवी प्रेरणा मिळते, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. तसेच आगामी चार दिवस रंगणाऱ्या क्रिकेट सामन्यांसाठी सर्व सहभागी संघांना शुभेच्छा देण्यात आल्या. ग्रामीण भागातील खेळाडूंना आपले कौशल्य दाखविण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणारा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे. क्रीडा, सामाजिक एकोपा आणि गुणवंतांचा सन्मान यांचा सुंदर संगम घडवून आणणाऱ्या या स्पर्धेमुळे पाटण परिसरात क्रीडामय वातावरण निर्माण झाले असून, आयोजकांच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

एसटी आरक्षणची बंजारा समाजाचीमागणी..! आदिवासींच्या सर्व सवलती द्या !!

हिवाळी अधिवेशनात शासन निर्णय काढण्याची आमदार किसनराव वानखेडे यांच्याकडे मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



उमरखेड, दि . ७ : बंजारा समाजाला अनुसूचित जमातीचे (ST) आरक्षण मिळेपर्यंत आदिवासी विकास विभागांतर्गत राज्य व केंद्र शासनाच्या अनुसूचित जमातींसाठी लागू असलेल्या सर्व सवलती, सुविधा व योजना बंजारा समाजाला लागू कराव्यात. यासाठी आगामी हिवाळी अधिवेशनात शासन निर्णय (GR) काढण्याची मागणी गोर सेना व बंजारा समाजाच्या वतीने आमदार किसनराव वानखेडे यांच्याकडे दि. ७ रोजी निवेदनाद्वारे करण्यात आली.

बंजारा समाजाला एसटी आरक्षण मिळावे, या मागणीसाठी गेल्या अनेक वर्षांपासून राज्यभर विविध लोकशाही मार्गाने आंदोलने करण्यात आली आहेत. महामोर्चे, आमरण व साखळी उपोषणे, रास्तारोको तसेच ग्रामपंचायतींचे ठराव करून शासनाचे लक्ष वेधण्यात आले. आंदोलनादरम्यान सहा युवकांनी आत्मबलिदान दिल्याचा दावा निवेदनात करण्यात आला असून, अद्याप ठोस निर्णय न झाल्याने समाजात नाराजी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. निवेदनात चार प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. एसटी आरक्षण मिळेपर्यंत अनुसूचित जमातींच्या सर्व योजना व सवलती बंजारा समाजाला लागू कराव्यात, न्यायमूर्ती तहलियानी समितीच्या शिफारशी केंद्र शासनाकडे तातडीने पाठवाव्यात, आत्मबलिदान केलेल्या युवकांच्या कुटुंबांना प्रत्येकी १० लाख रुपयांची मदत व एका सदस्याला शासकीय नोकरी द्यावी, तसेच आंदोलनकर्त्यांवरील गुन्हे विनाशर्त मागे घ्यावेत. निवेदनात हैदराबाद गॅझेटिअर, १० जानेवारी १९५० रोजीची सेंट्रल प्रोव्हिन्स अँड बेरारची अधिसूचना तसेच विविध आयोगाच्या अहवालाचा दाखला देत बंजारा समाजाच्या एसटी आरक्षणाच्या मागणीचा पुनर्विचार करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच तहलियानी समितीचे कामकाज कोणत्या टप्प्यावर आहे, समितीचा अहवाल कधी सादर होणार आणि केंद्राकडे शिफारस कधी पाठविण्यात येणार, याबाबत शासनाने स्पष्टता द्यावी, अशी मागणी करण्यात आली. एसटी आरक्षणाचा अंतिम निर्णय होईपर्यंत शिक्षण, रोजगार, आर्थिक विकास आणि आदिवासी विकासाच्या योजनांचा लाभ बंजारा समाजाला मिळावा, यासाठी शासनाने तातडीने GR काढावा आणि हिवाळी अधिवेशनात या प्रश्नावर ठोस भूमिका घ्यावी, अशी विनंती आमदार वानखेडे यांना करण्यात आली आहे.

दुष्काळात शेतकऱ्यांना पाच हजारांची मदत, अधिकाऱ्यांसाठी मात्र लक्झरी वाहनांची खरेदी!

यवतमाळ, दि. ७ : जिल्ह्यात दुष्काळाचे सावट दिवसेंदिवस गडद होत असताना शेतकऱ्यांची पिके करपली, हाती आलेले उत्पन्न कवडीमोल भावाने विकण्याची वेळ आली आणि शेतमालाला हमीभावही मिळत नसल्याने बळीराजा आर्थिक संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत शासनाकडून पाच हजार रुपयांची अग्रिम मदत देऊन शेतकऱ्यांप्रती संवेदनशीलतेचा आव आणला जात असताना, दुसरीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसाठी अत्याधुनिक सुविधांनी युक्त लक्झरी वाहनांची खरेदी होत असल्याचे चित्र समोर आले आहे. त्यामुळे प्रशासनाच्या प्राधान्यक्रमावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांमध्ये निधीअभावी विकासकामे रखडल्याची ओरड सुरू आहे. डीपीटीसीचा निधी उपलब्ध होत नसल्याने अनेक प्रस्ताव आणि फाईली कार्यालयातील रॅकमध्ये धूळ खात पडल्या आहेत. अनेक विकासकामे अपूर्ण असून, शंभर टक्के कामे करूनही ठेकेदारांची देयके प्रलंबित असल्याच्या तक्रारी आहेत. बिलांच्या भुगतानासाठी दहा टक्क्यांच्या सूत्राची चर्चा ठेकेदारांमध्ये सुरू आहे. मात्र, या आर्थिक अडचणींच्या पार्श्वभूमीवर बांधकाम विभागाकडून अधिकाऱ्यांच्या सुविधांसाठी नवीन वाहनांना प्राधान्य दिले जात असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, यवतमाळ शहरासह ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय आहे. ठिकठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य असून, वाहनधारकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. अपघातांचा धोका आणि नागरिकांचा त्रास कायम असताना रस्ते दुरुस्तीपेक्षा अधिकाऱ्यांच्या प्रवासासाठी लक्झरी वाहनांची व्यवस्था महत्त्वाची ठरत असल्याचे चित्र आहे. अधिकाऱ्यांचा प्रवास शॉकप्रूफ; जनतेचा प्रवास खड्ड्यांतूनच! हा विरोधाभास प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर बोट ठेवणारा आहे. अधिकाऱ्यांसाठी नवीन वाहनांची खरेदी करण्यापूर्वी उपलब्ध शासकीय वाहनांचा वापर आणि त्यांची आवश्यकता तपासली का? वाहन खरेदीचा खर्च किती? रस्ते दुरुस्ती आणि रखडलेल्या कामांसाठी निधी कधी उपलब्ध होणार? दुष्काळात शेतकऱ्यांच्या अडचणींपेक्षा अधिकाऱ्यांच्या सुविधांना प्राधान्य का? या प्रश्नांची उत्तरे सार्वजनिक बांधकाम विभागाने द्यावीत, अशी मागणी होत आहे. आता लोकप्रतिनिधी आणि प्रशासन या विरोधाभासाकडे गांभीर्याने पाहणार की अधिकाऱ्यांच्या गाड्या नव्या आणि जनतेचे रस्ते जुन्याच खड्ड्यांत राहणार, हा खरा सवाल आहे.

आगीत संसार राख, माणुसकीचा हात धावला!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



पांढरकवडा, दि . ७ : केळापूर तालुक्यातील साखरा रोड येथे घराला लागलेल्या आगीत संसारोपयोगी साहित्य, कपडे, धान्य आणि जीवनावश्यक वस्तू गमावलेल्या वृद्ध मेश्राम दाम्पत्याच्या मदतीला व्हिसल ब्लोअर व जिंदल पुरस्कार विजेते रजनीकांत डालूरामजी बोरेले धावून आले. शासकीय मदतीच्या प्रतीक्षेत असलेल्या या दाम्पत्याला त्यांनी आर्थिक मदतीसह जीवनावश्यक साहित्य देत माणुसकीचा प्रत्यय दिला.

कवडू महादेव मेश्राम आणि मंगला मेश्राम यांचे घरकुलाचे बांधकाम सुरू असल्याने ते तात्पुरत्या टिनपत्रीच्या खोलीत राहत होते. मागील आठवड्यात अचानक लागलेल्या आगीत त्यांचा संपूर्ण संसार जळून खाक झाला. मर्यादित उत्पन्न आणि वृद्धापकाळात उभे ठाकलेले हे संकट त्यांच्या जगण्यालाच हादरा देणारे ठरले. नर्सिंग राठोड यांनी या दाम्पत्याची परिस्थिती बोरेले यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर ५ नोव्हेंबर रोजी बोरेले यांनी स्वतः मेश्राम यांना बाजारात नेऊन त्यांच्या पसंतीने साड्या, ब्लाऊज, पँट व शर्ट खरेदी करून दिले. तसेच दोन महिन्यांचा किराणा, धान्य, तेल, ब्लँकेट, मातीचे दिवे आणि रोख आर्थिक मदतही केली. दिवाळीत फटाक्यांपेक्षा जगण्यासाठी आवश्यक वस्तूंनाच प्राधान्य देत त्यांनी मदतीचा हात पुढे केला. आगीत घर जळाले, संसार उद्ध्वस्त झाला मात्र अशा संकटात माणुसकीची ऊब देणारी माणसे अजूनही समाजात आहेत, हे बोरेले यांच्या कृतीने अधोरेखित केले. केवळ सहानुभूती व्यक्त न करता प्रत्यक्ष मदतीसाठी पुढे येण्याचा त्यांचा हा उपक्रम चर्चेचा विषय ठरला आहे.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

दिवाळीसाठी फटाके फोडण्याकरिता १२ ठिकाणे निश्चित

अमरावती/का.प्र.

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर शहरातील वायुप्रदूषणाला आळा घालण्यासाठी तसेच नागरिकांना स्वच्छ व निरोगी वातावरणाचा हक्क मिळावा, या उद्देशाने अमरावती महानगरपालिकेने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. दिवाळीदरम्यान फटाके व आतषबाजी करण्यासाठी शहरातील पाच झोनअंतर्गत एकूण १२ ठिकाणे सामुदायिक फटाके फोडण्याकरिता निश्चित करण्यात आली आहेत. यासंदर्भात महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी विस्तृत कार्यालयीन आदेश निर्गमित केला आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या रिट याचिका क्रमांक ६७२/२०१५ मधील निर्देश तसेच विक्री व आतषबाजीसंदर्भातील मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने हा निर्णय घेण्यात आला आहे. महानगरपालिका क्षेत्रातील वायुप्रदूषणाचे दुष्परिणाम कमी करणे, स्वच्छ पर्यावरण राखणे आणि मानवी हक्कांच्या दृष्टीने नागरिकांचे आरोग्य जपणे, हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश आहे. वैयक्तिक पातळीवर फटाके फोडण्याऐवजी सामुदायिक स्वरूपात निश्चित ठिकाणी फटाके फोडण्यास प्राधान्य देण्याबाबत प्रशासनाने निर्देश दिले आहेत.



महानगरपालिकेच्या उपअभियंत्यांनी झोन क्रमांक १ ते ५ अंतर्गत आगामी दिवाळीसाठी फटाके फोडण्याकरिता सामुदायिक ठिकाणांची निश्चिती केली आहे. त्यानुसार ही ठिकाणे पुढीलप्रमाणे आहेत.

झोन क्रमांक १ – रामपुरी कॅम्प १. वाघामारे चौक मैदान, नवसारी जवळील स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, प्रभाग क्रमांक ३. २. बजरंग नगर, संतोषीनगर व जयसियाराम नगर वस्तीला लागून असलेले मैदान, प्रभाग क्रमांक ५.

झोन क्रमांक २ – राजापेठ १. दसरा मैदान. २. अंबिकानगर मैदान.

वायुप्रदूषण रोखण्यासाठी महानगरपालिकेचे पाऊल



झोन क्रमांक ३ – दस्तुरनगर १. छत्री तलाव उद्यानासमोरील मैदान. २. वडरपुरा मैदान, खुली जागा (ध्जह एर्ज्म).

झोन क्रमांक ४ – बडनेरा १. स्वामी विवेकानंद खेळण्याचे मैदान, म्हाडा कॉलनी, प्रभाग क्रमांक १९, आकोली. २. गणेशनगर खुला मैदान, प्रभाग क्रमांक २०. ३. सावता मैदानचे परिसर, बडनेरा रोड, अमरावती प्रभाग क्रमांक २१ व २२ नवी वस्ती.

झोन क्रमांक ५ – भाजीबाजार १. महानगरपालिका झोन क्रमांक ५, भाजीबाजार कार्यालयासमोरील खुली जागा. २. आनंदनगर चौक, पुलाजवळ. ३. आदिवासी हॉस्टेलसमोरील खुली जागा, वल्लभनगर.

महानगरपालिकेने निश्चित केलेल्या या ठिकाणांमुळे दिवाळीदरम्यान होणाऱ्या फटाक्यांच्या आतषबाजीचे नियोजनबद्ध व्यवस्थापन करणे शक्य होणार आहे. त्याचबरोबर शहरातील हवेची गुणवत्ता टिकविणे, ध्वनी व वायुप्रदूषणाचे दुष्परिणाम कमी करणे आणि नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण करणे यासाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांच्या स्वाक्षरीने हा आदेश जारी करण्यात आला असून, नागरिकांनी महानगरपालिका प्रशासनाने निश्चित केलेल्या सामुदायिक ठिकाणांचा वापर करून पर्यावरणपूरक आणि सुरक्षित दिवाळी साजरी करावी असे आवाहन आयुक्त डॉ.मंगेश गोंदावले यांनी केले आहे.

फटाक्यांचा धूर नको,आनंदाचा प्रकाश हवा!

अमरावती-दिवाळी म्हणजे आनंदाचा, मांगल्याचा, प्रकाशाचा आणि चैतन्याचा दीपोत्सव! मात्र या आनंदोत्सवाला फटाक्यांच्या आतषबाजीची जोड देण्याऐवजी पर्यावरण संवर्धनाची आणि सामाजिक भानाची सुंदर किनार लाभावी, या उदात्त हेतूने अमरावती महानगरपालिका उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळा क्रमांक १४, वडाळी येथील विद्यार्थ्यांनी यंदाची दिवाळी प्रदूषणमुक्त व पर्यावरणपूरक पद्धतीने साजरी करण्याचा प्रेरणादायी संकल्प केला आहे. शाळेत आयोजित 'दीपोत्सव' उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना फटाक्यांमुळे होणारे वायुप्रदूषण, ध्वनिप्रदूषण, पर्यावरणाची हानी तसेच लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, पशुपक्षी यांच्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम याबाबत जाणीवजागृती करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी फटाके न फोडण्याची, पर्यावरणाचे रक्षण करण्याची आणि दिवाळीचा सण आनंद, उत्साह व सुरक्षिततेने साजरा करण्याची सामूहिक शपथ घेतली.'फटाके फोडून नव्हे, तर मने जोडून दिवाळी साजरी करूया','ध्वनी आणि धुराचे प्रदूषण टाळूया, निसर्गाच्या सान्निध्यात आनंदाचे दीप उजळूया' अशा सकारात्मक संदेशांतून विद्यार्थ्यांनी पर्यावरण रक्षणाचा जागर केला. विद्यार्थ्यांच्या या छोट्याशा संकल्पातून मोठ्या सामाजिक परिवर्तनाची नांदी घडत असून, आजची बालपिढी उद्याच्या पर्यावरणस्नेही समाजाची शिल्पकार ठरत असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित झाले. केवळ स्वतःपुरता संकल्प मर्यादित न ठेवता आपल्या कुटुंबीयांना, मित्रपरिवाराला आणि समाजालाही फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांनी केले.'एक संकल्प प्रदूषणमुक्त दिवाळीचा, एक दीप पर्यावरण संवर्धनाचा!' या भावनेतून राबविण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, पर्यावरणप्रेम आणि जबाबदार नागरिकत्वाची मूल्ये रुजविणारा ठरला. प्रकाशाचा सण उजळू दे, पण निसर्गाचा श्वास गुदमरू नये; दिवाळीचा आनंद फुलू दे, पण प्रदूषणाचा अंधार पसरू नये! हाच संदेश देत शाळेतील विद्यार्थ्यांनी समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे.

संक्षिप्त



वलगाव पोलिसांकडून विद्यार्थ्यांसह वृद्धांना दिवाळीची भेट

टाकरखेडा संभू- दिवाळी सणाचे औचित्य साधून पोलीस स्टेशन वलगावच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत नया अकोला येथील चिल्ड्रेन फेलोशिप शाळेतील विद्यार्थ्यांना तसेच वलगाव येथील संत गाडगेबाबा वृद्धाश्रमातील वृद्धांना मिठाई व फराळाचे वाटप करण्यात आले.दिवाळीचा आनंद समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा, या सामाजिक भावनेतून वलगाव पोलिसांनी हा उपक्रम राबविला. मिठाई व फराळ मिळाल्याने विद्यार्थी तसेच वृद्धांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. या उपक्रमात पोलीस निरीक्षक रिता उईके, सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक शिर्के, पोलीस उपनिरीक्षक भारती मामनकर, प्रदीप शहाणे, संजय काळे, ईशय खांडे, किरण पाठे, शेखर नेमाने, धनिष्ठा शिरभाते व कविता राठोड यांच्यासह पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते.

विदर्भ निर्माण संकल्प मेळाव्यास जिल्ह्यातून कार्यकर्ते उपस्थित राहाणार

अमरावती- विदर्भ निर्माण जनसंकल्प मेळावा अकोला येथे होणार आहे यावेळी अमरावती जिल्ह्यातून शेकडो कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. ओक हॉलमध्ये ठीक बारा वाजता कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. या कार्यक्रमाला मार्गदर्शन विदर्भ राज्य आंदोलन समितीचे अध्यक्ष माजी आमदार वामनराव चटप, जेष्ठ अर्थतज्ञ डॉ प्रा श्रीनिवास खांदेवाले, प्रकाश पोहरे, विदर्भ राज्य आंदोलन समिती चे उपाध्यक्ष अरुण भाऊ केदार ,पश्चिम विदर्भ प्रमुख पी. आर. राजपूत ,युवा आघाडी अध्यक्ष मुकेश मासूरकर करणार आहेत. या मेळाव्याच्या उपस्थितीकरिता सर्व तालुक्यात आपल्या स्तरावर बैठका घेण्यात आल्या असून कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष राजेंद्र आगरकर ,रियाज खान, सुषमा मुळे ,पद्मा राजपूत, सरला सपकाळ प्रकाश लढ्ढा सतीश प्रेमलवार, माधवराव गावंडे,राजाभाऊ पुसदेकर ,सुनील साबळे, संकेत चौधरी, पांडुरंग बिजवे, अशोक राणे, गजानन दुधाट, संजय हाडोळे, डॉ विजय कुबडे, विष्णूजी काळमेघ, दिलीप भोयर, साहेबराव इंगळे,डॉक्टर नीलकंठ यावलकर,अशोक हांडे, बाबाराव जाधव, दीपक शंभरकर, शिवाजी चौधरी दिनकर निस्ताने,दिवाकर राऊत, विलास धांडे, दिनेश ढवस, बाळकृष्ण राऊत सुधीर डांगे दिगंबर चुनडे, सुनील देशमुख, विनायक इंगोले, दीपक कथे, अनिल वानखडे, गजानन इंगोले, प्रा शरद पुसतकर यांनी केले.

कंदली साईमंदिरात काकड आरती

अचलपूर : कार्तिक मासानिमित्त कांडली येथील साई मंदिरात महिनाभर काकड आरती होत आहे. भजन-कीर्तनाचे आयोजन महिनाभर करण्यात येते. काकड आरती हभप दिलीप तडस यांच्या मुखातून सकाळी ५ ते ७ वाजेपर्यंत होत आहे. संस्थानचे हरिदास भुस्कडे, संजय वांगे, चंद्रशेखर लांडे, श्रीकृष्ण बनसोड, राजू रावतकर, शरद नाते, दिलीप खेलकर, प्रल्हाद तिवारी, मधु खानजोडे, अरविंद तळोकार, श्रीराम अडकिने, राजू भुयारकर उपस्थित असतात.

मकरंदाबाद येथून बोकूड लंपास

अमरावती- आसेगाव पूर्णा ठाण्याच्या हद्दीतील मकरंदाबाद येथून बोकूड लंपास करण्यात आला. ही घटना ५ नोव्हेंबर रोजी उघडकीस आली. मकरंदाबाद येथील रहिवासी समीर बेग शब्बीर बेग (२६) यांनी आपल्या मालकीचा बोकूड गोठ्यात बांधला होता. सदर १० हजार रुपये किमतीचा बोकूड अज्ञात चोरट्याने लंपास केला. ही बाब लक्षात आल्यावर समीर बेग यांनी आसेगाव पूर्णा ठाण्यात तक्रार दाखल केली.

दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी महावितरणचे योगदान

मुख्यमंत्री सहाय्यता निधीला ३.६८ कोटी रुपयांची मदत

अमरावती/का.प्र.

महाराष्ट्रातील गंभीर दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी जपत महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी ३ कोटी ६८ लाख १७ हजार ८८७ रुपयांची भरीव मदत केली आहे. अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला आणि मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईस्थित वर्षा निवासस्थानी भेट घेऊन या मदतनिधीचा धनादेश त्यांच्याकडे सुपूर्द केला.



ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विक्रम कुमार, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी., महावितरणचे संचालक धनंजय औंढेकर (संचालन), योगेश गडकरी (वाणिज्य), अनुदीप दिघे (वित्त),राजेंद्र पवार (मानव संसाधन) यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. राज्यातील अनेक भागांमध्ये सध्या भीषण दुष्काळाचे सावट असून, बळीराजा आणि ग्रामीण जनता मोठ्या संकटात आहे. या संकटकाळात दुष्काळग्रस्तांना हक्काचा आधार देण्यासाठी महावितरणच्या ऊर्जेने भारलेल्या संवेदनशील कर्मचाऱ्यांनी स्वेच्छेने आपले योगदान दिले आहे. वर्ग एकच्या अधिकाऱ्यांपासून ते क्षेत्रीय स्तरावर काम करणाऱ्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वांनीच या मदतकार्यात उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवला.

धनादेश स्वीकारताना देवेंद्र फडणवीस यांनी महावितरणच्या सर्व कर्मचाऱ्यांचे आणि व्यवस्थापनाचे विशेष आभार मानले. 'दुष्काळाच्या या कठीण काळात महावितरणने दाखवलेली ही संवेदनशीलता कौतुकास्पद आहे. ही मदत दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना तत्काळ दिलासा देण्यासाठी अत्यंत महत्त्वाची ठरेल,' अशा भावना मा. मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केल्या. महावितरणने नेहमीच वीज पुरवठ्यासोबतच सामाजिक जबाबदारीचे भान राखले आहे. संकटाच्या काळात महावितरण राज्यासोबत ठामपणे उभी राहते, हे या मदतीतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

कत्तलीसाठी नेण्यात येणाऱ्या ४ गोवंशाला जीवनदान

शेंदूरजना घाट पोलिसांची धडक कारवाई



अमरावती/का.प्र.

कत्तलीसाठी नेण्यात येणाऱ्या ४ गोवंशाला शेंदूरजना घाट पोलिसांनी जीवनदान दिले आहे. रवाळा ते शेंदूरजना घाट मार्गावर गॅस एजन्सीजवळ नाकाबंदी करून ही कारवाई करण्यात आली.आरोपी अशोक किसन परतेती (६२, रा. घाटउमरी, प्रभात पट्टण, बैतूल) याला अटक केली आहे. त्याच्या कडून १ लाख ५ हजार रुपये किमतीचे ४ गोवंश जप्त करण्यात आले आहेत.

शेंदूरजना घाट पोलिसांचे पथक पेट्रोलिंग करत असताना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, रवाळा ते शेंदूरजना घाट मार्गावर गॅस एजन्सीजवळ ४ गोवंश घेऊन एक इसम जात आहे. त्यावरून पोलिसांनी नाकाबंदी करून आरोपीला ताब्यात घेतले. चौकशी दरम्यान आरोपीने सांगितले की, ४ पैकी २ जनावरे ही साद अहमद शेख कुरेशी (वय २६, रा. कुरेशीपुरा, मलकापूर) याची असल्याचे सांगितले.

चारही गोवंशाला मुक्त करून पुसला येथील गोरक्षण संस्थेत ठेवण्यात आले आहे. याप्रकरणी प्राणी प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर अधीक्षक दत्ता तोटेवार, उपविभागीय पोलीस अधिकारी उमेश पाटील, ए. एन. लांडे यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक राहुल गवई, विरेंद्र अमृतकर, विजय गुल्हाने, निलेश वासनकर, सागर लेव्हरकर, मदन उईके, अश्विन फरतोडे आदींनी कारवाईमध्ये सहभाग केला.

फ्लॅटमध्ये काम करणाऱ्या मोलकरणीनेच केला ऐवज लंपास

शंकर नगर मार्गावरील गजानन टॉवर येथील घटना

अमरावती/का.प्र

स्थानिक शंकर नगर मार्गावरील गजानन टॉवरमधील एका फ्लॅटमध्ये काम करणाऱ्या मोलकरणीने मालकाच्या घरातील ८ लाख २९ हजार रुपयांच्या दागिन्यांवर हात साफ केल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणात पोलिसांनी तपास करून मोलकरीण व तिचा प्रियकर राज नटवर झांझोटे (२०, रा. सुशील नगर) याला अटक केली आहे. त्यांच्या कडून एकूण ९ लाख ४६ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

माहितीनुसार, गजानन टॉवर निवासी देवल विजयकुमार मानसाता यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती की, १ नोव्हेंबर रोजी ते पत्नी सोबत बाहेर जात होते. त्यावेळी पत्नीने घालण्यासाठी सोन्याचे दागिने तपासले असता तिथून १०७ ग्रॅम सोन्याचे दागिने व ५० ग्रॅम चांदी असा एकूण ८ लाख २९ हजार रुपयांचा ऐवज गायब असल्याचे लक्षात आले. घरात काम करणाऱ्या मोलकरणीवर त्यांनी संशय व्यक्त केला होता. त्यानुसार पोलिसांनी या प्रकरणात तपास सुरू केला आणि मोलकरीण व तिचा प्रियकराला ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केली असता चोरीचा प्रकार उघडकीस आला. त्यांच्या कडून पोलिसांनी ६२ ग्रॅम सोन्याचा तुकडा किंमत ७ लाख ४६ हजार ४०० रुपये, दोन ओपो कंपनीचे मोबाईल किंमत ५० हजार रुपये, अक्टिवा एमएच २७ इएच २२७३ किंमत १ लाख ५० हजार रुपये असा एकूण ९ लाख ४६ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त श्याम घुगे, सहाय्यक आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनात राजापेठचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैभव पानसरे यांच्या नेतृत्वात. निरीक्षक उमेश मुंडे, नितीन शिंदे, मनिष करपे, पवन तिवारी, पंकज खटे, रवि लिखितकर, अंकुश काळे, अमोल खंडेझोड, आबिद शेख, प्रशांत बेलोरकर, रीक खान, आकाश यादव, सतिश टपके, अमोल देशमुख, अर्जुन कदम यांनी कारवाई मध्ये सहभाग घेतला.



बडनेऱ्यात निराधारांच्या चेहऱ्यावर फुलले आनंदाचे हास्य!

आ. प्रविण पोटे पाटील यांचा सेवाभावी उपक्रम, पोटे पाटील कुटुंबीयांनी निराधारांसोबत साजरी केली दिवाळी

अमरावती/का.प्र.

दिवाळी म्हणजे आनंद, प्रकाश आणि आपुलकीचा सण. मात्र समाजातील निराधार, वयोवृद्ध आणि दुर्लक्षित घटकांच्या आयुष्यातही आनंदाचे दिवे उजळावेत, या उदात्त भावनेतून माजी राज्यमंत्री तथा आमदार प्रविण पोटे पाटील, श्रेयसदादा पोटे पाटील आणि श्रुतीताई पोटे पाटील यांनी यंदाही सामाजिक बांधिलकी जपत बडनेरा येथे निराधारांसोबत दिवाळी साजरी केली. या उपक्रमातून केवळ भेटवस्तूंचे वाटप न करता निराधार नागरिकांना मायेचा आधार, आपुलकीची ऊब आणि सन्मानाची जाणीव करून देण्यात आली.



महानगरपालिकेच्या आधार केंद्रात वास्तव्यास असलेल्या निराधार नागरिकांसाठी बडनेरा येथे आयोजित या दिवाळीच्या विशेष उपक्रमाला भावनिक आणि सामाजिक महत्त्व प्राप्त झाले. सणासुदीच्या काळात अनेकांना आपल्या कुटुंबीयांसोबत आनंद साजरा करण्याची संधी मिळते; मात्र आधार केंद्रातील नागरिकांनाही दिवाळीचा आनंद अनुभवता यावा, या भावनेतून पोटे पाटील कुटुंबीयांनी पुढाकार घेतला.कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक अभ्यंगस्नानाने करण्यात आली. त्यानंतर आधार केंद्रातील नागरिकांना नवीन कपडे, दिवाळीचा फराळ, मिष्टान्न तसेच विविध जीवनोपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. दिवाळीच्या निमित्ताने सर्वांसाठी खास पुरणपोळीच्या स्नेहभोजनाचेही आयोजन करण्यात आले. या स्नेहपूर्ण वातावरणात निराधार नागरिकांनी दिवाळीचा आनंद अनुभवला. अनेकांच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य आणि समाधान हीच या उपक्रमाची खरी फलश्रुती ठरली.

सेवाभावातून माणुसकीचा दिवा प्रज्वलित!

यावेळी आमदार प्रविण पोटे पाटील यांनी आपली भावना व्यक्त करताना सांगितले की, निराधार आणि वयोवृद्ध नागरिकांना आधार देणे ही समाजातील प्रत्येकाची जबाबदारी आहे. दिवाळीच्या एका पणतीच्या प्रकाशाप्रमाणे आपणही त्यांच्या आयुष्यात आनंदाचा प्रकाश निर्माण करू शकतो. अनेक वर्षांपासून अशा पद्धतीने दिवाळी साजरी करताना जे आत्मिक समाधान मिळते, ते शब्दांत व्यक्त करणे कठीण आहे.

श्रेयस पोटे यांनीही उपस्थित नागरिकांशी संवाद साधत सामाजिक बांधिलकीचे महत्त्व अधोरेखित केले. समाजातील गरजू आणि वंचित घटकांना मदतीचा हात देणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असून युवा पिढीने अशा सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. समाजाप्रती संवेदनशीलता आणि सेवाभाव जपल्यासच खऱ्या अर्थाने सामाजिक परिवर्तन घडू शकते, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाला शिवराय कुळकर्णी, जयंत डेहनकर, तुषार भारतीय, चेतन पवार, ॲड. चेतन गावंडे, सुरेखा लुंगारे, लर्ता देशमुख, भारती गुहे, प्रकाश पुंड, डॉ. बबन लायदे, डॉ वीरेंद्र ढोबळे मनीष चौबे, अभिजित वानखडे, रोहित देशमुख, अक्षय पोटे, विनोद तन्वैस, संजय कटारिया नरेश दमाई रोशनी वाकोडे, योगेश निमकर, गंगा अंभोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

मोदी सरकारचा शेतकऱ्यांवर पुन्हा घात!

उद्योगपतींच्या तिजोऱ्या भरण्यासाठी कापूस उत्पादकांचा बळी : किशोर तिवारी

दुष्काळाने होरपळलेला, कर्जाने दबलेला, नापिकीने खचलेला महाराष्ट्राचा कापूस उत्पादक आज मरणाच्या दारात उभा आहे. आणि अशा वेळी दिल्लीत बसलेले मोदी सरकार त्याला मदतीचा हात देण्याऐवजी त्याच्या पाठीत खंजीर खुपसत आहे!कापूस आयातीवरील ११ टक्के शुल्कमाफी ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत वाढवून केंद्र सरकारने पुन्हा एकदा सिद्ध केले की, हे सरकार शेतकऱ्यांचे नाही, तर मोठ्या उद्योगपतींचे आणि गिरणी मालकांचे आहे, असा आरोप शेतकरी नेते किशोर तिवारी यांनी केला आहे.

महाराष्ट्रात नवीन कापसाची आवक सुरू होत असतानाच ही माफी वाढवणे म्हणजे शेतकऱ्याचा घाम विकून उद्योगपतींची दिवाळी साजरी करणे आहे.सरकारचेच आकडे सरकारला तोंडघशी पाडतात. २०२०-२१ मध्ये देशात ३८२.४८ लाख गाठी कापूस होत होता,आज तो जेमतेम २६० लाख गाठींवर आला. उत्पादन ११२ लाख गाठींनी घटले! आणि आयात ५ लाख टनांवरून थेट ११ लाख टनांवर गेली ! तब्बल ११० टक्के वाढ!म्हणजे देशाचा शेतकरी मारायचा आणि परदेशी शेतकऱ्याला जगवायचे, हेच का मोदी सरकारचे 'आत्मनिर्भर भारत'एकीकडे कॉटन असोसिएशनच्या अंदाजानुसार यंदा महाराष्ट्रात ९१ लाख गाठी, देशात २८० लाख गाठी उत्पादन होईल असा अंदाज व्यक्त केला आहे पण भारतात ४० टक्के कापूस उत्पादक महाराष्ट्रात दुष्काळाने शेतात काय उरले आहे, हे शेतकऱ्यालाच माहीत आहे.

कागदावरील आकडेवारीने पोट भरत नाही.केंद्राने ८,२६७ ते ८,६६७ हमीभाव जाहीर करून उपकार केल्याचा आव आणला. पण एकेकाळी १०,००० ला विकला जाणारा कापूस आज



हमीभावाच्या पातळीवर का आला? कारण दिल्लीने आयातीचे दरवाजे सताड उघडले! भाव पाडण्याचे पाप कुणाचे? याची चौकशी झालीच पाहिजे, दोषींना शिक्षा झालीच पाहिजे.'शेतकरी दुष्काळातही जगण्याची धडपड करतो. त्याला फक्त एकच आशा असते - चांगला भाव. पण सरकारने शुल्कमुक्त आयातीने ती आशाही संपवली. हा निर्णय नाही, हा शेतकऱ्याविरुद्धचा कट आहे, उद्योगांच्या दबावाखाली घेतलेला देशद्रोही निर्णय आहे,' असे कडाडून तिवारी म्हणाले.शेतकऱ्याला भाव नाही मिळाला तर काय होणार? पीककर्ज थकणार, सावकाराचा फास आवळणार, मजुराला मजुरी नाही, जिनिंग बंद पडणार, गावची बाजारपेठ ओस पडणार. आणि शेवटी शेतकरी आत्महत्येच्या वाटेवर जाणार. याला जबाबदार कोण? दिल्लीचे सरकारच!आता ऐका,दिल्लीवाल्यांनो! विदर्भाच्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांची हाक ऐका!

१. शुल्कमाफी तात्काळ रद्द करा, कापसावर २५% आयात शुल्क लावा!

२. आवक हंगामात बिनधास्त आयात बंद करा! फक्त अत्यावश्यक विशेष कापसालाच सवलत द्या.

३. सीसीआयने प्रत्येक तालुक्यात हमीभाव खरेदी सुरू करा, शेतकऱ्याला व्यापाऱ्याच्या दारात लाचार करू नका!

४. दुष्काळग्रस्तांना नुकसानभरपाई, पीकविमा द्या आणि कर्जवसुलीला तात्काळ ब्रेक लावा!

५. कोणत्या उद्योगपतींच्या सांगण्यावरून हा निर्णय घेतला, ते जाहीर करा! पडद्याआडचे सौदे उघड करा!

'वस्त्रोद्योग जगला पाहिजे, मान्य. पण शेतकऱ्याला मारून उद्योग जगवायचा असेल, तर तो उद्योग आम्हाला नको! शेतकरी जगला तरच देश जगेल. भाव संरक्षणाची हमी दिली नाही, तर विदर्भ पेटल्याशिवाय राहणार नाही,' असा थेट इशारा किशोर तिवारी यांनी दिला.

रब्बी पीकविम्याचा पेच

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर गावशिवारात यंदा रब्बीच्या पेरणीची लगबग दिसत नाही. दुष्काळामुळे भीषण पाणीटंचाई निर्माण झाली. त्यामुळे शेतकरी दुहेरी कोंडीत सापडला. पेरणी केली तर हाती काय येईल, याची शाश्वती नाही. पण नाही पेरले तर पीकविम्याची भरपाई मिळणार नाही. पीकविम्यासाठी अनेक शेतकरी पेरणीचा निर्णय घेत असल्याचे दिसते. कारण पीकविमा भरपाई आणि सरकारच्या मदतीत खूप फरक आहे.

सरकार देत असलेली एनडीआरएफची मदत कोरडवाहू पिकांसाठी हेक्टरी ११ हजार रुपये असेल. बागायती पिकांसाठी २२ हजार रुपये आणि फळपिकांसाठी ३० हजार रुपये मिळेल. एका शेतकऱ्याला जास्तीत जास्त २ हेक्टर म्हणजेच ५ एकरांपर्यंत ही मदत मिळेल. विशेष म्हणजे शेतकऱ्यांच्या पिकाचे ३३ टक्क्यांच्या पुढे कितीही नुकसान झाले तरी मदत वाढणार नाही.

म्हणजेच कोरडवाहू पिकाचे ३३ टक्के नुकसान झाले, ७० टक्के झाले किंवा अगदी १०० टक्के नुकसान झाले तरीही मदतीची रक्कम हेक्टरी ११ हजार रुपयेच असेल. पीकविम्यात मात्र नुकसान वाढेल तशी भरपाई वाढेल. त्यामुळेच दुष्काळात शेतकऱ्यांना सरकारच्या मदतीपेक्षा पीकविमा भरपाईचा जास्त आधार वाटतोय. शेतकरी हाती किती उत्पादन येईल त्यापेक्षा पीकविमा भरपाईसाठी पेरणी करत असल्याचे काही भागांतील शेतकऱ्यांनी सांगितले.

रब्बीतील ज्वारी, गहू, हरभरा, मका, आणि कांदा पिकासाठी विमा अर्ज भरण्यास सुरुवात झाली. पीकविमा भरपाईस पात्र ठरण्यासाठी शेतकऱ्यांना आधी अर्ज भरावा लागेल. रब्बी हंगामातही शेतकऱ्यांना भरावा लागणार विमा हप्ता तसा कमीच आहे. केवळ कांद्याचा विमा हप्ता अधिक येतो. इतर पिकांचा हप्ता अपवाद वगळता सर्वच जिल्ह्यांमध्ये हेक्टरी अगदी ६० रुपयांपासून ते ७०० रुपयांच्या दरम्यान येतो. पण मिळणारे विमा संरक्षण अर्थात वाजवी आणि किफायतशीर दरावरून संघर्ष होणे ही आता वार्षिक परंपरा होते आहे. केंद्र सरकारने निश्चित केलेला एफआरपी शेतकऱ्यांना अपुरा वाटतो. त्यामुळे एफआरपी अधिक बोनस, अशी मागणी पुढे येते. हंगाम लांबला, तर गाळपाचे वेळापत्रक आणि कारखान्यांचे आर्थिक गणित बिघडते. परिणामी कारखानदार बाजारातील परिस्थिती प्रतिकूल असतानाही शेतकऱ्यांना वाढीव दराचे आश्वासन देतात. यंदा ऑगस्ट-सप्टेंबरमधील साखरेच्या दरातील तेजीचा अपवाद वगळता कारखान्यांना अपेक्षित बाजारभाव मिळालेला नाही. निर्यातीच्या मर्यादित संधींमुळेही उत्पन्न वाढवण्यावर बंधने आली. शेतकऱ्यांना दिलेली आश्वासने पूर्ण जास्त आहे. खरिपात पावसाअभावी ३०४ तालुक्यांमध्ये नुकसान ३३ टक्क्यांपेक्षा जास्त झाले आणि दुष्काळ जाहीर झाला.

रब्बीची परिस्थिती तर बिकट आहे. त्यामुळे जोखीम स्तर ७० टक्के असला तरी पीक कापणी प्रयोगात नुकसान निश्चितच जास्त येण्याची शक्यता आहे. यामुळे शेतकऱ्यांना यंदा रब्बी हंगामातही चांगली भरपाई मिळू शकते. कृषी विभागानेही दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन शेतकऱ्यांना विमा योजनेत सहभागी होण्याचे आवाहन केले.

खरिपात काही शेतकऱ्यांनी योजनेवर बहिष्कार टाकत अर्ज भरले नव्हते. त्या शेतकऱ्यांना खरिपाची विमा भरपाई मिळणार नाही. खरे तर यंदा योजनेवर बहिष्कार टाकण्याची ही वेळ नाही. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मार्गांनी आर्थिक हातभार लागण्याची गरज आहे. त्यामुळे पीकविमा काढायला हवा. आपल्या पिकाची डिजिटल क्रॉप सर्व्हेवर नोंदणी करणे बंधनकारक आहे. पीक उगवून आल्यानंतर तातडीने ही नोंदणी करावी. पेरलेल्या पिकाचीच नोंद करावी, अन्यथा अर्ज रद्द होऊ शकतो.

एकंदर स्थिती पाहता पेरणी करताना खर्च कमीत कमी ठेवावा लागणार आहे. पाण्याची उपलब्धता चांगली असेल तरच उत्पादनाचे उद्दिष्ट ठेवून खर्च करावा. सरकारनेही शेतकऱ्यांच्या अडचणी ओळखून रब्बीचे नियोजन करण्याची गरज आहे. केंद्र आणि राज्य सरकार सातत्याने शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याची ग्वाही देत आहेत. आता शेतकरी प्रत्यक्षात तशा कृतीची सरकारकडून अपेक्षा करत आहेत. शेतकऱ्यांनी दुष्काळी परिस्थिती डोळ्यापुढे ठेवून जनावरांना चारा आणि पीकविम्याची भरपाईसाठी नियोजन केल्यास यंदा फायदेशीर ठरू शकते. शेतकऱ्यांना आर्थिक हातभारही लागेल आणि चाराही उपलब्ध होईल. कृषी विभागानेही दुष्काळी भागातील रब्बी हंगामाकडे यादृष्टीने पाहणे गरजेचे आहे.

अनिल जाधव

एआयमुळे होत असलेले disruption हे ह्याचे एक मोठे कारण आहे. अर्थात, कोविडनंतरची अवाजवी भरती आणि क्लायंट्सनी कमी केलेली बजेट्स ह्यांचाही त्यात वाटा आहेच. ही कारणे काही आपण बदलू शकत नाही.मात्र, आपल्या बाबतीत हे घडले तर काय करायचे ह्यासाठी ही लेखमाला..

चाळिशीमध्ये आयटी मधला जॉब अचानक गेला तर?

तुम्ही चाळिशीत आहात. कुटल्याशा IT कंपनीत मिडल मॅनेजमेंट किंवा त्याहून उच्च पदावर काम करत आहात. तुमच्यावर तुमच्या कुटुंबाची जबाबदारी आहे. घराचे, गाड्यांचे हप्ते सुरू आहेत. मुलांच्या शिक्षण-उच्च शिक्षणाचा खर्च सुरू आहे. आईवडिलांची जबाबदारी तुमच्यावर आहे. तुम्हाला भरपूर पगार आहे. ह्या भरपूर पगारामुळे तुम्ही तुमची लाईफस्टाईल भरपूर महागडी करून ठेवली आहे.

अचानक एके दिवशी तुमच्या कंपनीतल्या कॉलवर HR चा माणूस येतो. 'restructuring' वगैरे काहीतरी कारण देऊन, 'उद्यापासून कामावर येऊ नका' सांगतो. आणि तुमच्या शांत, स्थिर, गुडीगुडी चाललेल्या संपूर्ण विश्वाला क्षणार्धात सुरुंग लागतो. ही काल्पनिक कथा नाही. सध्या भारतात आणि जगभरात IT मध्ये काम करणाऱ्या हजारो, कदाचित लाखो लोकांवर ही वेळ येत आहे.

ज्यांच्यावर ही वेळ आलेली नाही, त्यांना ती कधीही येऊ शकते अशी टांगती तलवार डोक्यावर लटकलेली आहे. AI मुळे होत असलेले disruption हे ह्याचे एक मोठे कारण आहे. अर्थात, कोविडनंतरची अवाजवी भरती आणि क्लायंट्सनी कमी केलेली बजेट्स ह्यांचाही त्यात वाटा आहेच. ही कारणे काही आपण बदलू शकत नाही.मात्र, आपल्या बाबतीत हे घडले तर काय करायचे (किंवा घडू शकेल असे वाटत असेल तर त्याला सामोरे कसे जायचे) ह्यासाठी ही लेखमाला लिहीत आहे.



भाग- १

भाग १: भावनिक उलथापालथ मॅनेज करणे

तुम्ही वयाच्या चाळिशीच्या मध्यात (Mid-40s) असता, १५-२० वर्षांचा दांडगा अनुभव पाठीशी असतो. सध्याच्या कंपनीत पाच-दहा वर्षे इमानेइतबारे काम केलेले असते. केलेल्या कामाबद्दल कंपनीत आणि बाहेरही चांगला मानसन्मान मिळालेला असतो. आणि अशा वेळी जेंव्हा तो HR चा कॉल येतो, किंवा सिस्टमचा सक्सेस बंद होतो, तेंव्हा पायाखालची जमीन सरकते. राग, संताप, दुःख, असहायता, अनिश्चितता प्रचंड दाटून येतात. सैरभैर व्हायला होते.

हे स्वाभाविक आहे.ज्या पिढीने २००० सालानंतरचा IT मधला सुवर्णकाळ पाहिला, त्या लाटेमध्ये कष्ट करून स्वतःची भरभराट करून घेतली, त्यांच्यासाठी कंपनीचे ID Card हे केवळ नोकरीचा भाग नसते, तर समाजातली आपली ओळख (Identity) असते. त्यामुळे अचानक नोकरी जाणे हा केवळ आर्थिक धक्का नसतो, तर तो मनावर होणारा एक मोठा आघात असतो.त्यामुळे जर आपला जॉब गेला, तर पहिल्यांदा आपल्यात होणाऱ्या भावनिक उलथापालथीवर काम करायला हवे. हे कसे करायचे?

१. स्वतःला दोष देऊ नका

ही Layoff ची लाट तुमच्या वैयक्तिक गुणवत्तेवर किंवा क्षमतेवर प्रश्नचिन्ह नाही. हा संपूर्ण इंडस्ट्रीत होणारा एक Macro-economic आणि टेक्नॉलॉजिकल बदल आहे. नोकरी गेली म्हणजे आपण 'अयशस्वी' ठरलो, हा गैरसमज आधी मनातून काढून टाका. ह्या लाजेपायी अनेकजण समाजापासून आणि मित्रांपासून स्वतःला तोडून टाकतात, जे सर्वात घातक ठरू शकतं. ते अजिबात करू नका.

२. कुटुंबाशी मोकळेपणाने बोला

आपल्याकडे, घरच्यांना काळजी वाटेल म्हणून अनेक पुरुष किंवा कुटुंबप्रमुख नोकरी गेल्याचे वास्तव पत्नी, मुले किंवा आई-वडिलांपासून लपवून ठेवतात. रोज नेहमीसारखे तयार होऊन घराबाहेर पडण्याचे नाटक करणे प्रचंड मानसिक तणाव निर्माण करते. पहिल्याच आठवड्यात कुटुंबासोबत शांतपणे बसून वस्तुस्थिती सांगा. जेंव्हा संकट वाटून घेतले जाते, तेंव्हा कुटुंबाची साथ हीच तुमची सर्वात मोठी ताकद बनते.

३. दिवसाचे Routine मोडू देऊ नका

९ ते ६ चे कॅलेंडर अचानक रिकामे झाले की नैराश्य आणि अतिविचार (Overthinking) सुरू होतात. म्हणूनच तुमची सकाळची वेळ निश्चित ठेवा. सकाळी उठून किमान ४५ मिनिटे व्यायाम, योगासने किंवा प्राणायाम करा. जॉब सर्चसाठी दिवसातले ठराविक ४ तासच द्या; उरलेल्या वेळेत स्वतःचे मानसिक स्वास्थ्य जपा.

मनातली भीती आणि धक्का पचवला, की पुढची पायरी येते ती म्हणजे आपल्या घराचे आर्थिक गणित सावरण्याची. वयाच्या ४५ व्या वर्षी घराचे EMI, मुलांचे उच्च शिक्षण आणि पालकांचे आरोग्य ह्या तिहेरी जबाबदाऱ्या असताना आर्थिक नियोजन कसे करावे?

- प्रसाद शिरगावकर

साखर उद्योगाचे दुखणे कायम!



ऊस दर आंदोलनानंतर महाराष्ट्रात ४२०० रुपये, कर्नाटकात ३६०० रुपये प्रतिटन तोडगा निघाला असला तरी एफआरपी, बोनस आणि कर्जाच्या दुष्टचक्रातून साखर उद्योगाची सुटका कशी होणार?

महाराष्ट्र आणि कर्नाटकातील ऊस उत्पादकांच्या चार दिवसांच्या आंदोलनाची अखेर कोंडी फुटली आहे. महाराष्ट्रात प्रतिटन ३,९०० रुपये पहिली उचल, हंगामाच्या अखेरीस १०० रुपये बोनस आणि साखरेचा बाजारभाव प्रतिक्विंटल ४,५०० रुपयांच्या पुढे गेल्यास आणखी २०० रुपये, असा एकूण ४,२०० रुपयांचा तोडगा निघाला. कर्नाटकात प्रतिटन ३,६०० रुपये दरावर शेतकऱ्यांनी आंदोलन मागे घेतले. मात्र हा समझोता म्हणजे साखर उद्योगाच्या मूलभूत समस्येवरील उपाय नव्हे; हंगाम सुरू करण्यासाठी केलेली तात्पुरती मलमपट्टी आहे.

महाराष्ट्र आणि कर्नाटकात हंगाम सुरू होण्यापूर्वी एफआरपी करण्यासाठी कारखान्यांना वित्तीय संस्थांकडून कर्ज घ्यावे लागते. आधीच्या कर्जाचे व्याज आणि परतफेडीचा भार असतानाच नव्या हंगामात पुन्हा वाढीव दराची जबाबदारी स्वीकारावी लागते. परिणामी कर्जाचा डोंगर वाढतो आणि पुढील हंगामात पुन्हा त्याच संघर्षाची पुनरावृत्ती होते. हे दुष्टचक्र साखर उद्योगाला आर्थिकदृष्ट्या कमकुवत करीत आहे.

या समस्येचे मूळ ऊस दरात नसून साखरेच्या विक्री किमतीत आहे. देशातील साखर कारखानदार गेल्या तीन वर्षांपासून साखरेचा किमान हमीभाव प्रतिक्विंटल ५,००० रुपये करण्याची मागणी करीत आहेत. मात्र, केंद्र सरकार महागाई वाढीच्या भीतीने हा निर्णय घेण्यास टाळाटाळ करते आहे. कारखान्यांना साखर विक्रीतून पुरेसे उत्पन्न मिळाले नाही, तर ऊस उत्पादकांना वाढीव दर देण्याची त्यांची क्षमता कशी वाढणार? कर्ज काढून बोनस देणे हा कायमस्वरूपी आर्थिक उपाय होऊ शकत नाही, हे साधे अर्थशास्त्र आहे. ते केंद्र सरकारलाही कळते. पण वळत नाही. यामुळे वार्षिक सुमारे दोन लाख कोटी रुपयांची उलाढाल असलेल्या साखर उद्योगाचे भवितव्य टांगणीला लागले आहे. या उद्योगावर लाखो ऊस उत्पादक, कामगार आणि ग्रामीण अर्थव्यवस्था अवलंबून आहे. त्यामुळे केंद्र सरकारने साखरेच्या किमान विक्री किमतीचा प्रश्न तातडीने निकाली काढावा. अन्यथा, आजपर्यंत शेतकरी कर्जमाफीसाठी रस्त्यावर येत होते. परंतु, उद्या केंद्र सरकारच्या धोरण दिरंगाईमुळे कर्जाचा डोंगर डोक्यावर असलेले कारखानदार कर्जमाफीसाठी दिल्लीला थडकले, तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

महाराष्ट्रात यंदा ऊस आंदोलनात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली हजारो शेतकरी पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावर होते. तीन दिवस वाहतुकीचा बोजवारा उडाला. दिवाळीसाठी गावाकडे परतणाऱ्या अनेक कुटुंबांना मनःस्ताप झाला. महामार्गावर वाहनांची दुतर्फा रांग लागली. पण तीन दिवस राज्यातील सरकारने संपर्क साधला नाही. गोकुळ दूध संघाच्या सत्तेसाठी कायदा बदलू पाहणाऱ्या राज्य सरकारला शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्यासाठी वेळ मिळाला नाही. सणासुदीत एवढा मोठा गोंधळ दुर्लक्षित करता येण्यासारखा नव्हता. आता मुख्यमंत्र्यांनीच पुढाकार घेऊन केंद्राकडून हमीभावाचा प्रश्न सोडवून घेण्यात पुढाकार घ्यावा. चार दिवसांचे आंदोलन संपले, पण संघर्षाचे अर्थकारण संपलेले नाही. दरवर्षी ऊस उत्पादकांना रस्त्यावर उतरावे लागणे आणि कारखानदारांना कर्जाचा आधार घेऊन आश्वासने द्यावी लागणे, ही साखर उद्योगाच्या धोरणात्मक अपयशाची लक्षणे आहेत. एफआरपी वाढविण्याची मागणी आणि कारखान्यांची आर्थिक क्षमता यांच्यात समतोल साधायचा असेल, तर साखरेच्या किमान विक्री किमतीचा निर्णय आता अपरिहार्य आहे. अन्यथा आजचा समझोता उद्याच्या आंदोलनाची केवळ प्रस्तावना ठरेल. केंद्र सरकारने हा प्रश्न आणखी लांबवणे म्हणजे दोन लाख कोटींच्या उद्योगाला अनिश्चिततेच्या खाईत ढकलण्यासारखे आहे.

राजेंद्र जोशी

आजची कृत्रिम बुद्धिमत्ता

आजच्या डिजिटल युगात एक वेगळाच चमत्कार घडताना दिसतो आहे. पूर्वी एखादा लेख लिहिण्यासाठी शब्दांची जुळवाजुळव करावी लागायची, विचारांना आकार द्यावा लागायचा, वाचन करावे लागायचे, अनुभवांच्या आधारे विषय समजून घ्यावा लागायचा. मात्र आज ChatGPT सारख्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साधनांमुळे अवघ्या काही क्षणांत लेख, कविता, कथा, भाषणे आणि वैचारिक लिखाण तयार होऊ लागले आहे. ज्यांना कधी चार ओळीही लिहिता आल्या नसत्या, ते आज उत्तम लेखक असल्याप्रमाणे व्यक्त होताना दिसत आहेत. उद्या ही संख्या आणखी वाढेल, यात शंका नाही. पण इथे एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतो. लेखकांची संख्या वाढत आहे की केवळ लेखकांसारखे दिसणाऱ्या लिखाणांची संख्या वाढत आहे?

हा प्रश्न तंत्रज्ञानाला विरोध करण्यासाठी नाही, तर लेखनाचा खरा अर्थ समजून घेण्यासाठी आहे. ChatGPT हे निःसंशय अद्भुत तंत्रज्ञान आहे. आपण त्याला एखादा विचार सांगतो, विषय देतो, आपल्या भावना व्यक्त करतो आणि ते त्याला सुंदर, व्याकरणदृष्ट्या शुद्ध, सुसंगत आणि प्रभावी शब्दांत मांडून देते. आपल्याकडे विचार असतात, पण शब्द नसतात; भावना असतात, पण त्यांना अभिव्यक्ती देता येत नाही. अशा वेळी हे तंत्रज्ञान उत्तम सहकारी ठरते. ज्ञानाची देवाणघेवाण, माहितीचे विश्लेषण आणि विचारांची मांडणी करण्यासाठी त्याचा उपयोग झाला पाहिजे.मात्र या सगळ्यात एक मूलभूत फरक आहे. ChatGPT शब्द समजू शकते, पण शब्दांमागची वेदना अनुभवू शकत नाही. ते प्रेमावर हजारो सुंदर ओळी लिहू शकते, पण प्रेमात पडल्यावर होणारी अस्वस्थता अनुभवू शकत नाही.ते संघर्षावर प्रेरणादायी भाषण देऊ शकते, पण अपयशानंतर एकट्याने अश्रू पुसत पुन्हा उभे राहण्याचा अनुभव त्याच्याकडे नसतो.

कारण ते माणूस नाही. ते माणसाने निर्माण केलेले तंत्रज्ञान आहे. त्याच्याकडे माहितीचा प्रचंड साठा असू शकतो, भाषेचे ज्ञान असू शकते, शब्दांची अफाट संपत्ती असू शकते; पण माणसाप्रमाणे जगलेले आयुष्य नाही. लेखन म्हणजे केवळ शब्दांची सजावट नव्हे. लेखन म्हणजे निरीक्षण, चिंतन, अनुभव, संवेदना आणि विचारांची प्रामाणिक अभिव्यक्ती. एखाद्या लेखातील कठोर वाक्यामागे समाजाने दिलेला एखादा कटू अनुभव असतो. ही पार्श्वभूमी कृत्रिम बुद्धिमत्ता शब्दांत मांडू शकेल; पण ती प्रत्यक्ष जगू शकणार नाही.

माझ्या मते, ChatGPT वापरण्यात कोणतीही गैरगोष्ट नाही. उलट प्रत्येकाने काळानुसार तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे. ज्यामुळे ज्ञान वाढते, वेळ वाचतो आणि अभिव्यक्तीला मदत होते, त्या साधनांचे स्वागतच केले पाहिजे. परंतु त्याचा वापर करताना स्वतःचे विचार, स्वतःचे निरीक्षण आणि स्वतःची वैचारिक ओळख जपली पाहिजे. कारण जगाला केवळ सुंदर शब्दांची गरज नाही, तर त्या शब्दांमागे प्रामाणिक विचार असलेल्या माणसांची गरज आहे.आज ChatGPT मुळे हजारो लोक लिहितील, लाखो लेख तयार होतील, असंख्य कविता प्रसिद्ध होतील. पण काळाच्या कसोटीवर टिकणारे लिखाण तेच असेल, ज्यामध्ये केवळ भाषेचे सौंदर्य नाही, तर विचारांची खोली आणि अनुभवांची प्रामाणिकता असेल. कृत्रिम बुद्धिमत्ता तुम्हाला लेखकासारखे लिहायला शिकवू शकते; पण लेखक म्हणून घडण्यासाठी तुम्हाला स्वतःचे आयुष्य वाचावे लागेल, समाज समजून घ्यावा लागेल, माणसे अनुभवावी लागतील आणि स्वतःच्या विचारांशी प्रामाणिक राहावे लागेल.

धनंजय देशमुख
मो. ९२८४३८२१०२

दिवाळीत फटाका विक्रीवर पोलिसांचे कडक निर्बंध!

दुकानांमध्ये सुरक्षेच्या नियमांचे पालन बंधनकारक

ऑनलाइन फटाका विक्रीवर बंदी

अमरावती/प्रतिनिधीः- दिवाळी उत्सवादरम्यान फटाक्यांची मोठ्या प्रमाणात होणारी आतषबाजी आणि बाजारपेठांमधील गर्दी लक्षात घेता अमरावती शहर पोलिसांनी फटाका विक्रीसाठी कडक सुरक्षा नियम लागू केले आहेत. ५ ते ११ नोव्हेंबरदरम्यान दिवाळी उत्सव साजरा होत असताना फटाक्यांच्या तात्पुरत्या दुकानांमध्ये सुरक्षिततेच्या नियमांचे पालन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या फटाका विक्रेत्यांचे परवाने निलंबित करण्यासह कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी दिला आहे.



दिवाळीनिमित्त धार्मिक स्थळे आणि बाजारपेठांमध्ये नागरिकांची मोठी गर्दी होते. त्याचवेळी फटाक्यांच्या आतषबाजीमुळे आग लागण्याच्या दुर्घटना तसेच ध्वनी आणि वायुप्रदूषणाचा धोका निर्माण होण्याची शक्यता असते. ही बाब लक्षात घेऊन संयुक्त मुख्य विस्फोटक नियंत्रक, पश्चिम अंचल, नवी मुंबई यांनी दिवाळी २०२६ साठी तात्पुरते फटाका विक्री परवाने देताना विशेष दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. फटाका विक्रीच्या तात्पुरत्या दुकानांमध्ये लाकडी साहित्य आणि कापडी पडद्यांचा वापर करता येणार नाही. फटाक्यांचा साठा सुरक्षित तसेच ज्वलनशील नसलेल्या सामग्रीपासून तयार केलेल्या शेडमध्ये ठेवणे आवश्यक आहे. प्रत्येक दुकानामध्ये किमान तीन मीटर अंतर ठेवावे, तर संरक्षित ठिकाणांपासून किमान ५० मीटर अंतरावर दुकाने उभारावीत. तसेच दोन दुकाने एकमेकांसमोर असणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.

तात्पुरत्या फटाका दुकानांमध्ये तेलाचे दिवे, गॅस दिवे किंवा उघडे विद्युत दिवे वापरण्यास मनाई करण्यात आली आहे. दुकानांच्या परिसरात विजेच्या तारा लोंबकळणार नाहीत, याची खबरदारी घ्यावी. एकाच रांगेतील दुकानांसाठी विद्युत वाहिनीचा वापर होत असल्यास मास्टर स्विच बसविणे बंधनकारक आहे. विशेष म्हणजे, फटाका विक्रीच्या तात्पुरत्या दुकानांच्या ५० मीटर परिसरात फटाके फोडण्यास मनाई राहणार आहे. शहरात एकाच ठिकाणी ५० पेक्षा अधिक फटाका विक्रीची दुकाने उभारता येणार नाहीत.

ऑनलाइन विक्रीवरही बंदी

ई-कॉमर्स संकेतस्थळांवरून फटाक्यांची खरेदी-विक्री करण्यास पूर्णतः बंदी असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. दवाळी उत्सव काळात लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांची विशेष काळजी घेऊन सर्वांनी सुरक्षितपणे सण साजरा करावा, असे आवाहन पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी केले असून, अमरावतीकरांना दिवाळीच्या शुभेच्छाही दिल्या आहेत.

जवाहर गेट, इतवारा मार्गावर वाहतुक विस्कळीत

अमरावती/प्रतिनिधीः-दिवाळीसारख्यास मोठ्या सणाच्या निमित्ताने शहरातील रस्ते वारंवार वाहतुक विस्कळीत होऊन जाम होत आहेत. अशातच जवाहर गेट जवळील टांगा पडाव, इतवारा मार्गाजवळ आज शनिवार ७ नोव्हेंबर रोजी दुपारी ट्राफीक जाम लागला. त्यामुळे तासभराहून अधिक काळ शेकडो वाहने आणि मोठ्या संख्येने लोक अडकून राहिले. तेव्हा वाहतूक विभागाचा नुकताच कार्यभार सांभाळलेले निरीक्षक हनुमंत उरलागोंडावार आपल्या पथकासह तेथे पोहोचले. त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता तेथील सर्व तात्पुरते ठेले हटवून मार्ग मोकळा केला. ज्यामुळे नागरिकांनी आणि दुकानदारांनी सुटकेचा निःश्वास सोडला. महत्त्वाचे म्हणजे, निरीक्षक उरलागोंडावार यांनी सांगितले की, रस्त्यांवर अतिक्रमण अथवा अव्यवस्थित ठेले अजिबात खपवून घेतले जाणार नाहीत. टांगा पडाव परिसरात फळे-भाज्यांपासून ते नानाविध प्रकारच्या वस्तूंचे ठेले उभे करून ठेवले जातात. इतवारा, किराणा मार्केट असल्या कारणाने तेथे ये-जा करणाऱ्या वाहनांची, माल वाहतुकीच्या वाहनांचीही मोठी गर्दी असते. माल उतरवणे व चढवणे यामुळेही वाहतूक कोंडी होते. त्यातच आज दुपारी फळे व भाजीपाला विक्रेत्यांनी रस्त्यावरच ठेले लावल्याने जाम झाला.

माऊली नगरात वृद्ध दाम्पत्याला जीवे मारण्याची धमकी

लाखोंचे दागिने लुटून दोघे पसार!

अमरावती/प्रतिनिधीः- घरात केवळ वृद्ध दाम्पत्य असल्याची संधी साधून दोन अज्ञात लुटारूंनी मध्यरात्री घरात प्रवेश केला. चाकूचा धाक दाखवत जीवे मारण्याची धमकी दिल्यानंतर घरातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम घेऊन त्यांनी पलायन केले. अमरावती रोडवरील माऊली नगरात घडलेल्या या घटनेत सुमारे ३ लाख ३५ हजार रुपयांचा ऐवज लंपास झाला आहे. या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगेश नामक व्यक्तीने काही वर्षांपूर्वी माऊली नगरात घर बांधले आहे. त्यांचे सासरे नाना पुंडलिकराव कराळे (वय ६५) हे मागील दोन महिन्यांपासून मुलगी आणि जावयासोबत येथे राहत होते. घटनेच्या रात्री मंगेश आणि त्यांची पत्नी जेवण आटोपून आपल्या गावी गेले होते. त्यामुळे घरात नाना कराळे आणि त्यांची पत्नी असे दोघेच होते.

मध्यरात्रीच्या सुमारास दोन अज्ञात व्यक्तींनी घराच्या खिडकीची ग्रील तोडून आत प्रवेश केला. अचानक घरात घुसलेल्या या दोघांनी वृद्ध दाम्पत्याला चाकूचा धाक दाखवला. विरोध केल्यास जीवे मारण्याची धमकी देत त्यांनी घरातील लाकडी कपाटाची झडती घेतली. कपाटात ठेवलेले दोन मंगळसूत्र (३० ग्रॅम), दोन सोन्याच्या पट्ट्या (२० ग्रॅम), दोन सोन्याच्या बांगड्या (२० ग्रॅम) आणि पाच हजार रुपये रोख असा ऐवज लुटारूंनी ताब्यात घेतला. सोन्याच्या दागिन्यांची किंमत सुमारे ३ लाख ३० हजार रुपये असून, रोख रकमेसह एकूण ३ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला आहे.

परिशिष्ट १ (प्रथम वेळ)

महाराष्ट्र शासन

उपविभागीय कृषी अधिकारी यांचे कार्यालय
पत्ता मनोरमा कॉम्पलेक्स, सिंभोरा चौक
मोर्शी ता. मोर्शी जि. अमरावती

ई मेल sdaomorshi.new@gmail.com दूरध्वनी क्रमांक 07228-222273

ई निविदा सुचना क्रमांक B1-१४ ते १५
सन २०२६-२०२७
(नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प)

उपविभागीय कृषी अधिकारी मोर्शी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाकडून खाली दर्शविल्याप्रमाणे कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता खुल्या नमुन्यातील निविदा ई निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर **http:// mahaetenders.gov.in** येथून डाऊनलोड करण्यात यावी तसेच निविदा स्विकारण्याच्या अथवा नाकारण्याचा अधिकार उपविभागीय कृषी अधिकारी मोर्शी / जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी अमरावती यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारल्या जाणार नाही.

निविदा क्रं.	**कामाचे नाव**	अंदाजीत किंमत रू.	ई निविदा उपलब्ध कालावधी	निविदापुर्व बैठक दिनांक व वेळ	ई निविदा उघडणे दिनांक	निविदा फार्म रक्कम	बयाणा रक्कम
B1-14	ढाळीचे बांध तयार करणे मौजा - शेंदूरजना बा. गट क्रं. ११ ते २० ता. तिवसा जि. अमरावती	३९९२५१४	९/११/२०२६ ते २३/११/२०२६	१६/११/२०२६ सकाळी ११ वाजता उ.वि.कृ.अ. मोर्शी कार्यालय	२५/११/२०२६	५६०	३९९२५
B1-15	ढाळीचे बांध तयार करणे मौजा - शेंदूरजना बा. गट क्रं. २२ ते २७ ता. तिवसा जि. अमरावती	२६७३५७२				५६०	२६७३६

खालील संकेतस्थळावर ई निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.

९) http://mahaetenders.gov.in

(सदर निविदेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)

१०) उपविभागीय कृषी अधिकारी मोर्शी कार्यालयातील सुचना फलक.

उप-विभागीय कृषी अधिकारी
मोर्शी जि-अमरावती

वि.मा.का./अम./जाहि./६२३/२०२६-२०२७

जाहीरनामा/सायटेशन नोटीस

एस.एस.भिंगारदेव, ७ वे न्यायदंडाधिकारी प्र.श्रे. जि.अमरावती यांच्या न्यायालयात (कोर्ट नं.०७)

कि.कि.अर्ज क्रमांक १२४८/२०२६

अर्जदार : पंचशिला अशोक शेंडे
वय ३९ वर्षे, रा.भीम टेकडी जवळ, बेनोडा, अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदारः मा.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी, महानगरपालिका, अमरावती ता. जि.अमरावती

ज्याअर्थी यातील अर्जदाराने मा.कोर्ट नं.०१ मध्ये जन्म व मृत्यूची नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम १३(३)(अ) प्रमाणे यातील अर्जदार **स्वतः** यांच्या जन्म दिनांक **२६.०८.१९८७** रोजी झाली आहे. अशी नोंद करण्याचा हुकूम होणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जाबाबत कोणाची काही तकार अगर हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द केल्यापासून ३० दिवसांच्या आत आपण आपल्या वकीलामार्फत अगर स्वतः मा.कोर्ट नं.०७ यांनी आपले म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तकार न आल्यास मा.कोर्ट नं.०७ योग्य तो हुकूम काढतील याची नोंद घ्यावी.

शिक्का

स्वाक्षरी/-
०७ वे सह दिवाणी न्यायालय,
कनिष्ठ स्तर, अमरावती

दिवाणी न्यायालय (क.स्तर) नांदगाव खंडेश्वर जिल्हा अमरावती
जन्म/मृत्यू नोंदणीचा आदेश होण्याकरिता दाखल केलेल्या प्रकरणाचा जाहिरनामा

किरकोळ फौजदारी अर्ज क्र.८०/२०२६ **ने.ता.०४/१२/२०२६**

अर्जदार राजेंद्र अशोकराव लोहकरे
वय ३० वर्ष, व्यवसाय - शेती
रा.शिरपुर, नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती

... विरुध्द...

गैरअर्जदार- सचिव तथा जन्म मृत्यू अधिकारी, शिरपुर
ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती

ज्याअर्थी अर्जदार नामे **राजेंद्र अशोकराव लोहकरे** यांचा **जन्म दिनांक २४/०२/१९९६** रोजी **शिरपुर, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती** येथे झाला. अर्जदार नामे **राजेंद्र अशोकराव लोहकरे** यांच्या जन्माची नोंद, जन्म मृत्यू नगरपंचायत कार्यालय, शिरपुर, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती यांचे जन्म व मृत्यू रजिस्टर मध्ये करण्यात आली नाही. करिता उपरोक्त अर्जदाराने त्यांच्या जन्माची नोंद जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अ अन्वये घेण्याबाबत आदेश होण्याकरिता वि. दिवाणी व फौजदारी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात दिनांक २३/१०/२०२६ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी उपरोक्त अर्जावर ज्या कोणास काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी दिनांक ०४/१२/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी ता.नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर, निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उपरोक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०५/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
सही/-
(सहाय्यक अधिक्षक)
दिवाणी व फौजदारी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

प्रो.क्र.९१५/२०२६

वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस

मा.विजय जी. परवरे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्रमांक ३४७/२०२६ ने.ता.०९.१२.२०२६

अर्जदार :
1) **Sunil Panjabrao Kambale,** Age 51 yrs., Occu.- Labour, R/o. Bauddha Pura, Mu. Post Belora, Tq. Chandur Bazar, Amravati
2) **Mayur Sunil Kambale,** Age 22 yrs., Occu.- Education R/o. Asara, Tq. Bhatkuli, Dist. Amravati
3) **Mahesh Sunil Kambale,** Age 20 yrs., Occu.- Private Jo R/o. Pirangut, Po.Pirangut, Dist. Pune

-- विरुध्द --

गैरअर्जदारः- **Nil**

ज्यापेक्षा **Kalpana Yashwant Khandare** हे दि.३०.०९.२०२५ रोजी मयत झाले. अर्जदार **Sunil Panjabrao Kambale, Age 51 yrs., Occu- Labour, R/o. Bauddha Pura Mu.Post Belora, Tq. Chandur Bazar, Amravati** व इतर यांनी बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २ प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता या न्यायालयामध्ये दि.२८.१०.२०२६ रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत **Kalpana Yashwant Khandare** यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत **Kalpana Yashwant Khandare** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक **३१.१०.२०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर)
भातकुली,दि.३१.१०.२०२६

दिवाणी न्यायालय (क.स्तर) नांदगाव खंडेश्वर जिल्हा अमरावती
जन्म/मृत्यू नोंदणीचा आदेश होण्याकरिता दाखल केलेल्या प्रकरणाचा जाहिरनामा

किरकोळ फौजदारी अर्ज क्र.७९/२०२६ **ने.ता.०४/१२/२०२६**

अर्जदार प्रभाबाई वासुदेवराव झबके (लग्नानंतरचे नांव)
प्रभा माणिकराव कस्तुरकर (लग्नापूर्वीचे नांव)
वय ६४ वर्ष, व्यवसाय - घरकाम
रा.वार्ड नं.४, मु. आमगाव, पो.आकोली, जि.वर्धा

... विरुध्द...

गैरअर्जदार- सचिव तथा जन्म मृत्यू अधिकारी, सातरगांव
ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती

ज्याअर्थी अर्जदार नामे **प्रभा माणिकराव कस्तुरकर** यांचा **जन्म दिनांक १३/०१/१९६२** रोजी **सातरगांव, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती** येथे झाला. अर्जदार नामे **प्रभा माणिकराव कस्तुरकर** यांच्या जन्माची नोंद, जन्म मृत्यू नगरपंचायत कार्यालय, सातरगांव, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती यांचे जन्म व मृत्यू रजिस्टर मध्ये करण्यात आली नाही. करिता उपरोक्त अर्जदाराने त्यांच्या जन्माची नोंद जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अ अन्वये घेण्याबाबत आदेश होण्याकरिता वि. दिवाणी व फौजदारी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात दिनांक २३/१०/२०२६ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी उपरोक्त अर्जावर ज्या कोणास काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी दिनांक ०४/१२/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी ता.नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर, निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उपरोक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०५/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
सही/-
(सहाय्यक अधिक्षक)
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
नांदगाव खंडेश्वर

घरगुती स्वयंपाकासाठी उत्साही व कल्पक व्यक्ती पाहिजेत

अमरावती येथे ४ ते ५ व्यक्तींच्या कुटुंबासाठी Personal Cook / Home Chef पाहिजे.

अनुभव : अनुभव असलेल्या तसेच स्वयंपाकाची आवड व कौशल्य असलेल्या व्यक्तींना प्राधान्य.

वेतन : कौशल्य व कामाच्या स्वरूपानुसार.

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.२२८८/२०२६
Savita Virendra Joshi+ 2 Versus NIL
पुढील ता.२७.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

Applicants :-
1. **Savita Viredra Joshi,** Aged 58 yrs. Occ.- Household R/o. Sammani Colony, Shegaon Road, Amravati- 444604
2. **Abhishek Virendra Joshi,** Aged 29 yrs. Occ.- Education R/o. Sammani Colony, Shegaon Road, Amravati- 444684
3. **Sayali Kedar Lambe,** Aged 32 yrs. Occ.- Household R/o. Plot No. 73, Devidas Apartment, Wardha Road, Near Tambe Hospital, Hindustan Colony, Vivekaand Nagar, Nagpur- Pin 440 015.

----Versus ---

Non- Applicant :- NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **Rambhau Marotrao Joshi** हे दिनांक २३.०३.२०२६ रोजी **अमरावती** येथे मयत झाले. **Savita Virendra Joshi + 2 Versus Nil** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Savita Virendra Joshi + 2 Versus Nil** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०५.११.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

-सायटेशन/जाहीरनामा-

विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.७४०/२०२६ ने.ता.२३.१२.२०२६

अर्जदार -
१. **श्रीमती सुनिता वैकुंठ पांडे,** वय ७४ वर्षे, धंदा - घरकाम
२. **राजेश वैकुंठराव पांडे,** वय ४० वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा.शिरलस पो.नेरपिंगळाई, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. **वैशाली राजेंद्र काळे,** वय ४५ वर्षे, धंदा - घरकाम
रा.धोत्रा, ता.तिवसा, जि.अमरावती
४. **शुभांगी सतिश कापसे,** वय ४३ वर्षे, धंदा - घरकाम
रा.चिंचोली गवळी, ता. मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --
निल (कुणीही नाही)

वरील अर्जदाराने वि.दिवाणी न्यायाधीश साहेब, (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत U/S २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार क्र.१ चे पती तर अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडिल नामे **वैकुंठ गुलाबराव पांडे** यांचा **दि. ०३/०४/२०२६** रोजी **शिरलेस, ता.मोर्शी, जि.अमरावती** येथे मृत्यू झाला. अर्जदार हे मयतांचे कायदेशिर वारस आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०७.११.२०२६

शिक्का

आदेशान्वये,
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय (क.स्तर) , मोर्शी

दिवाणी न्यायालय (क.स्तर) नांदगाव खंडेश्वर जिल्हा अमरावती
जन्म/मृत्यू नोंदणीचा आदेश होण्याकरिता दाखल केलेल्या प्रकरणाचा जाहिरनामा

किरकोळ फौजदारी अर्ज क्र.७७/२०२६ **ने.ता.०१/१२/२०२६**

अर्जदार अ.राजीक अ.समद
वय ३९ वर्ष, व्यवसाय - शेती
रा.मंगरुळ चव्हाळा मज्जीद परिसर, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती

... विरुध्द...

गैरअर्जदार- सचिव तथा जन्म मृत्यू अधिकारी,
ग्रामपंचायत मंगरुळ चव्हाळा, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती

ज्याअर्थी अर्जदार नामे **अ.राजीक अ.समद** यांचा **जन्म दिनांक २०/०७/१९८७** रोजी **मंगरुळ चव्हाळा, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती** येथे झाला. अर्जदार नामे **अ.राजीक अ.समदे** यांच्या जन्माची नोंद,जन्म मृत्यू निबंधक,**ग्रामपंचायत मंगरुळ चव्हाळा**,ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती यांचे जन्म व मृत्यू रजिस्टर मध्ये करण्यात आली नाही. करिता उपरोक्त अर्जदाराने त्यांच्या जन्माची नोंद जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अ अन्वये घेण्याबाबत आदेश होण्याकरिता वि. दिवाणी व फौजदारी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात दिनांक २३/१०/२०२६ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी उपरोक्त अर्जावर ज्या कोणास काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी दिनांक ०१/१२/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी ता.नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर, निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उपरोक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०५/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
सही/-
(सहाय्यक अधिक्षक)
दिवाणी व फौजदारी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

जाहीरनामा/सायटेशन

किरकोळ अर्ज क्र.२३९६/२०२६
ममताताई विरुध्द निरंक
पुढील ता.१६.१२.२०२६

अर्जदार :-

1. **Mandabai Babanrao Madhankar,** Aged about 68 yrs. Occ.- Nil R/o. Umbarda Bazar, Tq. Karanja Dist. washim- 444 105

-- विरुध्द --

गैरअर्जदार :- Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की,मयत **Annapurna Bhaurav Khedkar** हे दि.२९.०५.२०२५ रोजी **अमरावती** येथे मयत झाले. **अर्जदार Mandabai Babanrao Madhankar** वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Mandabai Babanrao Madhankar** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०५.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. **173/19/2026**
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री कृष्णाजी अवधूत महाराज मंदिर देऊळगव्हाण, पो.पिंपळगव्हाण निपाणी, ता.ना. खंडेश्वर, जि.अमरावती**
बाबत अर्जदार - **श्री बळवंत डुबाजी सावध**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३ अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
(अ) जंगम मिळकत - निरंक
(ब) स्थावर मिळकत (वर्णन) :- मु. देऊळगाव पो.पिंपळगव्हाण निपाणी, ग्रा.पंचायत पिंप्रि गावंडा,ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमराववती गाव येथील मालमत्ता क्र.४८६ यावर जागेची लांबी-रुंदी ४५**X**५५= २४७५ चौ.फुट खुली जागा १५.५ **X** ५०=७७५ चौ.फुट
जागेचे एकूण क्षेत्रफळ ६५ **X** ५०= ३२५० चौ.फुट
पुर्वेस - रस्ता पश्चिमेस - रामेश्वर खंडारे
उत्तरेस- रस्ता दक्षिणेस- वसंत सावध

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल तर पुरावा देणे असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे शिक्यानिशी आज दिनांक २९.१०.२०२६ रोजी दिली.

शिक्का

सही/-
अधीक्षक, (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

दिवाणी न्यायालय (क.स्तर) नांदगाव खंडेश्वर जिल्हा अमरावती
जन्म/मृत्यू नोंदणीचा आदेश होण्याकरिता दाखल केलेल्या प्रकरणाचा जाहिरनामा

किरकोळ फौजदारी अर्ज क्र.७८/२०२६ **ने.ता.०४/१२/२०२६**

अर्जदार अश्वीनी प्रकाश डकरे
वय ३८ वर्ष, व्यवसाय - घरकाम
रा.वार्ड नं.४, नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

... विरुध्द...

गैरअर्जदार- सचिव तथा जन्म मृत्यू अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय,नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती

ज्याअर्थी अर्जदार नामे **अश्वीनी प्रकाश डकरे** यांचा **जन्म दिनांक २१/०४/१९८८** रोजी **नांदगाव खंडेश्वर,ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती** येथे झाला. अर्जदार नामे **अश्वीनी प्रकाश डकरे** यांच्या जन्माची नोंद, जन्म मृत्यू नगरपंचायत कार्यालय, नांदगाव खंडेश्वर ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती यांचे जन्म व मृत्यू रजिस्टर मध्ये करण्यात आली नाही. करिता उपरोक्त अर्जदाराने त्यांच्या जन्माची नोंद जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अ अन्वये घेण्याबाबत आदेश होण्याकरिता वि. दिवाणी व फौजदारी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात दिनांक २३/१०/२०२६ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी उपरोक्त अर्जावर ज्या कोणास काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी दिनांक ०४/१२/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी ता.नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर, निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उपरोक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०५/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
सही/-
(सहाय्यक अधिक्षक)
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
नांदगाव खंडेश्वर

दिवाणी न्यायालय (क.स्तर) नांदगाव खंडेश्वर जिल्हा अमरावती
जन्म/मृत्यू नोंदणीचा आदेश होण्याकरिता दाखल केलेल्या प्रकरणाचा जाहिरनामा

किरकोळ फौजदारी अर्ज क्र.८५/२०२६ **ने.ता.०४/१२/२०२६**

अर्जदार श्रीकांत रमेश राऊत तर्फे अर्जदार अरुण चंपतराव नेवारे
वय ५७ वर्ष, व्यवसाय - शेती
रा.जामगाव जनुना, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती

... विरुध्द...

गैरअर्जदार- सचिव तथा जन्म मृत्यू अधिकारी,
ग्रामपंचायत जामगाव, ता.नांदगाव खंडेश्वर,जि. अमरावती

ज्याअर्थी अर्जदार नामे **अरुण चंपतराव नेवारे यांचे भाचे श्रीकांत रमेश राऊत** यांचा **जन्म दिनांक १४/१२/१९८४** रोजी **जामगांव, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती** येथे झाला. अर्जदार नामे **अरुण चपंतराव नेवारे यांचे भाचे श्रीकांत रमेश राऊत,** यांच्या जन्माची नोंद, जन्म मृत्यू निबंधक,**ग्रामपंचायत जामगाव,** ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती यांचे जन्म व मृत्यू रजिस्टर मध्ये करण्यात आली नाही. करिता उपरोक्त अर्जदाराने त्यांच्या जन्माची नोंद जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अ अन्वये घेण्याबाबत आदेश होण्याकरिता वि. दिवाणी व फौजदारी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात दिनांक २३/१०/२०२६ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी उपरोक्त अर्जावर ज्या कोणास काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी दिनांक ०४/१२/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी ता.नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर, निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उपरोक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०५/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
सही/-
(सहाय्यक अधिक्षक)
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
नांदगाव खंडेश्वर

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ६५
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

संक्षिप्त

दुष्काळी स्थितीत हरभरा, तूर पिकांच्या व्यवस्थापनाचे धडे

आसेगाव पूर्णा - पावसाचे प्रमाण कमी झाल्याने रब्बी हंगामातील हरभरा व तूर पिकांच्या व्यवस्थापनाचे आव्हान शेतकऱ्यांसमोर उभे ठाकले आहे. या पार्श्वभूमीवर अचलपूर तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या वतीने सावळापूर येथे श्री हनुमान मंदिरात शेतकरी प्रशिक्षण घेण्यात आले.सहायक कृषी अधिकारी भागवत सोमटकर यांनी कृषी विभागाच्या योजना व कापूस वाढ प्रकल्पाची माहिती दिली. उपकृषी अधिकारी अतुल हुड यांनी कडधान्य आत्मनिर्भर अभियान, सुधारित लागवड तंत्रज्ञान व पीक नियोजनाबाबत मार्गदर्शन केले. वरिष्ठ शास्त्रज्ञ नरेंद्र मोहोड यांनी हरभरा व तूर पिकांवरील कीड-रोगांची ओळख, एकात्मिक कीड व्यवस्थापन आणि दष्काळी परिस्थितीतील पीक व्यवस्थापनाची माहिती दिली. मंडळ कृषी अधिकारी प्रमोद हिवाळे यांनी कमी पाण्यात पीक जोपासण्यासाठी पाणी व्यवस्थापन व जमिनीतील ओलावा टिकविण्याच्या उपाययोजना सांगितल्या. उपकृषी अधिकारी अजित चित्रकार यांनीही शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.यावेळी युवा शेतकरी मिलिंद गोदे यांच्यासह देवराव मांगे, सुरेश नांदने, मनीष शुक्ल व दिवाकर मांगे उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या शेतीविषयक अडचणींचे कृषी अधिकारी व शास्त्रज्ञांनी निरसन केले. बदलत्या हवामानात शास्त्रीय पद्धतीने शेती करून उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा,असे आवाहन यावेळी करण्यात आले.

परतवाडा, दर्यापुरात नमकीन बनवणाऱ्या कारखान्यांवर धाडसत्र

अचलपूर- सणासुदीच्या पार्श्वभूमीवर परतवाडा येथील रवी नगर परिसरातील 'मे.शुभी नमकीन अँड स्वीट सेंटर'ची तपासणी अन्न सुरक्षा अधिकारी जी.पी.दंदे यांनी केली.तपासणी दरम्यान याठिकाणी त्रुटी आढळून आल्या. उत्पादन स्थळाच्या काळवंडलेल्या भिंती, छताची दुरवस्था आणि अस्वच्छ परिसर अशा अन्न सुरक्षा कायद्यातील 'परिशिष्ट ४'च्या अटींचे थेट उल्लंघन होत असल्याचे समोर आले. या ठिकाणाहून शंकरपाळे, बारीक शेव आणि गाठिया या पदार्थांचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. तसेच कृत्रिम रंगाच्या संशयावरून १० हजार ८०० रुपये किमतीचा ९० किलो बारीक शेवेचा साठा जप्त करण्यात आला.दुसऱ्या कारवाईत, दर्यापूर येथील बनोसा भागातील 'मे. लक्ष्मी बिकानेर' या पेढीची अन्न सुरक्षा अधिकारी अ.ग.चौहान यांनी तपासणी केली. ही आस्थापना कोणतीही अधिकृत नोंदणी किंवा परवाना नसताना बेकायदेशीरपणे सुरू असल्याचे उघडकीस आले. भेसळीच्या संशयावरून १० हजार ८०० रुपयांचा २७ किलो खुला पेढा जागेवरच नष्ट करण्यात आला.

वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख म्हणून डॉ.पी.ए.गावंडे यांचे नामनिर्देशन



अमरावती- संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागाचे विभागप्रमुख म्हणून प्रा. डॉ. प्रशांत ए. गावंडे यांचे नामनिर्देशन करण्यात आले आहे.विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. वर्षा एन. नाठार हा विद्यापीठ सेवेतून सेवानिवृत्त झाल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या रिक्तपदी प्रा.डॉ.प्रशांत ए.गावंडे यांचे नामनिर्देशन करण्यात आले आहे. नुकताच त्यांनी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. वनस्पतीशास्त्र विभागाच्या प्रमुखपदी नामनिर्देशन झाल्याबद्दल डॉ.प्रशांत गावंडे यांचे सर्वांनी अभिनंदन केले आहे. सर्वसामान्यांच्या माहितीकरिता विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

शाळांमध्ये प्रदूषणमुक्त दिवाळीची शपथ

अमरावती- दिवाळीचा सण प्रदूषणमुक्त साजरा करण्याच्या उद्देशाने राज्यातील सर्व शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना प्रदूषणमुक्त दिवाळीची शपथ दिली जाणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांच्या निर्देशानुसार, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सदस्य सचिवांच्या २२ ऑक्टोबरच्या पत्रानंतर शिक्षण संचालनालयाकडून विभागीय शिक्षण उपसंचालक, जिल्हा परिषदांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी तसेच महानगरपालिकांच्या शिक्षण विभागांना या उपक्रमासाठी निर्देश देण्यात आले आहेत. शाळांमधील नियमित परिपाठाच्या वेळी विद्यार्थ्यांना ही शपथ दिली जाईल. ध्वनी व प्रदूषण रोखण्यासाठी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यातील शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि पशुपक्ष्यांच्या आरोग्यावर होणारे विपरीत परिणाम टाळण्यासाठी विद्यार्थ्यांना या वर्षी प्रदूषणमुक्त दिवाळीचा संकल्प करायला सांगितले जाईल.

१० नोव्हेंबरला सामूहिक गोपूजन सोहळा

मारेगाव- यवतमाळ जिल्ह्यातील मारेगाव तालुक्यात गौराळा-वरुड मार्गावरील टेकदिवारी मदावर (मोठा देव मंदिर) येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही बलिप्रतिपदेच्या शुभमुहूर्तावर मंगळवार, १० नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत सामूहिक गोपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून वणी विधानसभा मतदारसंघाचे आ.संजय देरकर तसेच वणीचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेशजी दळवे साहेब उपस्थित राहणार आहेत. टेकदिवारी मदावर हे ठिकाण वणीपासून सुमारे १५ किलोमीटर तर मारेगावपासून सुमारे ९ किलोमीटर अंतरावर आहे. कार्यक्रमाच्या ठिकाणी मद्यपान करून येणे, मद्यपान करणे तसेच फटाके फोडण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करून गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशारा उत्सव समितीच्या वतीने देण्यात आला आहे. यवतमाळ जिल्ह्यातील विविध भागांत पारंपरिक गोपूजन व गायीगोधनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात.

भास्कर पवार यांचे निधन



थामणगाव रेल्वे - कोठारी नगर येथे रहिवाशी भास्कर पवार वय (७० वर्ष) यांचे अल्पशा आजाराने शनिवारी ७ नोव्हेंबर रोजी सकाळी यवतमाळ येथील उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्या मागे एक मुलगा एक मुलगी असा आप्त मोठा परिवार असून एडवोकेट योगेश पवार यांचे ते वडील होते.हिंदू स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

दिवाळीच्या धामधुमीत वाहतुकीचा अडथळा

प्रमुख चौकांमध्ये वाहतूक कर्मचारी गायब, रस्त्यावर पार्कींग, फुटपाथ वर दुकाने

अचलपुर/वार्ताहर



दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी उसळली असून, जुळ्या शहरातील प्रमुख मार्गांवर विस्कळीत वाहतुकीची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. वाहनांची प्रचंड वर्दळ आणि बेशिस्त पार्किंगमुळे जुळ्या शहरात वाहतुकीचा अक्षरशः बोजवारा उडाला आहे. फुटपाथ वर दुकाने तर रस्त्यावर वाहनांचे पार्किंग असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. पण पोलीस अथवा वाहतुक पोलीस कुठेच दिसत नसल्यामुळे गर्दीचा फायदा घेत चोर सक्रीय होण्याची शक्यता नाकारता येत नाही.परतवाडा शहरात दिवाळीच्या खरेदीसाठी बाजारपेठेतील गर्दीत दिवसेंदिवस वाढ होत आहे.यामुळे दिवाळी चा एक दिवसापूर्वी वाढत्या गर्दीच्या तुलनेत वाहतूक व्यवस्थेचे योग्य नियोजन नसल्याने वाहनधारकांसह पादचाऱ्यांनाही मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला.दुराणी चौक परिसरात दुचाकी, चारचाकी वाहने आणि नागरीक वाहने रस्त्यावर उभी करून तासण तास खरेदी करीता जात असल्याने वाहतुकीस अडथडा निर्माण होत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. अचलपुर-परतवाडा शहरातील प्रमुख चौक आणि गर्दीच्या ठिकाणी वाहतूक कर्मचारी दिसून येत नसल्याने परिस्थिती अधिकच खराब आहे. वाहतूक नियंत्रणासाठी पोलीस तथा वाहतूक कर्मचारी उपस्थित नसल्याने वाहनचालकांकडून मनमानी पद्धतीने वाहने चालविणे आणि पार्किंग केले.याचा सर्वाधिक त्रास ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले आणि पायी चालणाऱ्या नागरिकांना सहन करावा लागत आहे.यामुळे नागरिकांना विविध अडचणीचा सामना करावा लागला.आणि काही ठिकाणी वाहनचकामध्ये च वादविवाद झाल्याचे समोर आले आहे.

स्वतंत्र वाहतूक नियंत्रण शाखेचे अधिकारी-कर्मचारी यांनी परतवाडा शहरासह जुळ्या शहरातील मुख्य चौकात विस्कळीत वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी तैनात होते.मात्र संबंधित पोलिस स्टेशन चे अधिकारी आणि वाहतूक कर्मचारी गायब असल्याने वाहनचालकांनी नाराजी व्यक्त केली.

दुष्काळात पाण्याची नासाडी

वर्षभरापासून हजारो लीटर पाणी वाया, ग्रामपंचायतचे दुर्लक्ष



चिखलदरा - एकीकडे जिल्ह्यात दुष्काळ परिस्थिती जाहीर झाली असून शासनाने पाण्याच्या वापरावर बंदी घातली आहे. शेतकऱ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे, तर दुसरीकडे डोमा येथून काटवुंभ गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य पाईपलाईनमधून मागील १ वर्षापासून सतत पाणी गळत असून हजारो लीटर पाणी दररोज वाया जात आहे. ग्रामस्थांनी वारंवार तक्रार करूनही ग्रामपंचायत काटकुंभ याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करीत आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला ग्रामपंचायतीने केराची टोपली दाखवली आहे का? असा संतप्त सवाल गावकरी विचारत आहेत. धनकादायक बाब म्हणजे,गळणाऱ्या पाण्याचा वापर बाजूच्या शेतमालकाकडून आपल्या शेताची ओलीत करण्यासाठी केला जात आहे. पिण्यासाठी आलेले शुद्ध पाणी शेतीसाठी वापरले जात असून, गावातील इतर नागरिक पाण्यापासून वंचित राहत आहेत. पाईपलाईनची गळती तत्काळ दुरुस्त करावी. पिण्याच्या पाण्याचा शेतीसाठी होणारा गैरवापर थांबवावा. १ वर्षापासून दुर्लक्ष करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. दुष्काळाच्या काळात पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असताना प्रशासनाने आता तरी जागे व्हावे, अशी मागणी जनतेतून होत आहे.

तीन तीर्थक्षेत्रांच्या विकासाला २० कोटींचे बळ

कौंडण्यपूर आणि वलगावच्या कामांनाही मंजुरी

अमरावती/का.प्र.



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज मोझरी, श्री क्षेत्र कौंडण्यपूर आणि संत गाडगेबाबा वलगाव या तीन तीर्थक्षेत्रांच्या विकासाला मोठी चालना मिळाली आहे. तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत तिन्ही ठिकाणच्या इमारतींची दुरुस्ती आणि भाविकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाच्या उच्चाधिकार समितीने तब्बल २० कोटी १९ लाख ८५ हजार रुपयांच्या कामांना मंजुरी दिली आहे. यामध्ये मोझरीसाठी १६ कोटी ५५ लाख रुपये,कौंडण्यपूरसाठी १ कोटी ८४ लाख २० हजार रुपये आणि वलगावसाठी १ कोटी ८० लाख ६५ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव आबासाहेब नगरगोजे दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. जिल्हाधिकारी आशीष येरेकर, नियोजन विभागाच्या सहसचिव गीतांजली बाविस्कर आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता सचिन चिवटे उपस्थित होते. मोझरी येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आध्यात्मिक संकुल, ग्रामविकास प्रबोधिनी,भक्तनिवास आणि महत्त्वाच्या व्यक्तींच्या विश्रामगृहांसह एकूण १२ इमारतींची दुरुस्ती करण्यात येणार आहे. याशिवाय सर्व इमारतींना कायमस्वरूपी पाणीपुरवठ्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. कौंडण्यपूर येथे प्रसाधनगृह, पर्यटक विश्रामगृह, उपहारगृह, विश्रामगृह आणि पोहोच मार्गाची दुरुस्ती होणार आहे. वलगाव येथे इमारतींची रंगरंगोटी, परिसराची स्वच्छता, फरशीची कामे, पावसाचे पाणी साठवण, पाणीपुरवठा आणि वीज व्यवस्था सुधारण्यात येणार आहे. या कामांमुळे भाविकांना अधिक चांगल्या सुविधा मिळणार आहेत.तिन्ही तीर्थक्षेत्रांतील कामे पूर्ण झाल्यानंतर दुरुस्ती आणि हस्तांतरणाबाबत सुधारित प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश अमरावती विभागीय आयुक्तांना देण्यात आले आहेत.

मोर्शी मार्गावर अवैध बस वाहतूक; कारवाई न केल्यास आंदोलनाचा इशारा

रस्ता अपघातात मृतक परिवारास १५ लाख देण्याची मागणी

अमरावती/का.प्र.



मोर्शी-अमरावती मार्गावर अवैध प्रवासी बस वाहतूक बिनदिक्कत सुरू असल्याचा आरोप करीत, वारंवार तक्रारी करूनही कारवाई होत नसल्याने सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाविरोधात आंदोलनाचा इशारा दिला आहे. बसमालक आणि आरटीओ अधिकाऱ्यांच्या कथित संगनमतामुळे प्रवाशांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. या निष्काळजीपणामुळे ७ एप्रिल २०२६ रोजी माहुली पोलीस ठाण्याच्या हद्दीत बसच्या धडकेत २३ वर्षीय शिवप्रकाश कवलती या युवकाचा मृत्यू झाला होता. या घटनेला आरटीओ प्रशासन जबाबदार धरून संबंधित अधिकारी उर्मिला पवार यांच्या वेतनातून मृत युवकाच्या कुटुंबाला १५ लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याची मागणी करण्यात आली आहे.

देवी मानकर, प्रमोद भुजे, अंबादास राऊत आणि राजू वानखडे यांनी पत्रकार परिषदेत ही भूमिका मांडली. मोर्शी-अमरावती मार्गावरील अवैध बस वाहतूक बंद करण्यासाठी प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांच्याकडे अनेकदा तोंडी आणि लेखी तक्रारी करण्यात आल्या. मात्र, अद्याप ठोस कारवाई झाली नसल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रकरणी कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळाने नागपूर येथील सचिवालयातही तक्रारीची माहिती घेतली. मुख्यमंत्री सचिवालयाच्या सहसचिव आशा पठाण यांनी राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेण्याचा सल्ला दिला. त्यानुसार १ नोव्हेंबर २०२६ रोजी नागपूर येथे बावनकुळे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देण्यात आले. गोऱ्हाळा (पिंगळा) बसथांब्यावर आरटीओंचे कायमस्वरूपी तपासणी नाक्याची उभारणी करण्याचीही मागणी करण्यात आली आहे. अवैध बस वाहतूक पूर्णपणे बंद न झाल्यास नागपूर येथील राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान आरटीओ अधिकारी उर्मिला पवार यांच्याविरोधात आंदोलन छेडण्याचा इशारा कार्यकर्त्यांनी दिला आहे.

न्यू गोल्डन इंग्लिश हायस्कूलमध्ये दिवाळी सोहळ्याचे आयोजन

अमरावती/का.प्र.



बालाजी नगर, मोती नगर वॉर्ड येथील न्यू गोल्डन इंग्लिश हायस्कूल, एन. जी. पब्लिक स्कूल तसेच साहिल प्राथमिक व माध्यमिक शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने अनोख्या आणि उत्साहपूर्ण दिवाळी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना दिवाळीतील विविध सणांचे महत्त्व, परंपरा आणि त्यामागील पौराणिक कथा समजाव्यात, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाची सुरुवात संस्थेच्या संचालिका जयश्री अनिल आसलकर आणि मुख्याध्यापिका सारिका माधने यांच्या हस्ते लक्ष्मीपूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. संस्थेचे असोसिएट डायरेक्टर उत्कर्ष अनिल आसलकर यांच्या संकल्पनेतून हा अभिनव उपक्रम साकारण्यात आला. या सोहळ्यानिमित्त विद्यार्थ्यांनी तोरण, आकाश कंदील, दिव्यांची रोषणाई आणि आकर्षक रांगोळ्यांनी संपूर्ण शाळा सजविली होती. शिक्षकांनी कथांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दिवाळीचे धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व समजावून सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली दिवाळीतील विविध दिवसांवर आधारित नाटिका, नृत्यनाटिका आणि सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

वसुबारस या पहिल्या दिवसाचे महत्त्व विद्यार्थ्यांनी गायी व वासराच्या पूजनाचे नाट्य सादर करून स्पष्ट केले. धनत्रयोदशी आणि नरकचतुर्दशीचे महत्त्व नृत्यनाटिकेतून उलगडण्यात आले. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी विद्यार्थ्यांनी सुंदर दीपसजावट करून संस्कृत श्लोकांच्या माध्यमातून लक्ष्मीमातेची आराधना केली. बलिप्रतिपदेच्या निमित्ताने बळीराजा, भगवान विष्णूंचा वामन अवतार आणि गोवर्धन पूजेचा देखावा सादर करण्यात आला. तर भाऊबीजेचे महत्त्व पूर्वप्राथमिक वर्गातील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सुंदर नाट्य सादरीकरणातून अधोरेखित केले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना प्रसादाचे वितरण करण्यात आले. संस्थेच्या संचालिका जयश्री अनिल आसलकर यांनी सर्वांना दिवाळीच्या मंगलमय शुभेच्छा दिल्या. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना खाऊ व मिठाईचे वाटप करून या आनंददायी सोहळ्याची सांगता करण्यात आली.या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले. दिवाळीच्या परंपरा, संस्कृती आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा सोहळा विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक आणि आनंददायी ठरला.

अमरावती-बडनेरा मतदारसंघात आनंदाचा शिधा वाटपाला सुरुवात

दुष्काळग्रस्त व गरजू नागरिकांना मदत




अमरावती/प्रतिनिधी:- अमरावती व बडनेरा मतदारसंघातील दुष्काळग्रस्त व गरजू लोकांना आनंदाचा शिधा वाटपाला सुरुवात करण्यात आली आहे. याप्रसंगी शिवसेनेचे मुख्य नेते महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा आनंदाचा शिधा अमरावतीचे जिल्हाप्रमुख संतोष बद्रे यांच्याकडे पाठविला. त्यांनी तात्काळ गरजू व दुष्काळग्रस्त लोकांना शिधा वाटप करण्याला सुरुवात केली तसेच अमरावती महानगरातील गरजू सफाई कामगारांना सुद्धा याप्रसंगी शिधावाटप करण्यात आले. शिधा वाटप करताना शिवसेनेचे उपनेते ज्ञानेश्वर धाने पाटील, साईनगर प्रभागाच्या नगरसेविका मंजुषा जाधव, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संतोष बद्रे, उपजिल्हाप्रमुख सुनील केने, सुभाष राठोड, गजानन शेरेकर, राठोड, सुरज बर्डे याप्रसंगी उपस्थित होते.

अचलपूर मतदारसंघात बनावट विदेशी दारूची विक्री जोमात

परतवाडा शहराला लागूनच असलेल्या मध्य प्रदेश सिमेतून होतो पुरवठा, अधिकाऱ्यांची गस्त नावापुरतीच

अचलपूर/वार्ताहर



अचलपूर मतदारसंघात दारू बंदी विभागाच्या जाणीवपूर्वक दुर्लक्षामुळे बनावट विदेशी दारूची विक्री जोमात सुरू आहे. एकीकडे परतवाडा येथून मध्य प्रदेशची सीमा असल्याने विदेशी बनावट दारूचा पुरवठा मध्य प्रदेश सीमेतून होतो. पण दारूबंदी विभागाचे अधिकारी - कर्मचारी हे कधीही गस्तीवर नसल्याने अचलपूर मतदारसंघात होणाऱ्या बनावट विदेशी दारूच्या पुरवठ्यावर अंकुश कोण लावणार? हा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे.

अचलपूर परतवाडा जुळवा शहरासह चांदूरबाजार, शिरसगाव, करजगाव, घाटलाडकी, ब्राह्मणवाडा थडी या विभागांमध्ये मैसदेही जिल्ह्याची सीमा वरील उल्लेख असलेल्या सर्व गावांमध्ये बनावट विदेशी दारूची आवक मोठ्या प्रमाणात सुरू आहे. या बनावट दारूमुळे राज्य शासनाच्या लाखो रुपयांचा महसूल बुडीत आहे. एकीकडे बनावट विदेशी दारू विक्री खुलेआम सुरू असल्याने अचलपूर येथील दारूबंदी विभागाचे अधिकारी नेमके काय करतात? हा प्रश्न सुद्धा निर्माण झालेला आहे.एकीकडे या कार्यालयात कधीही अधिकारी - कर्मचारी उपस्थित नसते.गस्तीवर असल्याचे कारण समोर ठेवून हे अधिकारी-कर्मचारी नेमकी गस्त कुठे करतात? कोणती कारवाई करतात आली? याची माहिती कधीही समोर आलेली नाही. दुसरीकडे दारूबंदी विभाग या बनावट विदेशी दारू विक्रीसाठी परवानगी दिली आहे का? असेही दबक्या आवाजात चर्चा सुरू आहे.पण याकडे अचलपूर दारु बंदी विभागाने जाणून-बुजून दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप शासकीय परवानाधारक दारू विक्रेत्यांकडून होत आहे.राज्य शासनाने विदेशी दारूच्या किमतीमध्ये नुकतीच प्रचंड वाढ केली आहे. यामुळे मध्य प्रदेशातील बनावट विदेशी दारूची विक्री प्रचंड प्रमाणात होत आहे.याचा पुरवठा अचलपूर,चांदूरबाजार तालुक्यात म्हणजे अचलपूर मतदारसंघात जागोजागी होत असल्याची माहिती समोर आलेली आहे. एकीकडे राज्यात विदेशी दारूच्या किमतीमध्ये वाढ आणि दुसरीकडे मध्य प्रदेशातून बनावट विदेशी दारूची किंमतीत तिप्पट फरक असल्यामुळे शंभर रुपयाची दारु ही तीनशे रुपये ग्राहकांकडून खरेदी केल्या जाते. यामुळे बनावट विदेशी दारू विक्री करणाऱ्यांची चांदी होत आहे.याचा परिणाम मात्र आरोग्यावरही होत असल्याचे समोर आलेले आहे.


अचलपूर दारूबंदी विभागाच्या कार्यालयात दारूबंदी निरीक्षक, तीन निरीक्षक तसेच चार लिपीक असा ९ कर्मचाऱ्यांचा स्टाफ कार्यरत आहे.


पण तक्रार करणाऱ्या नागरिकांना या कार्यालयात सदर अधिकारी- कर्मचाऱ्यांची अनुपस्थित तीच असल्याचे सांगितले जाते.या सर्व प्रकारामुळे अचलपूर शहरातील दारूबंदी विभागाचे कार्यालय हे फक्त शोभेची वस्तू बनलेली आहे आणि दुसरीकडे बनाव दारू विक्रीचा प्रकार खुलेआम सुरू आहे.या सर्व प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून दखल घेतल्या जाणार का हा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे.


घरकुल
मसाले
प्रत्येक सणात
प्रत्येक पदार्थात
घरकुल माझा सोबती..
GHARIKUL
+91 99 65 961 961
gharkul.masala@gmail.com
C-42 MIDC Area, Amravati 444607


॥ श्री गणेशाय नमः ॥
श्री गजानन उर्जा इंडस्ट्रीज
इलेक्ट्रिकल आणि सोलर वर्क्स
WAAREE
One with the Sun
Authorized Partner
WAACAB
Power Stable WAA Cable
Authorized Distributor
निवासी प्रकल्प
(घरगुती सोलर)
व्यावसायिक प्रकल्प
(उद्योग / व्यवसाय)
गृह संकुल प्रकल्प
(सोसायटी / अपार्टमेंट)
आमच्या सेवांमध्ये
सोलर सिस्टिम ची रचना व स्थापना
ऑपरेशन व मेंटेनन्स (O&M)
संपूर्ण विद्युत (इलेक्ट्रिकल) कामे
सार्हिय व तांत्रिक सहकार्य
विश्वसनीय दर्जेदार उपकरणे
आणि दीर्घकालीन पाठबळ
शासकीय
अनुदानाचा
लाभ घ्या!
आमची वैशिष्ट्ये
वीज बिलात मोठी बचत
शासकीय अनुदानाची सुविधा
पर्यावरणपूरक व स्वच्छ ऊर्जा
मालमत्तेची (प्रॉपर्टी) वाढलेली किंमत
दीर्घकालीन व विश्वासनीय समाधान
आपल्या सर्व ग्राहक, हितचिंतक
आणि नागरिकांना
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा..!
9545524119 | 9823922444 | 8788803446
मुख्य कार्यालय (नागपूर) :
33 "साफल्य", नंदनवन कॉलनी, नागपूर.
शाखा कार्यालय (वर्धा) :
इंदिरा मार्केट रोड, बँक ऑफ बडोदा जवळ, वर्धा.


दीपावलीच्या मंगलमय पर्वानिमित्त आपल्या
जीवनात सुख, समृद्धी, आरोग्य आणि
आनंदाची अखंड ज्योत प्रज्वलित राहो.
शुभ दीपावली


Book Nook
BookNook
Study Room
दीपावली की ढेर सारी
शुभकामनाएं
OFFER PROMO!
Offer 1
SINGLE
800 se सिर्फ
599/month
Offer 2
COMBO
2 Friends
1199/month
Offer 3
NEW
9 DAYS
FREE
Valid: 8 November to 8 December 2026
We Are
Cool
WiFi
CCTV
Girls
Safe
Ambapeth, Janmadhyam Complex | Call: 9823016309


अॅड. प्रशांत देशपांडे
स्वीकृत नगरसेवक, मनपा, अमरावती
भाजपा विधी प्रकोष्ट उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश


सोनपावलांनी येवो आनंद,
सुख-समृद्धीचा होवो वर्षाव.
दिवाळी घेऊन येवो,
आयुष्यात नव्या स्वप्नांचा ठेवा.!
आपल्या जीवनात नांदो सुख,
शांती आणि भरभराट.
शुभ
दिपावली
समस्त अमरावतीकरांना
दिपावलीच्या धनदायी,
प्रकाशमय,
आरोग्यदायी, चेतन्यदायी
हार्दिक शुभेच्छा..!
श्री. श्रीचंद तेजवानी
श्री. सचिन भेडे
श्री. अविनाश मार्डीकर
श्री. चेतन गावंडे
श्री. विलास इंगोले
श्री. नाना आमले
श्री. राजेंद्र तायडे
शेख हमीद शेख वाहेद
अमरावती महानगरपालिका, अमरावती.

जनमाध्यम

Epaper www.janmadhyam.com रविवार, ८ नोव्हेंबर २०२६ एक प्रतिष्ठित सवय

नगरपरिषद वर्धा जि. वर्धा
आरोग्य व पाणी पुरवठा विभाग

जाहीर आवाहन

सर्व नागरिकांना याद्वारे विनंती करण्यात येते की, दिवाळी उत्सव स्वच्छ दिवाळी म्हणुन साजरा करण्याकरिता पुढील प्रमाणे सहकार्य करावे! १) शक्यतोवर हवा प्रदुषण व ध्वनी प्रदुषण टाळण्यास्तव फटाके विरहीत दिवाळीचा सण साजरा करण्याचा प्रयत्न करावा. २) पाण्याचा अपव्यय टाळूया,आवश्यक तेवढेच पाणी वापरूया,पाणी बचत हीच काळाची गरज ओळखुया. ३) घरातुन निघणारा कचरा वर्गीकृत करुन आपल्याघरी येणाऱ्या संकलण वाहणात टाकावा.४) आपल्या घरातील टाकाऊ वस्तु नगर परिषदेच्या RRR (Reuse, Reduce, Recycle) केंद्राकडे सोपविण्यात यावा.५) फटाका व्यावसाईकांनी रितसर परवानगी घेऊन आपला व्यवसाय थाटावा तसेच आगीच्या घटना घडु नये यास्तव नगरपरिषदेद्वारे सुचविलेल्या उपाययोजनांचे तंतोतंत पालन करावे.६) ही दिवाळी प्लास्टिक मुक्त राहील या करिता सर्व नागरिकांनी सहकार्य करावे.७) नगर परिषदेचा कर व पाणीपट्टीचा भरणा तात्काळ नगरपरिषदेकडे करुन सहकार्य करावे.

(श्री.डॉ.सुधीर भाऊरावजी पांगुळ) अध्यक्ष नगरपरिषद वर्धा	(श्री.प्रदीपसिंग उजागरसिंग ठाकूर) उपाध्यक्ष नगरपरिषद वर्धा	(श्री.डॉ.सुधीर भाऊरावजी पांगुळ) अध्यक्ष नगरपरिषद वर्धा
(श्री. सुरेश गुलाबचंद आहुजा) सभापती, आरोग्य विभाग नगरपरिषद वर्धा	(श्रीमती.शुभांगी नरेश कोलते) सभापती, आरोग्य विभाग नगरपरिषद वर्धा	(विजय देशमुख) मुख्याधिकारी नगरपरिषद वर्धा

चतुराजी बहुउद्देशीय शिक्षण संस्था, अमरावती.

धनाची पूजा, यशाचा प्रकाश, किर्तीचे अभ्यंगस्नान, मनाचे लक्ष्मीपूजन,
संबंधाचा फराळ, समृद्धीचा पाडवा, प्रेमाची भाऊबीज
अशा या दिपावलीच्या आपल्या सहकुटुंब, सहपरिवारास सोनेरी शुभेच्छा...



शुभेच्छुक
समस्त इंगळे परिवार



प्रा. भगवान ईरभानजी इंगळे
सचिव चतुराजी बहुउद्देशीय शिक्षण संस्था, अमरावती.

सौ. साधना भगवान इंगळे
चतुराजी बहुउद्देशीय शिक्षण संस्था, अमरावती.

श्री गुरुदेव आँग्रो एजन्सीतर्फे सर्व शेतकरी, शेतमजूर व समस्त नागरिकांना
दीपावली व नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा

अमेय शिवदासराव मोपारी
ऋषिकेश शिवदासराव मोपारी व परिवार

आमच्याकडे सर्व प्रकारचे नामांकित, प्रमाणित बी बियाणे, तसाचनिक खते व कीटकनाशक योग्य व वाजवी दरात उपलब्ध

शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी व समस्त नागरिकांना दीपपर्व व नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.





किसान समृद्धी कृषी सेवा केंद्राच्या वतीने

सर्व शेतकरी बांधवाना व समस्त नागरिकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा, ही दिवाळी सर्वांना सुख, समृद्धी व भरभराटीची जाओ हीच सदिच्छा



श्री गोवर्धनसिंहजी सोहन सिंहजीशेखावत

शुभेच्छुक
किसान समृद्धी
कृषी सेवा केंद्र
चंद्रपूर(खल्लार)ता.
दर्यापूर, जि. अमरावती



श्री रणजीतसिंह गोवर्धनसिंहजी शेखावत

टिप :- आमच्याकडे सर्व प्रकारची बी बियाणे, कीटकनाशके व रासायनिक खते योग्य दरात मिळतील


























जनमाध्यम

Epaper www.janmadhyam.com रविवार, ८ नोव्हेंबर २०२६ एक प्रतिष्ठित सवय





महातेजाचा महाउत्सव

अज्ञानाचा अंधार ज्ञानाने, निराशेचे मळभ आशेने आणि द्वेषाचा अंधःकार प्रेमाने दूर करण्याची प्रेरणा दीपोत्सवातून मिळते. भौतिक समृद्धीच्या मागे धावताना माणसाने आपली माणुसकी, संस्कार आणि नात्यांची ऊब गमावू नये, याची आठवण दिवाळी करून देते. ज्ञानेश्वरांच्या दृष्टीने खरी दिवाळी ही ज्ञानप्रकाशाची आहे. कारण, अंतःकरणात प्रज्वलित झालेला ज्ञानदीप आयुष्यभर मार्गदर्शन करीत राहतो....



पं.विजयशास्त्री जोशी



भारतीय संस्कृतीच्या आणि उत्सवांच्या समृद्ध परंपरेत दिवाळीला अनन्यसाधारण स्थान आहे. दिवाळीचे आगमन होताच अवघ्या जनजीवनाला एक विलक्षण चैतन्य प्राप्त होते. घराघरांत सुरू होणारी स्वच्छता, अंगणात रेखाटल्या जाणाऱ्या रांगोळ्या, दाराबाहेर लटकणारे आकाशकंदील, पणत्यांचा मंद प्रकाश, फराळाचा सुगंध आणि आप्तस्वकीयांच्या भेटीगाठी यांतून मिळणारी आनंदानुभूती भौतिक सुखांपेक्षा कैक पटींनी वेगळी असते. दीपोत्सवाला हजारो वर्षांच्या सांस्कृतिक परंपरेचा वारसा लाभला आहे. प्रकाश आणि अंधार, ज्ञान आणि अज्ञान, सदाचार आणि दुष्प्रवृत्ती यांच्यातील संघर्षाचे प्रतीक म्हणून या सणाकडे पाहिले जाते. मानवी जीवनात आशा, समाधान, समृद्धी आणि सद्?भावना यांचे महत्त्व अधोरेखित करणारा हा उत्सव भारतीय समाजाच्या सांस्कृतिक जाणिवांचा अविभाज्य भाग बनला आहे.

ज्ञानेश्वरीतील पंधराव्या अध्यायात ज्ञानेश्वर माऊली म्हणतात, 'सूर्ये अधिष्ठिली प्राची । जगा राणीव दे प्रकाशाची । तैशी वाचा श्रोतयां ज्ञानाची । दिवाळी करी ?' संत ज्ञानेश्वर महाराजांनी दिवाळीच्या प्रकाशाला ज्ञानाची विलक्षण उपमा दिली आहे. पूर्व दिशेला सूर्य उगवला की, अवघे विश्व उजळून निघते. त्याप्रमाणे ज्ञानाचा प्रकाश माणसाच्या अंतःकरणात उतरला की, अज्ञानाचा अंधार दूर होतो. शब्दांना अर्थाचे, विचारांना विवेकाचे आणि जीवनाला आत्मबोधाचे तेज प्राप्त होते. ज्ञानेश्वरांच्या दृष्टीने खरी दिवाळी ही अशा ज्ञानप्रकाशाची आहे. घराच्या अंगणात लावलेले दिवे काही काळाने शांत होतात; परंतु अंतःकरणात प्रज्वलित झालेला ज्ञानदीप आयुष्यभर मार्गदर्शन करीत राहतो, असे याचे सार आहे.

दिवाळी या शब्दाची उत्पत्ती 'दीपावली' या संस्कृत शब्दापासून झाली. दीपांची आवली म्हणजे दिव्यांची रांग, असा त्याचा अर्थ. अंधारलेल्या परिसरात लावलेली एक छोटीशी पणतीही सभोवताल प्रकाशमान करते. या साध्या कृतीत भारतीय तत्त्वज्ञानातील एक गहन आशय सामावलेला आहे. अज्ञानाचा अंधार ज्ञानाने, निराशेचा अंधार आशेने आणि द्वेषाचा अंधार प्रेमाने दूर करण्याची प्रेरणा दीपोत्सवातून मिळते. भारतीय चिंतन परंपरेतील 'तमसो मा ज्योतिर्गमय' ही प्रार्थना याच भावनेचे दर्शन घडविते. अंधारातून प्रकाशाकडे नेण्याची ही प्रार्थना मानवी जीवनाच्या आध्यात्मिक आणि नैतिक उन्नतीची आकांक्षा व्यक्त करणारी आहे. दिवाळीच्या निमित्ताने प्रज्वलित होणारा प्रत्येक दिवा मांगल्य, विवेक आणि सद्भावनेचे प्रतीक ठरतो.

दिवाळीशी जोडलेल्या अनेक पौराणिक कथा लोकश्रुत आहेत. रामायण परंपरेनुसार प्रभू श्रीराम चौदा वर्षांचा वनवास संपवून आणि रावणाचा पराभव करून सीता व लक्ष्मणासह अयोध्येत परतले. त्यांच्या आगमनाचा आनंद साजरा करण्यासाठी अयोध्यावासीयांनी दीप प्रज्वलित केले. सत्याचा असत्यावर आणि धर्माचा अधर्मावर झालेला विजय हा याचा भावार्थ आहे. भगवान श्रीकृष्णाने नरकासुराचा वध करून त्याच्या अत्याचारातून लोकांची मुक्तता केल्याची कथा नरकचतुर्दशीशी जोडलेली आहे. भारतीय कृषी संस्कृतीशीही दिवाळीचे घनिष्ठ नाते आहे. पावसाळ्याची सांगता होत असताना आणि खरीप हंगामातील पिके घरात येण्याच्या काळात दिवाळी साजरी होते. शेतकऱ्याच्या कष्टाला आलेले फळ, धान्याने भरलेली कोठारे आणि नव्या आर्थिक व्यवहारांची सुरुवात यांमुळे या सणाला समृद्धीचे महत्त्व प्राप्त झाले. व्यापारी समाजात लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने नवीन हिशेब वह्या सुरू करण्याची परंपरा आहे. लक्ष्मीपूजनातील समृद्धीची संकल्पना आर्थिक संपन्नतेबरोबरच कौटुंबिक समाधान, आरोग्य, ज्ञान आणि सौहार्द यांनाही महत्त्व देते.

दिवाळीच्या उत्सवातील प्रत्येक दिवसाला स्वतंत्र सांस्कृतिक अर्थ आहे. वसुबारसेला गोमातेविषयी कृतज्ञता व्यक्त केली जाते. धनत्रयोदशीला धन्वंतरी पूजन आणि आयुरारोग्यासाठी मंगलकामना केली जाते. नरकचतुर्दशीच्या पहाटे अभ्यंगस्नान करण्याची परंपरा शरीरशुद्धी आणि प्रसन्नतेशी जोडलेली आहे. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी घराघरांत केली जाणारी लक्ष्मीमातेची पूजा सुखसमृद्धीचा पाया आहे. बलिप्रतिपदेला बळीराजाच्या स्मरणाबरोबरच नव्या वर्षाच्या स्वागताची भावना व्यक्त होते. बहीण-भावाच्या प्रेमळ नात्याचे बंध घट्ट करणारी भाऊबीज कुटुंबव्यवस्थेला आणि समाजाला बळकटी देणारा आहे. या सर्व परंपरांमधून जिव्हाळा, परस्परांविषयीचा आदर आणि नातेसंबंधांचे महत्त्व प्रकट होते.

उटण्याचा सुगंध, सुगंधी तेल, नवीन वस्त्रे आणि पारंपरिक फराळ यांमुळे दिवाळीच्या वातावरणाला प्रसन्नता लाभते. चकली, करंजी, लाडू, अनारसे, चिवडा आणि शंकरपाळे यांसारख्या पदार्थांच्या तयारीत रमताना कौटुंबिक हेवेदावे बाजूला पडतात, तर मुलांनी तयार केलेले मातीचे किल्ले हिंदवी स्वराज्याचे संस्थापक असणाऱ्या युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे आणि त्यांच्या शूर मावळ्यांचे स्मरण करून देतात. दिवाळीचा सांस्कृतिक विस्तार हिंदू परंपरेपुरता मर्यादित राहिलेला नाही. जैन धर्मात भगवान महावीरांच्या निर्वाणाचे स्मरण या काळात केले जाते. शीख परंपरेतील बंदी छोड दिवस हा गुरू हरगोबिंद यांच्या मुक्ततेशी संबंधित आहे. परंपरांचा ऐतिहासिक आणि धार्मिक संदर्भ वेगवेगळा असला, तरी प्रकाश, मुक्ती आणि मांगल्याच्या भावनांमुळे त्यांच्यात सांस्कृतिक जवळीक निर्माण झाली आहे. भारतीय समाजातील विविधतेचा आदर आणि सहअस्तित्वाची भावना अशा उत्सवांमधून अधिक दृढ होते.

आज दीपोत्सवाची परंपरा भारताच्या सीमा ओलांडून सातासमुद्रापार गेली आहे. नेपाळ, श्रीलंका, मॉरिशस, फिजी, मलेशिया, सिंगापूर, ब्रिटन, अमेरिका आणि इतर अनेक देशांत भारतीय वंशाचे नागरिक दीपोत्सव उत्साहाने साजरा करतात. विविध देशांतील सार्वजनिक ठिकाणी दीपप्रज्वलन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सामूहिक उत्सव आयोजित केले जातात. परदेशात स्थायिक झालेल्या भारतीयांसाठी दिवाळी ही आपल्या मातृभूमीशी, भाषेशी आणि संस्कृतीशी नाते जपण्याची संधी असते. त्याच वेळी इतर समाजघटकांना भारतीय परंपरांची ओळख करून देण्याचे कार्यही या उत्सवातून घडते.

काळाच्या ओघात दिवाळीच्या स्वरूपात अनेक बदल झाले आहेत. पारंपरिक मातीच्या पणत्यांबरोबर विद्युत रोषणाई आली, घरगुती फराळाबरोबर तयार पदार्थांची बाजारपेठ विस्तारली आणि शुभेच्छापत्रांची जागा आधुनिक संदेशव्यवस्थेने घेतली. बदलाची प्रक्रिया निरंतर चालणारी असल्याने दीपावली त्याला अपवाद असणे अपेक्षित नाहीच; पण या उत्सवाचे मूळ सौंदर्य जपण्याची जबाबदारी प्रत्येक पिढीवर आहे. अनावश्यक खर्च, दिखाऊपणा, ध्वनी आणि वायू प्रदूषण यांमुळे सणातील प्रसन्नता कमी होऊ नये, याची काळजी सर्वांनी घ्यायला हवी. पर्यावरणपूरक सजावट, मातीच्या पणत्यांचा वापर, स्थानिक कारागिरांच्या वस्तूंना प्राधान्य आणि गरजू कुटुंबांच्या आनंदात सहभागी होणे यांमधून दिवाळीचे सामाजिक महत्त्व अधिक वाढू शकते.

दिवाळीचा खरा आनंद माणसामाणसांतील स्नेहभावनेत सामावलेला आहे. लखलखत्या दिव्याइतकेच मनातील सद्भावनेला महत्त्व आहे. घरातील ज्येष्ठांचा आदर, लहान मुलांवरील प्रेम, शेजाऱ्यांशी जिव्हाळा आणि समाजातील वंचितांविषयीची संवेदनशीलता या मूल्यांची जपणूक करण्यानेच या उत्सवाला अर्थ प्राप्त होणार आहे. आपल्या आनंदात इतरांना सहभागी करून घेण्याची वृत्ती ही भारतीय सण परंपरेची खरी शिकवणूक आहे. भौतिक समृद्धीच्या मागे धावताना माणसाने आपली माणुसकी, संस्कार आणि नात्यांची ऊब गमावू नये, याची आठवण दिवाळी करून देते. भारतीय संस्कृतीने प्रकाशाला ज्ञानाचे, पावित्र्याचे आणि आशेचे प्रतीक मानले आहे. दिवाळीच्या असंख्य दिव्यांतून व्यक्त होणारा आशावाद शतकानुशतके मानवी जीवनाला प्रेरणा देत आला आहे. काळ बदलला, जीवनशैली बदलली आणि उत्सव साजरा करण्याच्या पद्धतीही बदलल्या; परंतु प्रकाशाची, तेजाची, चैतन्याची असीम ओढ कायम राहिली. मनातील अज्ञान, अहंकार, मत्सर आणि कटुता दूर करून विवेक, करुणा, प्रेम आणि सदाचार यांचा प्रकाश पसरविण्यातच दीपोत्सवाचे सार्थक आहे.

दिवाळे

'दिवाळी सण मोठा, नाही आनंदाला तोटा' यासारख्या शब्दप्रयोगातून लोकांमध्ये दिवाळी सणाचे किती अप्रूप आहे ते दिसते. पण मानवी मन भाषेचा वापर करताना कोणत्या अनुभवाची सांगड कशाशी घालेल हे सांगता येत नाही. दिवाळी आनंदाचा सण म्हणून त्याच्या इतक्याच आनंदाच्या दसऱ्याच्या सणाशी त्याचा मेळ घालून दसरा-दिवाळीचे शब्दप्रयोग तयार झाले आहेत, तर दुसरीकडे आनंदमय दिवाळीची साधेपणाने साजऱ्या केल्या जाणाऱ्या होळी सणाशी तुलना करून बऱ्याच म्हणीही तयार झालेल्या दिसतात.

तसे तर सगळेच सण आनंदाचे असतात, पण दिवाळी-दसरा हे सण अधिक आनंदाचे मानले गेलेले आहेत.'साधूसंत येती घरा, तोचि दिवाळी दसरा' या अभंगात संत तुकारामांनीही संतभेटीच्या आनंदाची तुलना दिवाळीच्या आनंदाशी केली आहे. दसरा-दिवाळी हे सण ऐन सुगीत येतात.सुगीत फार काम असले तरी मनासारखे धान्य आल्याने शेतकरी सुखावलेलाही असतो, त्यामुळे त्याचे मन काहीसे सैलावते, आळसावते. त्याचीही ही मनःस्थिती कथन करणारी म्हण म्हणजे 'दिवाळी दसरा,हातपाय पसरा' नवरात्रीत उपवासाचा सात्त्विक आहार करून तोंड अळणी झालेले असते.त्यामुळे दसऱ्याला महाराष्ट्रातील बऱ्याच भागात देवाला बोकड कापून झणझणीत मांसाहार खाण्याची पद्धत आहे. तेव्हा या दिवसांत दावणीच्या बोकडाचे काय विचार असतील याविषयीही एक म्हण आहे.. 'दसऱ्यातून जगू तेव्हा दिवाळीचा दिवा बघू.'सध्याच्या संकटातून सहीसलामत बाहेर पडलो तरच पुढील सुख अनुभवता येईल, या अर्थाने ही म्हण वापरली जाते.

दिवाळी हा भरभराटीचा, चैनीचा सण आहे. म्हणून तर एखादा चंगळ करत असेल तर 'तुझी दिवाळी आहे' असे म्हटले जाते किंवा एखादा रोजच सुखात लोळत असेल तर 'राजाला रोजच दिवाळी' असा शब्दप्रयोग केला जातो. याउलट शिमग्यात म्हणजे होळीत बोंब मारली जाते आणि बोंब मारणे हे दारिद्र्याचे, अभावाचे लक्षण आहे. यावरून जवळ धन असेल तोवर चैन करायची, नसेल तेव्हा बोंब मारायची या अर्थाने 'असेल तेव्हा दिवाळी, नसेल तेव्हा शिमगा' असे म्हटले जाते. दिवाळी-शिमग्याच्या सणांचा विशेष सांगणारी आणखीही एक म्हण आहे. 'आधी दिवाळी मग शिमगा.' शालिवाहन कालगणनेनुसार आधी दिवाळी येते आणि वर्षाच्या अखेरीस शिमगा येतो.दिवाळीचे दिवस तसेही सुगीचे,अर्थात चैनीचे,तर वर्षाच्या शेवटी येणाऱ्या शिमग्यात सर्व खडखडाट होतो.यावरून सुबत्ता असेल तेव्हा ऊतमात केली तर शेवटी हालच वाटय़ाला येणार,या अर्थाने ही म्हण वापरली जाते. तसेच दारिद्र्य आणि श्रीमंती प्रत्येक समाजात असते हे सांगताना 'एकाची दिवाळी तर दुसऱ्याची होळी' असेही म्हटले जाते. एखादा घरी अभावाचे जगत असला तरी बाहेर वावरताना तो तसे न दाखवता आपण चैनीत असल्याचं भासवत असेल, तर अशा व्यक्तीच्या संदर्भात 'घरात शिमगा, बाहेर दिवाळी' असे म्हटले जाते. काही व्यक्तींना इतरांकडून काही घेताना आनंद होतो. मात्र इतरांसाठी काही करताना त्यांचा हात आखडतो, अशा व्यक्तींना उद्देशून 'घेताना दिवाळी, देताना शिमगा' म्हणण्याची पद्धत आहे. राजा सुखात राहावा म्हणून प्रजेला कष्ट घ्यावे लागतात किंवा प्रजेला नागवून राजा सुख भोगत असतो हे सांगण्यासाठी 'प्रजेची होळी अन् राजाची दिवाळी' ही म्हण वापरली जाते.

'ज्याच्या घरी काळी, त्याची सदा दिवाळी' अशी एक मजेशीर आणि संदर्भ माहीत नसला तर अर्थाच्या अनेक शक्यता व्यक्त करणारी म्हण आहे. म्हैस रंगाने काळी असते, म्हशीचं दूध



गायीच्या दुधाहून घट्ट असते. त्यावरून दूधदुभते खायची चंगळ होईल या अर्थाने ही म्हण वापरली जाते.एखाद्याचा उद्योग तोटय़ात गेला की, 'दिवाळे निघाले', 'दिवाळे वाजले' असा शब्दप्रयोग केला जातो. खर्चिक, उधळ्या मनुष्याला 'दिवाळखोर' म्हटले जाते. हिंदी, सिंधी, कानडी या भाषांमध्येही याच अर्थाने हा शब्दप्रयोग केला जातो. मात्र या 'दिवाळे'चा दिवाळी सणाशी काही संबंध नाही, किंबहुना या शब्दप्रयोगाची समाधानकारक व्युत्पत्ती कुठंही आढळून आली नाही. 'व्युत्पत्ति कोश' आणि 'महाराष्ट्र शब्दकोश' दोन्हींमध्ये म्हटले आहे.कर्जबाजारी मनुष्य आपल्या घरात, दुकानात खिडकीत शेणाचा दिवा लावून तिथून निघून जातो. दिव्याच्या शेजारी तो आपल्या हिशेबाच्या वह्या ठेवतो. तो गेल्यानंतर त्याचे धनको येतात व त्याच्या वह्या पाहून त्याला ऋण परत करण्याचे सामर्थ्य नाही असे समजतात. या पद्धतीवरून हा शब्द रूढ झाला असावा.मात्र कृ.पां. कुलकर्णींनी ही व्युत्पत्ती संशयास्पद वाटत असल्याचंही म्हटलं आहे. त्यासाठी वाजणे, काढणे, निघणे अशी विविध क्रियापदे प्रचारात असल्याने नेमकी व्युत्पत्ती सांगताना संभ्रम निर्माण होतो.

साधना गोरे

देशविदेशांत उत्साहात साजरी होणारी दीपावली !

घरोघरी आनंदाचे तोरण चढवणारी भारतीय दिवाळी आता विदेशांतही चैतन्याची रुजवात करत आहे. दिवाळी थेट अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या घरापर्यंत पोहोचली आहे, तर इंग्लंडच्या रस्त्यांवरही तिची धूम दिसते. अलीकडे सगळे जगच एक ग्लोबल व्हिलेज झालेले असल्याने प्रत्येक देशातच विविध देशांतील लोक कामधंदा आणि शिक्षण यानिमित्ताने जातात. कालांतराने स्थायिकही होतात. भारतीय लोक त्याला अपवाद नाहीत. लोकांसमवेत त्यांची संस्कृती, भाषा आणि सण हे सगळे आलेच. त्यामुळे आता जगभर पसरलेल्या भारतियांनी दिवाळी अथवा दीपावली हा सणही जगभर नेला आहे. त्यात विविध वेशभूषा, भारतीय मिष्टान्ने, फराळाचे पदार्थ, सांस्कृतिक कार्यक्रम, रांगोळी, मेंदी, दिव्यांची, इतर आरास आणि शोभेचे दारूकाम असतेच. भारताशेजारच्या, तसेच पुढारलेल्या काही देशांतून तो साजरा करतांना भारतापेक्षा वेगळे काय?

नेपाळमध्ये विविध प्राण्यांप्रती कृतज्ञता म्हणून पूजन



भारताचा शेजारी असलेल्या नेपाळमध्ये दिवाळी सण तिहार म्हणून साजरा केला जातो. यातील पहिला दिवस काग तिहार म्हणजे कावळ्यांचा दिवस! कावळ्यांसाठी गोडधोड पदार्थ घराच्या छपरावर ठेवून दिले जातात. कावळ्यांचे ओरडणे हे दुःख आणि मृत्यूचे प्रतीक असल्याने सणापूर्वी ते दूर करण्यासाठी हा नैवेद्य ! दुसऱ्या दिवशी चक्क कुत्र्यांची पूजा होते. त्याला कुकुर तिहार म्हणतात. माणसाच्या कुत्र्याशी असलेल्या अतूट नात्याचा आदर करणे ही त्यामागची भूमिका. या दिवशी कुत्र्याला कुंकवाचा टिळा लावून, गळ्यात झेंडूची माळ घालून त्याला गोडधोड दिले जाते. नंतर गाय तिहार म्हणजे गायीची पूजा ! शेवटी लक्ष्मीपूजनही होते.

दिव्यांची रोषणाई करून दिवाळी साजरी करणारा इंडोनेशिया

इंडोनेशियामध्ये म्हणजे मुख्यत: बाली बेटांमध्ये देवळांना दिव्यांची रोषणाई उत्तम तऱ्हेने केली जाते. शिवाय दिवाळी धमाका म्हणून नृत्य आणि विविध प्रकारच्या वेशभूषा स्पर्धा यांचेही समारंभ जागोजागी साजरे होतात.

दिव्यांची आरास करून दिवाळी साजरा होणारे सिंगापूर

सिंगापूरमध्ये अनेक भारतीय स्थायिक झालेले आहेत. तिथे दिवाळी आपल्यासारखीच दणक्यात साजरी होते. सुरक्षा आणि ध्वनीप्रदूषण टाळण्यासाठी मात्र तिथे सार्वजनिक आतषबाजीला कटाक्षाने बंदी आहे. येथील दिव्यांच्या आरासमध्ये भारताचा राष्ट्रीय पक्षी असलेल्या मोराचे आकर्षक रूप सगळीकडे विपुल प्रमाणात वापरलेले दिसत

बाहुल्यांच्या खेळाद्वारे रामायण आणि महाभारत यांचे दर्शन घडवून मलेशियातील दिवाळी

मलेशियामध्ये दिवाळीत शॅडो पपेट म्हणजेच सावल्यांचा खेळ मोठ्या प्रमाणात दाखवला जातो. रामायण आणि महाभारत यांतील कथा बाहुल्यांच्या खेळाद्वारे दाखवण्याचे हे कलाकृतीपूर्ण काम असून, या आकृत्या म्हशीच्या कातड्यापासून बनवल्या जातात. त्यांना रंग देऊन, सर्व प्रकारची आभूषणे, वस्त्रे आणि मुकुट घालून त्यांचे नृत्य दाखवले जाते.

नदीत दिवे सोडून दिवाळी साजरी करणारा थायलंड

थायलंडमध्ये दिवाळी लुई क्रॅथोंग म्हणून साजरी केली जाते. दीपावली म्हणून सिद्ध केलेले दिवे मात्र केळीच्या झाडाच्या पानांपासून बनवले जातात. असे सहस्रो दिवे नदीमध्ये सोडलेले असतात. हा दीपोत्सव अत्यंत नयनरम्य असतो.

दिव्यांच्या रोषणाईची स्पर्धा आयोजित करणारा फिजी



फिजी या पॅसिफिक बेटात निळीच्या उद्योगासाठी अनेक वर्षांपूर्वी गेलेले भारतीय मजूर कायमचे तिथे स्थायिक झाले आहेत. सध्या फिजीमधील ३८ टक्के लोक भारतीय वंशाचे असून, तिथे पारंपरिक पद्धतीने अतिशय जोरदारपणे दिवाळी साजरी होते. नादी या शहरामध्ये सिगाटोका, लाउटोका आणि डेनाराऊ या आसपासच्या गावांतून आणि खेडेगावांतून विशेषतः दिवाळीसाठी विशेष बसगाड्या सोडल्या जातात. या शहरातील एक आगळीवेगळी परंपरा म्हणजे दिव्यांच्या रोषणाईच्या स्पर्धा. फिजीच्या पंतप्रधानांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून या स्पर्धेला प्रारंभ होतो.

महाराष्ट्राप्रमाणेच अमेरिकेतील दिवाळी

दिवाळीचा सण अमेरिकेतही आनंदाची बरसात करतो. तेथील सहस्रो भारतीय लोक त्यांच्या घरी दिवाळी साजरी करतातच; पण आता भारतीय शहरांच्या धर्तीवर अनेक ठिकाणी दिवाळीनिमित्त विशेष मिठाई बनवल्या आणि विकल्या जातात. अमेरिका, इंग्लंड, न्यूझीलंड या देशांत स्थायिक झालेल्या अनेक गुजराती स्त्रियांनीही हा गृहोद्योग चालू केला आहे. चकल्या, लाडू, शंकरपाळे यांसारख्या पदार्थांचा पुरवठा करण्यासाठी त्या आधी महिनाभर कार्यरत असतात. जॉर्ज बुश अमेरिकेचे अध्यक्ष असतांना वर्ष २००३ पासून त्यांनी व्हाइट हाऊसमध्ये दिवाळी साजरी करण्याचा प्रघात चालू केला. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी वर्ष २००९ मध्ये स्वत:च्या अध्यक्षीय घरात पूर्वेकडील खोलीमध्ये वैदिक मंत्रांच्या घोषात दीपप्रज्वलन केले होते.

संयुक्त राष्ट्रांत सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे साजरी होणारी दिवाळी

संयुक्त राष्ट्रांतही (युनायटेड किंगडम म्हणजे यूकेतही) भारतीय घरांमध्ये दिवाळी आगळीवेगळी असते. प्रत्येक भारतीय धूमधडाक्यात दिवाळी साजरी करतो. शिक्षणाचे माहेरघर असलेल्या येथील विद्यापिठांतही विद्यार्थी मोठ्या प्रमाणात दिवाळी सेलिब्रेशन करतात. युनिव्हर्सिटी ऑफ ससेक्सच्या वतीने तर दिवाळीनिमित्त विशेष सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. त्याला ४०० ते ५०० लोकांची उपस्थिती सहज असते. याव्यतिरिक्त लंडन शहरातून दिवाळीनिमित्त एक मोठी मिरवणूक निघते. त्यात अनेक भारतीय आणि विदेशी लोक सहभागी होतात. मिरवणुकीमध्ये भारतीय वाद्ये, नाच आणि कपडे यांचे मनोहारी दर्शन होते. आयुर्वेदिक मसाज (आपल्याकडील अभ्यंगस्नान), मेंदी, साडी नेसणे आणि नेसविणे या साऱ्या पारंपरिक गोष्टी हौसेने केल्या जातात. विदेशी नागरिकही या समारंभांत आनंदाने सहभागी होतात.

दोन आठवड्यांचा दिवाळी मेला साजरा करणारा न्यूझीलंड

न्यूझीलंडमध्ये सिटी काउन्सिलची (म्हणजे आपल्याकडची म्युनिसिपालिटी) तऱ्हा आणखीच वेगळी. ऑकलंड शहर आणि वेलिंग्टन या न्यूझीलंडच्या राजधानीच्या शहरात प्रत्यक्ष दिवाळीच्या आधी दोन आठवडे दिवाली मेला साजरा केला जातो. त्याचे उद्घाटन थेट पंतप्रधानांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून केले जाते. बी हाइव्ह या पार्लमेंटच्या इमारतीसमोर भलीमोठी रांगोळी काढली जाते. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, भारतीय नृत्ये, कर्नाटकी संगीत, हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत, रांगोळीच्या कार्यशाळा आदी त्यात समाविष्ट असते.

हरेकृष्ण आणि स्वामीनारायण मंदिरांतून देशोदेशी साजरी होणारी दिवाळी

देशोदेशी पसरलेल्या हरेकृष्ण मंदिरांतून आणि स्वामीनारायण मंदिरांमधूनही दिवाळी साजरी केली जाते. विशेषत: हरेकृष्ण मंदिरांतील शेंडी ठेवलेले, धोतर नेसून हरे राम, हरे राम, राम राम हरे हरे, हरे कृष्ण, हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे करत नाचणारे आणि घंटोन्घंटे हार्मोनियमवर हा जप वाजविणारे विदेशी भक्त दिवाळीची वाट पहात असतात. न्यूझीलंडमधील भारतीय मंदिरांतून दिवाळीनिमित्त अन्नकूट म्हणजे अन्नकोटाचे आयोजन होते. भक्तमंडळी अक्षरश: सहस्रो प्रकारचे पदार्थ बनवून ते आकर्षकरित्या मांडून ठेवतात. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी होणारे चोपडीपूजन हे या मंदिरांमधून, तसेच विविध भारतीय दुकानांमध्ये केले जाते. अनेक भारतीय दुकाने या दिवशी आपल्या सर्व कर्मचाऱ्यांना हिशेबाच्या वह्यांचे पूजन करण्यासाठी बोलावून मिठाई आणि बोनस वाटतात. आनंदाची ही दिवाळी सगळीकडेच चैतन्याचे कोंदण लावत जाते. भारतीय दिवाळी आता अशी जागतिक होते आहे ! (संदर्भ : सनातन प्रभात)

जगन घाणेकर

जनमाध्यम
Epaper www.janmadhyam.com रविवार, ८ नोव्हेंबर २०२६ एक प्रतिष्ठित सवय



दिवाळी पार्टीत बॉलिवूडचा झगमगाट





दिवाळीचा उत्साह सर्वत्र पाहायला मिळत असताना मुंबईत प्रसिद्ध फॅशन डिझायनर मनीष मल्होत्रा यांच्या दिवाळी पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. गुरुवारी, ५ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी झालेल्या या पार्टीला बॉलिवूड आणि टेलिव्हिजन विश्वातील अनेक कलाकारांनी हजेरी लावली. ऐश्वर्या-अभिषेकसह अनेक सेलिब्रिटी जोडपी या सोहळ्यात सहभागी झाले होते. पारंपरिक पोशाखांपासून ग्लॅमरस लूकपर्यंत कलाकारांच्या हटके फॅशनने पार्टीची रंगत आणखी वाढवली.

मनीष मल्होत्रा गेल्या अनेक वर्षांपासून दिवाळीनिमित्त खास पार्टीचे आयोजन करत आहेत. त्यांच्या या पार्टीला बॉलिवूडमधील प्रतिष्ठित आणि चर्चेत असलेल्या सेलिब्रिटी सोहळ्यांपैकी एक मानले जाते. यंदाही अनेक कलाकारांनी आपल्या स्टायलिश अंदाजात उपस्थिती लावली. अक्षय कुमार, ऐश्वर्या राय बच्चन, अभिषेक बच्चन, सैफ अली खान, करीना कपूर, माधुरी दीक्षित, करिश्मा कपूर, शर्वरी वाघ, नीता अंबानी, आदित्य रॉय कपूर, शोभिता धुलिपाला, करण जोहर, तमन्ना भाटिया आणि सान्या मल्होत्रा यांसारखे कलाकार या पार्टीत दिसले.

या पार्टीत ऐश्वर्या राय बच्चन आणि अभिषेक बच्चन यांनी एकत्र हजेरी लावली. दोघांना एकत्र पाहून चाहत्यांचे लक्ष त्यांच्याकडे वेधले गेले. ऐश्वर्याने गडद लाल रंगाची साडी नेसली होती. मोकळा पदर, आकर्षक दागिने आणि गडद लाल लिपस्टिक यामुळे तिचा पारंपरिक लूक खुलून दिसत होता. तर अभिषेकने काळ्या रंगाचा बंदगला सूट आणि काळा चष्मा परिधान केला होता. दोघांनीही कॅमेऱ्यासमोर एकत्र पोझ दिल्या.

करीना कपूर पती सैफ अली खानसोबत या पार्टीत पोहोचली होती. करीनाने शॅम्पेन गोल्ड रंगाची तलम, पारदर्शक साडी नेसली होती. तिचा हा लूक आकर्षक दिसत होता. तर सैफने गडद निळ्या रंगाचा कुर्ता आणि पांढरी पँट असा साधा, पण देखणा पोशाख निवडला होता.

दिवाळीसाठी सोनेरी बनारसी जॅकेट

दिवाळीचा सण जवळ आला की प्रत्येकाला आपल्या लूकमध्ये काहीतरी खास करण्याची इच्छा असते. यासाठी भरजरी लेहेंगा किंवा जड दागिन्यांचीच निवड करायला हवी असे नाही. अभिनेत्री आलिया भट्टने आपल्या हटके फेस्टिव्ह लूकमधून याचीच झलक दाखवली आहे. सोनेरी रंगाचे बनारसी जॅकेट, त्यासोबत मॅचिंग पँट आणि निळ्या रत्नांचे दागिने अशा अनोख्या पेहरावात आलिया दिसली. तिच्या या लूकमध्ये पारंपरिक भारतीय विणकामासोबत मॉडर्न फॅशनचा सुंदर मेळ पाहायला मिळतो. यंदाच्या दिवाळीत काहीतरी वेगळे परिधान करायचे असेल, तर आलियाची ही स्टाइल नक्कीच प्रेरणा देऊ शकते.

आलिया भट्टने प्रसिद्ध फॅशन डिझायनर मयूर गिरोत्रा यांनी खास तयार केलेला पोशाख परिधान केला होता. नेहमीच्या लेहेंगा किंवा साडीपेक्षा वेगळा पर्याय निवडत तिने सोनेरी धाग्यांनी विणलेले लांब बनारसी जॅकेट घातलेले होते. जॅकेटला उंच कॉलर, पुढील बाजूस डीप व्ही-नेक आणि कलीदार डिझाइन देण्यात आले होते. जॅकेटच्या पुढील बाजूला असलेल्या स्लिटमुळे त्याला अधिक आकर्षक लूक मिळाला. त्यासोबत आलियाने त्याच रंगाची फिटेड पँट परिधान केली होती. त्यामुळे तिचा संपूर्ण पोशाख उठावदार दिसत होता.



आलियाच्या या पोशाखाचे विशेष आकर्षण म्हणजे त्यावरील बारीक नक्षीकाम. जॅकेटवर डिझायनरच्या जुन्या 'मोर बाग ट्री ऑफ लाइफ' या डिझाइनचा वापर करण्यात आला होता. जॅकेटच्या खालच्या कडा आणि बाह्यांच्या टोकांवर नाजूक कोरा वर्क करण्यात आले होते. त्याशिवाय मीनाकारी आणि हिऱ्यांनी सजवलेली बटणे या पोशाखाला अधिक रॉयल लूक देत होती. पारंपरिक बनारसी विणकामाला आधुनिक कटची जोड दिल्यामुळे हा पोशाख इतरांपेक्षा वेगळा ठरला.

आलियाच्या स्टायलिंगमध्ये दागिन्यांची निवडही खास होती. स्टायलिस्ट प्रियांका कपाडिया बदानी यांनी सोनेरी पोशाखासोबत निळ्या रंगाच्या रत्नांचा वापर केला. पीसी तोतुका अँड सन्स यांच्या कॅबोशॉन रत्न आणि हिऱ्यांनी सजवलेला चोकर नेकलेस, त्याला साजेसे कानातले आणि एक हिरा असलेली अंगठी आलियाने घातली होती. सोनेरी पोशाखावर निळ्या रंगाच्या दागिन्यांमुळे तिच्या लूकला वेगळीच उठावदार किनार मिळाली.आलियाने या पोशाखासोबत मेकअपही साधा ठेवला होता. चमकदार त्वचा, तपकिरी रंगाचा स्मोकी आय मेकअप आणि न्यूड शेडमधील लिपस्टिकमुळे तिचे सौंदर्य खुलून दिसत होते. केसांना मध्यभागी भांग पाडून मोकळ्या लहरी ठेवण्यात आल्या होत्या. तसेच सोनेरी विणकाम असलेल्या म्यूल्स प्रकारातील पादत्राणांनी तिचा फेस्टिव्ह लूक पूर्ण केला.

दिवाळीसाठी फॅशन टिप्स



दिवाळीत नेहमीच्या साडी किंवा लेहेंग्यापेक्षा वेगळे काही परिधान करायचे असल्यास बनारसी जॅकेट आणि मॅचिंग पँटचा पर्याय वापरून पाहा.

सोनेरी किंवा पारंपरिक दागिन्यांऐवजी निळे, हिरवे किंवा इतर उठावदार रंगांचे रत्न असलेले दागिने निवडा.

भरजरी पोशाखासोबत जास्त मेकअप करण्याऐवजी न्यूड लिपस्टिक, हलका आय मेकअप आणि चमकदार त्वचेचा लूक निवडा.

मोकळे लहरी केस किंवा साधी हेअरस्टाइल तुमच्या फेस्टिव्ह लूकला अधिक आकर्षक बनवू शकते.

पोशाखाला साजेसे ब्लॉक हील्स किंवा आरामदायी सँडल्स वापरून पाहा.

दिवाळीत सुंदर दिसण्यासाठी नेहमीच जड आणि भरजरी कपड्यांची निवड करावी असे नाही. योग्य रंगसंगती, उठावदार डिझाइन आणि मोजके दागिने यांच्या मदतीनेही आकर्षक फेस्टिव्ह लूक तयार करता येतो.

दिवाळी पार्टीसाठी साडीपासून इंडो-वेस्टर्नपर्यंत



दिवाळी म्हणजे रोषणाई, फराळ आणि कुटुंबीयांसोबत साजरा केला जाणारा आनंदाचा सण. दिवाळीच्या काळात अनेक ठिकाणी पार्टी आणि गेट-टुगेदरचे आयोजन केले जाते. अशावेळी पारंपरिक पोशाखासोबतच काहीतरी वेगळे आणि स्टायलिश घालण्याची इच्छा असते. मात्र, दिवाळी पार्टीसाठी नेमका कोणता ड्रेस निवडावा, असा प्रश्न अनेक महिलांना पडतो. तुम्हालाही यंदा दिवाळी पार्टीत हटके दिसायचे असेल, तर अभिनेत्रींच्या या फॅशनेबल लूकमधून प्रेरणा घेऊ शकता. प्रिंटेड स्कर्टपासून लहंगा आणि इंडो-वेस्टर्न आउटफिटपर्यंत हे पर्याय नक्की ट्राय करून पाहा.

प्रिंटेड स्कर्ट, क्रॉप टॉप आणि शॉर्ट जॅकेट

दिवाळीत पारंपरिक कपड्यांना मॉडर्न टच द्यायचा असेल, तर प्रिंटेड स्कर्ट, क्रॉप टॉप आणि शॉर्ट जॅकेट हा उत्तम पर्याय ठरू शकतो. अभिनेत्री परिणीती चोप्राच्या या लूकमध्ये प्रिंटेड घेरदार स्कर्टसोबत मॅचिंग क्रॉप टॉप आणि एम्ब्रॉयडरी केलेले छोटे जॅकेट पाहायला मिळते. हा पोशाख दिवाळी पार्टीसाठी स्टायलिश आणि आकर्षक दिसेल.

लॅव्हेंडर रंगाचा लहंगा

दिवाळी पार्टीत रॉयल आणि एलिगंट लूक हवा असेल, तर लॅव्हेंडर रंगाचा लहंगा निवडू शकता. साराने तेंडुलकरच्या या लूकमध्ये हलक्या लॅव्हेंडर आणि निळ्या रंगाच्या लहंग्यावर फुलांची नक्षी, धाग्यांचे काम आणि चमकदार सजावट करण्यात आली आहे. यासोबत हलका नेटचा दुपट्टा आणि मोत्यांनी सजवलेली पोटली बॅग वापरल्यास लूक अधिक सुंदर दिसेल.



धोती पँट आणि क्रॉप टॉप

पारंपरिक कपड्यांपेक्षा काहीतरी वेगळे घालण्याचा विचार करत असाल, तर धोती पँट आणि क्रॉप टॉपचा पर्याय निवडा. अभिनेत्री शिल्पा शेट्टीच्या लाल रंगाच्या इंडो-वेस्टर्न लूकमध्ये धोती स्टाइल पँट, एम्ब्रॉयडरी केलेला क्रॉप टॉप आणि त्यावर मॅचिंग केप पाहायला मिळते. यासोबत ऑक्सिडाइज्ड ज्वेलरी घातल्यास पार्टीसाठी हटके लूक तयार होऊ शकतो.

बांधणी कुर्ता आणि शरारा सेट

दिवाळीच्या पारंपरिक वातावरणाला साजेसा आणि आरामदायी पोशाख हवा असेल, तर बांधणी प्रिंटचा शरारा सेट ट्राय करू शकता. निळ्या रंगाच्या या सेटमध्ये कुर्ता आणि घेरदार शरारा आहे. दुपट्ट्याच्या नेकलाइनवर मिरर वर्क आणि मोत्यांची सजावट असेल तर पोशाखाला खास पारंपरिक लूक मिळतो. यासोबत मॅचिंग नेकलेस, झुमके घातल्यास लूक अधिक खुलून दिसेल.

पारंपरिक साडीसोबत मॉडर्न स्टाइल

दिवाळी पार्टीसाठी साडी हा नेहमीच आकर्षक पर्याय ठरतो. सिल्क, बनारसी किंवा हलक्या एम्ब्रॉयडरीची साडी निवडून त्यासोबत डिझायनर ब्लाउज घालू शकता. पारंपरिक साडीला स्टायलिश लूक देण्यासाठी स्टेटमेंट इअररिंग्स आणि आकर्षक क्लचची निवड करा.



एम्ब्रॉयडरी लहंगा सेट

पार्टीमध्ये उठून दिसायचे असेल, तर सुंदर एम्ब्रॉयडरी असलेला लहंगा सेट निवडा. फुलांची नक्षी, मिरर वर्क किंवा हलक्या चमकदार सजावटीचा लहंगा दिवाळीच्या रोषणाईत खुलून दिसेल. यासोबत हलका दुपट्टा आणि नाजूक दागिने घातल्यास लूक अधिक आकर्षक होईल.

इंडो-वेस्टर्न ड्रेस

पारंपरिक आणि वेस्टर्न फॅशनचा संगम आवडत असेल, तर इंडो-वेस्टर्न ड्रेस ट्राय करू शकता. क्रॉप टॉपसोबत फ्लोई स्कर्ट, केप किंवा जॅकेट असा पर्याय निवडता येईल. या पोशाखामुळे तुम्हाला मॉडर्न लूक मिळेल आणि दिवाळी पार्टीतही तुम्ही वेगळ्या स्टाइलमध्ये दिसाल.

दिवाळी पार्टीसाठी ड्रेस निवडताना केवळ ट्रेंड पाहू नका, तर पोशाखात तुम्हाला आरामदायी वाटते का, याकडेही लक्ष द्या. योग्य ॲक्सेसरीज, हेअरस्टाइल आणि मेकअपची जोड दिल्यास तुमचा सणासुदीचा लूक अधिक खास होऊ शकतो.



जनमाध्यम

Epaper www.janmadhyam.com रविवार, ८ नोव्हेंबर २०२६ एक प्रतिष्ठित सवय

शहरवासी को
दिपावली
की
शुभकामनाएं
मोहम्मद अमीन
अंजनगाव सुर्जी

चंद्राचा कंदील घरावरी,चांदण्यांचे तोरण दारावरी..
क्षितीजाचे रंग रांगोळीवरी
दिवाळीचे स्वागत घरोघरी..!
सर्वांना
दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
विजय पाटील तिजारे
सामाजिक कार्यकर्ते

नव्या स्वप्नांची नवी सुरुवात,
नव्या संकल्पांची नवी पहाट
शुभदीपावली
अमोल दिलीप वानखडे
सैय्यद शोएब अली सैय्यद शौकत अली
नगरपरिषद कर विभाग अंजनगाव सुर्जी

लक्ष लक्ष दिव्यांनी
उजळून निघो ही निशा,
घेऊनि येवो नवी उमेद नवी आशा,
सोबत आमच्या लक्ष लक्ष शुभेच्छा!
शुभदीपावली
गजानन ज्ञा. चक्रनारायण
कर अधिकारी नगरपरिषद अंजनगाव सुर्जी
मो आरिफ अ. रहेमान
कर संग्राहक
सुधाकर येऊल
कर संग्राहक
न. प. अंजनगाव सुर्जी

नगर परिषद अंजनगाव सुर्जी, जिल्हा अमरावती
स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२०२६ व माझी वसुंधरा अभियान ७.०
पर्यावरण पुरक दिवाळी साजरी करूया
फटक्यामध्ये कार्बन व सल्फरचे प्रमाण अधिक असल्याने
पर्यावरणात ध्वनी व वायु प्रदूषण मोठ्या प्रमाणात होवून पशु, प्राणी तसेच
मानवी प्रजातीवर त्याचा वाईट परिणाम होतो,प्रदूषण टाळण्यासाठी आपण
सर्वांनी फटाक्यांचा वापर टाळून पर्यावरण प्रदूषण मुक्त/ध्वनी प्रदुषण मुक्त
दिवाळी साजरी करावी; व आपले अंजनगाव सुर्जी शहराला सुंदर व
स्वच्छ ठेवण्यास सहकार्य करावे .
मुख्याधिकारी विजय लोहकरे
नगराध्यक्ष अविनाश गायगोले
उपाध्यक्ष प्रियंका मालठाणे
आरोग्य सभापती प्रवीण नेमाडे

नव्या स्वप्नांची नवी सुरुवात,
नव्या संकल्पांची नवी पहाट
शुभदीपावली
पंकज मोदी
नगरसेवक तथा
उद्योजक अंजनगाव सुर्जी

शिव सेना
दिपावलीच्या शुभ क्षणांनी
आपली सारी स्वप्न साकार व्हावी
ही दिपावली आपल्यासाठी
एक अनमोल आठवण ठरावी
आणि या आठवणीने आपल
आयुष्य अधिकाअधिक सुंदर व्हाव...
शुभदीपावली
शिवसेना
मुन्ना ईसोकार
शिवसेना शहरप्रमुख

नव्या स्वप्नांची नवी सुरुवात,
नव्या संकल्पांची नवी पहाट
शुभदीपावली
विजय लोहकरे
मुख्याधिकारी
कृष्णा सोनवणे
कु. प्रिया टांक

नव्या स्वप्नांची नवी सुरुवात,
नव्या संकल्पांची नवी पहाट
शुभदीपावली
निलेश फरतोडे
गृहनिर्माण अभियंता नगरपरिषद अंजनगाव सुर्जी
कु. वैष्णवी अहीर
गृहनिर्माण अभियंता नगरपरिषद अंजनगाव सुर्जी

नव्या स्वप्नांची नवी सुरुवात,
नव्या संकल्पांची नवी पहाट
शुभदीपावली
कु. सुप्रिया रिठे
अंजनगाव सुर्जी नगरपरिषद विद्युत विभाग.
अंकुश पाटील गावंडे
शासकीय कंत्राटदार

यशाचा नवा प्रकाश,
प्रगतीचे नवे पाऊल;
तुमच्या व्यवसायाला मिळो समृद्धीची चाहूल.
शुभदीपावली
ओंकार स्वरूपा
ऑर्केस्ट्रा
धर्मराज शिरोळे
सौ.लता धर्मराज शिरोळे
9552269001 | 9595558121
शिरोळे ब्युटी श्रृंगार
सराफा लाईन, सावकारपुरा, अंजनगाव सुर्जी

सर्व नगरवासीयांना
दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
श्री गजानन शा.विजेकर
सौ सीमा गजानन विजेकर
मो देहान अ मुनाफ
इब्राहिम बेग हसन बेग
श्री श्रीकांत नरेहनराव जुनघरे
इंजि. सुयोग उत्तमराव खाडे
श्री अविनाश आनेश्वरराव डेंगे
सौ सुनीता भास्करराव वाळे
सौ आवेदाबी मो आरिफ

जनमाध्यम


E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

रविवार, ८ नोव्हेंबर २०२६

एक प्रतिष्ठित सवय


















जनमाध्यम
Epaper www.janmadhyam.com
रविवार, ८ नोव्हेंबर २०२६
एक प्रतिष्ठित सवय

दिवाळीच्या अर्थकारणात सर्वांनाच संधी



'दिवाळीच्या दिव्यांचा प्रकाश केवळ श्रीमंतांच्या घरात उजळत नाही, तर त्या दिव्यांसाठी माती गाळणाऱ्या कुंभाराच्या झोपडीपर्यंतही पोहोचतो. कारण अर्थव्यवस्थेचा खरा प्रकाश हा एका व्यक्तीच्या संपत्तीत नसून अनेकांच्या हाताला मिळणाऱ्या कामात असतो.'



डॉ. हरिष मुरारी बावनगडे

दिवाळी हा भारतातील सर्वांत महत्त्वाच्या सणांपैकी एक आहे. दिवाळी म्हणजे आनंद, उत्साह, प्रकाश, नवीन खरेदी, गोडधोड पदार्थ, नवीन कपडे, घराची स्वच्छता, रंगरंगोटी आणि नात्यांमधील प्रेम. भारतीय संस्कृतीत दिवाळीला धार्मिक आणि सामाजिक महत्त्व आहे. मात्र, या सणाकडे आपण अर्थशास्त्राच्या दृष्टिकोनातून पाहिले, तर त्यामागे भारतीय अर्थव्यवस्थेचे एक महत्त्वाचे चक्र कार्यरत असल्याचे दिसते. दिवाळीच्या काळात प्रत्येकजण आपापल्या क्षमतेनुसार खर्च करतो. या प्रत्येकाच्या खर्चामागे कोणाचे ना कोणाचे उत्पन्न दडलेले असते. मातीचे दिवे घेतले, तर कुंभारांना उत्पन्न मिळते. घराची रंगरंगोटी केली, तर रंगाऱ्यांना काम मिळते. झाडू खरेदी केला, तर झाडू बनविणाऱ्या कारागिराच्या घरात पैसा जातो. नवीन कपडे खरेदी केले, तर शिंपी, विणकर, कापड व्यापारी आणि वाहतूकदार यांच्या व्यवसायाला चालना मिळते. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, दिवाळी हा रोजगार, उत्पन्न, उत्पादन, व्यापार आणि आर्थिक परस्परावलंबन यांना चालना देणारा एक महत्त्वाचा आर्थिक उत्सव आहे.

दिवाळी आणि अर्थशास्त्र

अर्थशास्त्रात उत्पादन, उपभोग, विनिमय, वितरण आणि उत्पन्न या संकल्पनांना विशेष महत्त्व आहे. दिवाळीच्या काळात या सर्व आर्थिक क्रिया एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर घडतात. दिवाळीपूर्वी घरोघरी साफसफाई केली जाते. घरांना रंग दिला जातो. फराळाचे पदार्थ तयार केले जातात. नवीन कपडे, मिठाई, सजावटीच्या वस्तू, आकाशकंदील, पणत्या, रांगोळीचे रंग आणि इतर साहित्य खरेदी केले जाते. या सर्व व्यवहारांमुळे बाजारपेठेत मागणी वाढते. एखाद्या वस्तूची मागणी वाढली की तिचे उत्पादन वाढविण्याची गरज निर्माण होते. उत्पादन वाढले की कामगारांची गरज वाढू शकते. कामगारांच्या हातात पैसा येतो. हा पैसा ते पुन्हा अन्नधान्य, कपडे, शिक्षण, आरोग्य आणि इतर गरजांवर खर्च करतात. त्यामुळे बाजारातील इतर व्यावसायिकांनाही उत्पन्न मिळते.

गरीब आणि श्रीमंत परस्परावलंबी

श्रीमंत व्यक्तीकडे अधिक पैसा असू शकतो, परंतु त्या पैशातून निर्माण होणाऱ्या अनेक सुविधा आणि वस्तूंसाठी त्याला इतरांच्या श्रमांची गरज असते. घर बांधण्यासाठी गवंडी लागतो, घराची स्वच्छता करण्यासाठी घरकामगार लागतो, रंगकामासाठी रंगारी लागतो आणि घर सजविण्यासाठी विविध कारागीर लागतात. दुसरीकडे, या कामगारांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी ग्राहकांची मागणी महत्त्वाची असते. ग्राहक खर्च करतात, तेव्हा अनेक सेवा पुरविणाऱ्या व्यक्तींना काम मिळते. म्हणूनच केवळ गरीब व्यक्तीच श्रीमंतांवर असतात, असे म्हणणे अपुरे ठरेल. श्रीमंत व्यक्तीही आपल्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी कामगार, कारागीर, शेतकरी, दुकानदार आणि सेवा पुरविणाऱ्यांवर अवलंबून असते.

पणत्यांतून उजळणारी अर्थव्यवस्था

दिवाळी आणि कुंभार यांचे नाते अतिशय जुने आहे. आज बाजारात विद्युत दिवे, आकर्षक सजावटीच्या वस्तू आणि विविध प्रकारचे कृत्रिम दिवे उपलब्ध असले, तरी मातीच्या पणत्यांना आजही विशेष स्थान आहे. कुंभार दिवाळीच्या अनेक दिवस आधी पणत्या तयार करतो. त्यासाठी माती गोळा करणे, माती मळणे, पणत्या घडविणे, त्या वाळविणे, भाजणे आणि विक्रीसाठी बाजारात आणणे अशा अनेक प्रक्रिया कराव्या लागतात. या संपूर्ण प्रक्रियेत कुंभाराचा वेळ, श्रम आणि कौशल्य गुंतलेले असते. त्याच्या कुटुंबातील इतर सदस्यही या कामात सहभागी होऊ शकतात. दिवाळीत पणत्यांची विक्री वाढली, तर या कुटुंबाला अतिरिक्त उत्पन्न मिळण्याची संधी निर्माण होते. पणती खरेदी करणाऱ्या ग्राहकासाठी ती प्रकाश देणारी एक छोटी वस्तू असते; परंतु कुंभारासाठी ती त्याच्या कुटुंबाच्या उत्पन्नाचे साधन असते. म्हणून दिवाळीत मातीच्या पणत्या खरेदी करणे ही केवळ परंपरा जपण्याची कृती नाही; ती स्थानिक हस्तकला आणि पारंपरिक व्यवसायांना आर्थिक आधार देण्याची संधीही आहे.



झाडू तयार करणारे

दिवाळीच्या आधी घरांची साफसफाई करण्याची परंपरा आहे. घरातील धूळ, कचरा आणि अनावश्यक वस्तू काढून टाकल्या जातात. त्यामुळे झाडू, फरशी पुसण्याचे साहित्य, स्वच्छतेची साधने आणि इतर वस्तूंची मागणी वाढू शकते. झाडू तयार करणारे कारागीर, कच्चा माल पुरविणारे व्यापारी, झाडू विकणारे फेरीवाले आणि स्वच्छतेची कामे करणारे कामगार या सर्वांचा या प्रक्रियेशी संबंध असतो. आपण बाजारातून झाडू खरेदी करतो, तेव्हा त्या व्यवहारातून केवळ दुकानदारालाच नव्हे, तर पुरवठा साखळीतील इतर घटकांनाही अप्रत्यक्ष लाभ मिळू शकतो. दुसरीकडे, दिवाळीच्या काळात घरांची साफसफाई करण्यासाठी कामगारांची मदत घेतली जाते. अशा वेळी त्यांना रोजगार आणि उत्पन्न मिळण्याची संधी निर्माण होते. आपल्या घरातील स्वच्छता आणि सुंदरता निर्माण करणाऱ्या या कामगारांचे योगदान अनेकदा दुर्लक्षित राहते. परंतु त्यांच्या श्रमांशिवाय सणाची तयारी पूर्ण होऊ शकत नाही.

रंगारी-गवंडी

दिवाळीपूर्वी अनेक कुटुंबे घरांना रंग देतात,दुरुस्ती करतात आणि घराचे नूतनीकरण करतात. त्यामुळे रंगारी, गवंडी, सुतार, इलेक्ट्रिशियन, प्लंबर आणि इतर कुशल कामगारांना काम मिळू शकते. रंगकामाचे उदाहरण घेतले, तर त्यामध्ये केवळ रंगारीचा सहभाग नसतो. रंग, ब्रश, पुट्टी आणि इतर साहित्य तयार करणारे उत्पादक, ते वाहून नेणारे वाहतूकदार, घाऊक व्यापारी आणि किरकोळ दुकानदार अशा अनेक घटकांचा त्यात सहभाग असतो. घरमालकाने रंगकामासाठी केलेला खर्च विविध व्यक्ती आणि व्यवसायांपर्यंत पोहोचतो. कामगाराला मजुरी मिळते, दुकानदाराला विक्रीतून उत्पन्न मिळते आणि उत्पादकाला मालाची मागणी मिळते. मात्र, हा लाभ प्रत्येक वर्षी किंवा प्रत्येक व्यवसायाला सारख्याच प्रमाणात मिळेल असे नाही. स्थानिक परिस्थिती, ग्राहकांची आर्थिक क्षमता आणि बाजारातील स्पर्धा यांवर त्याचे प्रमाण अवलंबून असते.

शेतकरी, फुलविक्रेत्यांचे अर्थकारण

दिवाळीत फुले, फळे, गोडधोड पदार्थ, धान्य आणि इतर कृषी उत्पादनांना महत्त्व असते. लक्ष्मीपूजन, घराची सजावट आणि पाहुणचार यासाठी अनेक कुटुंबे या वस्तू खरेदी करतात. फुलांच्या माळा तयार करणारे, फुले विकणारे, फळांचे व्यापारी, भाजीपाला विक्रेते आणि शेतकरी यांना या मागणीमुळे उत्पन्न मिळण्याची संधी असते. शेतकरी शेतात उत्पादन घेतो; व्यापारी ते बाजारात आणतो; वाहतूकदार ते एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहोचवतो आणि विक्रेता ग्राहकाला उपलब्ध करून देतो. या प्रत्येक टप्प्यावर श्रम आणि खर्च गुंतलेला असतो. उत्पादनापासून अंतिम ग्राहकापर्यंत पोहोचणाऱ्या या प्रक्रियेला पुरवठा साखळी म्हणतात. दिवाळीच्या काळात या साखळीतील काही वस्तूंची मागणी वाढल्यास संबंधित व्यवसायांना फायदा होऊ शकतो. मात्र, शेतकऱ्याला प्रत्यक्ष किती फायदा मिळेल हे उत्पादन खर्च, बाजारभाव, वाहतूक खर्च, नाशवंत मालाचे नुकसान आणि मध्यस्थांची संख्या यांवरही अवलंबून असते. म्हणून दिवाळीच्या खरेदीत स्थानिक शेतकरी आणि लहान विक्रेत्यांना प्राधान्य देणे महत्त्वाचे ठरते

महिला बचतगट, घरगुती उद्योग

दिवाळीच्या काळात फराळ, लाडू, चकल्या, करंज्या, चिवडा, मिठाई, आकाशकंदील, कागदी सजावट, रांगोळीचे साहित्य आणि भेटवस्तू यांना मागणी असते. या वस्तू तयार करण्यामध्ये अनेक महिला बचतगट, गृहउद्योग, लघुउद्योजक आणि स्वयंरोजगार करणाऱ्या व्यक्ती सहभागी असतात. घरातून फराळ तयार करून विकणाऱ्या महिलांना अतिरिक्त उत्पन्न मिळू शकते. बचतगटांना उत्पादन आणि विक्री वाढविण्याची संधी मिळू शकते. स्थानिक कारागिरांना आपल्या कौशल्याचे आर्थिक मूल्य मिळू शकते. विशेषतः ग्रामीण भागात आणि लहान शहरांमध्ये अशा व्यवसायांमुळे महिलांचा आर्थिक सहभाग वाढण्यास मदत होऊ शकते.

उदाहरणार्थ, एखाद्या महिला बचतगटाने दिवाळीसाठी फराळ तयार केला, तर त्यासाठी धान्य, तेल, साखर, मसाले आणि पॅकिंग साहित्य खरेदी केले जाते. त्यानंतर उत्पादन, पॅकिंग, जाहिरात, वाहतूक आणि विक्री या प्रक्रिया घडतात. या सर्व प्रक्रियांमधून अनेक आर्थिक व्यवहार निर्माण होतात.

दिवाळी आणि बाजारपेठेतील मागणी

अर्थशास्त्रातील मागणीच्या सिद्धांतानुसार, वस्तू आणि सेवांच्या मागणीवर ग्राहकांचे उत्पन्न, किंमत, आवडीनिवडी आणि इतर घटकांचा प्रभाव पडतो. सणासुदीच्या काळात अनेक ग्राहकांचे खरेदीप्राधान्यक्रमात बदलतात. दिवाळीत कपडे, मिठाई, इलेक्ट्रॉनिक वस्तू, घरगुती उपकरणे, वाहनांची खरेदी, सजावटीचे साहित्य आणि भेटवस्तू यांसारख्या विविध वस्तूंना मागणी मिळू शकते. मागणी वाढल्यास उत्पादक आणि व्यापारी आपला साठा वाढवतात. काही व्यवसाय अतिरिक्त कर्मचारी



नेमतात किंवा कामाचे तास वाढवतात. वाहतूक, वितरण, पॅकिंग, जाहिरात आणि डिजिटल व्यवहार यांनाही चालना मिळू शकते. यामुळे दिवाळी हा अनेक उद्योगांसाठी महत्त्वाचा विक्रीकाल ठरतो. तथापि, विक्री वाढणे आणि नफा वाढणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. उत्पादन खर्च, सवलती, कर्जावरील व्याज, वाहतूक खर्च आणि स्पर्धा यांमुळे काही व्यवसायांचा नफा मर्यादित राहू शकतो. म्हणून दिवाळीचे अर्थशास्त्र समजून घेताना विक्रीबरोबरच उत्पादन खर्च, रोजगार, मजुरी आणि उत्पन्नाचे वितरण यांचाही विचार करणे आवश्यक आहे.

दिवाळी आणि अर्थचक्र

भारतीय अर्थव्यवस्थेत कुटुंबे, उद्योग, व्यापारी, कामगार, शेतकरी, सरकार आणि वित्तीय संस्था यांचा सहभाग असतो. या घटकांमध्ये पैसा, वस्तू, सेवा आणि उत्पादनाच्या साधनांचा सतत प्रवाह सुरू असतो. दिवाळीच्या काळातील आर्थिक व्यवहार समजून घेण्यासाठी खालील साखळी पाहता येईल. ग्राहकांचा खर्च-वस्तू व सेवांची मागणी- उत्पादन व विक्री- रोजगार व मजुरी- कामगारांचे उत्पन्न- पुन्हा उपभोग व खर्च.

उदाहरणार्थ, ग्राहकाने स्थानिक दुकानदाराकडून दिवाळीचे साहित्य खरेदी केले. दुकानदाराला विक्रीतून पैसे मिळाले. त्याने पुरवठादाराकडून अधिक माल मागविला. पुरवठादाराने उत्पादकाकडून माल घेतला. उत्पादकाला उत्पादनासाठी कामगारांची गरज भासली. कामगारांना मजुरी मिळाली आणि त्यांनी आपल्या कुटुंबाच्या गरजांसाठी खर्च केला. अशा प्रकारे अर्थव्यवस्थेतील विविध घटक एकमेकांशी जोडले जातात. अर्थशास्त्रात याचा संबंध उत्पन्नाच्या चक्रीय प्रवाहाशी आणि परिस्थितीनुसार खर्चाच्या गुणक परिणामाशी जोडता येतो. एखाद्या खर्चातून निर्माण झालेले उत्पन्न पुढे इतर व्यवहारांना आधार देऊ शकते.

स्थानिक बाजारपेठ आणि ग्रामीण अर्थव्यवस्था

दिवाळीचा आर्थिक परिणाम केवळ मॉल्स किंवा ऑनलाइन बाजारपेठांपुरता मर्यादित नाही. गावातील आठवडी बाजार, लहान दुकाने, हातगाडीवाले, फेरीवाले आणि पारंपरिक कारागीर यांचाही त्यात महत्त्वाचा वाटा असतो. ग्रामीण भागात कुंभार, लोहार, सुतार, विणकर, फुलविक्रेते, फराळ तयार करणारे गृहउद्योग आणि लहान व्यापारी सणासुदीच्या बाजारपेठेचा भाग असतात. ग्रामीण कुटुंबांकडून होणारी खरेदी स्थानिक व्यवसायांना उत्पन्न देऊ शकते. त्याचप्रमाणे शहरातील ग्राहकांनी ग्रामीण भागातील उत्पादने खरेदी केल्यास ग्रामीण उत्पादकांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध होऊ शकते.

दिवाळी आणि रोजगारनिर्मिती

दिवाळीच्या काळात अनेक व्यवसायांमध्ये तात्पुरत्या रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात. दुकाने, गोदामे, वाहतूक, पॅकिंग, वितरण, सजावट, घरगुती सेवा आणि खाद्यपदार्थनिर्मिती यांसारख्या क्षेत्रांमध्ये काम वाढू शकते. काही व्यापारी अतिरिक्त कामगार नेमतात, तर काही कुटुंबे घरगुती व्यवसायाच्या माध्यमातून उत्पन्न मिळवितात. या रोजगारामुळे कामगारांना आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी पैसे मिळू शकतात. त्यांच्या कुटुंबांना अन्न, शिक्षण, आरोग्य आणि इतर आवश्यक खर्च भागविण्यास मदत होऊ शकते. मात्र, सणासुदीच्या काळात मिळणारा रोजगार अनेकदा तात्पुरता असतो. त्यामुळे केवळ दिवाळीच्या कामावर अवलंबून राहणाऱ्या कामगारांना वर्षभर स्थिर उत्पन्नाची हमी मिळत नाही. यासाठी लघुउद्योगांना सातत्याने बाजारपेठ मिळणे आवश्यक आहेत.



अर्थव्यवस्थेतील असमानतेचा प्रश्न

प्रत्येकाच्या आर्थिक क्षमतांनुसार दिवाळीच्या बाजारपेठेत सहभागी होण्याच्या संधी भिन्न सणासाठी वस्तू तयार करणाऱ्या काही कामगारांचे उत्पन्न मर्यादित असते. त्यांच्या श्रमांमुळे इतरांचे घर सजते; पण स्वतःच्या घरासाठी पुरेसा खर्च करणे त्यांना कठीण जाऊ शकते. केवळ बाजारपेठेतील विक्री वाढणे म्हणजे सर्वांचे जीवनमान सुधारणे नव्हे. कामगारांना योग्य मोबदला, लहान उत्पादकांना रास्त भाव, कामासाठी सुरक्षित वातावरण आणि आर्थिक संधींची उपलब्धता यांनाही महत्त्व आहे. म्हणून दिवाळीचे खरे अर्थशास्त्र हे केवळ पैशाच्या उलाढालीत नसून त्या उलाढालीतून निर्माण होणाऱ्या उत्पन्नाचे न्याय्य वितरण आणि सर्वसमावेशक विकासात आहे.

स्थानिक खरेदी : मोठा आर्थिक परिणाम

दिवाळीत आपण कोणत्या वस्तू खरेदी करतो, कुठून खरेदी करतो आणि त्या वस्तू तयार करणाऱ्या व्यक्तीला किती लाभ मिळतो, याचा विचार करणे गरजेचे आहे. मातीच्या पणत्या कुंभाराकडून खरेदी करणे, फराळ स्थानिक महिला बचतगटाकडून घेणे, फुले स्थानिक विक्रेत्याकडून खरेदी करणे आणि स्थानिक कारागिरांनी तयार केलेल्या सजावटीच्या वस्तूंना प्राधान्य देणे अशा कृतींमुळे लहान व्यवसायांना मदत होऊ शकते. तसेच, वस्तू खरेदी करताना दर्जा, सुरक्षितता, योग्य किंमत आणि गरज यांचा विचार केला पाहिजे. केवळ सण आहे म्हणून अनावश्यक खर्च करणे योग्य नाही. सामाजिक जबाबदारीने केलेली खरेदी ग्राहकांचे समाधान आणि स्थानिक उत्पादकांचे उत्पन्न या दोन्ही गोष्टींना हातभार लावू शकते.

दिवाळी आणि शाश्वत अर्थव्यवस्था

आजच्या काळात दिवाळी साजरी करताना पर्यावरण, संसाधनांचा वापर आणि आर्थिक शाश्वतता यांचाही विचार करणे आवश्यक आहे. मातीच्या पणत्या, पुनर्वापर करता येणाऱ्या सजावटीच्या वस्तू, स्थानिक उत्पादन, कमी पॅकिंग असलेल्या वस्तू आणि पर्यावरणपूरक पर्याय यांना प्राधान्य दिल्यास कचरा कमी करण्यास मदत होऊ शकते. फटाके, प्लास्टिकची सजावट आणि अनावश्यक वस्तूंचा अतिवापर यांमुळे पर्यावरणावर दुष्परिणाम होऊ शकतो. त्यामुळे आनंद साजरा करताना पर्यावरणीय खर्चही लक्षात घेतला पाहिजे.

विकासाचा व्यापक दृष्टिकोन

तीन गोष्टी विशेष लक्षात घेतल्या पाहिजेत.

१) मागणी आणि उत्पादन. सणासुदीच्या काळात काही वस्तू आणि सेवांची मागणी वाढते. त्यानुसार उत्पादन, विक्री आणि वितरणाच्या प्रक्रियांना चालना मिळू शकते.

२) रोजगार आणि उत्पन्न. या मागणीची पूर्तता करण्यासाठी कामगार, कारागीर, व्यापारी, शेतकरी आणि सेवा पुरवठादार यांना काम मिळण्याची संधी निर्माण होते.

३) उत्पन्नाचे वितरण. आर्थिक उलाढालीचा लाभ केवळ मोठ्या उद्योगांपुरता मर्यादित न राहता लहान उत्पादक, पारंपरिक कारागीर, महिला बचतगट आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे.

या तीन घटकांचा समन्वय साधला, तर दिवाळीसारख्या सणांमधून स्थानिक आर्थिक विकासाला अधिक समावेशक स्वरूप मिळू शकते. दिवाळीच्या अर्थशास्त्राचा व्यापक अर्थ हाच आहे की, एका व्यक्तीचा खर्च दुसऱ्या व्यक्तीच्या उत्पन्नाचा स्रोत ठरू शकतो. मात्र, हा लाभ किती प्रमाणात निर्माण होतो आणि कोणापर्यंत पोहोचतो, हे बाजारपेठेची रचना, उत्पन्नाचे वितरण आणि आर्थिक परिस्थिती यांवर अवलंबून असते.

दिवाळी हा प्रकाशाचा, आनंदाचा आणि सामाजिक एकतेचा सण आहे. परंतु त्यामागे एक व्यापक आर्थिक वास्तव दडलेले आहे. कुंभाराच्या पणत्यांपासून रंगाऱ्याच्या ब्रशपर्यंत, झाडू बनविणाऱ्यांपासून शेतकऱ्याच्या उत्पादनापर्यंत, महिला बचतगटाच्या फराळापासून किरकोळ व्यापाऱ्याच्या दुकानापर्यंत अनेक व्यक्ती या सणाच्या आर्थिक प्रक्रियेशी जोडलेल्या आहेत. श्रीमंत व्यक्तीची खरेदी लहान उत्पादकासाठी उत्पन्न निर्माण करू शकते. मध्यमवर्गीय कुटुंबाचा खर्च स्थानिक दुकानदाराला आधार देऊ शकतो. गरीब कुटुंबाची मर्यादित खरेदीही एखाद्या छोट्या विक्रेत्याच्या उत्पन्नाचा भाग ठरू शकते. त्याच वेळी, या सर्व ग्राहकांना वस्तू आणि सेवा उपलब्ध करून देण्यासाठी उत्पादक, कामगार आणि व्यापारी यांची आवश्यकता असते.

दिवाळीच्या सण-उत्सवांवर दुष्काळाचे सावट

आपल्या राज्यात एका बाजूला सणांचा आनंद, तर दुसऱ्या बाजूला शेतीतील अनिश्चितता आणि वाढत्या खर्चाची चिंता, अशा दुहेरी कात्रीत अनेक कुटुंबे सापडली आहेत. वास्तविक पाहता, आपल्या भारतीय संस्कृतीत सण-उत्सवांना केवळ धार्मिक महत्व प्राप्त नाही, तर त्यातून सामाजिक नाती दृढ होतात, कुटुंबातील सदस्य एकत्र येतात आणि दैनंदिन जीवनातील ताणतणाव दूर करण्याची संधी मिळते. गणेशोत्सवातील सार्वजनिक उपक्रम, गौरीपूजनातील कौटुंबिक परंपरा आणि नवरात्रोत्सवातील देवीच्या आराधनेतून समाजजीवनाला मोठे चैतन्य मिळते. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत प्रत्येकाच्या मनात सणांविषयी एक वेगळीच ओढ असते.

दिवाळी तर आनंद, उत्साह, प्रकाश आणि नव्या आशेचे प्रतीक मानले जातात. मात्र, यंदाच्या उत्सवी वातावरणाला दुष्काळाच्या वास्तवाची किनार आली आहे. संपूर्ण राज्यात शहरी आणि ग्रामीण भागात पाणीपुरवठ्याचा प्रश्न यंदा वारंवार ऐरणीवर आला आहे. तसेच खरीप हंगाम जवळजवळ हातून गेल्याने शेतकरी चिंतेत आहेत. बाजारपेठा शांत आहेत. सण-उत्सवांसाठी कराव्या लागणाऱ्या खर्चाचे नियोजन करताना सर्वसामान्य कुटुंबांना अनेक तडजोडी कराव्या लागत आहेत. विशेषतः ग्रामीण भागातील शेतकरी आणि शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांसाठी यंदाचे वर्ष अधिक कसोटीचे ठरत आहे.

पण, सण-उत्सव हे माणसाला जगण्याची नवी उमेद देतात. संकटाच्या काळातही आनंदाचे क्षण शोधण्याची प्रेरणा देतात. त्यामुळे दुष्काळाचे सावंत असले तरी सण साजरे करण्याची परंपरा थांबणार नाही. मात्र, या उत्सवाबरोबरच शेतीचे प्रश्न आणि सर्वसामान्यांच्या आर्थिक अडचणींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. सणांच्या निमित्ताने बाजारपेठेत चैतन्य निर्माण व्हावे, प्रत्येक घरात आनंदाचा दिवा उजळावा आणि आर्थिक अडचणींमुळे कोणाच्याही सणाचा आनंद हिरावला जाऊ नये, हीच सर्वसामान्यांची भावना आहे. गणेशोत्सव आणि गौरीपूजनानंतर नवरात्रोत्सवाची सांगता होत असताना आता दिवाळीची प्रतीक्षा वाढली आहे. मात्र, यंदाच्या दिव्यांच्या रोषणाईसोबत नोकरदार वर्ग वगळता शेती, रोजगारावर अवलंबून असणाऱ्या ग्रामीण भागात आर्थिक विवंचनेचे वास्तवही अनेकांच्या मनात आहे.

सण म्हटले की नवीन कपडे, फराळ, मिठाई, घराची स्वच्छता, रंगरंगोटी, पूजासाहित्य आणि पाहुण्यांचे स्वागत असा खर्चांचा मोठा पट समोर येतो. दिवाळीच्या निमित्ताने मुलांच्या अपेक्षा पूर्ण करण्यापासून घरातील परंपरा जपण्यापर्यंत अनेक जबाबदाऱ्या कुटुंबप्रमुखांवर असतात. मात्र, शेतीतील उत्पन्नाची अनिश्चितता, वाढता दैनंदिन खर्च आणि आर्थिक नियोजन कोलमडत असल्याने निर्माण होणाऱ्या परिस्थितीमुळे यंदा अनेकांना खर्चावर नियंत्रण ठेवावे लागत आहे. दुष्काळाचा परिणाम केवळ शेतीतील पिकांपुरता मर्यादित राहात नाही. त्याचे पडसाद बाजारपेठेपासून छोट्या व्यावसायिकांपर्यंत आणि सर्वसामान्यांच्या कौटुंबिक अर्थकारणांपर्यंत उमटतात. ग्रामीण भागातील नागरिकांची क्रयशक्ती कमी झाली, तर त्याहा मोठा परिणाम स्थानिक बाजारावरही होतो. त्यामुळे सण-उत्सवांचा काळ हा व्यापाऱ्यांसाठीही जरी आशेचा असला, तरी ग्राहकांच्या खिशातील मर्यादित पैसा ही बाजारपेठेसमोरील वस्तुस्थिती आहे.

प्रा. मधुकर चुटे
नागपूर

जनमाध्यम
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com रविवार, ८ नोव्हेंबर २०२६ एक प्रतिष्ठित सवय

दीपावली : ज्ञानाच्या प्रकाशातून अज्ञानाच्या अंधाराचे दहन

अज्ञानाचा अंधार नाहीसा करून मानवी जीवनात ज्ञानाचा प्रकाश उजळवणारा दिवाळीचा सण. सोनपावलांनी येणाऱ्या दिवाळीच्या प्रत्येक दिवसाला आध्यात्मिक-सांस्कृतिक महत्त्व आहे. त्याविषयी...

दीपावली म्हणजे स्नेहाच्या-प्रेमाच्या प्रकाशाची उधळण होय. दिवाळी-दीपोत्सव म्हणजे खऱ्या अर्थाने आनंदाचा-प्रकाशाचा सण आहे. वास्तवात हा उत्सव समृद्धी देणारा सण आहे. वर्षभरातल्या चिंता, भय, ताणतणाव, महामारी यांची मरगळ झटकून टाकत नव्या उमेदीने जीवनाला सुखमय- आनंदमय करणारा हा सण आहे. अज्ञानाचा अंधार नाहीसा करून मानवी जीवनात ज्ञानाचा प्रकाश फैलवणारा हा सण आहे.

सोनपावलांनी येणाऱ्या दिवाळीच्या प्रत्येक दिवसाला आध्यात्मिक-सांस्कृतिक महत्त्व आहे.धनत्रयोदशीपासून ते भाऊबीजेपर्यंत प्रत्येक क्षणन्क्षण हर्षोल्हासात साजरा केला जातो. तथापि दीपावलीचा शुभारंभ हा खऱ्या अर्थाने 'वसुबारस'पासून म्हणजेच दि. २१ ऑक्टोबरपासून होत असून, सायंकाळी गाय-वासराची पूजा करून त्यांना नेवैद्य खाऊ घातला जातो.

त्यानंतर 'धनत्रयोदशी'लादेवापुढे धनधान्य व धने ठेवून त्याची पूजा करतात अन् सायंकाळी दक्षिण दिशेला कणकेचे दिवे लावून त्यांची पूजा केली जाते.

'नरक चतुर्दशी'च्या दिवशा घरातील सर्व लहान-मोठे सदस्य पहाटे अभ्यंगस्नान करतात अन् त्यानंतर अंगणात फटाके फोडतात. आख्यायिकेत याच दिवशी भगवान श्रीकृष्णाने नरकासुर राक्षसाचा वध केला होता. महत्त्वाचे म्हणजे, याच दिवशी दि. २४ ऑक्टोबर रोजीच 'लक्ष्मीपूजन'देखील असून वद्य अमावस्येला सायंकाळी लक्ष्मी-कुबेराचे पूजन केले जाते. धनधान्य समृद्धी व सौख्य नांदावे हे त्याचे प्रतीक असते.

त्यानंतर कार्तिक शुद्ध प्रतिपदा म्हणजेच बलिप्रतिपदा. ज्यास आपण 'दीपावली पाडवा' असेही म्हणतो. हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक असून या दिवशी कोणत्याही शुभकार्याची सुरुवात केली जाते. या शुभदिनी पत्नी ही पतीला ओवाळून त्याच्यासाठी दीर्घायुष्य चिंतिते. तिला याप्रसंगी तिच्या आवडीची साडी भेट म्हणून दिली जाते. योगायोगाने या वर्षी याच दिवशी 'भाऊबीज'देखील असून, बहीण आपल्या भाऊरायाला ओवाळून पेढा भरवते अन् त्याच्या उज्ज्वल भवितव्यासाठी देवाला प्रार्थना करते.



भाऊसुद्धा बहिणीला तिच्या आवडीची भेटवस्तू देतो. दागदागिन्यांची खरेदीही मोठ्या प्रमाणात केली जाते. वास्तवात हा सण म्हणजे आनंदाची पर्वणीच!

दीपावलीच्या चार-पाच दिवसांच्या काळात घरोघरी रोषणाई केली जाते. तसेच घरांच्या ओट्यावर-गॅलरीत मातीच्या पणत्या लावून सभोवतालचा परिसर प्रकाशमय केला जातो. वास्तवात हा दिव्यांचा-रोषणाईचा सण आहे. आपल्या आया-भगिनी अंगणात आकर्षक रांगोळ्या काढून सर्वांचे लक्ष वेधित असतात. रंगबेरंगी आकाश कंदिलांची उभारणी, नातेवाईक-मित्रमंडळीला फराळाची मेजवानी अन् फटाक्यांची आतषबाजीमुळे तर सारा परिसर दुमदुमून जातो. प्रत्येक जण पारंपरिक वेशभूषा करून इतरांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करत असतो. चमचमीत फराळावर ताव मारून दिवाळीचा आनंद लुटण्याची मजा काही औरच असते. याशिवाय नातेवाईकांना-आप्तमित्रांना दिवाळीनिमित्त दिल्या जाणाऱ्या शुभेच्छांना तर पारावारच उरत नाही. 'ग्रीटिंग कार्ड' देऊन वा मोबाईलद्वारे मेसेज पाठवूनही दीपावलीच्या शुभेच्छा व्यक्त केल्या जातात. येनकेनप्रकारे आपल्या मित्रांना, सगेसोयऱ्यांना आपल्या दीपावली शुभेच्छा पोहोचविण्याचा हा सर्वंकष प्रयत्न असतो, हे दृष्टोत्पत्तीस येते.

काळ कितीही बदलो, पण आगरी-कोळी समाजाची दिवाळी पारंपरिक पद्धतीने मोठ्या धूमधडाक्यात दरवर्षी साजरी होत असते. त्यांचं आपल्या पारंपरिक संस्कृतीशी घट्ट नातं आहे. मुंबई, ठाणे, कोकणातील भूमिपुत्रांची दिवाळी साजरी करण्याची पद्धत काही आगळीवेगळीच असते. बलिप्रतिपदेला हे लोक पारंपरिक पद्धतीने बैलांची मनोभावे पूजा करत असतात. आपल्या शेतीत भरपूर उत्पन्न निघो, धनधान्याची भरभराट होवो, या पार्श्वभूमीवर आगरी-कोळी लोक 'ईडा-पीडा टळो, बळीचे राज्य येवो' असे देवाला साकडे घालत भाताच्या पेंढ्या आपापल्या घरासमोर जाळत असतात. तसेच लक्ष्मीपूजनच्या दिवशी हे लोक रात्रीच्या वेळी तांदळाच्या पीठाची बैलाची प्रतिकृती तयार करून गावभर मिरवतात. अशा भव्यदिव्य पद्धतीने आगरी-कोळी समाज आपली दिवाळी साजरी करत असतात. त्यांना आमच्यातर्फे दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

दीपावली हा पारंपरिक भारतीय सण मतभेद-मनभेद विसरून तुम्ही आम्ही सर्वजण आपली हजारो वर्षांपूर्वीची संस्कृती, परंपरा अधिकाधिक समृद्ध करण्याचा प्रयत्न करत असतो. खरंतर दीपावली हा सण आता धर्ममर्यादा ओलांडून त्याने एक राष्ट्रीय उत्सवाचे स्वरूप प्राप्त केले आहे, ही अभिमानाची गोष्ट आहे. यातूनच खऱ्या अर्थाने धार्मिक सहिष्णुता प्रस्थापित होऊन 'सर्वधर्मसमभाव' निर्माण होण्यास चालना मिळते. समस्त युवक-युवतींचे भवितव्य उज्ज्वल होवो, तर ज्येष्ठांना निरोगी स्वास्थ्य लाभो, याच दीपावलीनिमित्त अनंत शुभेच्छा! मित्रहो, आपणा सर्वांना यंदाची दीपावली सुखा-समाधानाची,आनंदाची व भरभराटीची जावो, ही ईश्वर चरणी प्रार्थना!

आध्यात्मिक दृष्टिकोनातून दिवाळीचे महत्त्व



'आज प्रकाशाचा सण आहे. दिवाळी म्हणजे प्रकाशाचा सण. येथील प्रत्येकजण प्रकाश आहे. हा सण सर्व भारत, नेपाळ, सिंगापूर, मलेशिया, श्रीलंका, इंडोनेशिया, मॉरीशस, सुरीनाम, त्रिनिदाद आणि दक्षिण आफ्रिका मध्ये साजरा केला जातो. लोक एकमेकांना दिवाळीच्या शुभेच्छा देतात आणि फराळ, मिठाई वाटतात. दिवाळीच्या दरम्यान आपण आपली गत काळातील दुःखे विसरून जातो. डोक्यात जे भरले गेले असते ते फटाके वाजवतो आणि सारे काही विसरून जातो. फटाक्यांप्रमाणे गत काळ देखील जळून जातो, नष्ट होतो आणि आपले मन नवीन नूतन बनते. हि दिवाळी होय. फक्त दिवे आणि मेणबत्त्या लाऊन काही होणार नाही तर आपणा प्रत्येकाला आनंदी आणि प्रज्वलित व्हावे लागेल. प्रत्येकाला आनंदी आणि बुध्दीवान बनावे लागेल. बुद्धीमत्तेचा प्रकाश प्रज्वलित झाला आहे. प्रकाशाला ज्ञान रुपी प्रकाश बणऊन त्याचा प्रसार करूया आणि आज उत्सव साजरा करूया – तुम्ही काय म्हणता?

भूतकाळाला जाऊ द्या, विसरून जा. आपल्या विद्वत्तेने जीवन एक उत्सव बनवूया. वास्तविक बुध्दीमत्तेशिवाय उत्सव साजरा होऊ शकत नाही. 'ईश्वर माझ्यासोबत आहे' हे जाणणे, हीच बुध्दीमत्ता आहे. आपल्याकडे जी काही संपत्ती, संपदा आहे तिचे आज दर्शन घ्या. ध्यानात घ्या कि आपण संपन्न आहोत आणि पूर्णत्वाचा अनुभव घ्या. नाहीतर मन सतत अभावामध्ये राहील. 'अरेरे..हे नाही..ते नाही, या साठी दुःखी आहोत, त्यासाठी दुःखी आहोत.'

संपत्तीच्या अभावाकडून समृध्दीकडे वळा. प्राचीन परंपरा आहे कि आपण आपल्या समोर सोन्या चांदीची नाणी ठेवतो, सारी संपत्ती ठेवतो आणि म्हणतो, 'पहा, ईश्वराने मला कितीतरी दिलेले आहे आणि या सर्वा प्रती मी कृतज्ञ आहे.' अशी समृध्दी अनुभवा. मग ध्यानात येईल कि तुम्हाला किती आणि काय काय दिले आहे.मग आपण धन आणि ऐश्वर्याची देवता लक्ष्मीची पूजा करतो. आपल्या मार्गातील अडथळे नाहीसे करणाऱ्या विघ्नहर्त्या गणेशाची पूजा करतो. त्यांचे स्मरण करतो.

युरोप मध्ये २७ देश आहेत. प्रत्येक देशासाठी एकेक दिवा लाऊन काहीकाळ ध्यान करूया. आपण ध्यान करतो म्हणजे विशाल आणि सर्व समावेशक आत्म्याला आपल्या समृध्दी आणि संपन्नतेबध्दल कृतज्ञता व्यक्त करत असतो, धन्यवाद देत असतो. आणखी प्राप्तीसाठी देखील प्रार्थना करत असतो, ज्यामुळे आपण आणखी सेवा करू शकू. सोने चांदी हि बाह्य प्रतीके आहेत. खरी संपत्ती आपल्या आंत आहे. आंत खूप सारे प्रेम, शांती आणि आनंद आहे. यापेक्षा ज्यादा आणखी काय हवे. विद्वत्ता खरे धन आहे. आपले चारित्र्य, आपली शांती आणि आपला आत्मविश्वास-हीच खरी संपत्ती आहे. जेंव्हा तुम्ही ईश्वराच्या सानिध्यात असून प्रगती करत असता तेंव्हा यापेक्षा वेगळी संपत्ती असूच शकत नाही. हा श्रेष्ठ विचार तुम्हाला तेंव्हाच सुचतो जेंव्हा तुमचे ईश्वराशी आणि त्या अनंततेशी तादात्म्य झालेले असते. जेंव्हा लाटेला याची अनुभूती होते कि ती सागराशी संलग्न आहे आणि तिचाच हिस्सा आहे – तेंव्हा तिला एक विशाल शक्ती प्राप्त होते.'

दिवाळी हा सण 'अंधारावर प्रकाशाचा' आणि 'अज्ञानावर ज्ञानाचा' विजय दर्शवतो. पौराणिक कथेनुसार, प्रभू श्रीराम १४ वर्षांचा वनवास संपवून अयोध्येत परतले होते, त्या आनंदाप्रीत्यर्थ लोकांनी दिवे लावून त्यांचे स्वागत केले. तसेच, हा सण आंतरिक प्रकाशाला जागृत करण्याचे प्रतीक मानला जातो.दिवाळी हा सण पाच दिवसांचा उत्सव आहे, ज्यातील प्रत्येक दिवसाचे विशेष महत्त्व आहे:१. धनत्रयोदशी: धन्वंतरी देवाचे पूजन आणि समृद्धीसाठी प्रार्थना.२. नरक चतुर्दशी: वाईट प्रवृत्तींचा नाश आणि शरीराची शुद्धी (अभ्यंगस्नान).३. लक्ष्मीपूजन: ज्ञान आणि ऐश्वर्याची देवी लक्ष्मीची पूजा.४. बलीप्रतिपदा (पाडवा): नवीन सुरुवात आणि दातृत्वाचे प्रतीक.५. भाऊबीज: भाऊ आणि बहिणीच्या पवित्र प्रेमाचा सण.

दिवाळीमध्ये दिव्यांचे (ईंहेंर) काय महत्त्व आहे?

दिवाळीतील 'दिवा' हा केवळ बाहेरचा अंधार दूर करत नाही, तर तो आपल्या मनातील नकारात्मकता, मत्सर आणि भीती दूर करण्याचे प्रतीक आहे. दिव्यांची ओळ (आवली) आपल्याला एकजुटीने राहण्याचा संदेश देते.आध्यात्मिक भाषेत, दिवाळी म्हणजे स्वतःच्या आत डोकावून पाहणे. आपल्यातील 'सत्व' गुणाचा विकास करणे आणि अज्ञानाचा अंधार दूर करून ज्ञानाचा प्रकाश पसरवणे, हा या सणाचा मूळ उद्देश आहे. आर्ट ऑफ लिविंगच्या मते, उत्सव हा केवळ बाह्य नसून तो मनाचा नैसर्गिक स्वभाव असावा.

भाऊबीजेला भावाला ओवाळण्यासाठी पूजेच्या....



भाऊबीजेचा सण हा बहीण-भावामधील प्रेम, विश्वास आणि अतूट बंधाचे प्रतीक मानला जातो. दिवाळीनंतर दोन दिवसांनी येणारा हा सण कार्तिक महिन्यातील शुक्ल पक्षाच्या द्वितीया तिथीला साजरा केला जातो. या दिवशी बहिणी आपल्या भावांच्या कपाळावर टिळक लावतात आणि त्यांच्या सुख, समृद्धी, दीर्घायुष्य व उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना करतात. त्या बदल्यात, भाऊ आपल्या बहिणींचे रक्षण करण्याचे आणि त्यांच्या आयुष्यभराच्या आनंदाची काळजी घेण्याचे वचन देतात. धार्मिक मान्यतेनुसार, या दिवशी विधीवत पूजा करणे आणि भावाच्या कपाळावर टिळक लावणे विशेष महत्त्वाचे मानले जाते. परंतु भाऊबीजेच्या पूजेच्या ताटात कोणत्या वस्तू असाव्यात, हे तुम्हाला माहीत आहे का? चला तर मग, आवश्यक वस्तू आणि त्यांचे धार्मिक महत्त्व जाणून घेऊया.

भाऊबीजेच्या पूजेच्या ताटातील आवश्यक वस्तू:

१. रोळी किंवा कुंकू- भाऊबीजेच्या पूजेच्या ताटात 'रोळी' किंवा 'कुंकू' ही सर्वात महत्त्वाची वस्तू मानली जाते. बहिणी याचा वापर करून भावाच्या कपाळावर टिळक लावतात. धार्मिक परंपरेनुसार, टिळक लावणे हे शुभत्व, आदर आणि शुभेच्छांचे प्रतीक मानले जाते.

२. अक्षता-रोळीसोबतच पूजेच्या ताटात 'अक्षता' (अखंड तांदूळ) असणे आवश्यक आहे. टिळक लावल्यानंतर भावाच्या कपाळावर अक्षता लावल्या जातात. हिंदू धर्मात अक्षतांना पूर्णत्व, समृद्धी आणि शुभतेचे प्रतीक मानले जाते.

३. दिवा आणि तूप- पूजेच्या ताटात एक छोटा दिवा नक्की ठेवावा. यात तूप किंवा तेल घालून दिवा प्रज्वलित करा आणि त्यानंतर आपल्या भावाची आरती करा. हा दिवा सकारात्मकतेचे आणि अंधाराकडून प्रकाशाकडे जाण्याचे प्रतीक मानला जातो.

४. फुले-भाऊबीजेच्या पूजेत फुलांना विशेष महत्त्व आहे. पूजेच्या ताटात ताजी फुले ठेवा. यामुळे पूजेचे ताट अधिक सुंदर आणि शुभ वाटते.

५. मिठाई-भाऊबीजेच्या विधीमध्ये मिठाईशिवाय पूजा अपूर्ण मानली जाते. पूजेच्या ताटात लाडू, पेढे, बर्फी किंवा तुमच्या भावाला आवडणारी इतर कोणतीही मिठाई ठेवा. टिळक लावल्यानंतर भावाला मिठाई खाऊ घाला. हे बहीण-भावाच्या नात्यातील गोडवा आणि प्रेम दर्शवते.

६. कलावा किंवा मौली (पवित्र धागा)-तुम्ही पूजेच्या ताटात कलावा किंवा मौली (पवित्र धागा) देखील ठेवू शकता. विधीदरम्यान, हा धागा भावाच्या मनगटावर बांधला जातो; हे शुभ मानले जाते आणि याद्वारे भावासाठी शुभेच्छा दिल्या जातात.

७. नारळ आणि सुपारी- भाऊबीजेच्या पूजेच्या ताटात नारळ आणि सुपारी ठेवणे शुभ मानले जाते. नारळाला विधींमध्ये 'श्रीफळ' असेही म्हणतात, जे शुभता आणि समृद्धीचे प्रतीक मानले जाते.

८. पाण्याने भरलेले कलश- विधीसाठी पाण्याने भरलेले एक स्वच्छ भांडे (कलश) जवळ ठेवा. काही परंपरांमध्ये, भावाला टिळक लावण्यापूर्वी पाण्याशी संबंधित विशिष्ट विधी केले जातात. त्यामुळे, तुमच्या कुटुंबातील प्रथेनुसार या पाण्याचा वापर करा.

९. विडा आणि सुपारी- अनेक प्रदेशांत भाऊबीजेच्या पूजेत पान आणि सुपारी ठेवण्याची प्रथा आहे. हे विधीचा एक भाग म्हणून अर्पण केले जातात आणि भावालाही दिले जातात.

१०. दक्षिणा आणि भेटवस्तू- तुम्ही पूजेच्या ताटात काही दक्षिणा (प्रतीकात्मक भेट) किंवा नाणीही ठेवू शकता. 'भाई दूज'च्या दिवशी भाऊ आपल्या बहिणींना भेटवस्तू देतात, तर बहिणी आपल्या भावांच्या कल्याणासाठी प्रार्थना करतात आणि त्यांना शुभेच्छा देतात.

'भाई दूज'चा विधी कसा करावा?

'भाई दूज'च्या दिवशी सकाळी लवकर उठून स्नान करावे आणि स्वच्छ वस्त्रे परिधान करावीत. पूजेची जागा स्वच्छ करून भगवान गणेश आणि भगवान विष्णू यांची प्रार्थना करावी. शुभ मुहूर्तावर, आपल्या भावाला एका स्वच्छ आसनावर किंवा चटईवर बसवावे. त्यानंतर, भावाच्या कपाळावर 'रोली' (कुंकू) आणि 'अक्षता' लावून टिळक करावे. यानंतर भावाची आरती करावी आणि त्याला मिठाई अर्पण करावी. बहिणीने आपल्या भावाचे दीर्घायुष्य, समृद्धी आणि आनंदी, परिपूर्ण जीवनासाठी प्रार्थना करावी. भावानेही आपल्या बहिणीला भेटवस्तू देऊन तिचे रक्षण करण्याचे आणि तिचा आदर करण्याचे वचन द्यावे.

'भाई दूज'च्या दिवशी यमराज

गोवर्धन पूजेसाठी घरी अन्नकूट कसे तयार करावे?

गोवर्धन पूजेचा सण दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी अत्यंत श्रद्धा आणि उत्साहाने साजरा केला जातो. हिंदू धर्मात या दिवसाला विशेष धार्मिक महत्त्व आहे. गोवर्धन पूजेला 'अन्नकूट' उत्सव असेही म्हणतात. या दिवशी भगवान श्रीकृष्ण, गोवर्धन पर्वत आणि गाईंची पूजा केली जाते. असे मानले जाते की, या दिवशी भगवान श्रीकृष्णाला 'अन्नकूट' (विविध खाद्यपदार्थांचा नैवेद्य) अर्पण केल्याने घरात सुख-समृद्धी येते आणि कुटुंबावर ईश्वराची कृपा सदैव राहते. चला तर मग, घरी 'अन्नकूट' कसा तयार करावा आणि त्याचे धार्मिक महत्त्व काय आहे, हे जाणून घेऊया.


'अन्नकूट' म्हणजे विविध प्रकारच्या अन्नधान्यांपासून बनवलेल्या पदार्थांचा समूह. गोवर्धन पूजेच्या दिवशी भगवान श्रीकृष्णाला अर्पण करण्यासाठी अनेक प्रकारचे पदार्थ तयार करण्याची परंपरा आहे. यामध्ये हंगामी भाज्या, डाळी, भात, कढी, पुरी, मिठाई आणि इतर विविध खाद्यपदार्थांचा समावेश असतो. धार्मिक मान्यतेनुसार, द्वापार युगात भगवान श्रीकृष्णाने ब्रजवासीयांचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांना इंद्रदेवाच्या कोपापासून वाचवण्यासाठी गोवर्धन पर्वत आपल्या करंगळीवर उचलला होता. तेव्हापासूनच भगवान श्रीकृष्णाला 'अन्नकूट' अर्पण करण्याची प्रथा सुरू झाली. हा सण निसर्ग, अन्नधान्य आणि गाय (गोमाता) यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचेही एक माध्यम आहे.

'अन्नकूट' तयार करण्यासाठी कशाची आवश्यकता असते?

घरी 'अन्नकूट' तयार करण्यासाठी तुम्ही तुमच्या श्रद्धेनुसार आणि सोयीनुसार विविध पदार्थ बनवू शकता. यामध्ये तुम्ही बटाटा, फ्लॉवर, मटार, गाजर, वांगी, दुधी भोपळा, फरसबी आणि टोमॅटो यांसारख्या हंगामी भाज्यांचा वापर करू शकता. याव्यतिरिक्त, तुम्ही तांदूळ, डाळी, बेसन, दही, गव्हाचे पीठ आणि तूप यांसारख्या साहित्याचाही समावेश करू शकता. 'अन्नकूट'साठी अनेक प्रकारचे पदार्थ बनवले जातात; विशेषतः मिश्र भाजी, कढी, डाळ, भात, पुरी, हलवा, खीर, लाडू आणि पेढे यांचा यात प्रामुख्याने समावेश असतो. तुम्ही देवाला फळे, मखाणे, खडीसाखर आणि पंचामृतही अर्पण करू शकता.

'अन्नकूट' भाजी कशी तयार करावी?

'अन्नकूट' भाजी बनवण्यासाठी, सर्वप्रथम तुमच्या आवडीच्या मोसमी भाज्या स्वच्छ धुवून त्यांचे छोटे तुकडे करून घ्या. एका मोठ्या भांड्यात थोडे तूप गरम करा आणि त्यात जिरे, हिंग व सौम्य मसाले घाला. त्यानंतर, सर्व चिरलेल्या भाज्या घालून नीट मिसळा.



चवीनुसार मीठ, हळद आणि धणे पूड टाका. थोडे पाणी घालून भांडे झाकून ठेवा आणि भाज्या शिजू द्या. भाज्या पूर्णपणे शिजल्यावर त्यावर ताजी कोथिंबीर घाला. लक्षात ठेवा की, देवाला अर्पण करण्यासाठी तयार केलेला नैवेद्य 'सात्त्विक' (शुद्ध) असावा; त्यात कांदा किंवा लसूण वापरू नका.

'अन्नकूट' अर्पण करण्याची योग्य पद्धत

गोवर्धन पूजेच्या दिवशी सकाळी स्नान करून घरातील देवघर स्वच्छ करा. त्यानंतर, भगवान श्रीकृष्ण आणि गोवर्धन महाराजांची पूजा करा. देवाला फुले, धूप, दिवा आणि नैवेद्य अर्पण करा. तयार केलेले सर्व पदार्थ एकत्र करून भगवान श्रीकृष्णासमोर ठेवा. धार्मिक परंपरेनुसार, नैवेद्य अर्पण करताना आपल्या कुटुंबाच्या सुख, शांती आणि समृद्धीसाठी देवाला प्रार्थना करावी. पूजेनंतर, तयार केलेले अन्न 'प्रसाद' म्हणून कुटुंबातील सदस्यांमध्ये आणि इतरांमध्ये वाटावे.


'अन्नकूट' उत्सवाचे धार्मिक महत्त्व

अन्नकूट' उत्सव आपल्याला अन्नाचा आदर करायला आणि निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करायला शिकवतो. गोवर्धन पर्वताच्या पूजेला प्रोत्साहन देऊन, भगवान श्रीकृष्णाने आपल्या जीवनातील निसर्गाचे—पर्वत, वनस्पती, प्राणी आणि जल—महत्त्व अधोरेखित केले. 'अन्नकूट' अर्पण करणे ही केवळ एक धार्मिक परंपरा नाही, तर ती समुदाय, सेवा आणि दातृत्वाचे प्रतीकही आहे. म्हणूनच, गोवर्धन पूजेच्या निमित्ताने तुमच्या भक्तीनुसार आणि क्षमतेनुसार 'अन्नकूट' तयार करा आणि सर्वांसोबत प्रसाद वाटा.

जनमाध्यम

E-mail:-ytljanmadhyam@gmail.com | रविवार, ८ नोव्हेंबर २०२६ | एक प्रतिष्ठित सवय















































TRUST MEANS
JADHAO TVS

TVS

JADHAO TVS

अमरावती शहराच्या मध्यभागी
असलेले एकमात्र

TVS AUTHORISED
SHOWROOM

SALES • SERVICE • SPARES

JADHAO AUTOMOTIVE PVT. LTD.
Amravati Railway Station Square To Main Bus Stand Road, Amravati
SALES : 7796632002/3/5 SERVICE : 7796632001/7

जीहाँ!
चांदूरबाजार तालुक्यातील
समस्त गॅस धारकांना
धनत्रयोदशी व दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा
लक्ष-लक्ष दिव्यांनी उजळून निघो ही निशा
घेऊनी येवो नवी उमेद नवी आशा!
HP GAS
शुभेच्छुक
कल्पना गॅस सर्व्हीस (H P Gas)
महाराष्ट्र बँकवर, मेन रोड, चांदूरबाजार, जि. अमरावती
संचालक : कल्पना विलास तायवाडे
संचालक - विलास तायवाडे

ग्रामपंचायत बेलोरा (प्रहार)
उपसरपंच अतुल भाऊ रूपरावजी सिंगम
यांच्याकडून सर्व जनतेला
दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
ही दिवाळी सर्वांना सुख, समृद्धी व भरभराटीची
जावो हीच सदिच्छा !

सर्व जनतेला
दिवाळीच्या
खूप खूप शुभेच्छा
ही दिवाळी सर्वांना सुख, समृद्धी
व भरभराटीची जावो
हीच सदिच्छा !
शुभेच्छुक
शासकीय कंत्राटदार
मुस्तफा बुरहानिंग
अमरावती

शुभ दीपावली

अचलपूर - परतवाडा
जुळ्या शहरातील
समस्त जनतेला
दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक - तमिज शहा,
अचलपूर तालुका कार्याध्यक्ष,
युवा स्वाभिमान पार्टी.

अमरावती जिल्हयातील समस्त जनतेला
दिपावली व भाऊबीजेच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक - गायत्री स्कूल ऑफ नर्सिंग,
नवसारी, अमरावती.

जनमाध्यम
Epaper www.janmadhyam.com रविवार, ८ नोव्हेंबर २०२६ एक प्रतिष्ठित सवय

दीपावली : प्रत्येक हृदयात प्रेमाचा दीप चेतवा!

तेलाची पणती तेवण्यासाठी त्याची वात तेलात बुडालेली असावी लागते पण त्याचे टोक मात्र तेलाच्या बाहेर असावे लागते. जर वात पूर्णपणे तेलात बुडालेली असली तर ती प्रकाश देऊ शकणार नाही. आयुष्य हे दिव्यातल्या वातीसारखे आहे. तुम्हाला या जगात रहावे लागते पण त्याच्यापासून अलिप्तही रहावे लागते. जर तुम्ही जगातल्या भौतिक गोष्टींमध्ये पूर्णपणे बुडून गेलात तर तुम्ही जीवनात आनंद आणि ज्ञान मिळवू शकणार नाही. जगात राहूनही त्यातल्या संसारिक गोष्टीत बुडून गेला नाहीत तरच आनंदाचा आणि ज्ञानाचा प्रकाश पडू शकेल.

दिवाळी हा अशाप्रकारे निर्माण झालेल्या विवेकाच्या प्रकाशाचा सण आहे. या दिव्याच्या सणात चांगल्याने वाईटावर मिळवलेला विजय, प्रकाशाने अंधारावर मिळवलेला विजय आणि ज्ञानाने अज्ञानावर मिळवलेला विजय साजरा केला जातो. दिवे लावले जातात ते केवळ घर सजवण्यासाठी नव्हे तर जीवनातले हे गहिरे सत्य सांगण्यासाठी सुद्धा लावले जातात. विवेकाचा आणि प्रेमाचा दिवा प्रत्येक हृदयात लावा आणि प्रत्येकाच्या चेहऱ्यावर एक प्रफुल्ल असे हास्य फुलवा.

प्रत्येक माणसात काही ना काही चांगले गुण असतात. आणि तुम्ही लावलेला प्रत्येक दिवा याचेच प्रतिक आहे. काहींमध्ये संयम असतो, काहींमध्ये प्रेम, सामर्थ्य, उदारता असते तर काहींमध्ये लोकांना एकत्र आणण्याची क्षमता असते. तुमच्यातील सुप्त गुण हे पणतीसारखे असतात. एकच पणती लावण्यात समाधान मानू नका, हजारो दिवे लावा कारण अज्ञानारूपी अंधःकार घालवण्यासाठी तुम्हाला खूप दिवे लावावे लागतील. तुमच्यातील विवेकाचा दिवा लावून आणि ज्ञान प्राप्त करून तुम्ही तुमच्यातील सर्व क्षमतांना जागवा. जेव्हा ते लावले जातील आणि तेवू लागतील तीच दिवाळी असेल !

आणखी एक महत्वाचे प्रतिक आहे ते म्हणजे फटाके. जीवनात बरेचदा तुम्ही फटाक्यासारखे होता, साचलेल्या भावना, नैराश्य,राग यांचा कधी स्फोट होईल नेम नाही. जेव्हा तुम्ही तुमच्या भावना, इच्छा, नावड, तिरस्कार यासारख्या भावना दाबून ठेवता तेव्हा त्याचा कधीतरी स्फोट होणारच. फटाके फोडणे ही आपल्या पूर्वजांनी बाटली बंद भावना मोकळ्या करण्यासाठी तयार केलेली पद्धत आहे. जेव्हा तुम्ही बाहेर एखादा स्फोट बघता तेव्हा तुम्हाला तुमच्यातही तशाच भावना निर्माण झालेल्या जाणवतात. आणि स्फोटाबरोबरच केवढातरी प्रकाश निर्माण होतो. तर जेव्हा तुम्ही या भावनांचा निचरा करता तेव्हा पावित्र्य निर्माण होते.

जोपर्यंत तुमच्यातील साचलेल्या भावनांचा निचरा होत नाही तोपर्यंत तुम्हाला नाविन्याचा अनुभव येणार नाही. दिवाळी म्हणजे वर्तमानात असणे. त्यामुळे भूतकाळातील पश्चाताप आणि भविष्याची काळजी टाकून द्या आणि वर्तमान क्षणात रहा. भेटवस्तू आणि मिठाई, फराळ यांची देवाण घेवाण करण्याठी एक प्रतिकात्मकता आहे. भेटवस्तू आणि मिठाई देणे हे मनातील पूर्वीचा कडवटपणा टाकून देऊन भविष्यासाठी मैत्रीचे नुतनीकरण करणे याचे प्रतिक आहे.

कोणताही उत्सव साजरा करणे हे सेवेशिवाय पूर्ण होत नाही. आपल्याला देवाकडून जे काही मिळाले आहे ते आपण इतरांबरोबर वाटून घ्यायला हवे कारण दिल्यानेच आपल्याला मिळते.हा खरा उत्सव आहे. साजरा करणे याचा असाही अर्थ आहे की सर्व मतभेद दूर करून आत्म्याचे तेज वाढवणे. समाजातील प्रत्येकाने विवेकपूर्ण व्हायला हवे. आनंद आणि विवेक पसरवायला हवा आणि हे तेव्हाच होईल जेव्हा सर्वजण एकत्र येऊन ज्ञानात राहून उत्सव साजरा करतील.



दिवाळी हा सण मागील वर्षभरात झालेल्या कुरबुरी आणि नकारात्मकता विसरण्याचा सण आहे. तुम्हाला प्राप्त झालेल्या विवेकावर प्रकाश टाकण्याची आणि पुन्हा नव्याने सुरवात करण्याचे स्वागत करण्याची ही वेळ आहे.जेव्हा खऱ्या विवेकाचा उगम होतो तेव्हाच उत्सव सुरु होतो. बरेचदा उत्सव साजरा करताना तुम्ही तुमची एकाग्रता आणि सजगता घालवून बसता. उत्सवात ही सजगता टिकवून ठेवण्यासाठीच प्राचीन ऋषींनी प्रत्येक सणांत पूजा आणि पावित्र्याचा समावेश केला आहे. यांच कारणासाठी दिवाळीतही पूजेचा भाग असतो. दिवाळीतील आध्यात्मीक विचारांनी या उत्सवाला एक सखोलता मिळते. कोणताही उत्सव हा आध्यात्मिक असायला हवा आणि अध्यात्माशिवाय सखोलता येत नाही. दीपावली म्हणजे दिव्यांच्या रांगा ज्या आपण आयुष्यात कमावलेल्या विवेकाच्या द्योतक आहेत. सत्य आणि प्रेम यांनी अज्ञानावर मिळवलेला हा जय आहे.

सत्यभामेने नरकासुराचा केलेला वध हा या विजयाचे प्रतिक आहे. नरक चतुर्दशीच्या दिवशी नरकासुराचा वध केला गेला होता. नरकासुर (नरक) राजाला असा वर मिळाला होता की त्याचा मृत्यू फक्त स्त्रीच्या हातूनच येईल. श्रीकृष्णाची पत्नी सत्यभामा हिच्या हातून त्याचा वध केला गेला.केवळ सत्यभामाच नरकासुराचा वध कां करू शकली ? सत्य म्हणजे खरे आणि भामा म्हणजे प्रिय. असत्य किंवा प्रेमाचा अभाव यांना नरकावर विजय मिळवता येत नाही. हिंसक मार्गाने तो घालवता येत नाही. केवळ प्रेम आणि समर्पण यानेच नरकापासून सुटका होऊ शकते. अहिंसा प्रेम आणि समर्पण या स्त्रीचे उपजत गुण आहेत. त्यामुळे फक्त सत्यभामाच नरक नष्ट करून पुन्हा एकदा प्रकाश आणू शकली. आणि नरकासुराची शेवटची इच्छा अशी होती की त्याचे जाणे म्हणजेच अंध:कार नाहीसा होण्याचे प्रतिक म्हणून प्रत्येक घरात दिवे लावून साजरे केले जावे.

अशाप्रकारे प्रेम आणि विवेकाच्या प्रकाशाचा उगम साजरा करणारा हा उत्सव आहे. तसेच यांच दिवशी दैत्यांचा राजा रावण याच्यावर विजय मिळवून राजा श्रीराम अयोध्येत, स्वत:च्या राज्यांत परत आले. अयोध्या म्हणजे जे नष्ट करू शकत नाही ते. राम म्हणजे आत्मा. जेव्हा जीवनात आत्म्याचे राज्य असते तेव्हा ज्ञानाचा प्रकाश पडतो. जीवन सर्वत्र आहे. पण जेव्हा जीवनात आत्मा जागवला जातो तेव्हा दिवाळी साजरी होते.

दिवाळीबद्दल अनेक दंतकथा असल्या तरी प्रत्येक हृदयात विवेकाचा दीप चेतविण्यासाठी आणि प्रत्येकाच्या चेहऱ्यावर स्मित आणण्यासाठी दिवाळी साजरी केली जाते. जीवनाचे अनेक पैलू आणि अनेक स्तर आहेत. त्या सर्वांवर प्रकाश टाकणे हे आपले महत्वाचे काम आहे. कारण त्यातला एक जरी पैलू अंधारात असला तरी जीवन पूर्णपणे खुलणार होणार नाही. तुमच्या जीवनातल्या प्रत्येक पैलूवर तुम्ही ज्ञानाचा प्रकाश टाकण्याची गरज आहे हे तुमच्या ध्यानात आणून देण्यासाठीच दिव्यांच्या माळा लावल्या जातात. विवेकाची गरज सगळीकडेच आहे. कुटुंबातील एक व्यक्ती जरी अंधारात असेल तरी तुम्ही आनंदी राहू शकत नाही. त्यामुळे तुम्हाला प्रत्येकाच्या मनात विवेकाचा दीप चेतावायला हवा. आणि तेच पुढे जाऊन संपूर्ण समाजात आणि पृथ्वीवरच्या प्रत्येक माणसाच्या बाबतीत करायला हवे.

जो ज्ञानात नाही त्याच्यासाठी दिवाळी वर्षातून एकदाच येते पण जो विवेकी असतो त्याच्यासाठी दररोज प्रत्येक क्षणच दिवाळी असते. ही दिवाळी ज्ञानात राहून आणि मानवतेची सेवा करण्याचा संकल्प करून साजरी करा. तुमच्या हृदयात प्रेमाचा, घरात समृद्धतेचा दीप चेतवा, दुसऱ्यांची सेवा करण्यासाठी करुणेचा, अज्ञानरूपी अंध:कार घालवण्यासाठी ज्ञानाचा आणि देवाने आपल्यावर जो समृद्धतेचा वर्षाव केला आहे त्यासाठी कृतज्ञतेचा दीप चेतवा.

श्री श्री रविशंकर यांचे मराठी भाषांतरित साहित्य

अभ्यंगस्नानानंतर फराळ खाण्याची परंपरा का?

दिवाळी म्हटली की डोळ्यांसमोर सर्वप्रथम येतात ते पणत्यांचा प्रकाश, आकाशकंदील, रांगोळ्या, नवीन कपडे आणि घराघरांतून दरवळणारा फराळाचा सुगंध! दिवाळीच्या काही दिवस आधीच घरातील महिला आणि कुटुंबातील सदस्य फराळ बनवण्याच्या तयारीला लागतात. अनेक घरांमध्ये एकत्र बसून फराळाचे पदार्थ तयार करण्याची परंपरा आजही जपली जाते. पण तुम्हाला कधी प्रश्न पडलाय का, की दिवाळीतच फराळ का बनवला जातो? या परंपरेमागे नेमके काय धार्मिक महत्त्व आहे? फराळाचे पदार्थ बनवण्याची प्रथा कशी सुरू झाली आणि त्यामागे कोणते सांस्कृतिक तसेच सामाजिक अर्थ दडलेले आहेत? जाणून घेऊया...

दिवाळीत फराळ बनवण्याची परंपरा कशी सुरू झाली?

दिवाळी हा भारतातील महत्त्वाच्या सणांपैकी एक आहे. हा सण अंधारावर प्रकाशाचा, वाईटावर चांगल्याचा आणि निराशेवर आनंदाचा विजय दर्शवतो. दिवाळीच्या काळात घराची स्वच्छता, सजावट, पूजा, पाहुण्यांचे स्वागत आणि गोडधोड पदार्थांची देवाणघेवाण केली जाते. याच परंपरेचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे दिवाळीचा फराळ. पूर्वीच्या काळात सणासुदीच्या निमित्ताने घरात खास पदार्थ तयार करण्याची परंपरा होती. दिवाळीच्या दिवसांत शेतातील कामांचा हंगामी टप्पा संपलेला असे आणि कुटुंबाला एकत्र येऊन सण साजरा करण्याची संधी मिळत असे. त्यामुळे घरात टिकणारे, अनेक दिवस खाता येणारे आणि पाहुण्यांना देता येणारे पदार्थ तयार केले जात. त्यातून चिवडा, चकली, करंजी, लाडू, शंकरपाळे अशा फराळाच्या पदार्थांना विशेष स्थान मिळाले.कारण फराळ बनवण्याची परंपरा केवळ खाण्यापुरती मर्यादित नाही, तर ती कुटुंबातील एकोपा, आनंद आणि आपुलकी जपणारी परंपरा आहे.

दिवाळीच्या फराळाचे धार्मिक महत्त्व काय?

दिवाळी हा सण देवी लक्ष्मी आणि भगवान गणेश यांच्या पूजेशी जोडलेला आहे. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी घरात सुख, समृद्धी आणि भरभराट नांदावी, अशी प्रार्थना केली जाते. या शुभप्रसंगी घरात गोडधोड पदार्थ तयार केले जातात. देवाला नैवेद्य दाखवून त्यानंतर कुटुंबातील सदस्य आणि पाहुण्यांना फराळ दिला जातो. फराळाचा प्रत्येक पदार्थ हा आनंद, गोडवा आणि समृद्धीचे प्रतीक मानला जातो. गोड पदार्थांमुळे जीवनात गोडवा राहावा, तर चविष्ट आणि पौष्टिक पदार्थांमुळे सणाचा आनंद वाढावा, अशी यामागची सांस्कृतिक भावना आहे. मात्र, फराळातील प्रत्येक पदार्थाला स्वतंत्र धार्मिक महत्त्व असल्याचे शास्त्रात सांगितलेले नाही. ही प्रथा प्रामुख्याने लोकपरंपरा आणि कौटुंबिक संस्कृतीतून विकसित झाली आहे.

पहाटे अभ्यंगस्नानानंतर फराळ खाण्याची परंपरा का?

महाराष्ट्रात नरक चतुर्दशीच्या दिवशी पहाटे उठून अभ्यंगस्नान करण्याची परंपरा आहे. सुगंधी तेल लावून स्नान केल्यानंतर नवीन कपडे परिधान केले जातात. घरात देवपूजा आणि आरती केली जाते. त्यानंतर कुटुंबातील सर्व सदस्य एकत्र बसून दिवाळीचा फराळ खातात. काही घरांमध्ये आरतीच्या वेळी चकली, लाडू यांसारख्या फराळाच्या पदार्थांचा नैवेद्य दाखवला जातो. अभ्यंगस्नानानंतर फराळ खाणे हा महाराष्ट्रातील दिवाळी उत्सवाचा अत्यंत आनंददायी भाग आहे.



फराळ एकमेकांना का वाटला जातो? यामागील महत्त्व

दिवाळीचा फराळ हा केवळ घरापुरता मर्यादित नसतो. शेजारी, नातेवाईक, मित्रमंडळी आणि परिचितांना फराळ देण्याची परंपरा महाराष्ट्रात अनेक वर्षांपासून सुरू आहे. पूर्वीच्या काळात दिवाळीच्या निमित्ताने प्रत्येक घरात फराळाचे डबे तयार केले जात असत. शेजाऱ्यांकडे फराळ पाठवणे, नातेवाईकांना बोलावून फराळाचा आस्वाद घेणे आणि एकमेकांना शुभेच्छा देणे याला विशेष महत्त्व होते. या परंपरेमुळे माणसांमधील आपुलकी वाढते, नाती दृढ होतात आणि समाजात एकोपा निर्माण होतो. फराळ वाटण्याची परंपरा सामाजिक एकजूट वाढवणारी असल्याचे सांस्कृतिक लेखनातूनही दिसते.

दिवाळीचा फराळ आणि ऋतुमानाचा संबंध

दिवाळी साधारणपणे ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात येते. या काळात हवामानात बदल होत असतो. पारंपरिक फराळातील काही पदार्थ तुलनेने कमी ओलावा असलेले असल्यामुळे ते अनेक दिवस साठवून ठेवता येतात. त्यामुळे दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये पाहुण्यांना फराळ देणे सोयीचे ठरत असे. लाडू, चिवडा, चकली, करंजी आणि शंकरपाळे यांसारखे पदार्थ आधीच तयार करून ठेवता येतात. त्यामुळे सणाच्या दिवसांत स्वयंपाकाचा ताण कमी होतो आणि कुटुंबाला एकत्र वेळ घालवता येतो.

बदलत्या काळातही टिकून आहे फराळाची परंपरा

आजच्या धावपळीच्या जीवनात अनेक कुटुंबे बाजारातून फराळ विकत घेतात. काही जण घरच्या घरी पारंपरिक पदार्थ बनवण्याला प्राधान्य देतात, तर काही ठिकाणी महिला बचतगट आणि लघुउद्योजक दिवाळी फराळाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी निर्माण करत आहेत. मात्र, घरात एकत्र बसून चकली, करंजी, लाडू आणि चिवडा बनवण्याचा आनंद आजही कायम आहे. आजीच्या हातची चव, आईच्या हातचा फराळ आणि लहान मुलांचा उत्साह यामुळे ही परंपरा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे पोहोचत आहे.

दिवाळीच्या फराळाचा खरा अर्थ काय?

दिवाळीचा फराळ म्हणजे केवळ चविष्ट पदार्थांची मेजवानी नाही, तर तो आपल्या संस्कृतीचा, परंपरेचा आणि कौटुंबिक जिव्हाळ्याचा अविभाज्य भाग आहे. देवाला नैवेद्य दाखवण्यापासून ते शेजाऱ्यांना फराळ वाटण्यापर्यंत प्रत्येक कृतीत आनंद, कृतज्ञता, आदरातिथ्य आणि आपुलकीची भावना दडलेली आहे. दिवाळीचा खरा गोडवा हा केवळ लाडू, करंजी किंवा शंकरपाळ्यांमध्ये नसून, तो एकमेकांसोबत आनंद वाटण्यात आणि नाती जपण्यात आहे. म्हणूनच वर्षानुवर्षे दिवाळीचा फराळ ही महाराष्ट्राच्या संस्कृतीतील एक सुंदर आणि अविस्मरणीय परंपरा बनून राहिली आहे.

दिवाळी 'फराळ' चा इतिहास

सणांचा राजा म्हणून दिवाळ सणाकडे पाहिले जाते. छोट्यांपासून मोठ्यापर्यंत प्रत्येकजण सकारात्मक उर्जा घेवून येणाऱ्या या सणाची वाट पाहत असतो. धनत्रयोदशीपासून या सणाला सुरुवात होते. त्यानंतर नरक चतुदर्शी, लक्ष्मी कुबेर पूजन, भाऊबीज आणि दीपावली पाडवा साजरा केला जातो. या आनंदोत्सवात नाती दिवसागणीक अधिक वृद्धींगत होत राहतात. चैत्यनाचा, आनंदाचा, उत्साहाचा, सकारात्मक उर्जेचा, मानवी हितसंबंध जपणारा सण म्हणून या सणाकडे पाहिले जाते.मुख्यत: म्हणजे या सणात पदार्थांची रेलचेल असलेला फराळ केला जातो. वेगवेगळे पदार्थ पाहायला मिळतात; पण तुम्हाला माहित आहे का? फराळ कधी सुरु झाला आणि का झाला. आज आपण याविषयी जाणून घेणार आहोत.



गोडधोड पदार्थ आणि सण

कृषी संस्कृतीमध्ये आहार आणि सण यांचे एक समीकरण आहे. आपल्याकडे सणांनुसार आहारामधील विविधता आढळते. दिवाळी सण म्हटलं की विविध पदार्थांची रेलचेल असते. पूर्वीच्या काळी आपल्या आहारात गोड पदार्थांची संख्या अत्यल्प होती. दिवाळी सणात लाडूंचे विविध प्रकार, करंजी, बालूशाही, अनारस अशा गोड पदार्थांनी तोंड 'गोड' करत हा सण साजरा केला जातो. दिवाळीतील गोड पदार्थ या सणांचा आनंद द्विगुणीत करतात.

भारतात सर्वत्र दिवाळी सण साजरा होतो;पण प्रदेश आणि भौगोलिकतेनुसार त्याचे स्वरुप वेगवेगळे आपल्याला जाणवते. पावसाळा संपला की शेतातील नवीन पिके घेतल्यानंतर शरद ऋतूत आणि आश्विन आणि कार्तिक (मराठी) महिन्याच्या दरम्यान (ऑक्टोबर-नोव्हेंबर दरम्यान) हा सण येतो.

महाराष्ट्र, दिवाळी आणि शेतीसंस्कृती

आपल्या महाराष्ट्रातील बरेच सण हे इथल्या शेतीभातीशी जोडले गेलेले आहेत. दिवाळी सणही आपल्या शेतीसंस्कृतीशी जोडला गेला आहे. हे आपल्याला विवीध लोकगितांतून, ग्रथांतून समजून येते. उदा.

दिन दिन दिवाळी, गायी म्हशी ओवाळी,
गायी म्हशी कोणाच्या, लक्ष्मणाच्या.
गाई म्हशीने भरले वाडे. दह्या दुधानं भरले डेरे, बळीचं राज्य येवो.

अशा ओव्यातून वा गाण्यांतून दिवाळी बद्दल माहिती मिळते.दिवाळी सणाला हजारो वर्षांचा इतिहास आहे. प्राचीन काळापासून हा सण साजरा होत आला आहे; पण नेमका कधी याबद्दल साशंकता आहे. हा सण कसा सुरु झाला याबद्दलही वेगवेगळी कारणे पाहायला मिळतात. याच दिवाळीत आवर्जून केली जाणारी गोष्ट कोणती असेल तर 'फराळ'. दिवाळी आणि फराळ हे एक समीकरण बनलं आहे. आपण फराळाशिवाय दिवाळी ही कल्पनाही करु शकत नाही. फराळातील पदार्थ हो भौगोलिक ठिकाणानूसार बदलत जातात. त्यांच्या चवी वेगवेगळ्या असतात. तुम्हाला आपल्या महाराष्ट्राचा फराळ म्हटलं की, करंज्या, चकल्या, विविध प्रकारचे लाडू (रवा, बेसन, बुंदी), चिवडा, शेव, अनारसे असे नाना प्रकारचे पदार्थ डोळ्यासमोर येतात. घरी आलेल्या पाहुण्यांना, आपल्या शेजाऱ्यांना आपणं हा फराळ देत असतो. ही गोष्ट मानवी नातं दृढ करायला नकळतपणे मदत करत असते. हा फराळ का केला जातो यालाही काहीतरी कारण असावं ना! तर या दिवाळी फराळाचा उल्लेख ११ व्या शतकात रघुनाथ गणेश नवहस्ते उर्फ रघुनाथसुरी यांनी लिहलेल्या 'भोजनकुतूहल' या ग्रंथात वाचायला मिळतो.

खाद्यपदार्थांची रेलचेल

आपल्या महाराष्ट्रातील फराळ हा खरतरं इथल्या शेतीसंसकृतीशी जोडला गेला आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबर दरम्यान येणारी ही दिवाळी या दिवसात शेतातील पिकं घेतली जातात. घरात धान्य आलेले असतं हे काम तितकचं कष्टाचं. शेतकरी घरात पिक आणल्यानंतर थोडासा निवांत होतो. गोडधोड पदार्थ शेतकऱ्याच्या घरात कधीतरी केले जात. या निवांत काळात गोडधोड म्हणून आणि एक आनंद म्हणून शेतकरी आपल्या घरी गोडधोडं पदार्थ करत असतो. हे दिवस थंडीचे, आपल्या शरिरातील स्निग्धता कमी झालेली असते. त्वचा रुक्ष झालेली असते. फराळात जे तुपकट आणि तेलकट पदार्थ असतात ती आपल्या शरिरातील स्निग्धता भरुन काढते. यालाच अनुसरुन आपली फराळ संस्कृती वृद्धींगत होत गेले आहे. दिवसागणिक तिचे स्वरुपही बदलत आहे.

सोनाली जाधव





जनमाध्यम

Epaper www.janmadhyam.com रविवार, ८ नोव्हेंबर २०२६ एक प्रतिष्ठित सवय



दुष्काळातील दिवाळी...

'अं'धारलेल्या शेतकऱ्यांच्या आयुष्यात प्रकाश कधी पडणार? दिवाळी म्हणजे आनंदाचा, उत्साहाचा, प्रकाशाचा आणि मांगल्याचा सण! घराघरांत दिव्यांची रोषणाई, आकाशकंदील, फटाक्यांची आतषबाजी, फराळाचा सुगंध आणि नवीन कपड्यांचा उत्साह असे चित्र सर्वत्र पाहायला मिळते. मात्र, याच दिवाळीच्या काळात महाराष्ट्रातील अनेक शेतकरी कुटुंबांच्या घरात मात्र आनंदाऐवजी चिंतेचा आर्थिक विवंचनेचा अंधार पसरलेला असतो. कारण त्यांच्या वाट्याला आलेली असते ती दुष्काळाची झळ, पाण्याची टंचाई, पिकांचे नुकसान वआर्थिक विवंचना! शहरांमध्ये दिवाळीची खरेदी जोरात सुरू असताना ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांना दोन वेळच्या जेवणाची चिंता सतावत असते. बाजारपेठा रोषणाईने उजळलेल्या असतात; परंतु शेतकऱ्यांच्या घरातील चूल पेटविण्यासाठीही संघर्ष करावा लागतो. ज्यांच्या कष्टावर संपूर्ण समाजाचे पोट भरते, त्याच शेतकऱ्याच्या घरात दिवाळीचा दिवा लावण्यासाठी पैसे नसावेत, यापेक्षा मोठे दुर्दैव कोणते?

यंदा पावसाने पाठ फिरवली, काही ठिकाणी पाऊस झाला तर काही ठिकाणी पिके पाण्याअभावी करपून गेली. सोयाबीन, कापूस, तूर, मका यांसारख्या पिकांचे मोठे नुकसान झाले. शेतकऱ्यांनी बियाणे, खते, औषधे आणि मशागतीसाठी केलेला खर्चही वसूल होण्याची शक्यता कमी झाली. कर्जाचा डोंगर मात्र वाढतच चालला आहे. ऊसतोड मजुरांच्या हाताला काम नाही.अशा परिस्थितीत दिवाळी साजरी करायची तरी कशी, हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा आहे. दिवाळीचा आनंद मुलांच्या चेहऱ्यावर असतो; पण दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या चेहऱ्यावर यंदा निरागस आनंदाऐवजी निराशा दिसत आहे. नवीन कपडे, फटाके, मिठाई आणि फराळ यांची अपेक्षा करणाऱ्या मुलांना परिस्थितीची जाणीव करून देताना आई-वडिलांचे मन किती व्यथित होत असेल, याची कल्पनाही करवत नाही. विशेषता ग्रामीण भागातील महिलांची अवस्था अधिकच कठीण आहे. पिण्याच्या पाण्यासाठी मैलोन्मैल भटकंती, जनावरांसाठी चारा-पाण्याची व्यवस्था, घरखर्च आणि मुलांचे शिक्षण या जबाबदाऱ्या सांभाळताना त्यांची दमछाक होत आहे. दिवाळीच्या सणात घराची स्वच्छता, रांगोळी, फराळ आणि पाहुणचार करण्याची इच्छा असूनही आर्थिक परिस्थितीमुळे अनेक महिलांना आपल्या इच्छा मनातच दाबून ठेवाव्या लागत



आहेत. अशा परिस्थितीत शासनाची जबाबदारी अधिक महत्त्वाची ठरते. केवळ दुष्काळ जाहीर करून प्रश्न सुटणार नाही.

दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत, पीक विमा भरपाई, कर्जाबाबत दिलासा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, जनावरांसाठी चारा छावण्या आणि रोजगार हमीची कामे उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. मदत कागदावर न राहता ती प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या हातात पोहोचली पाहिजे. दिवाळीच्या निमित्ताने सरकारने काही अंशी अल्पशी मदत दिली?.पण त्यामुळे फार मोठा हातभार लागणार आहे असे म्हणता येणार नाही. मोठमोठ्या घोषणा करण्यापेक्षा दुष्काळग्रस्तांच्या घरात खऱ्या अर्थाने आनंदाचा दिवा पेटविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. समाजातील दानशूर व्यक्ती, लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था व स्वयंसेवी संघटनांनी व उद्योगजकांनीअशा कुटुंबांच्या मदतीसाठी पुढे आले पाहिजे. दिवाळीचा खरा अर्थ केवळ घरात दिवे लावणे किंवा फटाके फोडणे एवढाच नाही. तर दुसऱ्याच्या आयुष्यातील अंधार दूर करणे हाच दिवाळीचा खरा संदेश आहे. आज गरज आहे ती दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या व रोजंदारी कामगारांच्या डोळ्यांतील अश्रू पुसण्याची, त्यांच्या मुलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याची आणि त्यांच्या घरात आशेचा दिवा पेटविण्याची. शहरातील दिवाळी रोषणाईने उजळली म्हणून महाराष्ट्र उजळला असे म्हणता येणार नाही. जोपर्यंत दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या घरात आनंदाचा दिवा पेटत नाही, तोपर्यंत महाराष्ट्राची दिवाळी खऱ्या अर्थाने साजरी झाली असे म्हणता येणार नाही! कारण प्रश्न केवळ दिवाळी साजरी करण्याचा नाही, तर शेतकऱ्यांच्या जगण्याचा आहे. त्यांच्या आयुष्यातील दुष्काळ संपणार कधी, हाच आजचा खरा प्रश्न आहे. एका बाजूला दिव्यांची रोषणाई आणि दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांच्या घरातील अंधार. ही दरी मिटविणे, हेच खऱ्या दिवाळीचे उद्दिष्ट असले पाहिजे.

डॉ.राजेंद्र मुरलीधर सानप

दिवाळी आणि लुप्त झालेल्या परंपरा

भारतीय संस्कृतीमध्ये सणांना केवळ मनोरंजनाचे किंवा आनंदाचे साधन मानले गेलेले नाही, तर ते मानवी जीवनावर उत्तम संस्कार करणारे आणि समाजाला एकाच सूत्रात बांधून ठेवणारे एक भक्कम माध्यम राहिले आहेत. या सर्व सणांमध्ये दीपावली अर्थात दिवाळी हा सण सर्वात श्रेष्ठ, प्रकाशमान आणि मानवी मनाला सुखावून जाणारा उत्सव मानला जातो. मात्र, एकविसाव्या शतकातील वेगवान जीवनशैली, पाश्चात्त्य संस्कृतीचे वाढते अंधानुकरण, वाढते शहरीकरण आणि तंत्रज्ञानाचा अतिवापर यामुळे या सणाचे पारंपरिक रूप आणि त्यामागे असणारे सखोल संस्कार आता काळाच्या पडद्याआड लुप्त होऊ लागले आहेत, ही आजची मोठी सामाजिक खंत आहे. पूर्वीच्या काळी दिवाळी हा केवळ चार ते पाच दिवसांचा एक औपचारिक सण नसायचा, तर तो अनेक महिने आधीपासून सुरू होणारा एक कौटुंबिक आणि सामाजिक सोहळा असायचा. आश्विन महिना सुरू झाला की घराघरांमध्ये स्वच्छतेची एक मोठी मोहीम सुरू व्हायची. घराची रंगरंगोटी करणे, कोनाकोपऱ्यातील जळमटे काढणे यामागे केवळ भौतिक स्वच्छता नव्हती, तर आपल्या मनातील नकारात्मक विचार दूर करून घरात लक्ष्मीच्या रूपाने सकारात्मक ऊर्जेचे स्वागत करणे हा त्यामागील मुख्य संस्कार होता. आजच्या आधुनिक काळात घरांची स्वच्छता करण्यासाठी व्यावसायिक संस्थांना कंत्राट दिले जाते, ज्यामुळे त्यामागील कौटुंबिक श्रम आणि जिव्हाळ्याची भावना कुठेतरी हरवून गेली आहे.

दिवाळीच्या फराळाची



संस्कृती हा तर या सणाचा मुख्य गाभा आणि कौटुंबिक जिव्हाळ्याचे प्रतीक होते. आज या सुंदर आणि सामूहिक श्रमसंस्कृतीची जागा 'रेडीमेड फराळ' संस्कृतीने घेतली आहे.

महाराष्ट्राच्या संस्कृतीत दिवाळीच्या काळात लहान मुलांनी मातीचे किल्ले बनवण्याची अत्यंत वैभवशाली परंपरा होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाची आणि त्यांच्या पराक्रमाची साक्ष देणारे हे किल्ले बनवण्यासाठी लहान मुले कित्येक दिवस आधीपासून माती, दगड आणि विटा गोळा करायची. स्वतःच्या हाताने चिखल कालवून, बुरुज आणि तटबंदी उभारून त्यावर शिवराय आणि मावळ्यांच्या मातीच्या मूर्ती ठेवल्या जायच्या. या परंपरेमुळे मुलांमध्ये इतिहास समजण्याची ओढ निर्माण व्हायची, मातीशी नाते जोडले जायचे आणि एकत्र काम केल्यामुळे संघभावना वाढायची. परंतु, आजच्या सिमेंटच्या जंगलात माती मिळणे कठीण झाले आहे आणि मुलेही मैदानावर खेळण्याऐवजी मोबाईल, संगणक आणि व्हिडिओ गेम्सच्या आभासी दुनियेत अडकली आहेत. परिणामी, आज दिवाळीत किल्ले बनवण्याचे दृश्य शहरांमधून जवळपास नाहीसे झाले आहे.

दिवाळीतील रोषणाई आणि प्रकाशाच्या परंपरेतही आज खूप मोठा बदल झाला आहे. पूर्वी घरातील सदस्य एकत्र येऊन बांबूच्या कामट्या आणि रंगीत कागदाचा वापर करून स्वतःच्या हाताने आकाशकंदील बनवायचे. त्यात एक वेगळीच सर्जनशीलता आणि आनंद असायचा. तसेच, कुंभाच्या घरून मातीच्या पणत्या आणून, त्या पाण्यात भिजवून, सुकवून आणि त्यात कापसाची वात व तेल घालून त्या घराच्या उंबरठ्यावर, अंगणात आणि तुळशीपाशी ओळीने लावल्या जायच्या. मातीच्या पणतीचा तो मंद आणि सात्विक प्रकाश मनाला शांतता द्यायचा. आज या हाताने बनवलेल्या कंदिलांची आणि मातीच्या पणत्यांची जागा चायनीज प्लास्टिक कंदिलांनी आणि विजेच्या भडक, डोळे दिपवणाऱ्या एलईडी माळांनी घेतली आहे. बटण दाबले की घर उजळते, पण त्यात तो जुना जिव्हाळा, शांतता आणि पणत्या लावण्यामागचा आध्यात्मिक भाव उरलेला नाही.

सूर्योदयापूर्वी उठून अंगाला उटणे आणि तेल लावून अभ्यंगस्नान करण्याची पद्धत होती. यामुळे शरीरातील रक्ताभिसरण सुधारून हिवाळ्याच्या सुरुवातीला आरोग्य उत्तम राहायचे. आजच्या काळात रात्री उशिरापर्यंत जागणे आणि सकाळी उशिरा उठण्याच्या सवयीमुळे हे पहाटेचे अभ्यंगस्नान आणि त्यामागील आरोग्यदायी संस्कार संपुष्टात येत आहेत. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी घराची पूजा करून पैशांपेक्षा गुणांची लक्ष्मी मोठी आहे हा विचार दिला जायचा, तर भाऊबीजेला भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याची वीण घट्ट केली जायची. आज या सर्व दिवसांचे स्वरूप केवळ औपचारिक आणि सोशल मीडियावर फोटो पोस्ट करण्यापुरते उरले आहे.

खऱ्या अर्थाने दिवाळीचा हा दीपोत्सव आपल्या आयुष्यातील अज्ञानाचा अंधार दूर करून ज्ञानाचा आणि प्रेमाचा प्रकाश पसरवू शकेल.

वैशाली देशमुख

दिवाळी आणि प्रदूषण

दिवाळी म्हटली की डोळ्यासमोर येतात ते मातीच्या पणत्या, आकाशकंदील, रांगोळी आणि फटाक्यांची आतषबाजी. दिवाळी हा प्रकाशाचा सण आहे. अंधारावर प्रकाशाने विजय मिळवण्याचा हा सण. पण गेल्या काही वर्षात या प्रकाशाच्या सणाला प्रदूषणाचे गडद सावट लागले आहे. दिवाळीचा आनंद साजरा करताना आपणच आपल्या निसर्गाला आणि आपल्या आरोग्याला हानी पोहोचवत आहोत का, याचा विचार करण्याची वेळ आता आली आहे.



दिवाळीच्या काळात सगळ्यात जास्त प्रदूषण होते ते फटाक्यांमुळे. फटाके फोडले की त्यातून निघणारा धूर थेट हवेत मिसळतो. त्या धुरात सल्फर, कार्बन आणि इतर विषारी वायू असतात. दिवाळीच्या रात्री तर संपूर्ण शहर धुराच्या चादरीत झाकून जाते. सकाळी उठल्यावर डोळे जळजळणे, घसा खवखवणे, खोकला येणे हे आता नेहमीचे झाले आहे. लहान मुले, वृद्ध माणसे आणि दमा असलेल्या रुग्णांना तर या धुराचा सर्वात जास्त त्रास होतो. त्यांना दिवाळीच्या दोन तीन दिवस घराबाहेर पडणेच मुश्किल होते.

फटाक्यांमुळे फक्त हवाच नाही तर ध्वनी प्रदूषणही वाढते. मोठमोठ्या आवाजाचे फटाके फोडले जातात. त्या आवाजाने लहान बाळे दचकून रडतात, वृद्ध माणसांची झोप उडते आणि मुक्या जनावरांची तर प्रचंड घाबरगुंडी उडते. कुत्रे, मांजर, पक्षी हे आवाजाने घाबरून सैरावैरा धावतात. अनेक पक्षी तर या आवाजाने आपले घरटे सोडून जातात.

फटाक्यांबरोबरच प्लास्टिकच्या सजावटीमुळेही प्रदूषण वाढते आहे. पूर्वी दिवाळीला मातीच्या पणत्या, झेंडूची फुले आणि कागदाच्या आकाशकंदिलांनी घरे सजायची. आता त्यांची जागा प्लास्टिकच्या माळा आणि चायनीज लाइट्सनी घेतली आहे. दिवाळी संपली की हेच प्लास्टिक कचऱ्यात जाते आणि मातीत मिसळून जमीन खराब करते. शिवाय फटाक्यांचे उरलेले कागद आणि कचरा रस्त्यावर पडून शहर घाण होते.

म्हणूनच आता आपल्याला दिवाळी साजरी करण्याची पद्धत बदलावी लागेल. फटाक्यांशिवाय दिवाळी होऊ शकत नाही, ही कल्पना मनातून काढून टाकावी लागेल. त्याऐवजी मातीच्या पणत्या लावून, नैसर्गिक फुलांची रांगोळी काढून, घरच्यांसोबत फराळ वाटूनही दिवाळी तितकीच आनंदाने साजरी करता येते. जर फटाके फोडायचेच असतील तर कमी आवाजाचे आणि कमी धुराचे हरित फटाके वापरावेत. दिवाळीचा खरा अर्थ हा अंधार दूर करून प्रकाश पसरवणे आहे. तो प्रकाश जर आपल्याच श्वासाला घातक ठरत असेल तर त्या दिवाळीला काय अर्थ आहे. यावेळी आपण एक संकल्प करूया, दिवाळी साजरी करू पण प्रदूषण न करता. कारण स्वच्छ हवा आणि निरोगी आयुष्य हीच खरी लक्ष्मी आहे.

विजय कडू



शेतकऱ्यांची दिवाळी कशी असते?

खरीप हंगाम संपून रब्बी हंगामाची सुरुवात होते आणि याच दरम्यान दिवाळीचा उत्सव येतो. किंबहुना, याच दिवसांचं महत्त्व सांगण्यासाठी दिवाळीची निर्मिती झाली असावी. पावसाळा संपलेला असतो. जमिनीने हिरवळीची चादर पांघरलेली असते. रब्बीची पेरणी होऊन पिकं बाल्यावस्थेत असतात, ती कोमल आणि नाजूक दिसत असतात. शेतात फिरायला गेलं तरी मन सुखावून जातं. नद्या, ओढ्यांचं नितळ पाणी संथपणे वाहत असतं. नद्या, नाले स्वच्छ होऊन आकर्षक दिसत असतात. विहिरी पाण्याने भरल्यामुळे निळ्याशार दिसत असतात. हिवाळ्याच्या थंडीची चाहूल लागत असते. या वातावरणाने शेतकरी उत्साहात असतो.

या शेतकऱ्यासाठी दिवाळी म्हणजे, शेतात पिकलेल्या धान्याच्या राशी घरात उंबऱ्याच्या आत आल्यानंतर तीन दिवस दिवाळी साजरी करून खरीप हंगामाला निरोप द्यायचा आणि रब्बी हंगामाची सुरुवात करायची. माझे वडील सांगतात की, दसरा साजरा झाला की थंडीला सुरुवात होते. दिवाळीपर्यंत थंडी शेतात पसरून वेशीवर येऊन थांबते. दिवाळीच्या दिवशी ती गावात, घरा-घरात शिरते. या थंडीला सामोरं जाण्यासाठी दिवाळीच्या पहाटे पहिली आंघोळ केली जाते. त्याला शहरात नरकचतुर्थीचं अभ्यंगस्नान म्हणतात.

दिवाळी हा कृषी संस्कृतीमधलाच उत्सव आहे. त्याचाच एक भाग म्हणजे शेतकरी ज्वारीच्या शेतात पांडव घालतात. ज्वारीच्या शेतात दगडाचे पांडव करून नैवेद्य दाखवला जातो. यामागे 'ज्वारीचं पीक चांगलं येऊ दे, कणसाची भरभराट होऊदे', अशी एक भावना असते. दुसरं, शेतात पांडव घालण्यामागे, 'वनवासाला गेलेल्या पांडवांचं शेतीने संरक्षण करावं, त्यांनी पिकांच्या शेतात राहावं, जेणेकरून काळीमाय त्यांना काहीच कमी पडू देणार नाही' असाही एक अर्थ आमचे वडील सांगतात. तिसरं म्हणजे काही जणांकडे घरच्या दारात गाईच्या शेणाच्या गवळणी घातल्या जातात. काहीजण त्यांना पांडव म्हणतात तर काहीजण गवळणी म्हणतात. शेतकरी घराच्या दारातल्या या गवळणीची पूजा करण्यासाठी 'सूर्या'च्या (एका गवताचा प्रकार) काड्या आणून दिवा बनवतात. तो दिवा पेटवून गवळणीसमोर उजेडासाठी ठेवला जातो. तसेच शेती, माती, घर, धन, संपदा हे आशय केंद्रस्थानी ठेवून गवळणीची गाणी म्हटली जातात.

शेतकरी कुटुंबात दिवाळीमध्ये गायी-वासराला महत्त्व असतं. दिवाळीच्या अगोदर १० दिवसांपासूनच गायीची पूजा करणं आणि ओवाळणं चालू असतं. या पूजेसाठी शेणाच्या गवरीच्या खंडावर गोडंतेल टाकून तो पेटवला जातो. चांगला पेट घेतला की, त्या गवऱ्यांच्या खंडाला दिवा समजून गायीची ओवाळणी केली जाते. त्यावेळी गायीला उद्देशून गाणं म्हणलं जातं,

'माझ्या बवळण गायीची कास, जशी सोन्याची रास'
'माझ्या बवळण गायीच्या मांड्या, जशा पालखीच्या दांड्या'
'माझ्या बवळण गायीचे डोळे, जसे की लोण्याचे गोळे....'

गायीची हळद-कुंकू लावून ओवाळणी केली जाते. याशिवाय काही परिसरात पाळीव प्राणी आणि माणूस यांचं नातं सांगणारी गाणीदेखील गायली जातात,

'दिन दिन दिवाळी,
गाई-म्हशी ओवाळी,
गाई-म्हशी कुणाच्या,
लक्ष्मणाच्या,
लक्ष्मण कुणाचा,
आई-बापाचा,
दे माई खोबऱ्याची वाटी,
वाघाच्या पाठीत घालीन काठी'

एकूणच, घरात दूध-दुभतं राहावं आणि वासरापासून शेतीच्या कामासाठी बैल मिळावेत ही बाब लक्षात घेऊन गायींप्रति कृतज्ञता म्हणून ही पूजा केली जाते. अलीकडे काही शेतकरी गोठ्यातील



धन म्हणून सर्वच पाळीव प्राण्यांची पूजा करताना दिसतात.

शेतमाल येण्याचा आनंद साजरा करण्यासाठी शेतकऱ्यांच्या घरात साफसफाई करणं, घराला रंगरंगोटी करणं, घर तोरणांनी सजवणं, दारात आकाशकंदील लावणं, घरासमोर पणत्या पेटवणं अशी घरा-दाराची सजावट केली जाते. तसेच खाण्यासाठी गोडाचे पदार्थ केले जातातच, शिवाय कुटुंबातील सर्वांना नवीन कपडे घेतले जातात. दुसरे म्हणजे, दिवाळीला घरा-दारात दिवे लावले जातात, त्यामागे घरात आलेल्या धान्याच्या राशीला कीड, पतंग लागू नयेत आणि तिचे संरक्षण व्हावे, असं कारण आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या दिवट्या पेटवल्या जातात. या दिवट्यांचा घराच्या अंगणात उजेड केला जातो. फटाके फोडून आनंद साजरा करतात. खरीप हंगामातील दुःख, वाईट प्रसंग यात विसरले जावेत, असा उद्देश असतो.

दिवाळीतील महत्त्वाचा दिवस म्हणजे लक्ष्मीपूजन. या दिवशी पूजेसाठी पूर्ण कुटुंब एकत्र येतं आणि घरात आलेल्या धान्याच्या राशीची पूजा करतं. काही कुटुंबांत झाडूला लक्ष्मी मानून, तिच्यावर पाणी शिंपडून, हळद-कुंकू वाहून पूजा करतात. हा झाडू नंतर वर्षभर घराची साफसफाई करण्यासाठी वापरला जातो. दिवाळी सणातला पाडवा हा शेतकऱ्यांचा महत्त्वाचा दिवस. शेतकरी सांगतात की, हा शेतकऱ्यांचा कल्याणकारी राजा बळीराजा याचं स्मरण करण्याचा दिवस आहे. तसेच भाऊबीजेचा दिवसही असतो.

अलीकडे हळूहळू दिवाळी उत्सवाचे स्वरूप बदलू लागलं आहे. पूर्वीप्रमाणे कृषी संस्कृतीनुसार दिवाळी साजरी करणं कमी होऊ लागलंय. नवीन पिढीने दिवाळीतील अनेक परंपरा सोडून देण्यास सुरुवात केली आहे. विशेषतः शेती क्षेत्राची घसरण सुरू झाल्यापासून अनेक प्रथा, रूढी आणि परंपरा पाळणं कमी झालंय. ज्वारीची लागवड कमी झाल्याने पांडव घालणं कमी झालंय. गायीची ओवाळणी कमी झालीय, गायीची गाणी म्हणणं कमी झालंय. दिवट्या, दिवे लावणं हेदेखील बदलू लागलं आहे. एकूणच दिवाळीकडे फॅशन किंवा मनोरंजन म्हणून पाहण्याकडे कल वाढू लागला आहे.

सोमिनाथ घोळवे



जनमाध्यम

Epaper www.janmadhyam.com रविवार, ८ नोव्हेंबर २०२६ एक प्रतिष्ठित सवय

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
महालक्ष्मी स्टोन क्रशर
रामगांव रोड, धामणगाव रेल्वे
काळी गिट्टी, मुरूम, क्रश सँड मिळण्याचे एकमेव ठिकाण
प्रो.प्रा. कथलकर व कांडलकर बंधु
मो-९१५८४७४०६४

वीर हनुमान लॉन, बालाजी कन्स्ट्रक्शन तर्फे सर्व नागरिकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा
विक्रम बुधलानी

ग्रामपंचायत कार्यालय मंगरुळ दस्तगीर
सर्व नागरिकांना
शुभ दीपावली
एस.एम.गोरे
सचिव

हॉटेल सदानंद
फॅमिली रेस्टॉरेंट ॲन्ड बार देवगांव
सदानंद लिकर्स
ॲन्ड रेस्टॉरेंट बार
धामणगांव रेल्वे
सदानंद
दुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स, देवगांव
अमोल इंगळकर
मोबाईल-9423850818 / 9890835818

सार्वजनिक बांधकाम विभाग
धामणगांव रेल्वे जि.अमरावती
दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
श्री.गोपाल ज्ञानेश्वर बकाले
उपविभागीय अधिकारी
सर्व अधिकारी कर्मचारी वृंद

श्री.माधव किसान सेवा केन्द्र
इंडियन ऑईल डिलर
मंगरुळ दस्तगीर रोड, धामणगांव रेल्वे
IndianOil
प्रो.प्रा.राधेश्याम प्रेमचंद मुंधडा

पं.स.धामणगांव रेल्वे बांधकाम विभाग
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!
प्रवीण हरिभाऊआखरे(कनिष्ठ अभियंता)
अभिजित धनराज काळे(कनिष्ठ अभियंता)
शशांक संजय जारी (सहा. असि.), अजिंक्य रामरावजी खेरडे,मनिष मोहन बनपडे, मयुर वैद्य, पंचशिल कांबळे, प्रसाद बानेगावकर,अक्षय अमोटे
ग्रामीण गृहनिर्माण अभियंता,
ऋषिकेश राणे ऑपरेटर

पंचायत समिती कार्यालय धामणगांव रेल्वे तर्फे
दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
डॉ. प्रफुल शशिकला गुलाबराव भोरखडे(गटविकास अधिकारी)
योगेश कुसुम नरेंद्र वानखडे (सहा.गटविकास अधिकारी)
निलेश वाघ (विस्तार अधिकारी)
सर्व अधिकारी व कर्मचारी वृंद

दुय्यम निबंधक कार्यालय, धामणगाव रेल्वे तर्फे
सर्व नागरिकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा

अमरावती जिल्हा मजूर सहकारी संस्था मर्या. अमरावती
अमरावती जिल्हा मजूर कामगार सहकारी संस्थाचा संघ मर्यादित अमरावती
समस्त नागरिकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
मा.श्री.माधवराव रा.शेंडे (अध्यक्ष)
मा.श्री.साहेबरावजी पं.माकोडे (उपाध्यक्ष)
मा.श्री.तनवीर सादिक काझी माजी अध्यक्ष तथा संचालक
र.नं.ए.टी.आय/पी.आर.डी. (एल.) ११५ कार्यालय : कामगार भवन, श्यामनगर, काँग्रेस नगर रोड, अमरावती

नगर परिषद कार्यालयातर्फे सर्व नागरीकांना
दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
वेळेवर घरटॅक्स, पाणी पट्टी भरा, व नगर परिषदेला सहकार्य करा.
पुनम नंदा किसनराव कळंबे
प्रशासक तथा मुख्याधिकारी

नारायण दुध डेअरी
गांधी चौक, धामणगांव रेल्वे
दुध, दही, ताक, श्रीखंड, आम्रखंड, पनीर, लस्सी, गायीचे दुध, म्हशीचे दुध मिळण्याचे एकमेव ठिकाण
शुभेच्छुक-नारायण सेठ

ग्रामपंचायत कार्यालय जुना धामणगांव
दिपावली
विश्वेश्वर दिघाडे
(सरपंच)
राहूल गोवर्धन धोटे
(ग्रामपंचायत अधिकारी)
व सन्माननीय सदस्य गण व कर्मचारी वृंद

सर्व नागरिकांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
राहुल भोयर ता.सहा.
राहुल ठाकरे स.को.अधिकारी
प्रशांत दुबे ता.सहा.
सौरभ दि.दुबे ता.सहाय्यक
सुरज प्र.बकाले ता.सहाय्यक
विजय मोरे आपरेटर
राहुल दी. गुल्हाने आपरेटर
महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना तालुका धामणगांव रेल्वे

सर्व नागरीकांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
मनोहरजी कांकरीया
निखिलबाबु कांकरीया
विक्कीबाबु कांकरीया

गजानन हेल्थ क्लिनीक
सर्व नागरीकांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
डॉ.महेश साबळे
MBBS
नगर परिषद समोर धामणगांव रेल्वे मो.8007657878

श्रीराम स्टोन क्रेशर
रामगांव रोड, धामणगांव रेल्वे
काळी गीट्टी, मुरूम, क्रश, सेंड मिळण्याचे एकमेव ठिकाण
नितीन चव्हाण मोबा-9665954444

मंगरुळ दस्तगीर पोलीस स्टेशन तर्फे
सर्व नागरीकांना
दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
गौतम इंगळे (पोलीस निरीक्षक)
गजानन रंगरावजी डवरे (पोलीस उपनिरीक्षक)
व कर्मचारी वृंद मंगरुळ दस्तगीर पोलीस स्टेशन

सर्व नागरीकांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
राजेंद्र पोळ
अंकित पोळ

सर्व नागरीकांना
दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
योगेश मुंधडा
शासकीय कंत्राटदार धामणगांव रेल्वे

Hotel Ramdev
AC & NON AC ROOMS
Experience Luxury Like Never Before!
Deluxe Room -AC
Super Deluxe Room -AC
Suite Rooms -AC
Call For Booking
8855811955
9146362955
Happy Diwali
Gandhi Chowk, Dhamangaon Rly. Amravati.

शिरभाते सॉ मिल
दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
विनय शिरभाते
सामाजिक कार्यकर्ता धामणगांव रेल्वे

श्री साई इन्फास्ट्रक्चर स्टोन क्रशर युनीट
काळी गीट्टी, मुरूम, क्रश, सेंड मिळण्याचे एकमेव ठिकाण
सर्व नागरीकांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
विशाल पनपालीया 9420520481 9130220481
संजय राठी 7083355592 9423123591
ऑफीस-विमल प्लाझा, अंजनसींगी रोड, राठी नगर, धामणगांव रेल्वे

बालाजी कृषी सेवा केन्द्र
गांधी चौक, धामणगांव रेल्वे
आमच्या असंख्य ग्राहकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
सुजित मुंधडा

हॉटेल कृष्णा पॅलेस
फॅमिली रेस्टॉरंट ॲन्ड लॉजींग
बायपास, मंगरुळ दस्तगीर रोड, धामणगांव रेल्वे

जाहीरात संकलन - प्रदीप भुसारी जनमाध्यम तालुका प्रतिनिधी धामणगांव रेल्वे. मोबाईल-९९२३४१९९९०
माऊली झेरॉक्स ॲन्ड फ्लेक्स नगर परिषद समोर धामणगांव रेल्वे • सौरभ भुसारी (मोबा -८४८२८८३८०३)

जनमाध्यम
Epaper www.janmadhyam.com रविवार, ८ नोव्हेंबर २०२६ एक प्रतिष्ठित सवय



























जनमाध्यम

Epaper www.janmadhyam.com रविवार, ८ नोव्हेंबर २०२६ एक प्रतिष्ठित सवय



दिवाळीचा दिवा कुठे लावायचा?

दिवाळी आली. दारात पणती लागेल, खिडकीत आकाशकंदील झळकेल, बाजारपेठेतील गदीला उत्सवाचे नाव मिळेल, पण उजेड वाढला म्हणजे अंधार कमी झाला, असे असते का? घरातल्या रोषणाईने रोजगाराची चिंता मिटते? फटाक्यांच्या आवाजात युद्धाच्या बातम्या विरतात ? शुभेच्छांच्या संदेशांनी कोरड्या विहिरी भरतात ? सण साजरा करू नये, असा याचा अर्थ नाही. उलट, सणाचा आनंद टिकवायचा असेल, तर त्याच्या भोवतालची अस्वस्थता समजून घ्यावी लागेल. दिवाळीचा प्रश्न, किती दिवे लावायचे हा नाही; ते कुठे लावायचे, हा आहे.

आजूबाजूचे जग पाहताना 'अराजक' हा शब्द सहज सुचतो. मात्र, प्रत्येक संघर्षाला अराजक म्हटले, की त्यामागच्या निर्णयांची जबाबदारी धूसर होते. युद्धे आपोआप सुरू होत नाहीत. संवाद आपोआप संपत नाही. अविश्वासालाही खतपाणी घालावे लागते. शत्रूची भीती दाखवून स्वतःचे अपयश झाकणे आणि प्रश्न विचारणाऱ्यालाच संकट ठरवणे, या सोयीच्या राजकारणाची किंमत सामान्य नागरिक मोजतो. रणांगण सीमेवर असले, तरी त्याचा हिशेब घरच्या खर्चात उतरू शकतो.

सातत्याने आव्हानाची भाषा ऐकू येणे, हे सामर्थ्याचेच लक्षण असते काय? प्रत्येक प्रश्नाला इशारा आणि प्रत्येक असहमतीला प्रत्युत्तराची धमकी मिळणार असेल, तर संवाद कुठे उरणार? सत्तेचे काम नागरिकांना सतत लढाईसाठी सज्ज ठेवणे आहे. की त्यांना निर्धास्त जगता येईल अशी व्यवस्था घडवणे? शांततेची मागणी म्हणजे शरणागती नाही. ती निर्णय घेणाऱ्यांकडून परिणामांची जबाबदारी मागण्याची भूमिका आहे.

आर्थिक व्यवहारातही हीच जबाबदारी हवी. विकासाचा दर आणि माणसाच्या जगण्याचा दर्जा यांच्यातले अंतर केवळ घोषणांनी मिटत नाही. कंपनीचा नफा वाढला, म्हणून कर्मचाऱ्याची सुरक्षितता वाढेलच असे नाही. बाजारपेठ फुलली, माणून प्रत्येक घराची क्रयशक्ती वाढली असेही नाही. प्रगती मोजताना उत्पादन, गुंतवणूक आणि संपत्ती यांच्याबरोबर स्थिर रोजगार, परवडणारे शिक्षण आणि उपचारांची उपलब्धता मोजणार आहोत का? की अर्थव्यवस्थेच्या यशाचे अभिनंदन करायचे आणि घरगुती अडचणीचे खापर व्यक्तीच्या अकार्यक्षमतेवर फोडायचे?

तरुणांच्या अस्वस्थतेकडे या संदर्भात पाहावे लागेल. प्रत्येक आंदोलनाचे कारण एकच एक नसते, प्रत्येक घोषणेमागची भूमिका निर्दोषही नसते. तरी प्रश्न विचारणारी पिढी म्हणजे 'बिघडलेली पिढी' हा निष्कर्ष काढणे सोपे आणि घातक आहे. तरुणाला केवळ नोकरी नव्हे, तर स्वतःच्या क्षमतेवर उभे राहण्याची शक्यता हवी असते. त्याला संयम शिकवण्याआधी व्यवस्थेने स्वतःची विश्वासार्हता तपासावी. ऐकून घेणे हा उपकार नाही, सार्वजनिक जबाबदारीचा पहिला धडा आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेने या प्रश्नाला आणखी धार दिली आहे. एआय म्हणजे सर्व नोकऱ्यांचा अंत, हे म्हणणे अतिरंजितः प्रत्येकाला आपोआप अधिक चांगली नोकरी मिळेल, हे म्हणणेही तितकेच बेजबाबदार कामाचे स्वरूप बदलताना काही कौशल्यांची मागणी कमी होऊ शकते, काहींची वाढू शकते. खरी कसोटी त्या बदलाच्या मधल्या काळात आहे. कालपर्यंत उपयोगी असलेले कौशल्य आज अपुरे ठरले, तर संबंधित माणसाने उद्याचा संसार कसा चालवायचा?

'नव्याने शिका' हा सल्ला योग्यः पण शिकण्यासाठी वेळ, पैसा आणि संधी कोण देणार? नोकरी करताना पुनप्रशिक्षण मिळणार का? संस्थेच्या तंत्रज्ञानावरील खर्चात कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाची तरतूद असेल का? नफ्याचा लाभ संस्थेला आणि बदलाची संपूर्ण किंमत कर्मचारी मोजणार, हे गणित न्याय्य कसे? शिक्षणसंस्थांनीही केवळ नव्या अभ्यासक्रमांच्या जाहिराती करण्यापलीकडे जावे. भाषा, चिकित्सक विचार, विषयाचे आकलन आणि तंत्रज्ञानाचा जबाबदार वापर यांची सांगड घालावी. साधन चालवता येणे आणि त्याने दिलेले उत्तर तपासता येणे, यात फरक आहे.



दिवाळीचा दिवा केवळ उंबरठ्यावर नको: निर्णयात, व्यवहारात व नात्यातही हवा. या दिवाळीत एवढेच करू या : उजेडाची वाट पाहण्याऐवजी, एकमेकांना वाट दाखवणारा उजेड होऊ या.

परदेशी गुंतवणुकीकडे पाहतानाही उत्साहाबरोबर हीच चिकित्सा आवश्यक आहे. भांडवलाचे स्वागत हवे; पण त्याच्या आगमनाला रोजगारनिर्मितीचा अंतिम पुरावा समजायचे कारण नाही. उद्योग सुरू झाल्यानंतर स्थानिकांना किती संधी मिळाल्या, लघुउद्योगांना किती काम मिळाले आणि रोजगाराचा दर्जा कसा राहिला, हे विचारावे लागेल. गुंतवणुकीचे मोठे आकडे मथळ्यात मावतात; त्यांचे सामाजिक फलित मात्र तपशीलात सापडते. तो तपशील मागणे म्हणजे विकासाला विरोध नव्हे,



पराग करंदीकर

महाराष्ट्रासाठी ही चर्चा शहरांच्या वेशीवर थांबू शकत नाही. दुष्काळाच्या प्रश्नाकडे केवळ पाऊस कमी पडण्याची घटना म्हणून पाहिले, तर आपले उत्तर टँकरपलीकडे जाणार नाही. पाण्याची उपलब्धता, वापराचे प्राधान्य, पीकपद्धती आणि स्थानिक रोजगार यांचा एकत्र विचार हवा. कोरड्या विहिरीभोवती फक्त शेती अडत नाही; घरचे अर्थकारण, मुलांचे शिक्षण आणि गावात राहण्याची शक्यताही अडते. शहरातील उद्योगाला पाण्याची खात्री देताना गावातील पिण्याच्या पाण्याची खात्री मागे पडत असेल, तर विकासाच्या प्राधान्यांवर प्रश्न विचारायलाच हवा. संकटात तातडीची मदत आवश्यकच. मात्र, मदतीची घोषणा म्हणजे दीर्घकालीन उपाय नाही. जलसंधारणाच्या कामांची गुणवत्ता, उपलब्ध पाण्याचा सार्वजनिक हिशेब आणि वापराचे न्याय्य नियोजन यांना राजकीय सोयीपेक्षा अधिक महत्त्व मिळाले पाहिजे. पाऊस आपल्या हातात नाही; पडलेल्या पावसाचे व्यवस्थापन मात्र पूर्णपणे नशिबावर सोडता येत नाही. दुष्काळ निसर्गाची परीक्षा असेल; त्याला दिलेले उत्तर ही प्रशासनाची आणि समाजाची परीक्षा असते.

मग आपण काय करायचे? हा प्रश्न आवश्यक आहे; पण त्याचे उत्तर देताना सरकार आणि संस्थांची जबाबदारी व्यक्तीवर ढकलू नये. नागरिकाने पाणी वाचवावेच; त्याने गळकी सार्वजनिक व्यवस्था समर्थनीय ठरत नाही. तरुणाने कौशल्य वाढवावेच, त्याने रोजगारधोरणावरील प्रश्न अनावश्यक होत नाहीत. वैयक्तिक प्रयत्न आणि संस्थात्मक उत्तरदायित्व हे पर्याय नाहीत. दोन्ही एकत्र लागतात. आपल्या हातातले करणे आणि ज्यांच्या हातात अधिकार आहेत त्यांच्याकडून कामाचा हिशेब मागणे, ही एकाच जागरूकतेची दोन रूपे आहेत. घरातील तरुणाला त्याच्या पगारावरून न मोजणे, नोकरी गेलेल्या सहकाऱ्याला अपयशी न ठरवणे, वृद्धांच्या काळजीला वेळ देणे, हे साधे प्रारंभ आहेत. कामाच्या ठिकाणी नव्या साधनांचे ज्ञान वाटून घेता येते. परिसरातील पाणीवापराबाबत साथ एक निर्णय घेता येतात. मदत करताना समोरच्याचा स्वाभिमान जपता येतो. मतभेद असलेल्या माणसाचे म्हणणे पूर्ण ऐकता येते. जग बदलण्याच्या मोठ्या भाषणापेक्षा अशी कृती लहान असेल, निरर्थक नक्कीच नाही.

सार्वजनिक आयुष्यातही आपला वाटा आहे. अप्रमाणित संदेश पुढे न पाठवणे, द्वेषाला करमणूक न समजणे आणि प्रश्न विचारणाऱ्याची हेटाळणी न करणे, यातून संवादासाठी जागा तयार होते. प्रत्येक बातमीला संतापाने उत्तर देणे म्हणजे सजगता नाही. काय घडले, त्याचा आधार काय, जबाबदार कोण आणि उपाय कोणता, हे विचारणे अधिक कष्टाचे आहे. पण विवेकाची सवय लागल्याशिवाय भीतीच्या बाजारातून बाहेर पडता येणार नाही. सकारात्मक शेवट हवा म्हणून वास्तवाला सोनेरी मुलामा देण्याचे कारण नाही. आशावादाची कसोटी चांगल्या काळात नसते; अडचणी मान्य करूनही पुढचे पाऊल टाकण्यात असते. गावातील शाळा, स्थानिक महाविद्यालय, उद्योग आणि नागरिक यांनी एकत्र बसून परिसराच्या गरजा ठरवल्या, तर सुरुवात होऊ शकते. कुणाला प्रशिक्षणाची जोड, कुणाला बाजारपेठेची माहिती, कुणाला मार्गदर्शन, तर कुणाला विश्वासाचा आधार हवा असेल. प्रत्येक उत्तर राजधानीतूनच येण्याची वाट पाहावी लागत नाही. स्थानिक पुढाकाराला पारदर्शक व्यवस्था आणि सातत्याची जोड मिळाली, तर प्रयत्नही टिकाऊ बदल घडवू शकतात. त्यासाठी सुरुवात करण्याचे धैर्य आपल्यालाच दाखवावे लागेल.

हे सगळे कधी संपणार, याचे प्रामाणिक उत्तर कुणाकडेही तयार नाही. म्हणून आशा सोडायची? उलट, आशेला घोषणेऐवजी कामाचे स्वरूप देण्याची ही वेळ आहे. गुंतवणुकीला रोजगाराशी, तंत्रज्ञानाला प्रशिक्षणाशी आणि उत्सवाला सामाजिक भानाशी जोडले, तर पुढचा रस्ता तयार होऊ शकतो. आपल्याकडे प्रश्न विचारण्याची बुद्धी, नव्याने शिकण्याची क्षमता आणि एकमेकांना आधार देणारे हात आहेत. ही साधने कमी महत्त्वाची नाहीत. दिवाळीचा दिवा म्हणूनच केवळ उंबरठ्यावर नको निर्णयात, व्यवहारात आणि नात्यातही हवा. आनंद साजरा करू या, पण त्यात दुसऱ्यासाठी जागा ठेवू या. उद्याची चिंता नाकारू नयेः तिला आजच्या तयारीचे कारण बनवावे, अंधार किती मोठा आहे याची मोजदाद आवश्यक आहे, पण आपली नजर तिथेच थांबण्याची गरज नाही. आपल्या हातातल्या ज्योतीने दुसऱ्याच्या दिव्याला स्पर्श केला तर पहिल्या दिव्याचा उजेड कमी होत नाही. वाढते ती दिसणाऱ्या वाटेची लांबी. या दिवाळीत एवढेच करू या उजेडाची वाट पाहण्याऐवजी, एकमेकांना वाट दाखवणारा उजेड होऊ या.(साभार-म.टा.)

दीप

ज्ञानदेवे ज्ञानेश्वरीरूपी,
विवेकाचा लाविला दीप;
अज्ञानाच्या अंधकारातून,
ज्ञानरूपी उजळला दीप..

नामदेव रंगले कीर्तनी,
माय चंद्रभागेच्या तिरी;
भागवत धर्मपताकेचा,
भक्तिमय तेजाळला दीप..

सावता फुलवी भक्तीचा मळा,
कामात विठ्ठलनामाचा गजर;
माय-मातीच्या सेवेचा,
चिरंतन लावला दीप..

एकनाथांच्या भारुडाने,
प्रबोधनाचा चाले जागर;
समता आणि मानवतेचा,
उजळला ज्ञानदीप..

तुकोबांची 'वृक्षवल्ली सोयरी',
सृष्टीच्या अस्तित्वाची महती;
प्रत्येकासही वेदांचा हक्क सांगून,
माणुसकीचा उजळला दीप..

माँ जिजाऊंच्या पोटी रत्न शिवबा
अठरा पगड एकजूट करून;
मराठी मुलुख वाचवण्या,
हिंदवी स्वराज्याचा लाविला दीप..

गाडगेबाबांनी हाती घेतला खराटा,
स्वच्छता-समृद्धीचा दिला मूलमंत्र;
देव भेटेल मानवसेवेच्या व्रतातून,
देवकीनंदनरूपी लाविला तेजदीप..

तुकडोजींच्या खंजिरीने केला
अंधश्रद्धा निर्मूलन विचार खेडोपाडी
'ग्रामगिता' मधून जनलोकासाठी
ग्रामसंस्कृतीचा लाविला समृद्धी दीप

विठ्ठल वळसे पाटील
पुणे,मो.८४८४०६६०४२

दादा,यंदा तरी मला...

दादा,यंदा तरी मला
सांग,दिवाळी सणाला
आपुलकीने माहेरी
घ्यायला तू येशील
का?।।धृ।।

नको मला साडी-चोळी,
नको दिवाळीचा फराळ;
भाऊबीजेला वेळ काढून
ओवाळून तू घेशील
का?।।१।।

थोडासा वेळ काढून,
हसून-खेळून गप्पा मारून;
आस्थेने दोन शब्द बोलून
विचारपूस तू करशील
का?।।२।।

लहानपणीचे रुसवे
विसरून,
नात्यात आठवणींचा
गोडवा;
दिवाळीच्या या मंगल
सणात
पुन्हा एकदा आणशील
का?।।३।।

असलो आम्ही सुखात,
अथवा असलो दुःखात;
तरी सांग, प्रत्येक
दिवाळीला
आपले मानून येशील
का?।।४।।

नको आम्हाला
दिवाळीभेट,
भेटीपेक्षाही, दादा मला;
आपल्या रक्ताचे प्रेमळ
नाते
सदा सांभाळून राखशील
का?।।५।।

नको कसलाही अहंकार,
नको मनामध्ये दुरावा;
बहीण-भावाच्या या
प्रेमाचा,
ठेवा आयुष्यभर जपशील
का?।।६।।

अलका भवारी - कोंढवळे
मो.९०११९४३८९०

दिवाळी सण

दिवाळीच्या दिवसात
दिवे लावू या घरात
रांगोळ्या ही काढूयात
लक्ष्मी येणार घरात

सहा दिवसांचा सण
आनंदून जाय मन
पहिला आला जो दिवस
हाची जो वसुबारस

झाले समुद्र मंथन
त्रयोदशी आले धन
अमृत कलश देत
धन्वंतरी देव वैद्य

चतुर्दशीचे दिवशी
नर्कासुर वध होई
असत्यावरी सत्याचा
विजय होई तो धर्माचा

दिवस अमावस्येचा
गजलक्ष्मी पुजनाचा
धनवैभव पुजेचा
लक्ष्मी विष्णू अद्वैताचा

प्रतिपदा ही शोभली
दानशूर राजा बली
भगिनी हो महालक्ष्मी
यमा भगिनी यमुनामाई

दिसता ही चंद्रबीज
बंधूभगिनीचा हा सण
ओवाळीते भाऊराया
बहीण हृदयी तुकडा

आनंदी दिवाळी सण
सजवा रांगोळ्या छान
आप्तस्वकीयांच्या भेटी
ऊर भरे सर्वां ठाई

आठवले घर जुने
कौलारू विटा मातिचे
आई बाबा होते जवळी
तेव्हा 'मनवा'ची दिवाळी

'स्वरचैतन्य' **डॉ. मिलिंद इंदूरकर** (मनवा)
मो.९५५२६०७६४६

दिवाळी

अमावस्येच्या अंधारात
प्रकाशाचा एक ध्यास
दिवाळी सण असतो
सर्वांसाठी असा खास

पणत्यांची केली जाते
घरीदारी चौफेर आरास
दारास बांधूनी तोरण
लक्ष्मी माता येई घरास

घरभर दरवळत राहतो
फराळाचा मंद मद सुवास
मंगल चैतन्यासह वाढे
आनंदाची महत्तम रास

भेटीगाठी जुळून येई सणा
कडवडपणाचा होई-हास
जळमटे काढुन मनावरची
मिळते नात्यांना नवा श्वास

एकमेकां सवे भरवुनी
आनंदाचा गोड घास
सुखकर करून घेऊया
दिवाळसणाचा प्रवास

राजश्री खाजोने
चांदूरबाजार
मो.९६६५६८०६३९



..तर श्रीलक्ष्मी आपल्या घरीही निरंतर वास करेल !

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी व्यापाऱ्यांची कार्यालये, कारखाने, दुकाने यांसह प्रत्येकाच्या घरी लक्ष्मीपूजन केले जाते. श्रीलक्ष्मीचा वास आपल्या घरी सदैव राहावा असे प्रत्येकाला वाटत असते. मात्र लक्ष्मी कोणाच्या घरी वास्तव्य करते ? कार्तिक अमावास्येच्या रात्री लक्ष्मी सर्वत्र संचार करते असा शास्त्रसंकेत आहे. रात्री संचार करून ती आपल्या निवासासाठी योग्य असे स्थान शोधू लागते. जेथे चारित्र्यवान, कर्तव्यदक्ष, संयमी, धर्मनिष्ठ, देवभक्त आणि क्षमाशील पुरुष आणि गुणवती आणि पतिव्रता स्त्रिया असतात, त्या घरी वास्तव्य करणे लक्ष्मीला आवडते. त्यामुळे लक्ष्मीचा वास आपल्या घरी असावा असे वाटणाऱ्यांनी आपल्यामध्ये उपरोक्त गुण आणण्यासाठी आणि आपली वर्तणूक सुधारण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे असते.



सद्यस्थितीला समाजातील नैतिकता रसातळाला गेली आहे. स्वार्थांधता वाढली आहे. गल्लीपासून दिल्लीपर्यंत भ्रष्टाचार बोकाळला आहे. गल्लीतल्या भाजीवाल्यापासून दिल्लीतल्या मंत्र्यांपर्यंत प्रत्येक जण इतरांना फसवून आपला स्वार्थ साधत आहेत. विज्ञानाच्या प्रगतीमुळे आपले राहणीमान सुधारले असले तरी नीतिमत्ता कमालीची घसरली आहे हे कुणीही अमान्य करणार नाही. असे असले तरी आजमितीला जसा चरित्र्यवान आणि सत्वशील माणसांच्या घरी लक्ष्मीचा वास दिसतो तसा इतरांना लुबाडून किंवा गैर मार्गाने धन कमावून श्रीमंत झालेल्यांच्या घरीही लक्ष्मीचे अर्थात धन संपत्तीचे वास्तव्य दिसते. हा दुजाभाव कसा? याचे उत्तर अध्यात्मात सापडते. अध्यात्मानुसार आपण कोणाच्या घरी जन्म घ्यावा हे आपल्या मागील जन्माच्या कर्मावरून ठरते. ज्या मुहूर्तावर एखाद्या धनदांडग्या उद्योगपतीच्या घरी मूल जन्माला येते त्याच मुहूर्तावर एखाद्या झोपडीतही बाळ जन्म घेते. जन्मवेळ आणि जन्मदिनांक सारखी असली तरी दोघांचे मागच्या जन्मीचे कर्म वेगवेगळे असल्याने दोघांचे प्रारब्ध भिन्न असते. त्यामुळे त्यांच्या नशिबी येणारे सुख दुःखही निरनिराळे असणार आहेत. पुढील आयुष्यातही दोघांच्या नशिबी येणारे चांगले वाईट भोग हे वेगवेगळेच असतील. या जन्मात दुष्कृत्य करूनही जर एखाद्याला संपत्ती प्राप्त होत असेल तर ते त्याचे मागच्या जन्मीचे पुण्यसंचय असून दुष्कर्माने ते तो संपवत आहे.

प्रत्येकाच्या नशिबी जसे प्रारब्ध असते तसे त्याच्या हाती क्रियमानही असते. क्रियमानाचा योग्य वापर केल्यास मनुष्य या जन्मातही हवे ते प्राप्त करू शकतो.क्रियमाणाचा वापर आपले सत्वशील चारित्र्य घडवण्यासाठी केल्यास, भगवंताने मनुष्यजन्म देऊन दिलेल्या कर्तव्यांचे धर्म आणि नीती यांचा वापर करून योग्यरीत्या पालन केल्यास. कठीण प्रसंगांत दोषांवर नियंत्रण ठेवून संयम दाखवल्यास, इतरांचा विचार प्राधान्याने करून धर्माने वागल्यास आणि अंगी क्षमाशील वृत्ती जोपासल्यास आपल्याही कर्मांना भगवंत नक्कीच चांगले फळ देईल आणि आपल्याही घरी लक्ष्मीचा सदैव वास राहील. अर्थात लक्ष्मी म्हणजे केवळ धनसंपत्ती नव्हे तर सुख, समाधान आणि शांती ही सुद्धा लक्ष्मीचीच रूपे आहेत. जीवनात आपली कर्मे चांगली असतील तर लक्ष्मी कोणत्याना कोणत्या रूपाने आपल्या घरी नक्कीच वास करते. यंदाच्या लक्ष्मीपूजनाला आपल्याला चारित्र्यवान, धर्मनिष्ठ आणि क्षमाशील बनवण्यासाठी देवीच्याच चरणी प्रार्थना करूया!

मोक्षदा घाणेकर

जनमाध्यम

Epaper www.janmadhyam.com रविवार, ८ नोव्हेंबर २०२६ एक प्रतिष्ठित सवय

दिवाळीतला अभ्यास

दिवाळीची सुट्टी म्हणजे विद्यार्थ्यांसाठी मनोरंजनाची पर्वणी असते. मात्र, या आनंदात अभ्यासाकडे दुर्लक्ष होऊ नये, यासाठी विद्यार्थ्यांनी सुट्टीचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे. अपुरा राहिलेला अभ्यास पूर्ण करणे आणि कुटुंबासोबत हा आनंद घेताना पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करणे यांचा समतोल साधल्यास ही सुट्टी विद्यार्थ्यांसाठी आनंददायी आणि उपयुक्त ठरू शकते.

रविंद्र ताबे

महाराष्ट्र राज्यामधील जिल्हानिहाय दिवाळीच्या सुट्टीच्या तारखा जाहीर झाल्या असल्या तरी विद्यार्थ्यांनी दिवाळीच्या सुट्टीचा आनंद घेताना अभ्यासाचे नियोजन करणे अतिशय महत्त्वाचे आहे. तेव्हा विद्यार्थ्यांनी आपल्या भविष्याचा विचार करून दिवाळीची सुट्टी वाया न घालविता अपुरा राहिलेला अभ्यास पूर्ण करून अभ्यासासाठी सुट्टीचा योग्य वापर करावा. यातच विद्यार्थ्यांचे भवितव्य आहे. अपुरा राहिलेला अभ्यास पूर्ण केल्याने त्यांच्या मनावरील ताण कमी होण्यास मदत होणार आहे. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक किंवा विविध पदवी संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी दिवाळीच्या सुट्टीचा योग्य प्रकारे अभ्यासासाठी उपयोग करायला हवा. दिवाळीची सुट्टी विद्यार्थ्यां अधिक महत्त्वाची असते. जर अभ्यास अपुरा असेल तर तो पूर्ण करण्याची संधी या सुट्टीमुळे विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

जवळजवळ ३० वर्षांपूर्वी ग्रामीण भागातील पालक आपल्या मुलांना शाळेतील शिकवणी पुरेशी नाही आणि आपली मुले अभियंता किंवा डॉक्टर व्हावीत, या उद्देशाने दिवाळीच्या सुट्टीत शहरातील एखाद्या खासगी क्लासमध्ये घालायचे. तेव्हा कधी एकदा दिवाळीची सुट्टी मुलांना पडते आणि खासगी क्लासला मुलांना पाठवतो, असे पालकांना वाटत असे. त्याआधी क्लासची पूर्ण फी पालक भरायचे.

त्यानंतर दिवाळीची सुट्टी लक्षात घेऊन पालकांना सुट्टीतील वेळापत्रक देऊन खासगी क्लासवाले मुलांची तयारी करून घ्यायचे. यामध्ये इंग्रजी आणि गणित विषयाची अधिक तयारी करून घेतली जात असे. त्यासाठी कोंडवाड्यात गुरांना जसे कोंडून ठेवले जाते, तसे खासगी क्लासवाले चार भिंतींच्या आत थंडगार कोंडवाड्यासारख्या वातावरणात मुलांची तयारी करून घ्यायचे. त्यासाठी रूम भाड्याने घेऊन किंवा आपल्या जवळच्या नातेवाइकांकडे मुलांच्या राहण्याची सोय पालक करत असत. त्यामुळे त्यांची दिवाळी खासगी क्लासमध्येच व्हायची. याचा परिणाम म्हणून अनेक विद्यार्थ्यांनी चांगले गुण संपादन केले आहेत. आजच्या परिस्थितीचा अभ्यास करता विद्यार्थ्यांनी दिवाळीची सुट्टी मजा करण्यात घालवू नये. बऱ्याच वेळा दिवाळी वर्षातून एकदाच येते, असे विद्यार्थ्यांना वाटत असते. तेव्हा दिवाळी उत्सवानिमित्ताने मजा केली तर काय झाले, असे त्यांना वाटते. बऱ्याच वेळा घराची साफसफाई करण्यात येते. घराच्या अंगणात रांगोळी काढून दाराला तोरण लावले जाते. घराच्या दारासमोर दिवे लावले जातात. सकाळी व संध्याकाळी फटाके वाजवले जातात. विविध प्रकारचे गोड पदार्थ खाल्ले जातात. तसेच नातेवाइकांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या जातात. त्यामुळे दिवाळीची सुट्टी केव्हा संपते, हे कळतसुद्धा नाही. त्याऐवजी विद्यार्थ्यांनी अपुरा अभ्यास पूर्ण केल्यास बरे होईल. दिवाळीच्या सुट्टीत मनोरंजन करीत असतानासुद्धा अभ्यासाकडे दुर्लक्ष होणार नाही, याची काळजी त्यांनी घ्यावी. म्हणजे सुट्टीच्या कालावधीत अभ्यासाचे नियोजन करून अभ्यास केल्यास परीक्षेच्या वेळी दडपण येणार नाही. तसेच फावल्या वेळात इतर विषयांचे वाचन करावे. यातून अधिक अभ्यास करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळेल.



अनेक विद्यार्थी सुट्टीचा उपयोग अभ्यास करण्यासाठी करतात. कारण एकदा गेलेली वेळ परत येत नाही. वेळ ही मौल्यवान असते. ज्याला वेळेचे मूल्य समजते, तो जीवनात यशस्वी होतो. सुट्टीत विद्यार्थ्यांनी अभ्यासाचा आनंद घेतल्यास त्यांना अधिक आनंद मिळेल. तेव्हा शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना कितीही सुट्ट्या मिळाल्या असल्या तरी त्यांनी अभ्यासाकडे आपले लक्ष केंद्रित करावे. विद्यार्थ्यांना दिवाळीच्या सुट्टीत मजा करावी, असे जरी वाटत असले तरी आपला अभ्यासक्रम लक्षात घेऊन संबंधित विषयांची उजळणी करावी आणि आपल्या माहितीसाठी संक्षिप्त नोट्स तयार कराव्यात. जेणेकरून अभ्यास करणे सोपे जाईल. त्याचप्रमाणे आपल्याला जास्तीत जास्त गुण कसे संपादन करता येतील, त्या अनुषंगाने प्रयत्न करावेत. म्हणजे आपली गुणवत्ता सुधारण्यास मदत होते. महत्त्वाची बाब म्हणजे, वेळच्या वेळी अभ्यास केल्याने परीक्षेच्या वेळी दडपण येत नाही. दिवाळीच्या सुट्टीत अभ्यास जरी केला तरी तोंडी परीक्षा किंवा अभ्यासदौरा केला असेल तर त्याचा अहवाल तयार करावा लागतो. तेव्हा अशा गोष्टींकडेसुद्धा दुर्लक्ष करू नये.

अभ्यासाबरोबरच आई-वडिलांना घरगुती कामासाठी मदत करावी. दिवाळी उत्सवाचे महत्त्व समजून घ्यावे. त्या उत्सवाच्या अनुषंगाने आपणसुद्धा उत्सवात सहभाग घ्यावा. जेणेकरून त्याचे महत्त्व समजण्यास मदत होते. उत्सवात सहभाग घेतल्यामुळे स्वतःला आनंद मिळतो. त्यामुळे आपण पर्यावरणाची काळजी घेत पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करतो. याचा अर्थ हवेतील प्रदूषण रोखण्यासाठी एक प्रकारे मदत करीत असतो. त्यामुळे अभ्यास करण्यासाठीही विद्यार्थ्यांचा उत्साह वाढतो. यामध्ये विविध पदार्थ बनविण्याचा आनंद मिळतो. अभ्यासाबरोबर आपल्या आवडीच्या गोष्टी शिकता येतात. आपल्या कुटुंबाच्या सान्निध्यात राहता येते. सर्वजण एकत्र आल्याने जुन्या आठवणींना उजाळा मिळतो. नवीन गोष्टी शिकता येतात. तेव्हा कधी एकदा दिवाळीची सुट्टी पडते आणि मौज, मजा व मस्ती करतो, असे विद्यार्थ्यांना वाटत असते. याला अपवाद असतात ते ग्रामीण भागातील विद्यार्थी. त्यांची दिवाळीची सुट्टी भातकापणीत जात असते. त्यात काही विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने ते आपल्या आई-वडिलांना कामकाजात मदत करून अभ्यासाच्या प्रत्येक दिवसाचे नियोजन करतात. कारण त्यांना आपल्या परिस्थितीची जाणीव असते. तेव्हा विद्यार्थ्यांनी आपल्या भविष्याचा विचार करून दिवाळीच्या सुट्टीचा उपयोग अभ्यासासाठी करावा. त्यासाठी त्यांना आपल्या जिल्ह्यातील दिवाळीच्या सुट्टीचा कालावधी लक्षात घेऊन अभ्यासाचे नियोजन करावे लागेल.

नरक चतुर्दशीचे महत्त्व

दिवाळीच्या उत्सवात 'नरक चतुर्दशी' (छोटी दिवाळी/अभ्यंगस्नानाचा दिवस) या सणाला विशेष स्थान आहे. हा दिवस वाईटावर चांगल्याच्या विजयाचा आणि मनातील नकारात्मकता दूर करून नवीन ऊर्जेने जगण्याचा संदेश देतो.या दिवसाचा संबंध भगवान श्रीकृष्ण आणि सत्यभामा यांच्याशी जोडलेला आहे. प्राग्ज्योतिषपूरचा राजा नरकासूर अत्यंत जुलमी आणि असुर प्रवृत्तीचा होता. त्याने देव, ऋषी-मुनी आणि सामान्य लोकांना त्रस्त केले होते तसेच १६,००० राजकन्यांना कैदेत डांबले होते. भगवान श्रीकृष्णांनी युद्धामध्ये नरकासुराचा वध करून त्या सर्व स्त्रियांची सुटका केली. त्यानंतर श्रीकृष्णाने त्या सर्व स्त्रियांचा स्वीकार करून त्यांना राजवाड्यात राणीचा दर्जा दिला. मृत्यूपूर्वी नरकासुराने वर मागितला की, या दिवशी जो कोणी अभ्यंगस्नान करेल त्याला नरकयातना मिळणार नाहीत. तेव्हापासून हा दिवस 'नरक चतुर्दशी' म्हणून साजरा होऊ लागला.



नरक चतुर्दशीच्या दिवशी सूर्योदयापूर्वी उठून अंगाला सुगंधी तेल आणि उटणे लावून कोमट पाण्याने अभ्यंगस्नान केले जाते. स्नानानंतर नवीन कपडे परिधान करून घरातील लहानांचे औक्षण केले जाते आणि संपूर्ण कुटुंब एकत्र येऊन दिवाळीच्या फराळाचा आनंद घेते.नरक चतुर्दशी हा दिवस मनातील आळस आणि नकारात्मकता काढून टाकून आयुष्यात प्रकाशाचे स्वागत करण्याचा आणि सण आनंदाने साजरा करण्याचा दिवस आहे.

वर्षा आवदे
नागपूर

घरात होईल सुख-समृद्धीचे आगमन...

घरात सकारात्मक वातावरण आणि सुख-शांती टिकून राहावी, यासाठी भारतीय संस्कृतीत अनेक पारंपरिक प्रथा सांगितल्या आहेत. मुख्य दरवाजावर दिवा लावण्यापासून ते अन्नदान करण्यापर्यंतच्या या उपायांना धार्मिकदृष्ट्या विशेष महत्त्व आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये सण-उत्सव आणि शुभप्रसंगी घराची स्वच्छता, पूजा-अर्चा आणि विविध धार्मिक परंपरांना विशेष महत्त्व दिले जाते. घरात सुख-समृद्धी नांदावी, कुटुंबात आनंदाचे वातावरण राहावे आणि सकारात्मकता टिकून राहावी, यासाठी अनेक पारंपरिक उपाय केले जातात. विशेषतः धनत्रयोदशी आणि दिवाळीसारख्या सणांमध्ये घराच्या मुख्य दरवाजाची सजावट, दिवे लावणे आणि रांगोळी काढणे अशा प्रथा आवर्जून पाळल्या जातात.

धार्मिक मान्यतेनुसार, या परंपरांचा संबंध देवी लक्ष्मीच्या आगमनाशी जोडला जातो. तुम्हालाही घरात आनंदी आणि प्रसन्न वातावरण हवे असेल, तर जाणून घ्या अशाच सहा पारंपरिक उपायांविषयी...

१. घराच्या मुख्य दरवाजावर लावा दिवा : घराच्या मुख्य प्रवेशद्वाराला धार्मिकदृष्ट्या विशेष महत्त्व आहे. मुख्य दरवाजा हा देवी लक्ष्मीच्या आगमनाचा मार्ग मानला जातो. त्यामुळे संध्याकाळच्या वेळी मुख्य दरवाजाजवळ दिवा लावण्याची परंपरा आहे. धार्मिक मान्यतेनुसार, तुपाचा किंवा तिळाच्या तेलाचा दिवा लावणे शुभ मानले जाते. यासोबतच प्रवेशद्वार स्वच्छ आणि नीटनेटके ठेवण्याचीही प्रथा आहे.

२. बांबूच्या सुपाला बडवण्याची परंपरा : काही भागांमध्ये बांबूच्या सुपाला बडवण्याची पारंपरिक प्रथा आजही पाहायला मिळते. लोकमान्यतेनुसार, असे केल्याने घरातील दारिद्र्य आणि नकारात्मकता दूर होते. जुन्या अडचणी मागे सोडून नव्या आनंदी काळाचे स्वागत करण्याचे प्रतीक म्हणूनही या प्रथेकडे पाहिले जाते. विशेषतः ग्रामीण भागात काही धार्मिक प्रसंगी ही परंपरा पाळली जाते.

३. घराच्या प्रवेशद्वारावर काढा सुंदर रांगोळी : भारतीय परंपरेत रांगोळीला शुभत्व आणि मांगल्याचे प्रतीक मानले जाते. सण-उत्सवांच्या काळात घराच्या उंबरठ्यावर सुंदर रांगोळी काढण्याची प्रथा आहे. नैसर्गिक रंगांचा वापर करून विविध आकर्षक नक्षी, स्वस्तिक किंवा इतर शुभचिन्हे काढली जातात. धार्मिक मान्यतेनुसार, रांगोळी ही आनंद आणि सकारात्मकतेच्या स्वागताचे प्रतीक मानली जाते.

४. नियमित करा तुळशीची पूजा : हिंदू धर्मात तुळशीच्या रोपाला अत्यंत पवित्र मानले जाते. अनेक घरांमध्ये तुळशी वृंदावन असते आणि दररोज तुळशीची पूजा केली जाते. संध्याकाळच्या वेळी तुळशीजवळ तुपाचा दिवा लावण्याचीही परंपरा आहे. धार्मिक मान्यतेनुसार, तुळशीची नियमित पूजा केल्याने घरात सुख-शांती नांदते. तुळशीच्या रोपाची योग्य काळजी घेणे आणि परिसर स्वच्छ ठेवणेही महत्त्वाचे आहे.

५. गरजूंना अन्न आणि वस्त्रांचे दान करा : भारतीय संस्कृतीत दानधर्माला विशेष महत्त्व दिले जाते. आपल्या क्षमतेनुसार गरजू व्यक्तींना अन्नधान्य, कपडे किंवा इतर आवश्यक वस्तूंचे दान करण्याची परंपरा आहे. विशेष सण-उत्सवांच्या काळात तांदूळ, गहू यांसारख्या धान्यांचे दान केले जाते. गरजू व्यक्तींना भोजन देणे हेदेखील सेवाभावाचे एक महत्त्वाचे.



दिवाळी..आनंद द्विगुणित करणारा सण

दिवाळीला भारतीय अर्थव्यवस्थेचे 'विकासाचे इंजिन' मानले जाते. वर्षभर चालणाऱ्या खरेदी-विक्रीच्या तुलनेत, दिवाळीच्या काळात होणारे चढ-उतार देशांतर्गत बाजाराला प्रचंड गती देतात. हा काळ लहान किराणा दुकानदारांपासून ते मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांपर्यंत सर्वांसाठी चांगला असतो. दिवाळीत खरेदी केलेले कपडे, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वाहने, स्थावर मालमत्ता आणि गृहसजावटीच्या वस्तू मोठ्या प्रमाणात सोने, चांदी आणि हिऱ्यांसारख्या मौल्यवान धातूंपासून बनवलेल्या असतात. 'कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स' नुसार, दरवर्षी दिवाळीच्या काळात देशपातळीवर कोट्यवधी रुपयांचा चढ-उतार होतो. यामुळे उत्पादन क्षेत्राला नवी चालना मिळते, नवीन उत्पादनांची मागणी वाढते आणि वाहतूक, पॅकेजिंग यांसारख्या संबंधित क्षेत्रांमध्ये रोजगार निर्माण होतो. किंवा मालमत्तेचे विकेंद्रीकरण ही सर्वात सुंदर आर्थिक रचना आहे. केवळ मॉल्स किंवा ई-कॉमर्स कंपन्यांमध्येच नव्हे, तर रस्त्यांवर मातीची भांडी, आगपेट्या, आकाशातील मेणबत्त्या, रांगोळीचे रंग, फुले विकणाऱ्या छोट्या कारागिरांना आणि विक्रेत्यांनाही बेरोजगारीच्या काळात काम मिळते. याच काळात शेतकऱ्यांची नवी पिढी बाजारात जाते.त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत तरलता येते.

अशाप्रकारे, दिवाळी बाजारात अभूतपूर्व उत्साह आणि जागरूकता निर्माण करते आणि संपूर्ण देशाला आर्थिक गती देते.

दिवाळीचा खरा आनंद केवळ घर सजवण्यात आणि संपत्ती वाढवण्यात नाही. आपल्या घरात आनंद साजरा केल्याने समाजातील उपेक्षित आणि दुर्बळ घटकांच्या जीवनात कसा प्रकाश येऊ शकतो, याचा विचार करणे हा भारतीय संस्कृतीचा एक मूलभूत घटक आहे. दिवाळीच्या शेवटी 'सर्वे भवन्तु सुखिनः' ही भावना थेट प्रतिबिंबित झाली पाहिजे. या काळात, तुम्ही खरेदी करत असलेली मातीची भांडी, झुंबर किंवा मातीच्या वस्तू बनवणाऱ्या कुंभार आणि कारागिरांच्या मेहनतीला पाठिंबा देणे हे तुमचे कर्तव्य आहे. रस्त्यावर बसून लहानसहान वस्तू विकणाऱ्या आणि आदराने घासाघीस न करणाऱ्या लोकांना अन्नदान करणे हीच खरी दिवाळी आहे. या निमित्ताने, अनाथाश्रम, वृद्धाश्रम, कामगार किंवा घरगुती मदतनीस यांना भेटवस्तू, कपडे किंवा आर्थिक मदत देऊन म्हणजेच लक्ष्मीची पूजा करून त्यांचे चेहरे आनंदी करा. ज्या दिवशी एखादा गरीब माणूस आपल्या कुटुंबासोबत एका साध्या झोपडीत राहतो, तोच दिवस दिवाळीला खरा अर्थ देतो. वाटल्याने आनंद द्विगुणित होतो आणि दिवाळी हा त्याचा सर्वात मोठा भाग असतो. गेल्या काही दशकांत, शहरीकरण, जागतिकीकरण आणि बदललेल्या जीवनशैलीमुळे आपल्या पारंपरिक स्वरूप बदलले आहे.



जनमाध्यम

E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

रविवार, ८ नोव्हेंबर २०२६

एक प्रतिष्ठित सवय

दीपावलीच्या
घाटंजी तालुक्यातील समस्त
ग्राहकांना हार्दिक शुभेच्छा !
शुभ
दीपावली
च्या हार्दिक शुभेच्छा !
सुरक्षित ऊर्जा...
समृद्ध घर...
शुभेच्छुक :-
लखमाई इंडेन गॅस एजन्सी
प्रोफेसर कॉलनी घाटंजी
प्रो. प्रा. सौ. कल्पना माहुरे
मा. श्री.गजानन राऊत
शाखा व्यवस्थापक

दीपावलीनिमित्त
आपणास व आपल्या परिवारास
हार्दिक शुभेच्छा..!
सुख, समृद्धी, आरोग्य आणि
आनंदाची कायमच साथ लाभो,
हीच मन:पूर्वक इच्छा..!
शुभेच्छुक :-
सौ. वर्षाताई नरेश पेंदोर
तालुका अध्यक्षा भाजपा महिला आघाडी घाटंजी

दीपावलीच्या
समस्त नागरिकांना
हार्दिक शुभेच्छा !
शुभ
दीपावली
दिव्यांच्या प्रकाशाने आपल्या जीवनात
आनंद, समाधान, आरोग्य आणि
सुख-समृद्धीची भरभराट होवो,
हीच सदीच्छा !
शुभेच्छुक :-
श्री. संजय पडलवार
श्री. वसंत जाधव
श्री. राजेश विठाळकर
श्री. देवेंद्र कावळे
श्री. गजानन मडावी
श्री. संदीप राऊत

समस्त नागरिकांना
दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा...
दीपावलीच्या या पावन पर्वावर
आपल्या आणि आपल्या परिवाराच्या
जीवनात आनंद, सुख, समृद्धी आणि
सर्वत्र मंगलमयता नांदो, हीच सदिच्छा!
शुभेच्छुक :-
मा. श्री विनयभाऊ जाधव
तालुका महामंत्री भाजपा घाटंजी

दीपावलीनिमित्त
आपणास व आपल्या परिवारास
हार्दिक
शुभेच्छा...
शुभ दीपावलीच्या या मंगलमय पर्वावर
आपल्या आयुष्यात सुख, समृद्धी, आनंद
आणि सकारात्मकतेचा प्रकाश सदैव राहो,
हीच सदिच्छा !
शुभेच्छुक :-
मा. श्री चेतनभाऊ जाधव
जिल्हा उपाध्यक्ष भाजपा युवा मोर्चा यवतमाळ

समस्त नागरिकांना
दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा...
दीपावलीच्या या पावन पर्वावर
आपल्या आणि आपल्या परिवाराच्या
जीवनात आनंद, सुख, समृद्धी आणि
सर्वत्र मंगलमयता नांदो, हीच सदिच्छा !
शुभेच्छुक :-
मा. श्री अंबादासभाऊ मेश्राम
सामाजिक कार्यकर्ता तथा
जिल्हा परिषद शिक्षणी गण

दीपावलीनिमित
आपणास व आपल्या परिवारास
हार्दिक
शुभेच्छा
आपल्या घरी सुख, समृद्धी,
आरोग्य, आनंद आणि
भरभराटी येवो, हीच सदिच्छा !
सुखसमृद्धीची
भरभराट लाभो...
शुभेच्छुक :-
सौ.वेदिका रितेश बोबडे
शिरोली पंचायत समिती गण
घाटंजी

आपणास व आपल्या परिवारास
दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा..
दीपोत्सवाच्या मंगलमय पर्वावर
आपल्या जीवनात सुख, शांती,
आरोग्य आणि समृद्धी नांदो!
शुभेच्छुक :-
मा. श्री आकाश भाऊ राठोड
जिल्हाध्यक्ष युवा सेना यवतमाळ

दीपावलीनिमित्त
आपणास व आपल्या
परिवारास
होर्दिक
शुभेच्छा..!
सुख, समृद्धी, आरोग्य आणि
आनंदाची कायमच साथ लाभो,
हीच मन:पूर्वक इच्छा..!
शुभेच्छुक :-
मा. श्री बाळुभाऊ जाधव
सहअध्यक्ष क्षेत्रस्तरीय समिती
(मुख्यमंत्री बळीराजा शेत पांनद रस्ता आणी विधानसभा)

आपणास व आपल्या परिवारास
दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा..
दीपोत्सवाच्या मंगलमय पर्वावर
आपल्या जीवनात सुख, शांती,
आरोग्य आणि समृद्धी नांदो!
शुभेच्छुक :-
मा. श्री आकाश भाऊ राठोड
जिल्हाध्यक्ष युवा सेना यवतमाळ

कै. बाळासाहेब पांडे
नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित
KBPNSP
* उपलब्ध सुविधा *
मासिक ठेव
मुदत ठेव योजना
दाम दुप्पट ठेव
आवर्त ठेव योजना
वैयक्तिक कर्ज
गृह कर्ज
सोने तारण कर्ज
लॉकर सुविधा
सर्व सभासदांना
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा
अभ्यासिका
विदर्भस्तरीय पुरस्कार द्वारा विदर्भ क्रेडीट फेडरेशन, अमरावती
जिल्हास्तरीय पुरस्कार द्वारा यवतमाळ जिल्हा फेडरेशन, यवतमाळ

पुसद तालुक्यातील सर्व नागरिकांना
दिवाळीच्या मंगलमय
हार्दिक शुभेच्छा..
शुभेच्छूक
मा.मज़हर खान ताहेर खान
आरोग्य सभापती नगरपरिषद पुसद.

उपहार
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा!
संस्थेचे कार्यक्षेत्र -संपूर्ण महाराष्ट्र
वणी(शहर),मारेगाव,मुकुटबन,घाटंजी,वरोरा,
गडचांदूर,चंद्रपूर,राजुरा,मूल,भद्रावती,चिमूर,
पवतमाळआर्णी,ब्रम्हपुरी,वणी(ग्रामीण)
वडसा,नेर,हिंगणघाट,गडचिरोली,गोंडपिपरी,वर्धा
मुदत ठेवीवर आकर्षक व्याजदर
कालावधी | सामान्यसाठी | महिला/जेष्ठ नागरिक
७ ते ४५ दिवस | 3% | 3%
४६ ते ९० दिवस | 4% | 4%
९१ ते १८० दिवस | 5% | 5%
१८१ ते २७० दिवस | 6% | 6%
२७१ ते ३६४ दिवस | 7.50% | 7.50%
३६५ ते ७३० दिवस | 8% | 8.50%
७३१ दिवसाच्यावर | 8.50% | 9%
दाम दुप्पट योजना
फक्त ९० महिन्यांमध्ये दाम दुप्पट
एम आय एस स्कीम :-
मिळवा १०००००/- मुदत ठेवीवर
७५०/- मासिक व्याजदर
किमान २ वर्षे
सोनेतारण कर्ज योजना
१० ग्राम सोन्यावर
११८००० /-
गोल्ड लोन
संचालक मंडळ
३८ वर्षांचा विश्वास
अॅड. देविदास काळे अध्यक्ष
श्री. विवेकानंद मांडवकर उपाध्यक्ष
डॉ.भुपालराव पिपळशेंडे -संचालक
श्री. हरीशंकर पांडे संचालक
श्री. रमेश भोंगळे संचालक
श्री. सुरेश बरडे संचालक
श्री. सुधिर दामले संचालक
अॅड.घनश्याम निखाडे संचालक
श्री. परीक्षीत एकरे संचालक
श्री. चिंतामण आगलावे संचालक
श्री. पुरूशोत्तम बद्दमवार संचालक
श्री. उदय शापुरे संचालक
श्री. लिंगारेड्डी अंडेलवार संचालक
श्री. अरविंद ठाकरे संचालक
श्री. सुनिल देठे संचालक
सौ. छायाताई ठाकुरवार -संचालिका
सौ. निमाताई जिवने -संचालिका
श्री .संजय दोरखंडे मुख्य कार्यकारी अधिकारी
• गहाण कर्ज
• सोनेतारण कर्ज
• मुदत ठेव योजना
• आवर्त ठेव योजना
• मासिक ठेव योजना
• आरटीजीएस
• एन ई एफ टी
• एस. एम. एस. बँकिंग
• लॉकर्स
• वैयक्तिक कर्ज
१९८९ पासून आपल्या सेवेत .....
Reg.No. YML/WNI RSR/CO/1142
श्री रंगनाथ स्वामी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. वणी
राम शेवाळकर परिसर,यवतमाळ रोड, वणी ता.वणी जि. यवतमाळ
horangnath@gmail.com, Mo-8446186216,rsnsp.com

|| जय सेवा ||
क्रांतीवीर भगवान
|| जय बिरसा ||
बिरसा मुंडा
जनजाती गौरव दिन
सेवा
सप्ताह
2026
११ नोव्हेंबर ते १८ नोव्हेंबर
अॅड.प्रियदर्शनी विना अशोक उईके
कु.तेजस्विनी विना अशोक उईके
सौ.विना अशोक उईके
प्रा.डॉ. अशोक उईके
मंत्री, आदिवासी विकास विभाग महा.राज्य तथा पालकमंत्री यवतमाळ जिल्हा
भारतीय जनता पार्टी यवतमाळ

जनमाध्यम
Epaper www.janmadhyam.com रविवार, ८ नोव्हेंबर २०२६ एक प्रतिष्ठित सवय

समस्त जनतेला
दियाळी
निमित्त
हार्दिक शुभेच्छा..!!
शुभेच्छुक
श्री प्रवीण भाऊ कासावार
पैनगंगा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष

राजाऊ आर.सी.एम. वंडर वर्ल्ड, मुकूटबन तर्फे
समस्त जनतेला
दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
स्वदेशी आणि दैनंदिन वापराच्या आरोग्यवर्धक वस्तू मार्केटपेक्षा अत्यंत स्वस्त दरात उपलब्ध, प्रत्येक खरेदीवर ५ ते २५% पर्यंत घसघशीत सूट.
(प्रो.प्रा.गायत्री केतन ठाकरे)
श्री राम मंदिर रोड, मुकूटबन
(ता. झरी जामनी, जि. यवतमाळ)
मो. 7350787287

ग्रामपंचायत कार्यालय निमणी
तर्फे
दीपावली
निमित्त
हार्दिक शुभेच्छा..!!
शुभेच्छुक
सरपंच उपसरपंच
सचिव सदस्य

MP BIRLA GROUP
MP BIRLA CEMENT
रीमेंट से घर तक
शुभ
दिवाली
Expert Advice: 1800 123 1117 | 98315 19191

डिलाईट केमीकल्स्
प्रा.लि. गणेशपुर
ता. झरी, जि. यवतमाल
की ओर से
दीपावली
की
हार्दीक
शुभकामनाये

समस्त जनतेला
दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
श्री प्रवीण भाऊ कासावार
पैनगंगा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष
प्राचार्य आर एन देशमुख
कासावार कॉलेज ऑफ फार्मस्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, झरी (जामणी)
प्राध्यापक तथा समस्त कर्मचारी वर्ग राजीव विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय झरी कासावार कॉलेज ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अॅन्ड रिसर्च झरी

जय जगन्नाथ
दीपावलीच्या शुभमुहूर्तावर
आवर्त ठेव (RD)
लखपती योजना
आजची नियमित बचत उद्याचा ₹1 लाखांचा परतावा!
RD लखपती योजनेवर
आकर्षित व्याजदर

मासिक हप्ता	कालावधी	मुदतपूर्ती रक्कम	बोनस
₹1,240	60 महिने	₹1,00,000	₹1,000
₹1,640	48 महिने	₹1,00,000	₹900
₹2,340	36 महिने	₹1,00,000	₹800
₹3,740	24 महिने	₹1,00,000	₹700
₹7,840	12 महिने	₹1,00,000	₹500

EXTRA BONUS
कालावधी संपल्या नंतर अतिरिक्त बोनस
₹1 लाख
निश्चित मुदतपूर्ती परतावा

झरी तालुका काँग्रेस
कमेटी तर्फे
दीपावली
निमित्त
समस्त नागरिकांना
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
मा.श्री. संदिप बुर्रेवार
अध्यक्ष झरी तालुका काँग्रेस कमेटी

झरी (जा) तालुका सह. शेतकी खरेदी विक्री संघ मर्या. झरी मुख्यालय मुकूटबन
समस्त जनतेला
दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
श्री. सुरेश गंगाजी बोनेनवार
अध्यक्ष झरी तालुका खरेदी विक्री संघ
श्री. अनिल रघुनाथ विंचाते
उपाध्यक्ष झरी तालुका खरेदी विक्री संघ
श्री. अरविंद पिंपळकार संचालक
श्री. रमेश उदकवार संचालक
श्री. रविंद्र काळे संचालक
श्री. योगेश बेलेकार संचालक
श्री. संतोष मंदावार संचालक
श्री. संतोष पाईनवार संचालक
श्री. आबदराव मडपावो संचालक
श्री. विठ्ठल पद्मलवार संचालक
सौ. ममता येनगुवार संचालिका
सौ. लताताई सुर संचालिका
कर्मचारीवृंद - श्री. धनराज डोहे, श्री. सुनिल कोटवार, श्री. ऋतु येनगुर्तीवार, श्री. निळकंठ जंगिलवार

घेऊन आलो आहोत, सर्व ग्राहकांकरिता आकर्षक ठेव योजना
मुदत ठेव (FD) योजनेवर
आकर्षित व्याजदर
तुमचे स्वप्ने आम्ही साकार करु

13 महिने	11.00%
15 महिने	11.25%
18 महिने	11.50%

मर्यादित कालावधी करिता
14/09/2026 ते 31/12/2026 पर्यंत
श्री. संजय रामचंद्र खाडे

समस्त जनतेला
दिपावलीच्या
हार्दीक शुभेच्छा
शुभेच्छुक
श्री.निलेशभाऊ येल्टीवार
सरपंच ग्रा.पं.दिग्रस
तथा सरपंच संघटना झरी तालुका

ग्रामपंचायत कार्यालय अडेगाव तर्फे,
समस्त
नागरिकांना
दिवाळी
निमित्त
हार्दिक शुभेच्छा..!!
शुभेच्छुक
सरपंच, उपसरपंच, सचिव व सदस्य

दिवाळी
निमित्त
समस्त नागरिकांना
हार्दिक शुभेच्छा...
शुभेच्छुक
कृषी उत्पन्न बाजार समिती, झरी जामणी, जिल्हा यवतमाळ
ॲड. श्री. राजीव कासावार सभापती उपसभापती मंगेश मोहितकर संचालक मंडळ कर्मचारी

श्री रंगनाथ स्वामी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. वणी
१९८९ पासून आपल्या सेवेत .....
राम शेवाळकर परिसर,यवतमाळ रोड, वणी ता.वणी जि. यवतमाळ
horangnath@gmail.com, Mo-8446186216
मुदत ठेवीवर आकर्षक व्याजदर
आर.डी. खात्यावर व्याजदर १०% पर्यंत
ग्राम दुप्पट फक्त १०२ महिने
शुभ दिपावली
सोनेतारण कर्ज योजना
१० ग्राम सोन्यावर १२८०००/- पर्यंत गोल्ड लोन -अटी आणि शर्ती लागू.
संस्थेचे कार्यक्षेत्र -संपूर्ण महाराष्ट्र
वणी(शहर),मारेगाव,मुकूटबन,घाटंजी,वरोरा,गडचांदूर,बंदरपूर,राजुरा,मूल,भद्रावती,चिमूर,यवतमाळआर्णी,ब्रम्हपुरी,वणी(ग्रामीण) वडसा,नेर,हिंगणघाट,गडचिरोली,गोंडपिपरी,वर्धा

दिवाळी
निमित्त
समस्त नागरिकांना
हार्दिक शुभेच्छा...!
शुभेच्छुक
श्री सतीश आदेवार
शिवसेना (उबाटा) तालुकाप्रमुख झरी जामनी

गृहलक्ष्मी बहुद्देशीय संस्था, द्वारा संचालित
गुरुकुल कॉन्व्हेन्ट, मुकुटबन
दीपावली
निमित्त सर्वांना हार्दिकशुभेच्छा...!
शुभेच्छुक
सर्व संचालक, मुख्याध्यापक, शिक्षक, इतर कर्मचारी, विद्यार्थी आणि सर्व पालकवर्ग

जनमाध्यम
Epaper www.janmadhyam.com रविवार, ८ नोव्हेंबर २०२६ एक प्रतिष्ठित सवय

दिवाळी कथा आणि उत्सव

इतिहासामध्ये ज्या काही महत्वपूर्ण घटना घडल्यात त्यांच्या स्मरणार्थ आज सण साजरे केले जातात. आपण ख्रिसमस साजरा करतो कारण त्या दिवशी काहीतरी महत्वाचे घडले होते. लोक ईद साजरी करतात कारण भूतकाळामध्ये त्यादिवशी काही चांगले घडले होते. असेच उत्सव साजरे होतात.

प्रत्येक सणामागे एखादी गोष्ट आहे किंवा काही खगोलीय महत्व आहे. जसे करवा चौथ- पौर्णिमेचा चौथा दिवस असतो. ज्यामध्ये महिला आपल्या पतीच्या कल्याणासाठी पूर्ण दिवसभर उपवास करतात, त्यानंतर उत्सव साजरा करून उत्तम आहार करतात. हि प्रथा आहे आणि यामागे आणखी कथा आहेत.

दिवाळीच्या कथा

अश्यारितीने दिवाळी जो 'प्रकाशाचा उत्सव' आहे – यामागे देखील खूप कथा आहेत. एक कथा अशी आहे कि याच दिवशी श्रीराम १४ वर्षाचा वनवास संपवून घरी परतले होते.

आणखी एका कथे अनुसार एक दुष्ट व्यक्ती सर्वाना खूप त्रास द्यायचा. त्याचा पराभव झाल्यावर मरताना त्याला त्याची शेवटची इच्छा विचारली. तेंव्हा त्याने सांगितले कि, 'त्याच्या पृथ्वीवरच्या शेवटच्या दिवशी प्रत्येक व्यक्तीने दिवे लावावेत आणि अज्ञानरुपी अंधकार दूर करून त्याच्या मृत्यूचा उत्सव साजरा करावा.' किती सुंदर इच्छा आहे नां, ती देखील हिटलर सारख्या व्यक्तीची ज्याने सर्वांना त्रासच दिला.



श्रीकृष्णाची पत्नी, सत्यभामाने त्याला युद्धात पराजित केले. तो इतका शक्तिशाली होता कि कोणीही पुरुष त्याचा पराभव करू शकत नव्हता. पण जेंव्हा एक महिला त्याच्या समोर आली तेंव्हा त्याने तिच्याकडे दुर्लक्ष केले. त्याने विचार केला, 'एक महिला काय करू शकते?' पण खरे तर त्या महिलेनेच, श्रीकृष्णाच्या पत्नीने त्याचा पराभव केला. या सगळ्या मागे श्रीकृष्णच होते. त्याचे नांव 'नरकासुर' एवढ्या साठी होते कारण तो जेथे जेथे जायचा तेथे तो लोकांना नरकप्राय कष्ट द्यायचा आणि त्या जागेला नरक बनवायचा. मृत्युवेळी त्याला त्याची शेवटची इच्छा विचारली असता त्याने सांगितले, 'माझ्या मृत्यूने सर्वांच्या जीवनात प्रकाश यावा.' मग सर्व लोकांनी जास्तीत जास्त दिवे प्रज्वलित केले, जीवनाचा उत्सव साजरा केला, सारी कटुता विसरून उत्सव साजरा केला. आणि दिवाळी सुरु झाली. अश्या अनेक कथा आहेत.

वारंवार विचारले जाणारे प्रश्न

दिवाळी सण का साजरा केला जातो? यामागील प्रमुख कथा कोणती?

दिवाळी साजरी करण्यामागे अनेक पौराणिक कथा आहेत. त्यातील सर्वात महत्त्वाची कथा म्हणजे प्रभू रामचंद्र १४ वर्षांचा वनवास संपवून आणि रावणाचा पराभव करून अयोध्येला परतले. त्यांच्या स्वागतासाठी अयोध्यावासियांनी संपूर्ण नगर दिव्यांनी उजळवून टाकले होते. हा सण अंधारावर प्रकाशाच्या विजयाचे प्रतीक मानला जातो.

दिवाळी आणि नरक चतुर्दशीचा काय संबंध आहे? नरक चतुर्दशी ही दिवाळीचा एक महत्त्वाचा दिवस आहे. पौराणिक कथेनुसार, भगवान श्रीकृष्णाने अत्याचारी असुर नरकासुराचा वध करून १६,००० स्त्रियांना त्याच्या कैदेतून मुक्त केले होते. वाईट प्रवृत्तींचा नाश आणि सत्याचा विजय साजरा करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. दिवाळीमध्ये माता लक्ष्मी आणि भगवान गणेशाची पूजा का केली जाते?

माता लक्ष्मी ही समृद्धी आणि भाग्याची देवी आहे, तर भगवान गणेश हे बुद्धी आणि अडथळे दूर करणारे दैवत आहेत. आर्ट ऑफ लिव्हिंगनुसार, केवळ संपत्ती असून चालत नाही, तर ती जपण्यासाठी आणि योग्य मार्गाने वापरण्यासाठी सद्बुद्धीची गरज असते. म्हणून दिवाळीत या दोघांची एकत्रित पूजा केली जाते. बलिप्रतिपदा किंवा दिवाळी पाडव्याचे महत्त्व काय आहे?

फराळावर बंधने नकोत, तेल, साखर, मिठावर ठेवा नियंत्रण

'दिवाळीत फराळ खाताना मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार यांसारख्या सहव्याधी असणाऱ्यांसाठी फराळ हा अनेकदा आरोग्याची मोठी चिंता ठरतो. तेल, तूप, साखर, मैदा आणि मिठाच्या अतिवापरामुळे अशा रुग्णांसमोर आहाराचे मोठे बंधन येते. मात्र, फराळ पूर्णपणे वर्ज्य करण्याची आवश्यकता नसून, पदार्थ बनवण्याच्या पद्धतीत योग्य बदल, घटकांचे नियंत्रित प्रमाण आणि वैयक्तिक पथ्यांची काळजी या त्रिसूत्रीचा अवलंब केल्यास सहव्याधीग्रस्तांनाही आरोग्याशी तडजोड न करता दिवाळीच्या फराळाचा मनसोक्त आस्वाद घेता येतो,' असा मोलाचा सल्ला वैद्यकीय आणि आहारतज्ज्ञांनी दिला आहे.



आरोग्यतज्ज्ञांनी सांगितले, 'दिवाळीच्या फराळात मीठ, साखर आणि तेल या तीन घटकांचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे कोणत्या प्रकारची सहव्याधी आहे, यानुसार फराळात बदल करणे आवश्यक आहे. उच्च रक्तदाब असणाऱ्या रुग्णांनी मिठाचे प्रमाण कमी ठेवावे. हृदयविकार, कोलेस्टेरॉल, अँजिओप्लास्टी किंवा हृदयविकाराचा झटका येऊन गेलेल्या रुग्णांनी तेलकट आणि तळलेले पदार्थ मर्यादित प्रमाणात खावेत. मधुमेह असणाऱ्यांनी साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवणे आवश्यक आहे. मधुमेहासह हृदयविकार असणाऱ्यांनी या तिन्ही घटकांबाबत विशेष काळजी घ्यावी.'

तज्ज्ञांनी सांगितले, 'फराळातील पदार्थ पूर्णपणे वर्ज्य करण्याऐवजी त्यांचे प्रमाण आणि बनवण्याची पद्धत बदलणे अधिक फायद्याचे ठरते. उदाहरणार्थ, चकली किंवा इतर तळलेल्या पदार्थांऐवजी भाजलेले किंवा कमी तेलात तयार केलेले पदार्थ निवडता येतात. पदार्थ तयार करताना तळण्याऐवजी भाजण्याच्या पद्धतीचा वापर करण्यावर भर द्यावा. कोणते तेल वापरावे, यापेक्षा तेलाचे एकूण प्रमाण आणि पदार्थ तयार करण्याची पद्धत याकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. तेलाचा वापरही कमी प्रमाणात करावा.'

'पुरेसे पाणी प्या. जेवणानंतर १०–१५ मिनिटे चालण्याची सवय ठेवा. उपाशी राहून फराळ करू नका. कोल्ड ड्रिंक्सऐवजी लिंबूपाणी, ताक किंवा साखर न घातलेले पेय निवडा. फराळासोबत भाजलेले चणे, दही, दूध किंवा मूठभर कडधान्यांचा समावेश करा. दिवसभर हालचाल आणि व्यायाम सुरू ठेवा,' असेही दामले यांनी सांगितले.

आहारतज्ज्ञ डॉ. अवंती दामले यांनी फराळ आरोग्यदायी व्हावा, यासाठी काही महत्त्वाचे बदल सुचवले आहेत. बेक्ड चकलीला पसंती : चकली तळण्याऐवजी बेक्ड चकलीचा पर्याय निवडा. भाजणीमध्ये नाचणी, ज्वारी आणि बाजरीचा समावेश करा. करंजीत गुळाचा वापर : साखरेऐवजी मर्यादित प्रमाणात गूळ वापरा. सारणात सुके खोबरे, बदाम आणि अक्रोड घाला. लाडूंचे विविध पर्याय : बेसन, रवा लाडूंबरोबर डिंक, मेथी, तीळ आणि सुक्या मेव्याचे लाडू खा. साखर आणि तुपाचे प्रमाण कमी ठेवा. चिवड्यात पौष्टिक घटक : पोह्यांमध्ये भाजलेले शेंगदाणे, डाळं, कढीपत्ता आणि विविध बियांचा समावेश करा. मिठाईचे प्रमाण मर्यादित : श्रीखंड, बासुंदी आणि पेढे यांचे छोटे भाग घ्या.

दिवाळीचा फराळ हा निश्चितच आरोग्यदायी होऊ शकतो. यामध्ये काही फेरबदल करणे आवश्यक आहे. मिठाचे प्रमाण कमी ठेवल्यास उच्च रक्तदाब असणाऱ्यांनादेखील फराळाचा आस्वाद घेता येईल. पदार्थ तळून खाण्यापेक्षा जर भाजण्याचा पर्याय मिळत असेल, तर तो स्वीकारावा. तसेच, आपली नियमित औषधे घेऊन व्यायामाचीही जोड द्या. – डॉ. हेमंत कोकणे. हृदयरोगतज्ज्ञ, ससून सर्वोपचार रुग्णालय

दिवाळीचा फराळ घेताना मधुमेही रुग्णांनी विशेष काळजी घ्यायची आवश्यकता आहे. फराळामध्ये खजूर, मध याचा वापर करता येऊ शकतो. गुळाचाही कमीत कमी वापर केल्यास दिवाळीच्या फराळाचा आस्वाद मधुमेही रुग्णसुद्धा घेऊ शकतात.

– डॉ. सचिन पंडित, मधुमेहतज्ज्ञ

दिवाळीच्या दिवशी करा हे पाच सोपे उपाय

दिवाळी हा प्रकाश आणि आनंदाचा उत्सव असतो, हिंदू धर्मातील सर्वात मोठा सण म्हणजे दिवाळी, प्रत्येक जण दिवाळी सणाची अतुरतेनं वाट पाहत असतो. दरवर्षी कार्तिक महिन्यामध्ये दिवाळीचा हा सण येतो. या वर्षी वीस ऑक्टोबरपासून दिवाळीला सुरुवात होत आहे. दिवाळीच्या दिवशी माता लक्ष्मी आणि भगवान गणेश यांची पूजा केली जाते. वास्तुशास्त्रानुसार दिवाळीच्या दिवशी काही सोपे उपाय केल्यास घरातील आर्थिक समस्या दूर होतात, लक्ष्मी मातेचं घरात आगमन होतं. लक्ष्मी मातेच्या कृपेनी घरात सुख, समृद्धी येते. अशाच काही उपायांबाबत आज आपण माहिती जाणून घेणार आहोत.



दिवाळीच्या दिवशी सकाळी घराची स्वच्छता केल्यानंतर संपूर्ण घरात कच्च दूध, केशर, हळद आणि गंगाजल यांचं मिश्रण करून संपूर्ण घरात शिंपडायला पाहिजे, यामुळे लक्ष्मी माता प्रसन्न होते.

दिवाळीच्या दिवशी घराच्या मुख्य दरवाजाला आंबा आणि झेंडूंच्या फुलांपासून बनवलेलं तोरण बांधावं, आंब्यांच्या पानांचं तोरण हे खूप शुभ मानलं जातं, त्यामुळे घरातून नकारात्मक ऊर्जा नष्ट होते. घरात सुख शांती येते.

दिवाळीच्या दिवशी तुमच्या घरातील पूर्वजांच्या नावाने काही धान्य, दूध आणि मिठाई दान करावी, त्यामुळे पित्रांना समाधान लाभतं, तसेच लक्ष्मी मातेचा आशीर्वाद सदैव तुमच्यावर राहतो.



दिवाळीच्या दिवशी सायंकाळच्या वेळी महादेवाच्या मंदिरामध्ये शिवलिंगासमोर एक शुद्ध तुपाचा दिवा लावला पाहिजे, वास्तुशास्त्रानुसार दिवाळीच्या दिवशी महादेवाच्या मंदिरात दिवा लावल्यानं घरातील पितृदोष दूर होतो, घरात शांतता राहते.

दिवाळीच्या दिवशी घरातील सर्व प्रकारची नकारात्मक ऊर्जा दूर करण्यासाठी तुम्ही जेव्हा सकाळी घराची साफ सफाई करता, तेव्हा त्या पाण्यामध्ये थोडसं मीठ टाकलं पाहिजे, त्यामुळे घरातील नकारात्मक ऊर्जा दूर होते, वास्तुदोष दूर होतो, असं मानलं जातं. नकारात्मक ऊर्जा नष्ट झाल्यामुळे घरात सूख शांती येते.

(वरील माहिती उपलब्ध स्त्रोतावरून देण्यात आलेली आहे. याच्या तथ्यांबद्दल आम्ही कुठलाही दावा करीत नाही, तसेच अंधश्रद्धेला दुजोरा देत नाही)

पौराणिक महत्व.....

हिंदू धर्मात प्रत्येक सणाने बऱ्याच धार्मिक मान्यता आणि कथा जोडलेल्या आहेत. दिवाळीबद्दल देखील दोन पौराणिक कथा प्रचलित आहे.कार्तिक अमावास्येच्या दिवशी भगवान श्रीराम चौदा वर्षानंतर वनवास करून आणि लंकापती रावणचा नाश करून अयोध्या आले होते. या दिवशी भगवान राम यांच्या अयोध्येत आगमनाच्या आनंदाने लोकांनी दिवे लावून उत्सव साजरा केला होता. तेव्हा पासून दिवाळीची सुरवात झाली. एक अन्य कथेनुसार नरकासुर नावाच्या राक्षसाने आपल्या असुर शक्तींनी देवता आणि ऋषींना खूप त्रास दिला होता. या राक्षसाने साधू संतांच्या सोळा हजार स्त्रियांना बंदी बनवले होते. नरकासुरच्या वाढत्या अत्याचाराने चिंतीत देवी - देवता आणि साधू-संतांनी भगवान श्री कृष्णाकडे मदत मागितली. भगवान श्री कृष्णाने नरक चतुर्दशीला नरकासुराचा वध करून सर्वांना



त्याच्या आतंकाने मुक्ती दिली. सोबतच सोळा हजार स्त्रियांना मुक्त केले. याच्या आनंदात दुसऱ्या दिवशी म्हणजे कार्तिक महिन्याच्या अमावास्येला लोकांनी आपल्या घरात दिवे लावले. तेव्हा पासून नरक चतुर्दशी आणि दीपावलीचा सण साजरा केला जातो.

या व्यतिरिक्त दिवाळीला घेऊन अजून पौराणिक कारणं आहेत- धार्मिक मान्यतेनुसार ह्या दिवशी भगवान विष्णूने राजा बळीला पातळ लोकांचा स्वामी बनवले होते आणि इंद्राने स्वर्गाला सुरक्षित पाहून आनंदात दिवाळी साजरी केली होती. याच काळात समुद्र मंथनाच्या काळात क्षिरसागराने लक्ष्मी प्रगट झाली होती आणि त्यांनी भगवान विष्णूला पतीच्या स्वरूपात स्वीकार केले होते.

दिवाळीत फटाके फोडताना काळजी घ्या

दिवाळीला आता मोठ्या जल्लोषात सुरुवात झाली आहे. दिवाळीचा उत्साह अगदी कणाकणांत पसरलेला दिसतो. कित्येक जणांसाठी दिवाळीचं मुख्य आकर्षण म्हणजे भरपूर फटाके आणि आतिषबाजी.. अगदी सर्वसामान्य कुटूंबामध्येही हजारो रुपयांचे फटाके आणून उडवले जातात. यात बच्चे कंपनीचा उत्साह अगदी भराला आलेला असतो. याच उत्साहापायी कधी कधी पोळणे, चटका बसणे अशा काही दुर्घटना घडतात. यामुळे मग दिवाळीचा सगळा उत्साहच मावळून जातो. हे टाळायचं असेल तर दिवाळीत फटाके फोडताना पुढे सांगितलेल्या काही गोष्टींची काळजी घ्या.

दिवाळीत फटाके फोडताना कोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी?

१. सगळ्यात पहिली गोष्ट म्हणजे दिवाळीच्या दिवसांत सुती कपडे घाला. तसेच ते पुर्ण बाह्यांचे तसेच संपूर्ण अंग झाकलेले हवे. कारण फटाक्याची ठिणगी अंगावर उडाली तर चटका बसण्याची भीती असते.

२. दुसरी गोष्ट म्हणजे जेव्हा तुम्हाला फटाके उडवायचे असतील तेव्हा पॉलिस्टर,



नायलॉन असे कपडे घालणं टाळावं. कारण हे कपडे खूप लवकर आग पकडतात. त्यामुळे भाजण्याच्या, पोळण्याच्या शक्यता वाढतात. शिवाय या कपड्यांनी आग पकडली तर ते थेट अंगाला चिटकून बसतात.

३. फटाके नेहमी मोकळ्या जागेत जाऊन फोडा. जेणेकरून तिथे फटाका पेटवून लगेच दूर अंतरावर पळता येते. अडचणीच्या भागात, गर्दीमध्ये फटाके फोडणं पुर्णपणे टाळा.

धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर घेण्यासाठी सोन्याचे लाईटवेट कानातले, खिशाला परवडणाऱ्या किमतीत सुंदर डिझाईन्स

४. फटाके पेटवताना चेहरा नेहमी दूर ठेवा. एखादा फटाका पेटला आहे की नाही हे बघण्यासाठी त्याच्या जवळ जाऊन बघू नका. कारण अशावेळी एकदम फटका फुटतो आणि संपूर्ण चेहराच भाजू शकतो. डोळे निकामी होऊ शकतात.

जनमाध्यम
Epaper www.janmadhyam.com रविवार, ८ नोव्हेंबर २०२६ एक प्रतिष्ठित सवय

दिवाळीचे आध्यात्मिक महत्व .....

'आज प्रकाशाचा सण आहे. दिवाळी म्हणजे प्रकाशाचा सण. येथील प्रत्येकजण प्रकाश आहे. हा सण सर्व भारत, नेपाळ, सिंगापूर, मलेशिया, श्रीलंका, इंडोनेशिया, मॉरीशस, सुरीनाम, त्रिनिदाद आणि दक्षिण आफ्रिका मध्ये साजरा केला जातो. लोक एकमेकांना दिवाळीच्या शुभेच्छा देतात आणि फराळ, मिठाई वाटतात. दिवाळीच्या दरम्यान आपण आपली गत काळातील दुःखे विसरून जातो. डोक्यात जे भरले गेले असते ते फटाके वाजवतो आणि सारे काही विसरून जातो. फटाक्यांप्रमाणे गत काळ देखील जळून जातो, नष्ट होतो आणि आपले मन नवीन नूतन बनते. हि दिवाळी होय. फक्त दिवे आणि मेणबत्त्या लाऊन काही होणार नाही तर आपणा प्रत्येकाला आनंदी आणि प्रज्वलित व्हावे लागेल. प्रत्येकाला आनंदी आणि बुध्दीवान बनावे लागेल. बुद्धीमत्तेचा प्रकाश प्रज्वलित झाला आहे. प्रकाशाला ज्ञान रुपी प्रकाश बणऊन त्याचा प्रसार करूया आणि आज उत्सव साजरा करूया – तुम्ही काय म्हणता?

भूतकाळाला जाऊ द्या, विसरून जा. आपल्या विद्वत्तेने जीवन एक उत्सव बनवूया. वास्तविक बुध्दीमत्तेशिवाय उत्सव साजरा होऊ शकत नाही. 'ईश्वर माझ्यासोबत आहे' हे जाणणे, हीच बुध्दीमत्ता आहे. आपल्याकडे जी काही संपत्ती, संपदा आहे तिचे आज दर्शन घ्या. ध्यानात घ्या कि आपण संपन्न आहोत आणि पूर्णत्वाचा अनुभव घ्या. नाहीतर मन सतत अभावामध्ये राहील. 'अरेरे..हे नाही..ते नाही, या साठी दुःखी आहोत, त्यासाठी दुःखी आहोत.'

संपत्तीच्या अभावाकडून समृध्दीकडे वळा. प्राचीन परंपरा आहे कि आपण आपल्या समोर सोन्या चांदीची नाणी ठेवतो, सारी संपत्ती ठेवतो आणि म्हणतो, 'पहा, ईश्वराने मला कितीतरी दिलेले आहे आणि या सर्वा प्रती मी कृतज्ञ आहे.' अशी समृध्दी अनुभवा. मग ध्यानात येईल कि तुम्हाला किती आणि काय काय दिले आहे.मग आपण धन आणि ऐश्वर्याची देवता लक्ष्मीची पूजा करतो. आपल्या मार्गातील अडथळे नाहीसे करणाऱ्या विघ्नहर्त्या गणेशाची पूजा करतो. त्यांचे स्मरण करतो.



युरोप मध्ये २७ देश आहेत. प्रत्येक देशासाठी एकेक दिवा लाऊन काहीकाळ ध्यान करूया. आपण ध्यान करतो म्हणजे विशाल आणि सर्व समावेशक आत्म्याला आपल्या समृध्दी आणि संपन्नतेबध्दल कृतज्ञता व्यक्त करत असतो, धन्यवाद देत असतो.

आणखी प्राप्तीसाठी देखील प्रार्थना करत असतो, ज्यामुळे आपण आणखी सेवा करू शकू. सोने चांदी हि बाह्य प्रतीके आहेत. खरी संपत्ती आपल्या आंत आहे. आंत खूप सारे प्रेम, शांती आणि आनंद आहे. यापेक्षा ज्यादा आणखी काय हवे. विद्वत्ता खरे धन आहे. आपले चारित्र्य, आपली शांती आणि आपला आत्मविश्वास-हीच खरी संपत्ती आहे. जेंव्हा तुम्ही ईश्वराच्या सानिध्यात असून प्रगती करत असता तेंव्हा यापेक्षा वेगळी संपत्ती असूच शकत नाही. हा श्रेष्ठ विचार तुम्हाला तेंव्हाच सुचतो जेंव्हा तुमचे ईश्वराशी आणि त्या अनंततेशी तादात्म्य झालेले असते. जेंव्हा लाटेला याची अनुभूती होते कि ती सागराशी संलग्न आहे आणि तिचाच हिस्सा आहे – तेंव्हा तिला एक विशाल शक्ती प्राप्त होते.'दिवाळी हा सण 'अंधारावर प्रकाशाचा' आणि 'अज्ञानावर ज्ञानाचा' विजय दर्शवतो. पौराणिक कथेनुसार, प्रभू श्रीराम १४ वर्षांचा वनवास संपवून अयोध्येत परतले होते, त्या आनंदाप्रीत्यर्थ लोकांनी दिवे लावून त्यांचे स्वागत केले. तसेच, हा सण आंतरिक प्रकाशाला जागृत करण्याचे प्रतीक मानला जातो.दिवाळी हा सण पाच दिवसांचा उत्सव आहे, ज्यातील प्रत्येक दिवसाचे विशेष महत्त्व आहे:१. धनत्रयोदशी: धन्वंतरी देवाचे पूजन आणि समृद्धीसाठी प्रार्थना.२. नरक चतुर्दशी: वाईट प्रवृत्तींचा नाश आणि शरीराची शुद्धी (अभ्यंगस्नान).३. लक्ष्मीपूजन: ज्ञान आणि ऐश्वर्याची देवी लक्ष्मीची पूजा.४. बलीप्रतिपदा (पाडवा): नवीन सुरुवात आणि दातृत्वाचे प्रतीक.५. भाऊबीज: भाऊ आणि बहिणीच्या पवित्र प्रेमाचा सण.

दिवाळीमध्ये दिव्यांचे काय महत्त्व आहे?

दिवाळीतील 'दिवा' हा केवळ बाहेरचा अंधार दूर करत नाही, तर तो आपल्या मनातील नकारात्मकता, मत्सर आणि भीती दूर करण्याचे प्रतीक आहे. दिव्यांची ओळ (आवली) आपल्याला एकजुटीने राहण्याचा संदेश देते.आध्यात्मिक भाषेत, दिवाळी म्हणजे स्वतःच्या आत डोकावून पाहणे. आपल्यातील 'सत्व' गुणाचा विकास करणे आणि अज्ञानाचा अंधार दूर करून ज्ञानाचा प्रकाश पसरवणे, हा या सणाचा मूळ उद्देश आहे.

आर्ट ऑफ लिविंगच्या मते, उत्सव हा केवळ बाह्य नसून तो मनाचा नैसर्गिक स्वभाव असावा.

भाऊबीजेला भावाला ओवाळण्यासाठी पूजेच्या....



भाऊबीजेचा सण हा बहीण-भावामधील प्रेम, विश्वास आणि अतूट बंधाचे प्रतीक मानला जातो. दिवाळीनंतर दोन दिवसांनी येणारा हा सण कार्तिक महिन्यातील शुक्ल पक्षाच्या द्वितीया तिथीला साजरा केला जातो.

या दिवशी बहिणी आपल्या भावांच्या कपाळावर टिळक लावतात आणि त्यांच्या सुख, समृद्धी, दीर्घायुष्य व उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना करतात. त्या बदल्यात, भाऊ आपल्या बहिणीचे रक्षण करण्याचे आणि त्यांच्या आयुष्यभराच्या आनंदाची काळजी घेण्याचे वचन देतात. धार्मिक मान्यतेनुसार, या दिवशी विधीवत पूजा करणे आणि भावाच्या कपाळावर टिळक लावणे विशेष महत्त्वाचे मानले जाते. परंतु भाऊबीजेच्या पूजेच्या ताटात कोणत्या वस्तू असाव्यात, हे तुम्हाला माहीत आहे का? चला तर मग, आवश्यक वस्तू आणि त्यांचे धार्मिक महत्त्व जाणून घेऊया.

भाऊबीजेच्या पूजेच्या ताटातील आवश्यक वस्तू:

१. रोळी किंवा कुंकू- भाऊबीजेच्या पूजेच्या ताटात 'रोळी' किंवा 'कुंकू' ही सर्वात महत्त्वाची वस्तू मानली जाते. बहिणी याचा वापर करून भावाच्या कपाळावर टिळक लावतात. धार्मिक परंपरेनुसार, टिळक लावणे हे शुभत्व, आदर आणि शुभेच्छांचे प्रतीक मानले जाते.

२. अक्षता-रोळीसोबतच पूजेच्या ताटात 'अक्षता' (अखंड तांदूळ) असणे आवश्यक आहे. टिळक लावल्यानंतर भावाच्या कपाळावर अक्षता लावल्या जातात. हिंदू धर्मात अक्षतांना पूर्णत्व, समृद्धी आणि शुभतेचे प्रतीक मानले जाते.

३. दिवा आणि तूप-पूजेच्या ताटात एक छोटा दिवा नक्की ठेवावा. यात तूप किंवा तेल घालून दिवा प्रज्वलित करा आणि त्यानंतर आपल्या भावाची आरती करा. हा दिवा सकारात्मकतेचे आणि अंधाराकडून प्रकाशाकडे जाण्याचे प्रतीक मानला जातो.

४. फुले-भाऊबीजेच्या पूजेत फुलांना विशेष महत्त्व आहे.

गोवर्धन पूजेसाठी घरी अन्नकूट

गोवर्धन पूजेचा सण दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी अत्यंत श्रद्धा आणि उत्साहाने साजरा केला जातो. हिंदू धर्मात या दिवसाला विशेष धार्मिक महत्त्व आहे. गोवर्धन पूजेला 'अन्नकूट' उत्सव असेही म्हणतात. या दिवशी भगवान श्रीकृष्ण, गोवर्धन पर्वत आणि गाईची पूजा केली जाते. असे मानले जाते की, या दिवशी भगवान श्रीकृष्णाला 'अन्नकूट' (विविध खाद्यपदार्थांचा नैवेद्य) अर्पण केल्याने घरात सुख-समृद्धी येते आणि कुटुंबावर ईश्वराची कृपा सदैव राहते. चला तर मग, घरी 'अन्नकूट' कसा तयार करावा आणि त्याचे धार्मिक महत्त्व काय आहे, हे जाणून घेऊया.



'अन्नकूट' म्हणजे विविध प्रकारच्या अन्नधान्यांपासून बनवलेल्या पदार्थांचा समूह. गोवर्धन पूजेच्या दिवशी भगवान श्रीकृष्णाला अर्पण करण्यासाठी अनेक प्रकारचे पदार्थ तयार करण्याची परंपरा आहे. यामध्ये हंगामी भाज्या, डाळी, भात, कढी, पुरी, मिठाई आणि इतर विविध खाद्यपदार्थांचा समावेश असतो. धार्मिक मान्यतेनुसार, द्वापार युगात भगवान श्रीकृष्णाने ब्रजवासीयांचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांना इंद्रदेवाच्या कोपापासून वाचवण्यासाठी गोवर्धन पर्वत आपल्या करंगळीवर उचलला होता. तेव्हापासूनच भगवान श्रीकृष्णाला 'अन्नकूट' अर्पण करण्याची प्रथा सुरू झाली. हा सण निसर्ग, अन्नधान्य आणि गाय (गोमाता) यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचेही एक माध्यम आहे.

'अन्नकूट' तयार करण्यासाठी कशाची आवश्यकता असते?

घरी 'अन्नकूट' तयार करण्यासाठी तुम्ही तुमच्या श्रद्धेनुसार आणि सोयीनुसार विविध पदार्थ बनवू शकता. यामध्ये तुम्ही बटाटा, फ्लॉवर, मटार, गाजर, वांगी, दुधी भोपळा, फरसबी आणि टोमॅटो यांसारख्या हंगामी भाज्यांचा वापर करू शकता. याव्यतिरिक्त, तुम्ही तांदूळ, डाळी, बेसन, दही, गव्हाचे पीठ आणि तूप यांसारख्या साहित्याचाही समावेश करू शकता. 'अन्नकूट'साठी अनेक प्रकारचे पदार्थ बनवले जातात; विशेषतः मिश्र भाजी, कढी, डाळ, भात, पुरी, हलवा, खीर, लाडू आणि पेढे यांचा यात प्रामुख्याने समावेश असतो. तुम्ही देवाला फळे, मखाणे, खडीसाखर आणि पंचामृतही अर्पण करू शकता.

'अन्नकूट' भाजी कशी तयार करावी?

'अन्नकूट' भाजी बनवण्यासाठी, सर्वप्रथम तुमच्या आवडीच्या मोसमी भाज्या स्वच्छ धुवून त्यांचे छोटे तुकडे करून घ्या.

एका मोठ्या भांड्यात थोडे तूप गरम करा आणि त्यात जिरे, हिंग व सौम्य मसाले घाला. त्यानंतर, सर्व चिरलेल्या भाज्या घालून नीट मिसळा. चवीनुसार मीठ, हळद आणि धणे पूड टाका. थोडे पाणी घालून भांडे झाकून ठेवा आणि भाज्या शिजू द्या. भाज्या पूर्णपणे शिजल्यावर त्यावर ताजी कोथिंबीर घाला. लक्षात ठेवा की, देवाला अर्पण करण्यासाठी तयार केलेला नैवेद्य 'सात्त्विक' (शुद्ध) असावा; त्यात कांदा किंवा लसूण वापरू नका.

'अन्नकूट' अर्पण करण्याची योग्य पद्धत

गोवर्धन पूजेच्या दिवशी सकाळी स्नान करून घरातील देवघर स्वच्छ करा. त्यानंतर, भगवान श्रीकृष्ण आणि गोवर्धन महाराजांची पूजा करा. देवाला फुले, धूप, दिवा आणि नैवेद्य अर्पण करा. तयार केलेले सर्व पदार्थ एकत्र करून भगवान श्रीकृष्णासमोर ठेवा. धार्मिक परंपरेनुसार, नैवेद्य अर्पण करताना आपल्या कुटुंबाच्या सुख, शांती आणि समृद्धीसाठी देवाला प्रार्थना करावी.



पूजेनंतर, तयार केलेले अन्न 'प्रसाद' म्हणून कुटुंबातील सदस्यांमध्ये आणि इतरांमध्ये वाटावे.

'अन्नकूट' उत्सवाचे धार्मिक महत्त्व

अन्नकूट' उत्सव आपल्याला अन्नाचा आदर करायला आणि निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करायला शिकवतो. गोवर्धन पर्वताच्या पूजेला प्रोत्साहन देऊन, भगवान श्रीकृष्णाने आपल्या जीवनातील निसर्गाचे—पर्वत, वनस्पती, प्राणी आणि जल—महत्त्व अधोरेखित केले. 'अन्नकूट' अर्पण करणे ही केवळ एक धार्मिक परंपरा नाही, तर ती समुदाय, सेवा आणि दातृत्वाचे प्रतीकही आहे.

म्हणूनच, गोवर्धन पूजेच्या निमित्ताने तुमच्या भक्तीनुसार आणि क्षमतेनुसार 'अन्नकूट' तयार करा आणि सर्वांसोबत प्रसाद वाटा.

धन, आरोग्य आणि प्रकाशाची पहाट....

दिवाळी म्हटलं की डोळ्यासमोर येतात ते दिवे, फटाके आणि आनंद. पण या पाच दिवसांच्या महापर्वाची सुरुवात होते ती धनत्रयोदशीने. आश्विन महिन्याच्या कृष्ण पक्षातील त्रयोदशीला येणारा हा सण यंदा सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. याला धनतेरस असंही म्हणतात.

धनत्रयोदशी मागची पौराणिक कथा - समुद्रमंथनाचे रहस्य

पौराणिक कथेनुसार जेव्हा देव आणि दानवांनी मिळून समुद्रमंथन केले, तेव्हा त्या समुद्रातून १४ रत्ने बाहेर आली. त्या चौदा रत्नांपैकी एक होते भगवान धन्वंतरी. शरद पौर्णिमेनंतर येणाऱ्या त्रयोदशीला भगवान धन्वंतरी हातात अमृताने भरलेला कलश घेऊन प्रकट झाले.

ते आयुर्वेदाचे प्रवर्तक मानले जातात. त्यामुळे या दिवसाला ङधन्वंतरी जयंतीङ सुद्धा म्हणतात. आरोग्य हेच खरे धन आहे, हे सांगणारा हा दिवस आहे.

त्याच समुद्रमंथनातून देवी लक्ष्मी आणि कुबेर महाराज सुद्धा प्रकट झाले. म्हणून धनाची देवता म्हणून या दिवशी लक्ष्मी-कुबेर पूजनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

यमदीपदानाची प्रथा - मृत्यूवर विजय

धनतेरस शी एक हृदयस्पर्शी कथा जोडलेली आहे. राजा हिमाच्या १६ वर्षाच्या मुलाच्या कुंडलीत लग्नाच्या चौथ्या दिवशी सर्पदंशाने मृत्यू लिहिला होता. त्या दिवशी त्याच्या पत्नीने पतीला झोपू दिले नाही. तिने घराच्या दारात सोन्या-चांदीच्या ढिगाऱ्याची रास लावली आणि सर्वत्र दिवे लावले. ती रात्रभर पतीला गोष्टी सांगत जागी राहिली.



जेव्हा यमदूत सापाच्या रूपात आले, तेव्हा सोन्या-चांदीच्या चकाकीने आणि दिव्यांच्या प्रकाशाने त्यांचे डोळे दिपले आणि ते घरात प्रवेश करू शकले नाहीत. अशा प्रकारे तिने आपल्या पतीचे प्राण वाचवले. तेव्हापासून धनतेरसच्या दिवशी यमदेवाला दक्षिण दिशेला दिवा लावण्याचीङ प्रथा सुरू झाली, ज्याला यमदीपदान म्हणतात. यामुळे अकाली मृत्यू टळतो अशी श्रद्धा आहे.

धन म्हणजे संपत्ती आणि तेरस म्हणजे त्रयोदशी.

या दिवशी केलेली खरेदी तेरा पटीने वाढते अशी मान्यता आहे. म्हणूनच या दिवशी लोक सोने, चांदी, नवीन भांडी, इलेक्ट्रॉनिक वस्तू, वाहन, घर, जमीन खरेदी करतात. विशेषतः सोन्या-चांदीच्या नाण्यांवर लक्ष्मी-गणेशाची प्रतिमा असते.

व्यापारी वर्गासाठी हा सर्वात मोठा दिवस. ते आपल्या दुकानाची, तिजोरीची आणि हिशेबाच्या वह्यांची (चोपडा पूजन) पूजा करतात. नवीन व्यवसायाची सुरुवात या दिवशी शुभ मानली जाते.

पूजा विधी कसा करावा?

१. सकाळी लवकर उठून अभ्यंग स्नान करावे.

२. संध्याकाळी शुभ मुहूर्तावर घराच्या ईशान्य कोपऱ्यात लक्ष्मी, कुबेर आणि धन्वंतरी यांची स्थापना करावी.

३. तेरा दिवे लावावेत. एक दिवा यमासाठी घराबाहेर दक्षिणेकडे तोंड करून लावावा.

४. सोने, चांदी, पैसे, तिजोरी यांची हळद-कुंकू वाहून पूजा करावी.

५. 'ओम धन्वंतराये नमः' आणि 'ओम श्री लक्ष्मी कुबेराय नमः' या मंत्राचा जप करावा.

आजच्या काळात धनतेरसचा संदेश

आजच्या धावपळीच्या जीवनात आपण फक्त पैशाच्या मागे धावतो, पण खरं धन म्हणजे आरोग्य.

कोरोना काळाने आपल्याला हेच शिकवले. त्यामुळे या धनतेरसला फक्त सोनं-चांदी नाही, तर चांगल्या आरोग्याची, चांगल्या विचारांची आणि चांगल्या नात्यांची प्रार्थना करूया.

पूजनाचा दिव्य सण...

प्रकाशाचा सण दिवाळी आहे, पण या सणाची खरी सुरुवात होते ती कृतज्ञतेने. आणि कृतज्ञतेचा पहिला दिवस म्हणजे वसुबारस. आश्विन कृष्ण द्वादशीला साजरा होणारा हा सण संपूर्ण महाराष्ट्रात विशेषतः ग्रामीण भागात मोठ्या भक्तीभावाने साजरा केला जातो.१. वसुबारस म्हणजे काय?वसु म्हणजे द्रव्य, धन आणि बारस म्हणजे द्वादशी. वसुबारसला गोवत्स द्वादशी असेही म्हणतात. या दिवशी गाय आणि तिच्या वासराची पूजा केली जाते. भारतीय संस्कृतीत गायीला गोमाता म्हटले आहे. ती ३३ कोटी देवतांचे वास्तव्य असलेली माता मानली जाते.२. पौराणिक कथा - समुद्रमंथन आणि कामधेनूसमुद्रमंथनातून ५ कामधेनू गायी बाहेर आल्या होत्या, त्यांचे नाव नंदा, सुभद्रा, सुरभी, सुशीला आणि बहुला. या गायी ऋषींना देण्यात आल्या. या गायी इच्छा पूर्ण करणाऱ्या होत्या. त्यांची आठवण म्हणून वसुबारसला गायीची पूजा केली जाते. अशीही कथा आहे की भगवान श्रीकृष्णाने गोवर्धन पर्वत उचलून गायींचे रक्षण केले, त्याची कृतज्ञता म्हणून हा सण साजरा होतो.३. शेतकऱ्याचा खरा मित्रमहाराष्ट्र हा शेतकऱ्यांचा प्रदेश. विदर्भात, अचलपूर तालुक्यात बैल आणि गाय हे शेतकऱ्याच्या कुटुंबाचाच भाग आहेत. वसुबारस हा शेतकऱ्याने आपल्या गोमातेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. या दिवशी गायीला पुरणपोळीचा नैवेद्य दिला जातो. तिच्या पायावर पाणी टाकून तिला हळद-कुंकू लावले जाते. तिच्या गळ्यात सुंदर माळा घातल्या जातात.या दिवशी चुकूनही गायीच्या दुधापासून बनलेले पदार्थ खात नाहीत.



तिच्या वासराला उपाशी ठेवून दूध काढणे हे पाप मानले जाते. हा सण आपल्याला शिकवतो की, प्राण्यांवर दया करा, त्यांच्याशी प्रेमाने वागा.४. पूजा विधीसकाळी लवकर उठून गायीच्या गोठ्याची स्वच्छता केली जाते.

रांगोळी काढली जाते. गाय आणि वासराला आंघोळ घालून त्यांना सजवले जाते. त्यांच्या कपाळाला कुंकू, शिंगांना बेगड लावले जाते. त्यानंतर त्यांची आरती केली जाते आणि त्यांना गोड नैवेद्य दिला जातो. घरातील महिला आपल्या मुलांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करतात.

जनमाध्यम
Epaper www.janmadhyam.com रविवार, ८ नोव्हेंबर २०२६ एक प्रतिष्ठित सवय

वर्धा आणि अमरावती जिल्ह्यातील सर्व नागरिकांना
दिवाळीच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा
सर्व नागरिकांना दिवाळी सुख समृद्धीचे जावो ही सदिच्छा...
शुभेच्छुक
खासदार अमर शरदराव काळे
वर्धा लोकसभा मतदार संघ

वर्धा अर्बन
अॅण्ड रुरल को-ऑप. क्रेडीट सोसायटी मर्या., वर्धा
मल्टीस्टेट
सर्व सभासद खातेदारांना दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा
Realize your dreams with Gold Loan ....
सोने तारण कर्ज
सोने ठेवा व झटपट कर्ज मिळवा
* कमी व्याजदर * अत्यल्प वेळेत कर्ज सुविधा उपलब्ध * संपूर्ण संगणकीकृत कार्यप्रणाली
भाग्यलक्ष्मी ठेव 201 दिवसाकरिता 10%
तुमच्या गरजा - आमची जबाबदारी / आजच संपर्क करा !

नगर परिषद वर्धा जि. वर्धा
आरोग्य व पाणी पुरवठा विभाग
जाहीर आवाहन
सर्व नागरिकांना याद्वारे विनंती करण्यात येते की, दिवाळी उत्सव स्वच्छ दिवाळी म्हणून साजरा करण्याकरिता पुढील प्रमाणे सहकार्य करावे!
1) शक्यतोवर हवा प्रदुषण व ध्वनी प्रदुषण टाळण्यासाव फटाके विरहित दिवाळीचा सण साजरा करण्याचा प्रयत्न करावा.
2) पाण्याचा अपव्यय टाळून, आवश्यक तेवढेच पाणी वापरुन, पाणी बचत हीच काळाची गरज ओळखून.
